सत्यमेव जयते

# सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2011-2012

सह संचालक, (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा,
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी 2011-2012 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफारीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका या संस्थेचा सन 2011-2012 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

---

जा.क्र.: स्था/१८ ब/सांमिकु/उवि२/597

सहसंचालक, (म.न.पा.ले.प.),
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापूर),
नवी मुंबई.४००६१४
दिनांक :- 19th Oct 2013

प्रति,
आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
सांगली- ४१६४१६

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकाचे आर्थिक वर्ष 2011-2012 या वर्षाचे लेखा परीक्षण श्री.एस.बी.कैंबळे, सहा.संचालक (म.न.पा.ले.प.) नवी मुंबई यांनी दिनांक 21/11/2012 ते 22/07/2013 या कालावधीत पूर्ण केले. श्री. सिताराम काळे उप संचालक (म.न.पा.ले.प.) उपविभाग दोन, यांनी अहवालाचे पुनर्विलोकन केले व श्री. चंद्रशेखर बिवलकर सह. संचालक (म.न.पा.ले.प.), नवी मुंबई यांनी दिनांक 05/09/2013 रोजी श्री. संजय देगावकर, आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करून अहवालाचे अंतिमीकरण केले. लेखा परीक्षण अहवालाच्या कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

श्री. इद्रिस इलीयास नायकवडी महापौर: दिनांक 01 / 04 /2011 ते 31 / 03 /2012

श्री. मकरंद सुधाकर देशपांडे, सभापती, स्थायी समिती : दिनांक 01 / 04 /2011 ते 31 / 03 /2012

श्री. द.प.मेतके आयुक्त : दिनांक 01 / 04 /2011 ते 31 / 03 /2012

# अनुक्रमणिका


I **भाग १**....................................................................................................................................... **3**

मागील लेखा परीक्षण अहवाल........................................................................................................ 3

**कलम ९ अ खालील आक्षेप**.................................................................................................................. **5**

1............................................................................अर्थसंकल्प, वार्षिक लेखे, मत्ता व दायीत्व या वरील भाष्य. 6

2.......................................................................... नियमित तसलमात व ठेव नोंदवही अपूर्ण असलेबाबत. 12

3...........................................................................................अनियमितपणे स्थायी अग्रीम दिले बाबत. 13

4...............................................................................कायम तसलमातीचे समायोजन झाले नसले बाबत. 14

5................................................................................नियमबाह्यरित्या लेख्याबाहेर रक्कमा ठेवलेबाबत. 15

6.......................................................घरपट्टी विभागाने चालू खातेवर नियमबाह्यरित्या रक्कमा ठेवलेबाबत. 18

7..... पुढील आर्थिक वर्षातील जमा रक्कम नियमबाह्यरित्या सामान्य रोख पुस्तकात वर्षाअखेरीस जमा घेतले बाबत. 20

8 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवले नसले बाबत. 21

9..................................................... नियमानुसार लेखे ठेवणेस स्थायी समितीची मान्यता घेतली नसलेबाबत. 22

10..................................................वसंतदादा शेतकरी सह. बँकेत नियमबाह्यरित्या गुंतविलेल्या रक्कमाबाबत. 23

11........................................................जादा वेतन दिलेल्या कर्मचाऱ्यांचे पगारातून रक्कम कपात करणेबाबत. 24

12...........................................महानगरपालिकेने कर्मचारी आकृती बंधास शासनाची मान्यता घेतली नसले बाबत. 26

13..................................... मनपा निवासस्थानात रहाणाऱ्या कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता कपात केला नसले बाबत. 28

14.......................................................................... कर्मचाऱ्यांकडून जामीन कदबे घेणेत आले नसलेबाबत. 29

15..............महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास बंद मिटरचे दंडापोटी आदा केलेली रक्कम वसूल करणेबाबत. 31

16...............................................सारस्वत बँकेच्या चालू खात्यावर नियमबाह्यरित्या रक्कमा जमा केल्याबाबत. 32

17........................................कुटुंब कल्याण व नागरी आरोग्य कैंद्रे याचे वेतन भत्ते अनुदान प्रलंबित असलेबाबत. 33

**कलम ९ ब खालील आक्षेप** ......................................................................................................... **35**

18............................................................... विद्युत विभागाने निविदा न मागविता साहित्य खरेदी केले बाबत. 36

19..विद्युत विभागाकडे स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती कामी लागणारे साहीत्य खरेदीतील वित्तीय अनियमिततेबाबत. 39

20........................................पाटबंधारे विभाग (नदीच्या पाण्याचा आकार) विलंब आकार भरणा केला नसलेबाबत. 43

21............................. मिरज येथे 10 द.ल.लीटर क्षमतेचे जलशुध्दीकरण कैंद्र बांधणे कामातील अनियमिततेबाबत. 44

22...... पाईप पुरवठा करणेसाठी वार्षिक दर करारावर एजन्सी नियुक्त करणे कामामध्ये झालेल्या अनियमीततेबाबत. 46

23............................................................ बंद पाणी मिटरमुळे पाणी आकारणी नियमानुसार होत नसलेबाबत. 48

24वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणी पुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 मधील अनियमितते बाबत.49

25पॅकेज क्र. 1.1 आणि 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे कामातील त्रुटी बाबत. ........ 52
26........ पंपीग मशिनरी व त्याला लागणारे इलेक्ट्रीक उपांगे बदलणे इत्यादी कामातील अनियमिततेबाबत. 55
27शामरावनगर येथे टाकी बांधणे, इंटेकवेल नुतनीकरण करणे हिराबाग ते शामरावनगर फिडरमेन टाकणे, वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे याकामातील अनियमिततेबाबत........ 57
28जॅकवेल ते माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यत 1219 मी.मी. व्यासाची अशुध्द पाणी दाब नलीका टाकणे कामातील त्रुटी बाबत. ........ 60
29........ महापौर उपभोक्ता विशेष पाणी बिल सवलत योजना राबविल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. 65
30महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाण्याचा कोटा वाढवून न घेतल्याने झालेले आर्थिक नुकसानी बाबत. 67
31........ तुरटी, ब्लीचींग पावडर , क्लोरीन इत्यादी खरेदी मधील अनियमिततेबाबत 68
32मिरज विभागांतर्गत 71 मी.मी. व्यासाची व 6.4 मी.मी. जाडीची एम. एस. अशुध्द जलदाब नलिका टाकणे कामातील त्रुटी बाबत. ........ 70
33. वसंतदादा सह.बँकेतील गुंतवणूकीस जबाबदार असणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई केली नसले बाबत. 72
34........ प्रमाणके रेखांकनास उपलब्ध केली नसले बाबत. 73
35........ विद्युत बिलाची उप प्रमाणके रेखांकनास प्राप्त न झाले बाबत. 74
36........ सामान्य रोख पुस्तक व बँक पासबुक (वेतन राखीव निधी) मधील तफावती बाबत. 74
37........ सामान्य रोख पुस्तक व पासबुकात (IHSDP) मार्च 2012 अखेरच्या शिल्लकेत तफावत. 75
38........ कॅशबुक व पासबुकातील (सुवर्ण जयंती) रक्कमेतील तफावती बाबत. 77
39........ पासबुक व सामान्य रोख पुस्तकातील (विकास निधी) शिल्लक रक्कमेतील तफावतीबाबत. 78
40........ सामान्य रोख पुस्तक व पासबुक (सेवा कर) मधील तफावतीबाबत. 80
41........ सामान्य रोख (सुरक्षा अनामत) पुस्तक व बँक पासबुक मधील तफावती बाबत. 81
42........ सामान्य रोख पुस्तक (जनरल फंड) व बँक पासबुक यांचेमधील तफावती बाबत. 82
43........ सामान्य रोख पुस्तक व पासबुकातील (दलित वस्ती) रक्कमेत तफावती बाबत. 84
44........ भ्रमणध्वनी मनोरे (मोबाईल टॉवर) ची दंडात्मक व नुतनीकरण फी वसुल केली नसले बाबत. 85
45इमारतीचा वापर मंजुर नकाशाप्रमाणे न करता वापरामध्ये बदल केल्याने दंडात्मक रक्कम 18 % व्याजासह वसुल केली नसले बाबत. ........ 86
46........ पावती पुस्तकांचा वापर न केलेने खरेदी व छपाई खर्च वाया गेलेबाबत. 88
47........ जकातीच्या चालू खातेधारकाकडून जकात ठेव व नुतनीकरण फी घेतली नसलेबाबत 89
48........ जिल्हा उदयोग केंद्राच्या मान्यतेशिवाय जकातीमध्ये 50% सवलत दिलेबाबत. 90
49मालमत्तांचे पुन:सर्वेक्षण व भाडेमुल्य दर निश्चित करणेचे कामास विलंब लागलेने झालेले आर्थिक नुकसानीबाबत. 91
50घरपट्टी बिलाच्या वसुल न झालेल्या रक्कमेवर शास्तीची रक्कम आकारली नसलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ........ 93
51........ घरपट्टी करनिर्धारण चुकीचे केलेने करावयाच्या वसुली बाबत 94

52..........................................करारपत्र नसताना मालमत्तांचे कर निर्धारण केलेने झालेल्या अनियमिततेबाबत. 96
53भ्रमणध्वनी मनोऱ्याचे (मोबाईल टॉवर) वार्षिक भाडे मुल्य करार दिनांकापासून निश्चित न केलेने करावयाचे वसूली बाबत. ..................................................................................................................................96
54..........................................वार्षिक आकारणी कमी धरलेने करनिर्धारण फरकाची रक्कम वसूल करणेबाबत 97
55.................................................................हॉटेल आयकॉन, सांगली चे चूकीचे करनिर्धारण केले बाबत. 98
56गाडगीळ व इतर यांची मिळकत क्र.107/22/2 चे करनिर्धारण चुकीच्या पध्दतीने केलेने झालेल्या नुकसानी बाबत. 101
57.....................................................डॉ.शरद शामराव सावंत सांगली यांचे करनिर्धारण चुकीचे केले बाबत. 103
58................................................इंगळे आप्पासाहेब वसंत यांचे मालमत्ता कर निर्धारण चुकीचे केले बाबत. 106
59...........................................................................शहा मिताली यांचे करनिर्धारण चुकीचे केलेबाबत. 107
60.................................................... सचिन शहा, शिवम ॲसेट सांगली, यांचे करनिर्धारण चुकीचे केलेबाबत. 110
61.................................................................................गाळा भाडे रक्कम कमी वसुली केले बाबत. 1111
62.........................................भटक्या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण करणेच्या कामातील अनियमिततेबाबत . 1121
63.......................................................................श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदीमधील अनियमिततेबाबत 113
64...........................................................प्रभाग समिती क्र.4 च्या औषध खरेदीमधील अनियमितते बाबत. 114
65....................................प्रभाग समिती क्र.4 कडे घेणेत आलेल्या साहीत्य खरेदी मधील अनियमिततेबाबत 116
66..............................................................आरोग्य विभागाच्या औषध खरेदी मधील अनियमितते बाबत. 118
67.................................................................नर्सिंग होम नोंदणी फी दंडासहीत वसूल केली नसले बाबत. 120
68..................................................... जनावरांचा कत्तलखाना चालविणेस देताना केलेल्या अनियमिततेबाबत. 121
69.........................................दैनिक परवाना शुल्क गोळा करणेचा ठेका नियमबाह्यरित्या देणेत आले बाबत. 122
70............................ देकार रक्कम वेळेत भरणा न केलेल्या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली नसले बाबत. 123
71................................................................पे-पार्क ची वसुली केली नसलेने झालेल्या नुकसानी बाबत. 125
72..................................................... खुल्या जागांचे भाडे मागणी न केलेने झालेले आर्थिक नुकसानी बाबत. 126
73...................................................बीफ मार्केट मधील गाळ्यांचे भाडे व थकीत रक्कम वसुल न केले बाबत. 128
74.........................................रेवणी प्लॉट्स येथील भाडयाने दिलेल्या जागेची भाडे मुल्य ठरविले नसले बाबत. 128
75................................रॉकेल डेपोला भूई भाडयाने दिलेल्या खुल्या जागांच्या 1993 पासूनच्या थकबाकीबाबत 129
76............................................................................ मालमत्ता विभागाकडील थकबाकी वसुली बाबत. 130
77......................................... सिध्दी विनायक गणपती कॅन्सर हॉस्पीटल मिरज चे थकित भाडे वसुली बाबत. 131
78...............................................टि.व्ही.सेंटर इमारत भाडेवाढ न केल्यामुळे झालेले आर्थिक नुकसानी बाबत. 132
79..........................................सिंधी मार्केट दुकान गाळ्यांचे सुधारीत दराप्रमाणे भाडे वसुल केले नसले बाबत. 134
80.........मा. वसंतदादा पाटील इन्स्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च सेंटर कार्यालय भाडेवाढ न केलेबाबत 136
81....................................................नाट्यगृहाचे भाडे नियमानुसार घेतले नसलेने झालेल्या नुकसानी बाबत. 136
82...................................जिमखाना पूर्वेकडील भाडेकरु नियमबाह्यरित्या जागांचा भोगवटा करित असले बाबत. 138
83....................................... पेट्रोल / डिझेल वाहनांच्या दुरुस्तीकरिता वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च केलेबाबत 139

84.........................जंगम मालमत्ता नोंदवहीत नमुद नसलेल्या वाहनावर नियमबाह्य रित्या केलेल्या खर्चा बाबत. 140
85............................................................शववाहिका खरेदी देयक वेळेत आदा न केलेने झालेले अतिप्रदानाबाबत 141
86................................................................................मनपा वाहनांकरिता घसारा निधीची तरतुद न केलेबाबत 142
87............................................................वॉटर टँकर, ट्रॉली ने पुरविलेल्या पाण्याची थकबाकी वसुल करणेबाबत. 143
88...............................................................विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनास जमा न केले बाबत. 144
89...................................................रोपे खरेदी मधील गंभीर अनियमिततेमुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. 144
90...........छ.शिवाजी स्टेडीयम सांगली येथील लॉनचा देखभाल दुरूस्ती मक्ता निश्‍चित करणे कामातील त्रुटी बाबत. 147
91..............................................................................जन्म मृत्यू नोंदणी शुल्क शासनाकडे जमा न केले बाबत. 148
92सांगली येथील बालहनुमान कॉलनी IHSDP अंतर्गत बांधणेत आलेल्या घरकुल बांधणेचे कामातील अनियमीतते बाबत. ......................................................................................................................................149
93........... मिरज येथील संजयनगर झोपडपट्टी स.नं.964 अ येथे 438 घरकुले बांधणे कामातील अनियमितते बाबत. 154
94....................................................IHSDP अंतर्गत मंजुर 2720 घरकुल बांधकाम मधील अनियमितते बाबत. 156
95......................सांगली महावीर उद्यानामध्ये बागेसाठी इरिगेशन सिस्टीम करणे कामामधील अनियमीतते बाबत. 159
96सांगली वॉर्ड क्र.71 शामराव नगर महादेव मंदिर कॉलनी रस्ता डांबरी करणे कामामध्ये झालेल्या अनियमीतते बाबत. ......................................................................................................................................161
97............ वॉर्ड क्र.74 मिरज येथील बौध्द वसाहत मध्ये 18 सिटचे सुलभ शौचालय कामातील अनियमितते बाबत. 163
98....... वॉर्ड क्र.14 उत्तर कला नगर ओपन स्पेस मधील सांडपाण्याचा निचरा करणे कामातील अनियमितते बाबत. 165
99........................................................ मिरज अविकसीत भागात मुरुम टाकणे याकामातील अनियमीतते बाबत. 167
100....................................... धुळुबूळु गल्ली अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत. 168
101.................सांगली वॉर्ड क्र.1 धावडे घर ते सदा शिंदे घर रस्ता डांबरीकरण कामातील लेखा विषयक त्रुटीबाबत. 169
102प्रभाग समिती क्र.4 च्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील बी.बी.एम. सीलकोट करणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत. ......................................................................................................................................171
103..............................वॉर्ड क्र.45 रमामाता कॉलनी मिरज ड्रेनेज पाईप टाकणेकामातील लेखाविषयक त्रुटी बाबत. 173
104............................................वॉर्ड क्र.73 गल्ली अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे कामातील अनियमितते बाबत. 175
105 वॉर्ड क्र.35 मार्केटयार्ड येथील एकता कॉलनी अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत. 177
106....सांगली येथील आशिर्वाद बंगला ते 100 फुटी रोड पर्यंत रस्ता बी.बी.एम करणे कामातील अनियमितते बाबत. 178
107........................................... सांगलवाडी मुकीनसो दर्गा परिसरात दुरुस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत. 180
108................................................. वॉर्ड क्र.58 खणभाग तिवरे गल्ली गटर बांधणे कामातील अनियमिततेबाबत. 182
109सांगली पुष्पराज चौक डिसीसी बँके समोरील सांडपाणी निचरा करणेसाठी पाईप लाईन टाकणे कामातील अनियमितते बाबत ......................................................................................................................................183
110........................................................वॉर्ड क्र.3 औद्योगिक वसाहत नानीबाई मळा अंतर्गत रस्ते डांबरी करणे. 185
111................................ वॉर्ड क्रं.21 सांगली आरवाडे पार्क ते कुपवाड रोड डांबरीकरण करणे कामातील त्रुटी बाबत. 186
112..................... सांगली येथील आशिर्वाद बंगला ते 100 फुटी रोड बी.बी.एम करणे कामातील अनियमिततेबाबत. 188
113.......................................................... वॉर्ड क्रं.59 प्रमोद सारनाथ घर ते सुखनिवास रस्ता डांबरीकरण करणे 190

114..........वॉर्ड क्र.28 वारणाले मनपा शाळा पाठीमागे हॉट मिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामातील त्रुटी बाबत. 192
115.................................................... सांगली येथील नंदनवन अपार्टमेंट ते  सेठ बंगला रस्ता बी.बी.एम. करणे. 194
116.......................... वॉर्ड क्र.63 मिरज पंचशील चौक वसाहत येथे पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामातील त्रुटीबाबत. 195
117...........वॉर्ड क्र.63 मिरज जमखानवाला हॉटेल ते पंचशील चौक आर.सी.सी. पाईप घालणे कामातील त्रुटी बाबत. 197
118.........वॉर्ड क्र.65 खाजा झोपडपट्टी ते कच्छी हॉल जवळ संरक्षक भिंत बांधणे कामातील लेखाविषयक त्रुटी बाबत. 198
119...................वॉर्ड क्र.40 गोपाल कृष्ण मंदीर ते शिंदे घर रस्त्याची सुधारणा कामातील लेखाविषयक त्रुटी बाबत. 200
120...............................................................................................HCL कंपनीस आदा केलेल्या देयकाबाबत. 200
121............................................ फौजदारी गुन्हयाबाबत खटला प्रलंबीत असलेल्या सेवकांच्या पुनर्नियुक्ती बाबत 202
122........................................................................... नगरसेवक लेटरपॅड छपाई नियमबाह्य खर्चा बाबत. 204

**कलम ९ क खालील आक्षेप**.......................................................................................................... **208**

**-------------------   निरंक   ------------------**.......................................................................................... **208**

**कलम ९ ड खालील आक्षेप**.......................................................................................................... **209**

123..................................................................फिरती दैनंदिनी (डायऱ्या) मंजूर न करताच वेतन आदा केलेबाबत 210
124.............................................टपाल तिकीट व जंगम स्थावर मालमत्ता नोंदवह्या ठेवणेत आले नसले बाबत. 210
125.........................................................................पाणी पुरवठा विभागास होत असलेल्या तोट्याबाबत. 211
126.................................................................................देयकातून 1% विमा कपात केला नसलेबाबत. 213
127...................................... लेखा विषयक महत्वाच्या नोंदवह्या लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केल्या नसलेबाबत. 213
128...........................................................................धनादेश पुस्तक साठा नोंदवही अपूर्ण असले बाबत. 215
129...............................मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा मंजुर कर्मचारी अकृतीबंध व लेखापरीक्षण अहवालाबाबत. 216
130....................गुंठवारी प्रशमन शुल्क व विकास आकार वसुल केले बाबतची माहिती उपलब्ध केली नसले बाबत. 217
131नियमितीकरण केलेल्या गुंठेवारी क्षेत्राच्या 10 % जमीन मनपाने ताब्यात घेतलेची माहिती लेखापरीक्षणास दिली नसले बाबत. ...........................................................................................218
132............................................................जकात पावती पुस्तकामध्ये खाडाखोड केलेने झालेले नुकसानीबाबत. 219
133..........................................................चालू खाते धारकांची नमुना क्रमांक 39 नोंद वही ठेवली नसले बाबत. 220
134....................................................................पथकर (मार्गस्थ) पावती पुस्तकांचा साठा नोंदवहीबाबत. 220
135....................................................................................जकात परतावा नोंदवही ठेवली नसलेबाबत. 221
136............................................ कार्यालयीन व भाड्याच्या वाहनांचे लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत. 221
137............................ कर निर्धारण बाबतच्या नोंदवह्या व कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत. 222
138........................................................................... लेखा परिक्षणाकामी कागदपत्रे उपलब्ध केले नाहीत. 223
139......................................कर निर्धारण व आकारणी पुस्तक नियमानुसार विहित नमुन्यात ठेवले नसले बाबत. 224
140......................................कर निर्धारण व आकारणी पुस्तक नियमानुसार विहित नमुन्यात ठेवले नसले बाबत. 225
141.......................................................................संडास बाथरुम व पॅसेजवर कर आकारणी केली नसलेबाबत 226

142................................. मालमत्ता कराच्या आकारणीसाठी यंत्र व सामुग्रीचे विवरण पत्र तयार केले नसलेबाबत. 227
143...................................................... व्यावसायीकांना अनुज्ञप्ती देणे व त्याची नोंद ठेवणे यामधील त्रुटी बाबत 228
144................................................ अंत्यविधीसाठी खरेदी केलेल्या साहित्याची अभिलेख सादर केले नसलेबाबत. 228
145.................................................................... मिरज विभागाची कत्तलखाना फी वसुल केली नसले बाबत. 229
146............................................................................... मालमत्ता विभागातील रजिस्टर अपूर्ण असलेबाबत. 230
147.................................................... पुनर्वसन न केलेल्या खोकी धारकांची डिमांड कमी केली नसले बाबत. 230
148................................................................. महानगरपालिकेच्या मालमत्ता स्वत:च्या नावांवर नसलेबाबत 231
149........जाहिरात कर, जाहिरात खुली जागा, शो टॅक्स यांची करवाढ केली नसलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत 232
150............................................................ दैनंदिनी छपाईसाठी करणेत आलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत. 233
151आर्थिक दुर्बल घटकातील युवती व महिलांना कुकींग, कॅटरिंग प्रशिक्षण देणेकामी निविदा न मागविता काम दिले बाबत. .......................................................................................................................................................234
152...........बचत गट व पतसंस्था गटास अनुदान वाटप केले नंतर उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतलेबाबत. 235
153........................... फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणाचे काम निविदा न मागविता दिलेने झालेल्या अनियमिततेबाबत. 235
154..................................................................................... अतिक्रमण विभागाच्या नगण्य कामगिरीबाबत 236
155................................................................................... वृक्ष व रोपे यांचे लेखे ठेवणेत आले नसले बाबत. 238
156............................................................................. नवीन बॅटरी / ऑईल खरेदीमधील अनियमिततेबाबत. 239
157........................................... मनपा पॅनेलवरील वकीलां व्यतिरीक्त अन्य वकीलांना दिलेल्या वकील फी बाबत. 240
158.............................................................................. न्यायालयीन दाव्यांची नोंदवही अपूर्ण असले बाबत. 241
159................................................................. विद्युत दिव्यांचा हिशोब विहीत नमुन्यात ठेवला नसलेबाबत. 242
160भांडारामध्ये असलेल्या निरुपयोगी, उपयोगात नसलेल्या किंवा गरजेपेक्षा अधिक शिल्लक मालाच्या याद्या ठेवणेत आल्या नसले बाबत. ...........................................................................................................................242
161..................................................................................... सामान्य रोकड वहीतील अनियमितते बाबत. 243
162....................... वॉर्ड क्रं. 51 मधील कोळके घर ते शेख घरापर्यंतचा रस्ता सुधारणे कामातील अनियमिततेबाबत. 244
163.................... सांगली येथील वॉर्ड क्र.47 गव्हर्मेंट कॉलनी 80 फूटी रस्ता सुधारणा करणे कामातील त्रुटी बाबत. 245
164........सांगली झुलेलाल चौक ते चंद्रकांत बंगला सांडपाणी निचरा करणेसाठी पाईप बसविणे कामातील त्रुटी बाबत. 247
165................................................................................... वाचनालय सभासद फी वसुल केली नसले बाबत. 249
166किरण यशवंत कांबळे (मयत) सफाई कामगार यांचे वारसदारास सेवा निवृत्तीवेतन विषयक लाभ विहीत मुदतीत न दिलेबाबत. ..........................................................................................................................................250
167 स्वेच्छानिवृत्ती प्रकरणात तीन महिन्याच्या नोटीशीचा कालावधी समाप्त झाल्यावर सेवानिवृत्त केले नसलेबाबत 251
168............श्री. के.सी.हळींगळे, कर निरीक्षक यांचे मुळ सेवापुस्तकात नियमबाह्यरित्या खाडाखोड केले असलेबाबत. 253
169............................................... भविष्य निर्वाह निधी लेख्या विषयी माहिती उपलब्ध करुन दिली नसले बाबत. 256
170....................................................................... सेवा पुस्तक दुय्यम प्रत कर्मचाऱ्यांना दिली नसले बाबत. 257
171........................................ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेत प्रदान केले नसलेबाबत. 257

लेखा परीक्षकनिहाय  परिच्छेद ..................... 264

**ANNEXURE ..................... 265**

# विभागनिहाय एकूण परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य प्रशासन | 4 | 2 | | 6 | **12** |
| शहर अभियंता / सार्वजनिक बांधकाम | | 28 | | 4 | **32** |
| शहर अभियंता - विद्युत विभाग | | 2 | | 2 | **4** |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 1 | 13 | | 4 | **18** |
| लेखा विभाग | 10 | 11 | | 2 | **23** |
| लेखापरीक्षण | | | | 1 | **1** |
| नगर रचना | | 2 | | 2 | **4** |
| जकात / स्थानिक संस्था कर / उपकर | | 3 | | 4 | **7** |
| कर निर्धारण व संकलन | 1 | 13 | | 7 | **21** |
| आरोग्य | 1 | 7 | | 3 | **11** |
| भूमी व मालमत्ता विभाग | | 14 | | 4 | **18** |
| वाहन विभाग | | 4 | | 1 | **5** |
| विधी विभाग | | | | 2 | **2** |
| भांडार | | | | 2 | **2** |
| संगणक / माहिती तंत्रज्ञान | | 1 | | | **1** |
| शिक्षण विभाग / शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ / माध्यमिक शिक्षण | | | | 1 | **1** |
| नागरी समुदाय | | | | 1 | **1** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विकास प्रकल्प विभाग | | | | | |
| महिला व बालकल्याण विभाग | | | | 1 | **1** |
| अग्निशमन विभाग | | 1 | | | **1** |
| अतिक्रमण विभाग | | | | 1 | **1** |
| प्रभाग कार्यालये | | 1 | | | **1** |
| उद्‌यान विभाग | | 2 | | 1 | **3** |
| जन्म-मृत्यु नोंदणी विभाग | | 1 | | | **1** |
| | **17** | **105** | **0** | **49** | **171** |

# भाग १

## मागील लेखापरीक्षण अहवाल

स्थानिक निधी लेखा विभागामार्फत महानगरपालिकेचे नियमित स्वरूपातील लेखा परीक्षण वित्त विभाग शासन निर्णय क्र. स्थानिले १०१० /प्र.क्र. २६ ब/ विमा प्रशा दि. ३१ मार्च २०११ अन्वये वित्तीय वर्ष 2011-12 पासून प्रथमच हाती घेत असल्याने मागील प्रलंबित परिच्छेद निरंक आहेत. तथापि यापूर्वी स्थानिक निधी लेखा विभागामार्फत महानगरपालिकेचे विशेष लेखा परीक्षण झाले असल्यास त्या परिच्छेदांवर स्वतंत्रपणे कार्यवाही अबाधित राहील.

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

## 1 अर्थसंकल्प, वार्षिक लेखे, मत्ता व दायीत्व या वरील भाष्य.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा, मनपा व अनुदाने निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अर्थसंकल्प, वार्षिक लेखे, मत्ता व दायीत्व या वरील भाष्य. स्थायी समितीने सन 11-12 या आर्थिक वर्षात वार्षिक लेखे स्विकृत केलेले नाहीत. सन 11-12 या लेखापरीक्षण वर्षात व्दिनोंद पद्धतीने महानगरपालिकेचे लेखा कामकाज चालू झाले नसलेचे दिसून आले आहे.***

**अर्थसंकल्प**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 मधील तरतुदीनुसार मनपाचा सन 2011-12 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आयुक्त यांनी सादर केला असुन त्यामधील तरतुदीमध्ये फेरबदल सुचवून अधिनियमातील कलम 96 मधील तरतुदीनुसार कलम 100 अन्वये महासभेने महासभा क्रमांक (विशेष) ठराव क्रं.262 विषय क्रं.2 दि.31.03.2011 ने संमत केला आहे.

मनपा क्षेत्रातील प्राथमिक शाळेतील मुलांची संख्या वाढविणेसाठी ज्या प्रभागामध्ये प्राथमिक शाळा आहे. त्या प्रभागातील सदस्यांनी त्यांना निर्धारीत केलेल्या स्थानिक विकास निधी मधुन 20% रक्कम संबंधित शाळेच्या व्यवस्थापन समितीस वर्ग करणेची तरतुद केली आहे. परंतु त्यानुसार सन 11-12 या आर्थिक वर्षात खर्च करणेत आलेला नाही.

महाराष्ट्र नागरविकास खात्याचे दि.6 जुलै 2005 चे शासन निर्णयानुसार मनपास व्दिनोंद लेखा पद्धत अनिवार्य करणेत आलेली आहे. मनपाने सन 08-09 ते सन 10-11 या आर्थिक वर्षाचे लेखे व्दिनोंद लेखा पद्धतीने बनविणेसाठी श्री. इनामदार ॲड. भालेराव या एजन्सीची नियुक्ती केली आहे. सन 10-11 या आर्थिक वर्षात 08-09 या वर्षाचे लेखे व्दिनोंद पद्धतीने तयार झालेले आहेत. सन 11-12 या लेखापरीक्षण वर्षात व्दिनोंद पद्धतीने महानगरपालिकेचे लेखा कामकाज चालू झाले नसलेचे दिसून आले आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार मनपा लेखासंहिता तयार करेपर्यंत नॅशनल म्युनिसिपल अकौंट्स मॅन्युअल च्या तरतुदी लागू राहतील असे स्पष्ट नमुद असताना मनपाने नगरपालिका लेखासंहिता प्रमाणे लेखे ठेवलेले 1971 आहेत.

न.पा. लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 26 (3) नुसार जमेचे अंदाज मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर अधारलेले असले पाहिजेत तसेच नियम क्रं.26 (4) नुसार एकूण खर्चाचे अंदाज गेल्या तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजित जमा या दोहो पैकी जी

कमी असेल त्यापेक्षा असु नये असे नमुद आहे.

मनपाचा मागील तीन वर्षाचा जमा व खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं | आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | सन 2008 - 09 | 112,90,64,221/- | 101,23,02,955/- |
| 2 | सन 2009 - 10 | 119,41,06,555/- | 93,55,65,271/- |
| 3 | सन 2010 - 11 | 116,45,90,818/- | 111,64,87,274/- |
| | एकूण | 348,77,61,594/- | 306,43,55,500/- |
| | एकूण सरासरी | 116,25,87,198/- | 102,14,51,833/- |

मनपाची प्रत्यक्ष जमेची सरासरी पाहता सन 11-12 या वर्षाचे जमेचे अंदाजपत्रक 116 कोटी 25 लाख ऐवजी रुपये 307,91,93,100/- करणेत आले आहे. मनपाची मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष खर्चाची सरासरी रुपये 102,14,51,833/- आहे. परंतु सन 11-12 चे अंदाजपत्रकामध्ये खर्च रुपये 307,80,99,900/- दाखविणेत आला आहे.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 26 (8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढउतार असतील तर येथे अशा चढउतारांचे संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असता ते देणेत आलेले नाही. अंदाजपत्रकामध्ये भांडवली उत्पन्न रुपये111 कोटी 06 लाख धरणेत आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने UIDSSMT पाणी पुरवठा योजनेसाठी 35 कोटी, नगरोत्थान योजनेसाठी 5 कोटी, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी 53 कोटी 3 लाख इतके शासन अनुदान मिळणार असलेचे अपेक्षित आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेचे दिसुन येते. सदर अनुदान प्राप्त होणेसाठी शासन अनुदानातुन चालू असलेली कामे योग्य रितीने प्रगतीपथावर ठेवणे गरजेचे आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 94 (1) अन्वये आयुक्ताने एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील आर्थिक वर्षातील न.पा.निधीच्या खात्यामध्ये जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रक्कमा व अशा वर्ष अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणारी विवरणपत्रे तयार करुन स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असता त्याप्रमाणे मनपाने सन 11-12 या आर्थिक वर्षात कार्यवाही केलेली नाही.

**वार्षिक लेखे**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 (3) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समिती समोर सादर करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने दि.7.11.2012 रोजी अहवाल स्थायी समितीकडे सादर केला आहे. परंतु स्थायी

समितीने सन 11-12 या आर्थिक वर्षात वार्षिक लेखे स्विकृत केलेले नाहीत.

वार्षिक लेखे नॅशनल म्युनिसिपल अकौंट्स मॅन्युअल मधील प्रकरण 31 च्या तरतुदीनुसार परिच्छेद 4 मध्ये वर्णन केलेल्या लेखापुस्तकात तयार करणे आवश्यक असता ते महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रं.59 (1) चे नमुना क्रं. 27 प्रमाणे तयार केलेले आहेत. परंतु नमुना क्रं. 27 मधील प्रत्यक्ष जमा / खर्च व अंदाज यामधील फरक स्तंभ क्रं.4 चा वार्षिक लेख्यामध्ये समाविष्ठ करणेत आलेला नाही. वर्षिक लेख्याचे जोडपत्र एक मुळ बांधकामे व जोडपत्र दोन परिक्षण व दुरुस्त्या जोडणेत अलेले नसलेने बांधकाम विभागावर किती खर्च झाला ते समजुन येत नाही.

जमा बाजुस एकूण जमेचा अंदाज रुपये 307,57,05,200/- घेतला आहे परंतु प्रत्यक्षात जमा रुपये 141,34,27,372.84/- इतकी झालेचे वार्षिक लेख्यावरुन दिसून येते अंदाजपत्रकीय रक्कमेशी जमेची एकूण टक्केवारी 45.97% एवढीच दिसून येते. भांडवली जमा ब या लेखाशिर्षाखाली शासनाकडून एकूण 94,62,98,000/- अनुदान अंदाजपत्रकामध्ये मिळेल असे नमुद केले आहे. परंतु शासनाकडून सदर अनुदान मिळविणेस मनपाला अपयश आलेने मनपाचे अंदाजपत्रक कोलमडलेचे स्पष्ट होते. तसेच भांडवली जमा अ मॅचिंग ग्रॅंट ट्रान्सफर पोटी रुपये 8 कोटी अपेक्षित उत्पन्न अंदाजित केले होते. परंतु सन 11-12 मध्ये अनुदान प्राप्त झालेले नाही. क विभाग जलनिस:रण लेखाशिर्षाखाली नगरोत्थान योजनेच्या मनपा हिश्श्या पोटी कर्ज 10 कोटी उभारणेचे अंदाजीत केले होते. परंतु प्रत्यक्षात कर्ज उभारणेत आले नसलेचे वार्षिक लेख्यावरुन स्पष्ट होते. मनपाने वार्षिक अंदाजपत्रकामध्ये शासनाकडून मिळणारे जवळपास 100 कोटी अनुदानाचा समावेश केलेने व प्रत्यक्षात अनुदान मिळविणेस अपयश आलेने शासकीय योजनेतुन सुरु असलेली UIDSSMT , IHSDP , नगरोत्थान योजनेची कामे रखडलेचे दिसुन येते. तसेच योग्य नियोजन न केलेने सदर योजनांचे खर्चामध्ये भविष्यात वाढ होऊन योजनेच्या फलश्रुतीमध्ये अडचणी निर्माण होणार असलेचे स्पष्ट होते. त्यामुळे मनपाने योग्य आर्थिक नियोजन करुन त्याप्रमाण निधी खर्च करणेची दक्षता घेणे आवश्यक आहे. नगरलिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रं.26 (3) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर आधारलेले असणे आवश्यक असता त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करताना दक्षता घेणेत आलेली नाही.

महानगरपालिकेच्या महत्वाची खाती व त्यापासून मिळालेले वर्षिक उत्पन्न यांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | विभागाचे नाव | लेखाविभागाप्रमाणे | | विभाग प्रमुख अहवालाप्रमाणे |
|---|---|---|---|---|
| | | सन 11-12 दुरुस्त अंदाज रुपये कोटी | सन 11-12 मधील प्रत्यक्ष जमा रुपये कोटी | प्रत्यक्ष जमा रुपये कोटी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | जकात | 84.21 | 93.21 | 100.52 |
| 2 | घरपट्टी | 21.09 | 17.52 | 16.47 |
| 3 | पाणी पट्टी | 17 | 14.29 | 14.94 |
| 4 | मालमत्ता | 2.66 | 1.20 | 0.93 |

लेखा विभागामर्फत देणेत आलेली प्रत्यक्ष जमेची आकडेवारी व विभाग प्रमुखांचे अहवालाप्रमाणे प्रत्यक्ष जमेची आकडेवारी यामध्ये तफावत दिसून येते. वार्षिक लेखा तयार करताना लेखाविभाग व अन्यविभागामध्ये ताळमेळ घेतला नसलेने मनपाचे अंदाजपत्रकीय तरतुद व एकूण प्रत्यक्ष उत्पन्न किती आहे. याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

जकात विभागाकडील आकडेवारी नुसार एकूण उत्पन्न रुपये 93.21 कोटी आहे परंतु विभागप्रमुखांचे अहवालानुसार एकूण उत्पन्न रुपये 100.52 कोटी असलेचे नमुद आहे. जकात विभागाचे बँक पासबुक युनियन बँक खाते क्रं.424202010502707 वर दि.31.03.2012 रोजी रुपये 5,08,71,828/- रुपये शिल्लक असून सदर रक्कम दि.31.03.2012 रोजी रोख किर्दीला घेतली नसलेने लेख्याबाहेर राहिलेचे स्पष्ट होते व ही अत्यंत गंभीर बाब आहे.

सन 2011-12 चे सुधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे व वार्षिक लेख्याप्रमाणे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | सन 11-12 सुधारीत तरतुद कोटी | सन 11-12 प्रत्यक्ष जमा कोटी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | घरपट्टी | 29.05 | 19.53 | 67.22 |
| 2 | जकात | 80 | 95.84 | 119.8 |
| 3 | मालमत्ता | 2.66 | 1.21 | 45.48 |
| 4 | पाणी पुरवठा | 42 कोटी 65 लाख पैकी कर्ज 25 कोटी | 14.75 | 28.9 |
| 5 | जलनिस:रण | 12.21 (10 कोटी कर्ज) | 2.22 | 18.18 |

अंदाजपत्रकीय तरतुदी प्रमाणे पाणी पुरवठा व मलनिस:रण विभागास एकूण 35 कोटी कर्ज घेणे आवश्यक आहे परंतु सन 11-12 मध्ये कर्ज घेणेत आलेली नाही. शासनाचे UIDSSMT व नगरोत्थान योजनेमधुन मनपास अनुदान मंजुरी असून मनपा हिश्श्यापोटीची रक्कम जमा करणे क्रमप्राप्त आहे. परंतु मनपाने सदर योजनासाठी कर्ज घेतले नसलेने मनपा हिश्श्यातुन रक्कम आदा करणेसाठी कर्जाचे बदली पैसे कशाप्रकारे उभारणेत येणार आहेत. त्याबाबत अर्थसंकल्पात तरतुद केली नसलेने योजनेच्या प्रगतीबाबत व यशस्वीततेबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

## मत्ता व दायित्व

मनपाने मत्ता व दायीत्वाचे विवरणपत्र नगरपालिका लेखा संहिता नियम क्रमांक 61 नमुना क्रं.29 मध्ये ठेवले आहे.

मत्ता सदरी घरपट्टी, पाणीपट्टी व मालमत्ता विभागाची एकूण थकबाकी रुपये 34,50,31,240/- + चालु मागणी रुपये 41,01,33,296/- असे एकूण रुपये76,95,79,728/- तसेच न दिलेल्या आगाऊ रक्कमा रुपये 1,44,15,182/- जो पर्यंत वसुल होत नाहीत तोपर्यंत सदर मत्ता आभासी असल्याचे स्पष्ट होते. सदर थकबाकीची वार्षिक विगतवारी काढलेली नाही. त्यामुळे कोणत्या वर्षाची किती थकबाकी शिल्लक राहीली आहे ते समजून येत नाही. व थकबाकी वसूलीसाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे रुपये135,44,88,517/- - रुपये76,95,79,728/- = रुपये58,49,08,789/- इतकीच रक्कम प्रत्यक्ष मत्ता म्हणून गणता येईल.

मत्ता व दायित्व विवरणपत्राप्रमाणे मत्ता सदरी नमुना क्रमांक 29, अ.क्र.5 नुसार थकीत मागण्या घेणेत आल्या नाहीत तसेच अ.क्र.6 नुसार मनपाला शासनाकडून देय असलेल्या अनुदानाचा समावेश केला नसलेने मत्ता व दायीत्वाची विवरणपत्रे मनपाने चुकीचे केलेचे दिसून येते.

मत्ता सदरी बँकेतील अथवा कोषागारातील एकूण गुंतवणुकी रुपये34,47,84,682/- दाखविणेत आल्या आहेत. परंतु नमुना क्रं.28 चे जोडपत्रानुसार वर्षामध्ये सर्व डे बुक केलेल्या मुळ गुंतवणुकीची किंमत रु. 34,47,84,682/- असून, वर्षा अखेर व्याजासह दर्शनी किंमत रुपये36,44,15,889/- इतक्या झाल्या आहेत. व 31 मार्च 2012 ची सर्व डे बुक गुंतवणुकीसह अखेर शिल्लक रुपये47,03,58,047/- इतकी आहे. परंतु वर्षिक लेख्याला जोडलेल्या प्रपत्रानुसार जनरलफंड डे बुक शिल्लक रुपये 26,72,40,139/- व 31 मार्च 2012 रोजी स्वतंत्र डे बुक शासन व मनपा कडे असलेले एकूण फंड रुपये 54,73,98,282/- दिसून येतात तसेच वसंतदादा सहकारी बँकेमधील एकूण गुंतवणुक रुपये 33,60,48,654.08/- दिसून येते. परंतु या रक्कमांचा समावेश मत्ता सदरी करणेत आलेला नाही. त्यामुळे मत्ता व दायित्व विवरणपत्र चुकीचे करणेत आलेचे स्पष्ट होते.

दायित्व सदरी अखर्चित अनुदाने आणि वर्गणी रुपये1,07,97,358/- दाखविणेत आली आहेत. परंतु सन 11-12 मध्ये स्वतंत्र डे बुक शासन / मनपा असलेले फंडातुन परिभाषित अंशदाने, पेंशन फंड, वेतन राखीव निधी, घसारानिधी, भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम वगळता रुपये36,21,63,268/- रुपये अखर्चित असलेचे दिसून येते. शासन अनुदान व मनपा निधी वेळेत खर्च न केलेने अनुदाने अखर्चित राहिलेचे दिसुन येते.

दायित्व सदरी विशेष निधीच्या रक्कमा घेणे आवश्यक असता त्या घेणेत आलेल्या नाहीत.

दायित्व सदरी एकूण रुपये6,19,02,241/- ची देयके प्रलंबित असलेचे दिसुन येते. अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे प्रत्यक्ष निधीची तरतुद असलेशिवाय खर्च करणेत येवू नये असे सर्वसाधारण वित्तीय तत्व असताना देखील प्रत्यक्ष निधीची तरतुद नसताना कामे करणेत आली असलेने इतक्या मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहिलेचे स्पष्ट होते. बजेट तरतुद आहे परंतु प्रत्यक्ष निधीची तरतुद

असलेबाबत लेखाविभागाचा अभिप्राय न घेताच प्रत्येक विभागाने परस्पर कामे करुन घेतलेने प्रलंबित देयकांचे प्रमाण वाढलेने मनपाचे दायीत्वामध्ये वाढ झालेचे दिसुन येते. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद , जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने पैसे जमा नसताना मोठ्या प्रमाणात अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे खर्च केला जात असलेने देयके प्रलंबित रहाण्याचे प्रमाण वाढलेचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 1)

## *2 नियमित तसलमात व ठेव नोंदवही अपूर्ण असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 21943088.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 21943088.00 रु.,

***सन 11-12 आर्थिक वर्षात कायम व नियमित तसलमात एकूण रु.2,19,43,088/- दिलेली असून त्यापैकी नियमित तसलमात 66,99,406/- समायोजित केलेचे व शिल्लक तसलमात रु.1,52,43,682/- असलेचे दिसून येते***

लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार अग्रीमधन/अगाऊ रकमा यांची नोंद वही नमुना नं. 147 चे लेखा परिक्षण केले असता सन 11-12 आर्थिक वर्षात कायम व नियमित तसलमात एकूण रु.2,19,43,088/- दिलेली असून त्यापैकी नियमित तसलमात 66,99,406/- समायोजित केलेचे व शिल्लक तसलमात रु.1,52,43,682/- असलेचे दिसून येते. अग्रीमाचा आढावा घेणेसाठी सन 2009-10 व सन 2010-11 च्या नोंदवही ही उपलब्ध केल्या नाहीत. त्यामुळे मागील शिल्लक रक्कमेचा ताळमेळ घेता आला नाही.

कायम व नियमित तसलमात रक्कमेच्या दिलेल्या नोंदी तसेच तसलमात नोंद वही साक्षांकीत करणेत आलेली नाही.

कायम तसलमात नोंदवही विहीत नमुन्यात ठवणेत आलेली नाही.

समायोजित तसलमात रक्कमेची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

प्रथम दिलेली तसलमात रक्कम समायोजित केले नंतरच दुसऱ्यांदा तसलमात देणे आवश्यक असता नियमबाह्यरित्या तसलमात रक्कम दिलेने महानगरपालिकेचा निधी नाहक गुंतून पडलेचे स्पष्ट होते.

लेखा संहिता 1971 नियम 190 प्रमाणे सुरक्षा अनामतीची नोंदवही नमुना नं. 147 ठेवली आहे. ती पूर्णपणे अपूर्ण आहे. स्तंभ क्र. 5 ते 21 मध्ये नोंदी नाहीत. गोषवारा काढणेत आला नाही. तरीसुध्दा वार्षिक लेख्यात याची नोंद घेणेत आली आहे.

उपलब्ध नोंदवही नमुना नं. 147 ची नोंद पडताळलेबाबत सक्षम कर्मचारी व अधिकारी यांची कोठेही सही नाही.

अर्धसमास पत्राचे उत्तर वेळेत प्राप्त झाले नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव र.रु.2,19,43,088/- वसुलपात्र करणेत येत आहे.

DATBPCM5601 (Ref No: 11)

## *3 अनियमितपणे स्थायी अग्रीम दिले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***कर्मचाऱ्यांना रक्कम रुपये 20,000/- पासून 1,00,000/- पर्यत स्थायी अग्रीम दिले आहे. परंतु लेखासंहिता नियम 140 (2) नुसार वर्षा अखेरीस दाखले घेतलेले नाहीत.*** |

सन 11-12 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करताना एकूण 30 अधिकाऱ्यांना एकूण रक्कम रुपये 8,28,500/- एवढे स्थायी अग्रीम देणेत आले आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

तातडीने महत्वाच्या बाबीवर खर्च करताना त्वरीत खर्च करता यावा म्हणून हे स्थायी अग्रीम देणेत आले आहे. कोणत्या बाबीवर स्थायी अग्रीम मधून खर्च करता येतो या बाबतची यादी लेखा परिक्षणास देणेत आली नाही.

पाणी पुरवठा विभाग यांत्रिकी शाखेस रुपये 25,000/- स्थायी अग्रीम दिले आहे. एक महिन्यात तीन ते चार वेळा खर्च करुनही रुपये 10,000/- पेक्षा जास्त खर्च नाही व त्याचे समायोजनही त्वरीत होत नाही. अशा पध्दतीमुळे सुमारे रुपये 15000/- दर महा शिल्लक राहतात ही रक्कम रोखपालाकडे न ठेवता संबंधीत कर्मचारी अधिकारी यांचेकडे असते. या पध्दतीनुसार इतर खात्यांमध्येही अशाप्रकारे व्यवहार चालत आहेत. स्थायी अग्रीम मंजूर करताना वित्तीय औचित्याचा विचार न केलेने प्रमाणापेक्षा जास्त अग्रीम दिले आहे. व शिल्लक रक्कम रोखपालाकडील कॅश बॉक्स मध्ये रहात नसून संबंधीत व्यक्तिकडेच रहाते. यामुळे शिल्लक रक्कमेचा खाजगी वापर होत असल्याचे दिसुन येते.

इंधनावर जास्तीत जास्त खर्च नोंदला आहे. याबाबीसाठी नियमित अग्रीम मंजूर करता येत असताना स्थायी अग्रीम देण्याचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही.

रुपये 20,000/- पासून 1,00,000/- पर्यत स्थायी अग्रीम दिले आहे. यापैकी प्रमाणापेक्षा जास्त रक्कम अनेक दिवस संबंधित अधिकारी कर्मचारी यांचकडे राहते व त्याचा खाजगी वापर होतो.

लेखा संहिता नियम 140 (2) नुसार प्रत्येक वर्षाचे 1 एप्रील रोजी नमुना दाखले घेणेत आलेले नाहीत. या नियमानुसार चालू वर्षापासून दाखले घेणेची दक्षता घेणेत येत आहे असे अर्धसमास पत्रात उत्तर देणेत आले आहे. यावरुन महानगपालिकेच्या स्थापनेपासून किंवा स्थायी अग्रीम दिल्या पासून नियमानसुार दाखले घेतले नाहीत. असे स्पष्ट होते. मागील अनेक वर्षापासून आर्थिक मेळ घेतलेला नाही. अर्धसमास पत्रास उत्तर दिल्याप्रमाणे कागदपत्रे दाखविली नाहीत.

मनपाच्या लेखा विभागाने स्थायी अग्रीमाबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही. व दरवर्षी मेळ घेतला नाही.

स्थायी आगाऊ रक्कमांचा हिशोब सांगली पाणी पुरवठा विभागाने दाखविला परंतु मिरज व कुपवाड विभागाने हिशोब लेखा परिक्षणास दाखविला नाही.

DATBPCM5601 (Ref No : 12)

## *4 कायम तसलमातीचे समायोजन झाले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 14415182.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 14415182.00 रु.,

***सन 2003 ते मार्च 12 पर्यत अग्रीम र.रु. 1,44,15,182/- प्रलंबित आहे. समायोजन झाले नाही. नोंदवही अद्यावत नाही. त्यामुळे आणखी किती प्रलंबित अग्रीम रक्कमेत वाढ होईल या बाबतची आकडेवारी अद्याप निश्चित केलेली नाही.***

सन 11-12 या वर्षाचे लेखा परिक्षण करीत असताना अग्रीम नोंद वही तपासली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

अग्रीम नोंदवही तपासली त्यातील सर्व स्तंभातील माहिती योग्य पध्दतीने नमुद केली नाही. स्तंभातील माहिती अपूर्ण आहे.

वर्षाअखेरीस गोषवारा काढला असून त्यावर सक्षम अधिकारी यांनी तपासलेबाबत त्यांची स्वाक्षरी केली नाही तसे विहित पध्दतीने गोषवारा  काढलेला नाही.

मागिल सन 10-11 ची नोंदवही तपासली त्यातील गोषवारा विहित पध्दतीने म्हणजे मागील प्रत्येक वर्षाचे किती अग्रीम प्रलंबित आहे ते नमुद नाही. त्यामुळे मागील किती वर्षाचे अग्रीम समायोजीत व्हावयाचे आहे ते तपासता आले नाही.

सन 2003 पासनूचे अग्रीम समायोजीत व्हावयाचे आहे असे नोंदी वरुन आढळते वेळीच समायोजन केलेले नाही.

एकाच अधिकाऱ्यास पुर्वी दिलेले अग्रीम समायोजन होणे अगोदर परत अग्रीम दिले आहे व अशा पध्दतीने श्री. रमेश सु. वाघमारे यांना र.रु. 20,000/- रु. 3,00,000/- व रु. 56,000/- असे तीन वेळा व तसेच कार्यकारी अभियंता यांना दि. 31/3/2006 रोजी रु. 45,41,305/- व दि. 28/8/2006 रोजी रु. 12,01,678/- असे दोन वेळा दिलेले अग्रीम अद्याप समायोजित झालेले नाही. व्याजासह रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

श्री. रमेश सु. वाघमारे यांना मसुरी येथे प्रशिक्षण घेणेसाठी र.रु. 3,00,000/- अग्रीम दिले प्रत्यक्ष खर्च किती झाला प्रमाणके दाखवली नाही. अग्रीम मंजुरीचा आदेश लेखा परिक्षणास दाखविला नाही. अद्याप अग्रीम समायोजन झाले नसल्याने रक्कम व्याजासह वसूल करावी.

सन 2003 ते मार्च 12 अखेर पर्यत रु. 1,44,15,182/- एवढे अग्रीम प्रलंबित असल्याचे आढळले आहे. विहित पध्दतीने समायोजन झाले नसल्याने अग्रीम प्रलंबित असलेचे दिसून येते. सन 1998 या महानगरपालिकेच्या स्थापनेपासून अग्रीमाचा आढावा घेवून अद्यावत नोंदवही लेखा परिक्षणास सादर केलेली नाही.

अग्रीमाचे समायोजन नाही प्रत्यक्ष खर्च नाही असे असताना वार्षिक लेख्यात अंतिम खर्च कसा दाखविला ते स्पष्ट झाले नाही.

अग्रीमाचे समायोजन वेळीच करणेबाबत महानगरपालिकेचे सक्षम अधिकारी यांचे नियंत्रण नसलेचे स्पष्ट होत. अग्रीम मंजूरीचा उद्देश, मर्यादा, समायोजनाची कार्यपद्धती व काल मर्यादा या संदर्भात मनपाने नियम करणे आवश्यक आहे.  अर्धसमास पत्रास संयुक्तिक उत्तर दिले नाही व उत्तरात नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रे दाखविलेली नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 14)

## *5 नियमबाह्यरित्या लेख्याबाहेर रक्कमा ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम : 10000000.00 रु.,

***महानगरपालिकेच्या लेखा विभागात विविध योजनासाठी 35 खाती आहेत. व त्यांची सामान्य रोख पुस्तकही आहेत. या शिवाय आणखी 6 खाती विविध बँकेत उघडली असून त्यांची सामान्य रोख पुस्तके ठेवलेली नाहीत. या खात्यावर दर महा घरपट्टी व जकातीचे मोठ्याप्रमाणावर रकमा जमा होतात. परंतू ते सामान्य रोख पुस्तकामध्ये नोंदविण्यात येत नाहीत.***

लेखा विभागाचे लेखापरीक्षण करताना बँकेतील एकूण 35 खाती व कॅशबुकाची यादी लेखापरीक्षणास पुरविणेत आली त्याप्रमाणे मार्च 2012 अखेरच्या शिल्लक रक्कमेबाबत लेखापरीक्षणही करणेत आले.

घरपट्टी विभागाचे लेखापरीक्षण करताना आणखी काही खाती बँकेत उघडून परस्पर त्या खात्यावर कराच्या रक्कमा भरल्या जात असलेचे अढळुन आले परंतु त्याचे कॅशबुक ठेवणेत आलेले नाही.

प्राप्त तपशील खालील प्रमाणे आहेत.

| बँक खाते क्रमाक | तपशील | बँकेचे नाव |
|---|---|---|
| 1) 470002010509946 | जनरल फंड | युनियन बँक |
| 2) 470002010509943 | विकास निधी | युनियन बँक |
| 3) 470002010509947 | अनामत | युनियन बँक |
| 4) 470002010502707 | जकात | युनियन बँक |
| 5) 1180 | घरपट्टी | सारस्वत बँक |
| 6) 1181 | पाणी पट्टी | सारस्वत बँक |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

लेखाविभागाने दिलेल्या 35 खात्या चे व्यतिरीक्त ही वरील सहा खाती लेखा परिक्षणावेळी आढळली आहेत. या खात्यांचा लेखा लेखाविभागात ठेवणेत आलेला नाही.

एकाच प्रकारच्या योजनेस उदा. जनरल फंड, विकास निधी,अनामत साठी एका पेक्षा जास्त खाती उघडणेत आली आहेत. या जादा खात्यावर मुख्यलेखाधिकारी यांचे नियंत्रण नाही असे आढळलेले आहे. अशा प्रकारे अर्थ खात्याचे नियंत्रण नसलेल्या खात्यावर कोट्यावधी रुपये जमा करण्याचे व्यवहार

करण्याबाबतचे निर्णय कोणाच्या आदेशाने व कोणत्या नियमानुसार घेतले याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविली नाहीत. या वेगवेगळ्या खात्यात जमा होणाऱ्या रक्कमांचे लेखांकन करण्याबाबत सुसंगत कार्यपध्दती विहीत करुन अंमलबजावणी करावी.

रक्कम विहित खाती जमा करणे व गुंतविणे या बाबत नियोजन नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. सर्व जादा खात्यांचा आढावा घेवून जबाबदारी निश्चत करुन सर्व व्यवहार एकाच खात्यावर करावेत व्यवहार सुसज्जता आणणे आवश्यक आहे. अर्ध समास पत्राचे उत्तर दिले नाही. लेखा संहिता नियम 1971 चे नियम 32 अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेली रक्कम त्वरीत व हातचे कांहीही राखुन न ठेवता नमुना क्रं.11 प्रमाणे असलेले रोकडवहीत नोंदविली पाहिजे असे असताना पाणी पुरवठा, जकात, घरपट्टी विभागाने नियमबाह्यरित्या युनियन व सारस्वत बँकामध्ये खाती उघडून त्यावर दररोजच्या जमा रक्कमा नगरपरिषद कर्यालयात जमा न करता परस्पर अन्य बँकामध्ये भरणा केली आहे.

लेखा संहिता नियम 1971 चे नियम 51 अन्वये सर्वसाधारण रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन समतोलित केले पाहिजेत व त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच नियम 51 (3) नुसार प्रत्येक माहिना अखेर रोकडवहीत नोंदलेल्या जमा व खर्चाचा बँक पासबुकामधील नोंदी बरोबर बाबवार तुलना करुन ताळमेळ घेणे आवश्यक असता सदर खात्यासाठी रोकडवही ठेवली नसलेने ताळमेळ घेतला जात नाही.

न.पा. लेखासंहिता 1971 चे नियम 70(2) अन्वये जकात अधिक्षकाने संकलन रक्कम नमुना क्रं.36 मध्ये नोंदवून पुस्तक व नमुना क्रं.13 ने विहित केलेल्या चलनासह जमा रक्कम मनपा कार्यालयात भरण केली पाहिजे. लेखापाल व रोखपाल भरणा केलेली रक्कम रोकडवहीच्या लेखेत आणील त्याप्रमाणे कार्यवाही न करता जकात विभागाने परस्पर रक्कम बँकेत भरणा केली आहे. त्यामुळे भरणा रक्कम लेख्याबाहेर राहिली आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 92 अन्वये नगरपालिका निधीत जमा असलेला शिलकी पैसा व्याजाने ठेवीच्या स्वरुपात बँकामध्ये गुंतवला पाहिजे. जकात विभागाचे युनियन बँक खाते क्रं. 470002010502707 या बचत खात्यावर दर महा 9 ते 10 कोटी जमा होतात व महिन्याचे शेवटी अन्य बचत खात्यावर जमा केले जातात. मनपाची जकात सन 2011-12 या आर्थिक वर्षात रु.100 कोटी जमा झाली असलेने जमा रक्कम लेखा विभागाचे जनरल फंड खात्यात भरणा केली असती तर खर्चाचा आढावा घेवून शिल्लक रक्कम बँकेमध्ये ठेवीच्या स्वरुपात गुंतविता आली असती. दर महाची शिल्लक रक्कम 10 कोटी असलेने बँकेचे 10% मुदतबंद ठेव व्याजाने रु.1 कोटी इतके व्याज महानगरपालिकेस उत्पन्नाचे स्वरुपात मिळाले असते.

नियमबाह्यरित्या जमा रक्कम मुख्य कार्यालयाकडे न भरता परस्पर अन्य बँक खातेमध्ये भरलेने सदर रक्कम महानगरपालिकेच्या लेख्याबाहेर राहिली आहे व शिल्लक रक्कम मुदतबंद स्वरुपात ठेवीमध्ये

गुंतविली नसलेने महानगरपालिकेचे 1,00,00,000/- रु. व्याजाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

DATBPCM5601 (Ref No : 15)

## *6 घरपट्टी विभागाने चालू खातेवर नियमबाह्यरित्या रक्कमा ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 35431789.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 35431789.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 3543178.00 रु.,

***घरपट्टी विभागाने दि. 6/2/12 रोजी र.रु. 3,54,31,789.50/- एवढ्या रक्कमेचे चलन दिले. परंतू लेखा विभागाने सदर रक्कम खात्यावर दि. 17/3/12 रोजी विलंबाने भरणा केली आहे.***

घरपट्टी विभागाकडील सारस्वत बँकचे चालू खाते क्र. 1180 वर दि. 1/12/11 ते 31/1/12 या कालावधीत जमा झालेली र.रु.3,54,31,789.50 चे भरणा चलन घरपट्टी विभागाने दि. 6/2/12 रोजी लेखा विभागाला दिले परंतू उपरोक्त रक्कम मुळ खात्यावर दि. 17/3/12 रोजी जमा केली असल्यामुळे सुमारे 44 दिवस विलंबाने रक्कम जमा झालेचे स्पष्ट होते.

दि. 1/2/12 ते 14/3/12 पर्यंत आणखी र.रु. 4,34,89,659/- जमा होती. व दि. 17/3/12 रोजी एकूण र.रु.7,89,21,448/- वर्ग करणे ऐवजी केवळ रु.3,54,31,789.05/- मुख्य खात्यावर वर्ग केली असलेमुळे उर्वरित र.रु. 4,34,89,659/- वर्ग झालेली नाही ही रक्कम वेळीच मुख्य खात्यावर वर्ग करुन गुंतवणुकीचे नियोजन केले नसलेने 10% प्रमाणे व्याजाचे उत्पन्न महानगरपालिकेस मिळाले नसलेचे स्पष्ट होते. सदर कार्यवाही मुळे महानगरपालिकेचे अर्थिक नुकसान झाले आहे.

ज्या खात्यावर रक्कम होती ते खाते क्र. 1180 सारस्वत सह. बँकेतील चालू खाते आहे. या खात्यावर व्याज मिळत नाही. यामुळे एवढ्या मोठ्या रक्कमेचा बँकेस फायदा होत आहे. नियोजन करुन बचत खात्यावर रक्कम रु. 3,54,31,789.05/- ठेवली नसलेने 4% प्रमाणे 44 दिवसाचे र.रु. 1,70,850/- व्याजचे नुकसान झालेले आहे. व सदर रक्कम 10% प्रमाणे गुंतवणूक केली नसलेने र.रु. रु. 35,43,178/- प्रती वर्षी एवढे व्याजाचे नुकसान झाले आहे. सन 2011-12 या वर्षात गुंतवणूक करणे बाबत काळजी घेतली नसलेने अशा सर्व रक्कमावरील व्याजाची गणना करुन व्याजाची रक्कम वसूल करावी.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 33(2),65,70,73(5),78(3), 97(5,) व 107 नुसार कर विभागाने नमुना नं. 13 मध्ये वेळोवेळी चलने देवूनही रक्कम वर्ग न करता चालू खात्यावर ठेवली व नंतर नियमात तरतुद व नमुना नसलेले रक्कम रुपये 3,54,31,789.05/- चे चलन दि. 6/2/12 रोजी तयार करुन घेवून नियम बाहृय पध्दतीने दि. 17/3/12 रोजी रक्कम जमा केलेने वित्तीय अनियमितता झालेली आहे.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 32(1) नुसार जमा झालेले अथवा संवितरीत केलेले अनुदान सहित सर्व रक्कमा हातचे काहीही राखून न ठेवता नमुना 11 सर्वसाधारण रोकड वहीत नोंदवले पाहिजे तसेच नियम 32(2) नुसार सर्व रोकड व धनादेशद्वारे जमा व वसूली रोजच्या रोज रोकडवहीत नोंदवली पाहिजे. परंतु नियमानुसार कार्यवाही केली नसलेचे स्पष्ट होते. त्यामुळे संबंधितावर जबाबदारी निश्चित करणेत यावी.

दि. 17/3/12 रोजी रक्कम काढताना रु. 4,34,89,659/- शिल्लक ठेवले व ते 31/3/12 रोजी काढून मुख्य खात्यावर वर्ग केली आहे. सारस्वत सह. बँकेत चालू खाते क्र. 1180 वर एवढ्या जास्त कालावधीसाठी रक्कम शिल्लक ठेवली आहे. राष्ट्रीयकृत बँकेचे बचत खातेवर रक्कम जमा केलेली नाही. यावरुन बँकेचे हित जपले असलेचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते. वर्षभरामध्ये जमा होणाऱ्या रक्कमेचे योग्य नियोजन होत नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर दिले नाही.

सारस्वत बँकेमध्ये खाते उघडण्यास कोणी परवानगी दिली याबाबतची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव र.रु. 35,43,178/- वसुलपात्र करणेत येत आहेत.

DATBPCM5601 (Ref No : 16)

## *7 पुढील आर्थिक वर्षातील जमा रक्कम नियमबाह्यरित्या सामान्य रोख पुस्तकात वर्षाअखेरीस जमा घेतले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 11818361.00 रु.

***लेखा विभागाने सन 2012-13 या आर्थिक वर्षात दि. 3/4/2012 ते 16/4/2012 या तारखांना बँकेमध्ये पावती / चलनाने जमा झालेली रक्कम पास बुकात एप्रील 12 मध्ये जमा केली आहे. परंतु सामान्य रोख पुस्तकात ती सन 2011-12 या आर्थिक वर्षात मार्च 2012 या महिन्यात नियम बाह्यरीत्या नोंदविली आहे.***

सन 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करताना घरपट्टी विभागाकडून जमा झालेली रक्कम वेळीच जमा झालेल्या नाहीत.

रक्कमांचा तपशील

| रक्कम रुपये | बँक जमा दिनांक | कॅशबुक जमा दिनांक |
|---|---|---|
| 1237424/- | 3/4/12 | 31/3/12 |
| 1152273/- | 4/4/12 | 31/3/12 |
| 2363117.50/- | 7/4/12 | 31/3/12 |
| 1158831/- | 8/4/12 | 31/3/12 |
| 1196189.50/- | 10/4/12 | 31/3/12 |
| 1119786.50/- | 11/4/12 | 31/3/12 |
| 1033717/- | 12/4/12 | 31/3/12 |
| 1011953/- | 13/4/12 | 31/3/12 |
| 1545069.50/- | 16/4/12 | 31/3/12 |
| 11818361/- | एप्रील | 31/3/12 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

दि. 3/4/12 ते 16/4/12 या कालावधीत बँक खात्यात जमा झालेली रक्कम प्रत्यक्ष दि. 31/3/12 रोजी जमा नसताना ती सामान्य रोख पुस्तकात या दिनांकास जमा दाखविणेत आली आहे. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 32 नुसार रक्कम ज्या तारखेस जमा होते त्याच तारखेस सामान्य रोख पुस्तकात

नोंदविणे आवश्यक होते. त्या प्रमाणे कार्यवाही नाही.

लेखा विभागाने रोख पुस्तकामध्ये दि. 31 मार्च, 2012 रोजी 1,18,18,361/- जमा दाखविली आहे. परंतू बँक पासबुकाचा मेळ घेतला असता सदर रक्कम बँकेमध्ये दि.03/04/2012 ते 16/04/2012 अखेर जमा झालेचे दिसून येते. न.पा. लेखासंहिता 1971 नियम 32 नुसार रक्कम ज्या तारखेस जमा होते त्याच तारखेस सामान्य रोख पुस्तकात नोंदविणे आवश्यक असता सन 12-13 या आर्थिक वर्षामध्ये जमा झालेली रक्कम सन 11-12 या आर्थिक वर्षात नियमबाह्यरित्या जमा झालेचे दाखविणेत आले आहे.

DATBPCM5601 (Ref No : 17)

## *8 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9अ*

***नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल व शासन निर्णय दि 6 जूलै 2005 नुसार शासनाने कळवूनही दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे मनपाने ठेवलेले नाहीत.***

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. लेखासू-102004/79/प्र.क्र.5/04/नवी-31 मुंबई दिनांक 6/7/2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विद्यमान आर्थिक व्यवस्थापन पध्दतीमध्ये सुधारणा करणेसाठी दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अमंलबजावणी 2004-2005 पासून सुरु करणेचे स्पष्ट निर्देश दिले असताना सुध्दा महानगरपालिकेमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवलेचे लेखापरीक्षणामध्ये दिसून आले नाही. नॅशनल म्यूनिसीपल अकाउंट मॅन्युअल (राष्ट्रीय लेखा संहिता) पध्दतीने लेखे ठेवणे आवश्यक असताना व तसे शासनाने सन 2005 ला याबाबत निर्देश देवून ही अद्याप या पध्दतीने लेखे ठेवलेले नाहीत.

अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तराप्रमाणे दुहेरी नोंद लेखा पध्दतीने ठेवलेले लेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 2)

## *9 नियमानुसार लेखे ठेवणेस स्थायी समितीची मान्यता घेतली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम 93 नुसार लेखे कोणत्या पध्दतीने ठेवावेत या बाबत स्थायी समितीने केलेल्या ठरावा बाबतची कागदपत्रे उपलब्ध केली नाहीत.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 नियम 93 नुसार स्थायी समितीने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार महानगरपालिकेच्या जमा खर्चाचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने जमाखर्चाचे लेखे विहित पध्दतीने ठेवणेबाबत दिलेल्या निदेशाची प्रत लेखा परिक्षणास देणेत आली नाही. तसेच मनपाने नगरपालिका लेखा संहिता 1971 प्रमाणे लेखे ठेवलेले आहेत परंतु त्यास मनपाने मान्यता दिली असलेबाबतची प्रत लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये लेखे नियमानुसार ठेवलेचे उत्तर दिले आहे. मात्र अनुषंगिक कागदपत्रे दाखविली नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 3)

## *10 वसंतदादा शेतकरी सह. बँकेत नियमबाह्यरित्या गुंतविलेल्या रक्कमाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 336048654.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 336048654.00 रु.

***वसंतदादा शेतकरी सह. बँकेत गुंतविलेली रक्कम अद्‌याप महानगरपालिकेस परत मिळाली नाही ही रक्कम गुंतविताना कोणत्या नियमानुसार निर्णय घेतले याबाबतचे कागदपत्रे व नस्ती लेखा परिक्षण कामी दिली नाहीत.***

राष्ट्रीयकृत बँकेत व सहकारी बँकेत एकूण किती गुंतवणूक केली त्याच्या बँक पावत्या व गुंतवणूक रजिस्टर्स व गुंतवणूकीची प्रपत्र याची एकत्रित माहिती लेखापरीक्षणास दिली नाही.

सन 2006 ते 2010 पर्यतच्या विशेष लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 55 मध्ये वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेत गुंतवणूक केलेल्या रक्कमेची तपासणी करुन परिच्छेद नोंदविला आहे.

वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेने दिनांक 03.04.2013 रोजी दिलेल्या पत्रानुसार परिशिष्ठ क्रमांक (01), बँकेकडे दिनांक 07.01.2009 अखेर व्याजासहित रुपये 33,60,48,654/- च्या ठेवी असले बाबत लेखी माहिती दिली आहे. सदर ठेवी मिळणे बाबत मनपाने कोणतेही प्रयत्न केले नसलेचे दिसून येते.

वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेत रक्कम गुंतविताना मान्यता घेतलेली कागदपत्रे लेखापरीक्षणावेळी वारंवार तोंडी सांगूनही तसेच सदर अर्धसमास पत्राद्‌वारे मागणी करुनही उपलब्ध करणेत आली नाहीत.

बँकेने सन 2009 अखेर व्याजासहित ठेवीची माहिती दिली आहे. परंतू सन 2012 अखेर व्याजाची गणना करुन ठेवी परत मिळविणेची कार्यवाही मनपा कडून करणेत आलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (1) चे परंतु अन्वये मान्य सहकारी बँकेत ठेवावयाची रक्कम कोणत्याही मान्य सहकारी बँकेच्या बाबतीत राज्य शासनाकडून सामान्यत: किंवा विशेषत: विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक असता कामा नये. असे असताना सुध्दा इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच बँकेत नियमबाह्यरित्या ठेवी ठेवलेने व सदर रक्कम परत मिळत नसलेने मनपाचे विकास कामांवर त्याचा प्रतिकुल परिणाम झालेचे दिसून येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (3) नुसार ठेवीमुळे किंवा गुंतवणूकीमुळे कांही नुकसान झाल्यास ते न.पा. निधीच्या खाती खर्ची टाकणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. अर्धसमास पत्रास वेळेत उत्तर दिले नाही.

उपरोक्त आक्षेपांच्या पुर्ततेस्तव रक्कम रुपये 33,60,48,654/- व वसुलीच्या दिनांकापर्यंतचे व्याज वसुलपात्र करणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 5)

### *11 जादा वेतन दिलेल्या कर्मचाऱ्यांचे पगारातून रक्कम कपात करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन,*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम : 9700.00 रु.,

| |
|---|
| ***सेवा पुस्तक व वेतन देयकाची तपासणी केली असता कर्मचाऱ्यांना नियमापेक्षा जास्त वेतन आदा करणेत आले आहे.*** |

कर्मचारी सेवा पुस्तक व वेतन देयकांचे लेखापरीक्षण केले असता, त्यांना खालील प्रमाणे जादा वेतन दिलेचे दिसून आले.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | पद | दिनांका पासून ते पर्यंत | जादा अदाई |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक संपत घाडे | व.लिपीक | 01.07.11 ते 01.07.12 | 1200/- |
| 2 | आनंदा शामराव वाघमारे | सब.ओव्हरसिअर | 01.07.07 ते 01.07.12 | 1080/- |
| 3 | वैशाली ब.सुर्यवंशी | नर्स | 01.07.07 ते 01.02.11 | 240/- |
| 4 | मंजुषा शशीकांत दोरकर | मेडी.ऑफिसर | 01.07.06 | 120/- |
| 5 | एच.ए.दिक्षित | उप अभियंता | 01.07.09 ते 01.07.11 | 360/- |
| 6 | पंकजा अनंत कोरे | ओव्हरसिअर | 01.07.09 ते 01.07.12 | 480/- |
| 7 | भगवान राजाराम पांडव | ओव्हरसिअर | 01.07.07 ते 01.07.10 | 240/- |
| 8 | संजय हरीशचंद्र धर्माधिकारी | क.अभियंता | 01.07.09 ते 01.07.11 | 360/- |
| 9 | परमेश्वर मल्लाप्पा हालकुडे (नेमणुक दि.10.05.02 पासुन अभिलेख पडताळणी नाही रजा लेखा दि.01.07.11 पासुन अपुर्ण आहे.) | क.अभियंता | 01.07.06 ते 01.07.11 | 720/- |
| 10 | लक्ष्मी व्यंकटेश तावरगेरी | हेड कॅशिअर | 01.07.06 ते 01.07.09 | 600/- |
| 11 | अंजली अजित जोशी | हेड कॅशिअर | 01.07.06 ते 01.07.09 | 600/- |
| 12 | विकास लक्ष्मण डुबल | वाहन चालक | 01.07.06 ते 01.07.11 | 1560/- |
| 13 | रमेश पांडूरंग उन्हाळे | मुकादम | 01.07.07 ते 01.07.12 | 720/- |
| 14 | सुनिल शंकर कुंभार | मुकादम | 01.07.07 ते 01.07.12 | 600/- |
| 15 | शिवाजी दत्तु पाटील | मुकादम | 01.07.07 ते 01.07.12 | 720/- |
| 16 | जालिंदर धोंडीबा सावंत | वाहन चालक | 01.07.07 | 120/- |
| | | | एकूण | 9700/- |

सदरच्या उणिवा हया चाचणी लेखा परिक्षणात आढळलेने इतर सर्व सेवापुस्तकांची पडताळणी करुन जादा वेतनाची वसुली करणेत यावी.

DATASJF7201 (Ref No : 10)

## *12 महानगरपालिकेने कर्मचारी आकृती बंधास शासनाची मान्यता घेतली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन, 0 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम : 435859058.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 435859058.00 रु.

***अधिनियम 1949 मधील कलम 51 (1 ते 5) प्रमाणे महानगरपलिकेने कर्मचारी आकृतीबंध शासनाकडून मान्य करुन घेतलेला नाही.***

सां.मि.कु.मनपाकडे सध्या 2372 इतका कर्मचारी वृंद कार्यरत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 51 (1 ते 5) नुसार सदर कर्मचाऱ्यांच्या शासन मान्य आकृतीबंधाची मागणी केली असता प्रशासन अधिकारी (आस्था) यांनी त्यांचेकडील पत्र क्रं. 786 दि. 07/02/2013 ने सां.मि.कु.मनपा कडे कुपवाड नगरपालिकेचा शासनमान्य आकृतीबंध उपलब्ध आहे. परंतु तत्कालीन सांगली, मिरज नगरपालिका यांचे आकृती बंध उपलब्ध नसलेचे तसेच मनपाचा ही मंजूर आकृतीबंध उपलब्ध नसलेचे मान्य केले आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध शासनाकडून मंजूर करुन घेण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केल्याचेही आढळले नाही. मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 29, नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश, कलम 457 मधील (3) नुसार नगरपालिका अधिकारी कर्मचारी (अ) ज्या जागावर नेमणुक करण्याचा अधिकार मनपामध्ये निहित असेल त्या जागासाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागावर नेमणुक करण्याची पध्दती (ब) अन्य जागावर नेमणुक करण्याची पध्दती ठरविण्याबाबत नियम करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत व सदर नियमास, कलम 455 अन्वये राज्य शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतू मनपाने याबाबत कोणतीही कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेने आकृती बंध, सेवाशर्ती तयार केली नसलेने सरळसेवा व पदोन्नातीने प्रत्येक संवर्गातील भरावयाची पदे, संवर्गनिहाय बिंदू नामावली प्रमाणे आरक्षण निश्चिती, पदोन्नती, सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजना लागू करणेसाठी च्या शैक्षणिक अटी याबाबतची कार्यवाही मनपा स्तरावर करुन शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सन 2011-12 या आर्थिक वर्षात विभागनिहाय वेतनावर खर्च करणेत आलेली रक्कम पुढील प्रमाणे आहे

| विभाग | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1) प्रशासन | - | 23112822/- |

2) लेखापरीक्षण - 3619308/-

3) नगरसचिव - 992576/-

4) जकात - 34745693/-

5) मालमत्ता व कर - 17942834/-

6) अग्निशमन व आणिबाणी सेवा - 14193347/-

7) विदुयत विभाग - 2780858/-

8) स्वच्छता कर्मचारी वगळून - 30541392/-

9) साफ सफाई व सोयी - 118601691/-

10) यंत्रशाळा - 1741294/-

11) आयुर्वेदीक विभाग - 1190478/-

12) प्रस्तृतीगृहे - 15285905/-

13) इतर दवाखाने - 17779172/-

14) कुटुंब कल्याण केंद्र - 3147917/-

15) नागरी आरोग्य सेवा - 8485318/-

16) उद्याने - 7643141/-

17) बांधकाम - 41135932/-

18) नगररचना - 2770275/-

19) जलनिसा:रण - 22045031/-

20) पाणी पुरवठा - 60536635/-

21) शिक्षण (बालमंदीर) - 2947936/-

22) ग्रंथालय - 1644334/-

23) मालमत्ता विभाग - 2975169/-

-----------------------

एकूण :- 435859058/-

शासनमान्य आकृतीबंध नसलेने सन 2011-12 या लेखापरीक्षण कालावधीमधील कर्मचारी वेतनाची रक्कम रु.43,58,59,058/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATASJF7201 (Ref No : 4)

## *13 मनपा निवासस्थानात रहाणाऱ्या कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता कपात केला नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन,*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम : 55872.00 रु.,

***मनपा कर्मचारी निवासस्थानात वास्तव्यास असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन घरभाडे भत्ता कपात करणेत आलेला नाही. तसेच वेतन बिलात नाव नसलेल्या व्यक्ती निवासस्थानामध्ये रहात असलेचे नोंदवहीवरुन दिसून येते. ही अत्यंत गंभीर बाब आहे.***

मनपा कडील खालील कर्मचारी मनपा निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत. परंतु त्यांच्या वेतनातुन घरभाडे भत्ता कपात करणेत आला नसलेने तो कपात करणेत यावा. तसेच सदर कर्मचारी जेंव्हा पासून निवासस्थानात रहातात तेंव्हा पासूनचे घरभाडे भत्ता कपात करणेत यावा.

| कर्मचाऱ्यांचे नांव | दिला जाणारा घरभाडे भत्ता |
|---|---|
| अर्जून सुनकाप्पा मद्रासी | 941 x 12 = 11,292/- |
| अभिजित जंबो मद्रासी | 688 x 12 = 8,256/- |
| मोशय्या देवसाहेब मद्रासी | 579 x 12 = 6,948/- |
| नारायण पांडूरंग यादव | 1443 x 12 = 17,316/- |
| महादेवी केरीपाळे | 1005 x 12 = 12,060/- |
| एकूण | 55872/- |

तसेच खालील सेवानिवृत्त कर्मचारी मयत झालेले आहेत परंतु निवासस्थान अद्याप मनपाच्या ताब्यात आले नसल्याचे निवासस्थान नोंद वहीवरुन दिसुन येते.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचं नाव | हुद्दा | दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | सुमन फकीरचंद गोंडाळे | सफाई कामगार | 11.07.09 - मयत |
| 2 | सुनिता किम चव्हाण | -----,,----- | 03.01.11 - मयत |
| 3 | फुलाबाई फुलय्या मद्रासी | -----,,----- | सेवा निवृत्त |
| 4 | सुनिल किम वाघोले | -----,,----- | 30.04.12 सेवा निवृत्त |
| 5 | मुक्तार अब्दुजरजाक काझी | -----,,----- | सेवानिवृत्त |
| 6 | सुरेश नारायण मद्रासी | -----,,----- | 02.07.02 पासून गैरहजर |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | प्रविण गुडूलाल चव्हाण | -----,,----- | 11.02 पासून गैरहजर |
| 8 | दिपा बलराज बनसे | -----,,----- | 01.02.09 पासून गैरहजर |
| 9 | प्रफुल्ल कांबळे | फायरमन | 01.04.11 पासून गैरहजर |
| 10 | उषा हिरालाल बारस्कर | सफाई कामगार | वेतन बीलात नाव समावीष्ठ नाही. |
| 11 | अर्जुन विष्णु चंडाळे | सफाई कामगार | ---------------,,-------------------- |
| 12 | मुबारक री. मुजावर | हरकामी बालमंदीर | ---------------,,-------------------- |
| 13 | किशोर ज. भोसले | ऑईलमन वॉटर वर्क्स | ---------------,,-------------------- |
| 14 | क्षिरसागर गितेश किसन | शिपाई | ---------------,,-------------------- |
| 15 | दादासाहेब सावळजकर | फोरमन | ---------------,,-------------------- |
| 16 | प्रभाकर बबूराव आनंदे | शिपाई | ---------------,,-------------------- |
| 17 | सुशिल लक्ष्मण भोरे | शिपाई | ---------------,,-------------------- |
| 18 | विकास सावंत | क्लीनर बांधकाम | ---------------,,-------------------- |
| 19 | मुजावर | निरंक | ---------------,,-------------------- |

सदरचे कर्मचारी मयत, सेवानिवृत्त झाले नंतर 6 महिन्यात निवासस्थान मनपाने ताब्यात घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच त्यांचेकडून बाजार भावाप्रमाणे भाडे वसुल केलेले नाही.

उपरोक्त अ.क्र. 10 ते 19 कर्मचाऱ्यांची नावे वेतनबिलात समाविष्ट नाहीत परंतु निवासस्थान नोंद वहीमध्ये सदर कर्मचाऱ्यांच्या नावे निवासस्थान दिलेची नोंद आहे. त्यामुळे खाजगी व्यक्ती मनपाचे निवासस्थानामध्ये नियमबाह्यरित्या रहात असलेचे स्पष्ट होते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. कायम कर्मचाऱ्यांना सदर निवासस्थाने मागणी नुसार दिली नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच त्यांचे न्याय हक्क मिळाले नसलेने त्यांना लाभापासून वंचित रहावे लागले आहे. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 8)

## *14 कर्मचाऱ्यांकडून जामीन कदबे घेणेत आले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन,*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम : 1407136.00 रु.,

***लेखा संहिता 1971 चे नियम क्र.138 प्रमाणे मनपाचे प्रत्येक अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याने दिलेल्या तारणपत्रांचे पुस्तक, नमुना क्र.106 प्रमाणे ठेवलेले नाही.***

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका लेखा परिक्षणावेळी मनपाच्या मालकीची मालमत्ता, रोकड अथवा दस्तऐवज हाताळणे ज्यांना आवश्यक आहे. असे जे कर्मचारी आहेत त्या पैकी खालील कर्मचाऱ्यांनी जामीन कदबे देणे बंधनकारक असता ते न घेता दरवर्षी महिन्यातून एकदा त्यांचे नांवापुढे दर्शविण्यात आलेली रक्कम वेतनातून कपात केली जाते.

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे x जामिन कदबा रक्कम | नोव्हें. 11 चे वेतनातून घेतलेली रक्कम | कपात करावायाची रक्कम (र.क्र.3 - र.क्र.4 ) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | स्वच्छता अभियंता | 5 x 3000=15,00/- | 33 x 5 =165 /- | 14,835/- |
| 2 | लेखापाल | 1x3000=3000/- | 33x1 =33/- | 2967/- |
| 3 | रोखापाल | 1x3000=3000/- | 33x1 =33/- | 2967/- |
| 4 | अधिक्षक | 5x2000=10,000/- | 22 x5 =110/- | 9890/- |
| 5 | स्वच्छता निरिक्षक | 20x2000=40,000/- | 22 x20 =440/- | 39,560/- |
| 6 | कर अधिक्षक | 5x3000=15,000/- | 33 x5 =165/- | 14,835/- |
| 7 | प्रत्येकी वसुली लिपीक | 50x1000=50,000/- | 11 x50 =550/- | 49,450/- |
| 8 | जकात अधिक्षक | 2x3000=6000/- | 33 x2 =66/- | 5934/- |
| 9 | जकात निरिक्षक | 11x2000=22,000/- | 22 x11 =246/- | 21,754/- |
| 10 | जकात तपासणीस | 78x1000=78,000/- | 22 x78 =1716/- | 76,284/- |
| 11 | जकात लिपीक | 57x1000=57,000/- | 11 x57 =627/- | 56,373/- |
| 12 | शिक्षक | 9x 2000=18,000/- | 22 x9 =198/- | 17,802/- |
| 13 | परिचारिका | 56x1000=56,000/- | 11 x56 =616/- | 55,384/- |
| 14 | मेस्त्री | 10x1000=10,000/- | 22 x10 =220/- | 9780/- |
| 15 | बंब चालक | 30x 500=15,000/- | 11 x30 =330/- | 14,670/- |
| 16 | भांडारपाल | 1x 2000=2000/- | 22 x1 =22/- | 1978/- |
| 17 | अभिलेखापाल | 1x 2000=2000/- | 11 x1 =11/- | 1989/- |
| 18 | प्रत्येक लिपीक | 500x500=2,50,000 | 11 x500 =5500/- | 2,44,500/- |
| 19 | मोटर चालक | 230x1000=2,30,000/- | 11 x230 =2530/- | 2,27,470/- |
| 20 | मुकादम | 100x 500=50,000/- | 11 x100 =1100/- | 48,900/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21 | चपराशी | 1000x500=5,00,000/- | 11x1000=11,000/- | 4,89,000/- |
| 22 | बृक्ष अधिकारी | 5x3000=15,000/- | 33 x5=165/- | 14,835/- |
| 23 | बागमाळी | 21x500=10,500/- | 11 x21=231/- | 10,269/- |
| | | | एकूण | 14,07,136/- |

सदर कर्मचाऱ्यांची तारण रक्कम निश्चित केलेली आहे. परंतु सन 11-12 मध्ये नोव्हेंबर 2011 चे वेतनातून वरील प्रमाणे रक्कम कपात केली आहे. उर्वरित रक्कम त्यांचेकडून वसूल करणे आवश्यक असता ती केली नसलेने वसुल करणेत यावी. अर्धसमास पत्र क्रं.41 दि.05/01/2013 चे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 9)

## ***15 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास बंद मिटरचे दंडापोटी आदा केलेली रक्कम वसूल करणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम : 561860.00 रु.,

***महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली यांनी बंद मिटर वेळेत सुरु न केलेबाबत रुपये 5,61,860/- दंड महानगरपालिकेकडून वसुल केला आहे. तो संबंधीताकडून वसूल करणेत यावा.***

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली यांचेकडून महानगरपालिका पिण्याचे पाणी विकत घेवून नागरिकांना नळाद्वारे पुरवित आहे. त्यापोटी महामंडळाकडून देणेत आलेल्या परिशिष्ठ क्रमांक ( 02 ) मध्ये नमुद देयकांचे लेखापरीक्षण केले असता कांही मिटर बंद असलेने व वेळेत दुरूस्त न केलेने दरमहाचे बिलातून एकूण रुपये 5,57,260/- चा दंड वसूल केला आहे.
खालील आक्षेप घेणेत येत आहेत.
जी मिटर बंद आहेत त्या महिन्याच्या अगोदरच्या बिलावर उदा. कनेक्शन SND/ 1072 बिल क्र. 6364 दि. 05/3/2012 चे उपप्रमाणकामध्ये जलमापक दि. 30/6/2011 पासून नादुरुस्त आहे. जलमापक त्वरीत बदलावा व यासाठी रुपये 200/- भरावेत तसेच जलमापक न बदललेस दि. 13/8/2011 पासून दंडनीय आकारणी केली जाईल असा शेरा आहे. असे असतानाही संबंधितांनी मिटर दुरुस्त करणेस दुर्लक्ष केलेने मनपाचे रुपये 5,61,860/- चे नुकसान झाले आहे. सदर रक्कम जबाबदारी निश्चित करून संबंधिताकडून

वसूल करणेत यावी.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये 5,61,860/- वसूलपात्र करणेत येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 7)

## *16 सारस्वत बँकेच्या चालू खात्यावर नियमबाह्यरित्या रक्कमा जमा केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेच्या जनरल फंडासाठी युनियन बँकेत बचत खाते क्र. 424201010932045 हे नियमानुसार खाते असताना सारस्वत बँकेत आणखी एक चालू खाते उघडून त्यामध्ये प्रत्येक पूर्ण महिना 2 ते 4 कोटी पर्यत रक्कम जमा असते. त्यामुळे लाखो रुपये व्याजाचे नुकसान होत आहे.***

कर निर्धारण व संकलन कार्यालयाने सारस्वत सहकारी बँकेत खाते क्र. 165100100001180 हे खाते चालू ठेवले आहे. परंतू या खात्यासाठी सामान्य रोख पुस्तक नमुना क्र. 11 ठेवलेले नाही.

जनरल फंडासाठी युनियन बँकेत खाते क्र. 424201010932045 हे नियमानुसार स्वतंत्र खाते ठेवले असताना आणखी एक खाते वरील प्रमाणे सारस्वत बँकेत ठेवले आहे. बँक खाते उघडणेबाबतची नस्ती लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम 83 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नगरपालिका निधी खात्यात सर्व जमा रक्कमा भरण्याबाबत केलेल्या तरतुदीचे पालन होत नाही.

सारस्वत बँकेच्या खात्यावरुन करापोटी जमा झालेल्या रक्कमा एक महिना पूर्ण झाल्यानंतर जनरल फंडाचे मुळ खात्यावर रक्कम वर्ग केली जाते. रक्कम वर्ग करेपर्यत 2 ते 4 कोटी पर्यतची रक्कम चालू खात्यावर सारस्वत बँकेत राहते. त्याचे व्याज मिळत नाही. व बँक विना व्याज रक्कम वापरते. जनरल फंडात थेट रक्कम जमा करुन व खर्चाचा आढावा घेवून रक्कम गुंतवणे आवश्यक होते तसे न झाल्याने व्याजापोटी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

मार्च अखेरीस शेवटच्या आठवड्यात युनियन बँकेच्या मुख्य खात्यावर थेट कराच्या रक्कमा भरल्या आहेत. परंतु वर्षभर थेट न भरता सारस्वत बँकेच्या वेगळ्या चालू खात्यावर भरल्या आहेत. यामुळे कराच्या रक्कमा स्विकारणे व त्या मनपा निधीत जमा करणे. या संदर्भात निश्चित व एकसमान कार्यपध्दती नाही.

सारस्वत बँकेच्या पासबूकाप्रमाणे दि. 03/04/2012 ते 16/04/2012 पर्यत कराची रक्कम रु. 42,32,699.50/- बँकेत भरणा केले असे असताना सदर रक्कम दि. 31/3/2012 रोजी रोकडपुस्तकामध्ये

नियमबाहयरित्या जमा दाखविली आहे. अर्धसमास पत्रास उशिरा दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.
महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता , 1971 क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे तसेच 2 अन्वये सर्व रोकड व धनादेश रोकड वहीत नोंदणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न करता परस्पर सारस्वत बँकेमध्ये करनिर्धारण विभागाकडून पैशाचा भरणा केला जातो.
लेखासंहीता 1971 चे नियम क्रं.35 व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे नियम 6.42(फॉर्म जनरल 12) अन्वये प्रत्येक देयक संकलकाने वा जमा कारकुनाने संकलीत वसुली ठराविक वेळी रोजच्या रोज भरणा केली पाहिजे. ती भरणा करतेवेळी त्याने सोबत जमापावती पुस्तक, चलन व त्यांचे संकलन पुस्तक आणले अथवा पाठविले पाहिजे. नगरपरिषद कार्यालयात सदर रक्कम स्विकार करणाऱ्याकडून त्यांची पोचपावती चलनावर व संकलन पुस्तकातही केली पाहिजे. उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही न करता रक्कम परस्पर सारस्वत बँकेत भरणा केली जात असलेने महापालिकेच्या रोकडवहीमध्ये करनिर्धारण विभागाने गोळा केलेल्या रक्कमांचा दररोज समावेश होत नसलेने सदर रक्कम लेख्याबाहेर राहत असलेचे स्पष्ट होते. या संदर्भात कर रुपाने गोळा होणाऱ्या सर्व रक्कमा नगरपालिकेच्या निधीत जमा होतील याकरिता सुसंगत कार्यपध्दत निश्चित करणे आवश्यक आहे.

DATBPCM5601 (Ref No : 13)

## *17 कुटुंब कल्याण व नागरी आरोग्य केंद्रे याचे वेतन भत्ते अनुदान प्रलंबित असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष:आरोग्य, राज्य निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम : 32462860.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 32462860.00 रु.

***नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र. एसएमसी -3098/3336/प्र.क्र.233/98/ नवि-22 दि.15 जानेवारी 2001 नुसार कुंटुब कल्याण केंद्र व नागरी आरोग्य सेवा योजना 100 % अनुदानावरील एकुण 42 पदे निर्माण करण्याच्या आयुक्त ,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दिनांक 31/08/1998 चे प्रस्तावास मान्यता देणेत आली आहे. सन 2004-05 ते 2012-13 पर्यत शासनाकडुन येणे असलेले अनुदान रु.3,24,62,860/- अद्याप प्राप्त करुन घेतले नाही. शासनाने मागणी केलेले प्रत्येक वर्षाची अंदाजपत्रके, लेखापरीक्षण तक्ते ,वेतन निश्चितीतील तफावती , तपासणी अहवाल व उद्दीष्टपुर्ती***

***अहवाल इत्यादी शासनास सादर करण्यात आले नाही.त्यामुळे शासनाकडुन अनुदान प्राप्त झाले नाही .***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा अंतर्गत कुंटुब कल्याण व नागरी आरोग्य केंद्रे यामध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते यांच्या पुर्ततेसाठी शासनाकडुन 100% सहाय्यक अनुदान प्राप्त होते. त्यासाठी महानगरपालिकेने शासनाच्या शर्ती व अटींचे पालन करणे आवश्यक आहे.तथापि कुंटुब कल्याण व नागरी आरोग्य केंद्राच्या अभिलेखाची तपासणी केली असता , अभिलेख व्यवस्थित ठेवलेले नाहीत, वेतन व भत्याच्या नस्त्या , नोंदवहया विहीत पध्दतीत ठेवलेल्या नाहीत.. शासनाने मागणी केलेले प्रत्येक वर्षाचे अंदाजपत्रके, लेखापरीक्षण तक्ते ,वेतन निश्चिती तील तफावती , तपासणी अहवाल व उदीष्टपुर्ती अहवाल इत्यादी शासनास सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सन 2004-05 ते 2012-13 पर्यत शासनाकडुन येणे असलेले अनुदान रु.3,24,62,860/- अद्याप प्राप्त झाले नसलेने या कर्मचा-यांचे वेतनाचा भार महानगरपालिकेवर पडल्याने नागरीकांचे सोई-सुविधांवर खर्च करणे शक्य झालेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 6)

# कलम ९ ब खालील आक्षेप

## गंभीर अनियमितता

## *18 विद्युत विभागाने निविदा न मागविता साहित्य खरेदी केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विद्युत विभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 601993.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 601993.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 12040.00 रु.,

***दर कराराव्यतिरीक्त वस्तूंची खरेदी करताना एकूण वार्षिक खरेदी रु. 50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी विहीत कार्यपद्धती अनुसरुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतु या ठिकाणी निविदा न मागविता थेट दरपत्रकाच्या आधारे खरेदी केली जाते.***

शासन निर्णय उद्योग दर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-1093/(2635)/उद्योग-6, दि.16/7/1993 आणि शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-2002/ (2990)/उद्योग-6, दि. 4/2/2003 मधील तरतुदीनुसार दरकराराव्यतिरीक्त वस्तूंची खरेदी करताना एका वस्तूंची एकूण वार्षिक खरेदी 50,000/-किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी विहीत कार्यपद्धती नुसार निविदा मागविणे बंधनकारक आहे.

तसेच वर्षभर फुटकळ स्वरुपात वारंवार खरेदीऐवजी वर्षासाठी दर ठरवुन त्या पुरवठादाराकडून आवश्यकतेनुसार वस्तू खरेदीसाठी दर करार करणे अधिक श्रेयस्कर आहे.

परंतु लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले आहे की, खालील प्रकरणात निविदा न मागविता थेट दरपत्रकांच्या आधारे श्री.प्रसाद जोशी या एकाच ठेकेदाराकडून खरेदी केलेली आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | साठा नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक | प्रमाणक क्रमांक | दिनांक | एकूण रक्कम | आयकर वजाती (2% टीडीएस.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | 7 |
| 1 | स्ट्रिट लाईट टायमर पेटीकरीता 95 ॲम्पीयर कपॅसिटीचा कॉन्टॅक्टर युनिट घड्याळ व बाबुंची शिडी पुरविणे | | | | 60430 | 1208.60 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 150 वॅट सोडीयम फिटींग, 40 वॅट स्ट्रीट लाईट फिटींग व ब्रॅकेट पुरविणे. | | | | 59330 | 1186.60 |
| 3 | विविध ठिकाणी 8 मी. उंचीचे सिमेंट पोल उभे करुन 40 वॅट स्ट्रिट लाईट फिटींग व सर्व्हिस वायर पुरविणे | | | | 61464 | 1229.28 |
| 4 | सर्व्हिस वायर 40 वॅट चोक स्टार्टर पुरविणे | | | | 61284 | 1225.68 |
| 5 | प्रभाग समिती क्र. 3, कुपवाड कार्यालयामध्ये वायरींग करणे व प्रतापसिंह उद्यानामध्ये मोकाट कुत्री पकडलेनंतर निर्बिजिकरण करणेकामी लाईट व्यवस्था करणे. | | | | 52783 | 1055.66 |
| 6 | प्रभाग समिती क्र. 3 मधील सदस्या सौ. वंदना सायमोते यांच्या वॉर्डात स्ट्रीट लाईट करीता सर्व्हिस वायर कॉन्टॅक्टर व घड्याळ पुरविणे | | | | 61485 | 1229.70 |
| 7 | 40 वॅट ट्युब स्टार्टर होल्डर व 40 वॅट कॉपर चोक पुरविणे | | | | 61250 | 1225.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8 | प्रभाग क्र. 4 अंतर्गत लोकमान्य कॉलनी मध्ये झोपडपट्टी धारकांकरीता व प्र. 1 मध्ये पूरग्रस्तांकरीता तातडीने लाईट व्यवस्था करणे. 100 वॅट बल्ब, वायर, होल्डर, स्वीच, फ्लेग्झिबल पाईप, सव्हिर्स वायर 2 x 4 स्क्वे. एम.एम., 40 ॲम्पीयर 2 पोल ई.एल.सी.बी. | | | | 61200 | 1224.00 |
| 9 | महापालिका क्षेत्रातील वाकलेले , पडलेले स्ट्रीट लाईट पोल सरळ करणे, 8 मी. उंचीचे नवीन सिमेंट पोल पुरविणे, 2 x 4 स्क्वे. एम.एम. ॲल्युमिनियम आय.एस.आय. मार्क सर्व्हिस वायर जी.आय. तार बॉबीनसह पुरविणे | | | | 61475 | 1229.50 |
| 10 | 60 ॲम्पीयर एल. ऍन्ड टी. कॉन्टॅक्टर युनिट 24 एम.एम. डिजीटल घड्याळ, 63 ॲम्पियर किटकॅट, एल. ऍन्ड टी. मेक कॉन्टॅक्टर कॉईल पुरविणे. | | | | 61292 | 1225.84 |

आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 C नुसार ठेकेदाराच्या देयकामधुन 2% प्रमाणे आयकर कपात केली नसलेने रक्कम रु.6,01,993/- x 2% प्रमाणे रुपये 12,040/- वसुल करणेत यावी.

DATRMJM6101 (Ref No : 117)

## *19 विद्युत विभागाकडे स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती कामी लागणारे साहीत्य खरेदीतील वित्तीय अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विद्युत विभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 6514575.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 6514575.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 130292.00 रु.,

***सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडे स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती कामी लागणारे साहीत्य खरेदीमध्ये मंजुर रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचे साहित्य खरेदी केलेने वित्तीय अनियमितता झालेचे दिसून येते.***

महानगरपालिकेच्या विद्युत विभागा कडे स्ट्रीट लाईट दुरुस्तीसाठी आवश्यकते प्रमाणे इलेक्ट्रिक साहित्य पुरविणेकामी सन 2011-12 मध्ये वार्षिक एजन्सी नियुक्त करणेकामी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये रितसर ई-टेंडर सेलद्वारे निविदा मागविणेत आल्या होत्या. मुदतीत तीन निविदा प्राप्त झाल्याचे दिसते. दि. 26/9/2011 रोजी निविदा उघडण्यात आल्या आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नाव | प्राप्त निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | मे. प्रसाद इलेक्ट्रिक ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स् इंजि. मिरज | शेकडा 1% कमी | I |
| 2 | लक्ष्मी इलेक्ट्रीकल्स्, सांगली | ऐस्टिमेट दराप्रमाणे | II |
| 3 | प्रेसिजन इंजिनिअर, मिरज | शेकडा 2% जादा | III |

आलेल्या निविदेमध्ये मे. प्रसाद इलेक्ट्रिक ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स् इंजि. मिरज यांचा निविदा दर एस्टिमेट दरापेक्षा शे. 1% कमी असल्याने त्यांची निविदा मान्य करणेत आली होती. अंदाजित खर्च रु. 31,02,365/- इतका होता. मात्र ही प्रक्रिया पूर्ण होणेस आठ महिन्यांचा कालावधी संपला असल्याने विषयांकीत कामी डिसें. 2011 ते 31 मार्च 2012 अखेर चार महिन्यांसाठी 31,02,365/- ऐवजी फक्त रक्कम रु. 13,78,829/- एवढ्या होणाऱ्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

सदरचा होणारा खर्च "025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षातून भागविणेबाबत उपायुक्त यांनी त्यांच्या दि. 15/11/2011 च्या विषयपत्रात स्पष्ट नमुद केले आहे. परंतु

या लेखाशिर्षाव्यतिरीक्त इतर लेखाशिर्षातूनही खर्च झाल्याचे निदर्शनास येत आहे.
डिसें. 11 ते मार्च 12 या चार महिन्यातील खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | बिल क्रमांक/ दिनांक | लेखाशिर्ष | रक्कम | अनुदान |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 290/11-12 17/12/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 1,03,207/- | 10,00,000/- |
| 2 | 292/11-12 17/12/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 91,327/- | |
| 3 | 327/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 92,732/- | |
| 4 | 325/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 90,595/- | |
| 5 | 326/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 1,73,275/- | |
| 6 | 327/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 94720/- | |
| 7 | 328/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 98129/- | |
| 8 | 329/11-12 09/1/2011 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 81,641/- | |
| 9 | 333/11-12 12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजना | 98594/- | 53,00,00,000/- |
| 10 | 332/11-12 12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजना | 98871/- | 53,00,00,000/- |
| 11 | 334/11-12 12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजना | 98,003/- | 53,00,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | 335/11-12<br>12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण<br>झोपडपट्टी विकास योजना | 79,064/- | 53,00,00,000/- |
| 13 | 336/11-12<br>12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण<br>झोपडपट्टी विकास योजना | 79,156/- | 53,00,00,000/- |
| 14 | 337/11-12<br>12/1/2012 | 002 इतर योजना 002) गृहनिर्माण<br>झोपडपट्टी विकास योजना | 98,508/- | 53,00,00,000/- |
| 15 | 352/11-12<br>23/1/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 3,02,138/- | 70,00,000/- |
| 16 | 350/11-12<br>23/1/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 4,18,310/- | 70,00,000/- |
| 17 | 349/11-12<br>23/1/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 339260/- | 70,00,000/- |
| 18 | 351/11-12<br>23/1/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 241461/- | 70,00,000/- |
| 19 | 342/11-12<br>23/1/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 98989/- | 70,00,000/- |
| 20 | 359/11-12<br>6/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 269049/- | 70,00,000/- |
| 21 | 358/11-12<br>6/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 197663/- | 70,00,000/- |
| 22 | 357/11-12<br>6/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 98886/- | 70,00,000/- |
| 23 | 360/11-12<br>6/2/2012 | बी 1108 रहदारीस अडथळा करणारे पोल हटविणे | 253699/- | 1,50,00,000/- |
| 24 | 386/11-12<br>28/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 189892/- | 70,00,000/- |
| 25 | 385/11-12<br>28/2/2012 | 002) इतर योजना गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना | 234067/- | अनुदान नमुद नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | 384/11-12 28/2/2012 | 002) इतर योजना गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना | 99238/- | 53,00,00,000/- |
| 27 | 390/11-12 28/2/2012 | 002) इतर योजना गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना | 178344/- | 85,00,000/- |
| 28 | 387/11-12 28/2/2012 | 002) इतर योजना गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना | 205069/- | 85,00,000/- |
| 29 | 389/11-12 28/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 281902/- | 85,00,000/- |
| 30 | 388/11-12 28/2/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 98840/- | 85,00,000/- |
| 31 | 414/11-12 21/3/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 196713/- | 85,00,000/- |
| 32 | 415/11-12 21/3/2012 | 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती | 128650/- | 85,00,000/- |
| 33 | 417/11-12 21/3/2012 | इमारत देखभाल दुरुस्ती | 198079/- | 45,00,000/- |
| 34 | 416/11-12 21/3/2012 | इमारत देखभाल दुरुस्ती | 298030/- | 45,00,000/- |
| 35 | 468/11-12 21/3/2012 | इमारत योजना 002) एकात्मिक गृहनिर्माण विकास योजना कार्यक्रम | 397911/- | 53,00,00,000/- |
| 36 | 410/11-12 21/3/2012 | इमारत योजना 002) एकात्मिक गृहनिर्माण विकास योजना कार्यक्रम | 2,29,180/- | 53,00,00,000/- |
| 37 | 420/11-12 26/3/2012 | इमारत योजना 002) एकात्मिक गृहनिर्माण विकास योजना कार्यक्रम | 1,81,413/- | 53,00,00,000/- |
| | | एकूण खर्च | 65,14,575/- | |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

स्थायी समिती ठराव क्र. 427, स्थायी समिती सभा क्र. 21, विषय क्र. 25 दि.25/11/2011 अन्वये रु.13,78,829/- एवढ्या खर्चास मान्यता दिलेली असताना डिसें. 11 ते मार्च 12 या चार महिन्यात रु. 65,14,575/- एवढा खर्च झाला आहे. रु. 51,35,746/- एवढा जादा खर्च स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय केला आहे

एकूण निविदा रुपये 3102365/- ची मागविण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात एकूण रुपये 6514575/- ची खरेदी करण्यात आली. त्यामुळे वाढीव संख्या व खर्च विचारात घेता स्पर्धात्मक दराचा फायदा मनपास झाला नाही.

सदरचा खर्च हा 025 ब) 2 विद्युत विभाग 055) विद्युत देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षातून भागविणेबाबत दि.15/11/2011 च्या विषयपत्रात नमुद केलेला असताना त्यानंतर वेगवेगळ्या लेखाशिर्षातूनही स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय खर्च करणेत आला आहे. त्यामुळे वार्षिक लेखा व प्रत्यक्ष लेखाशिर्षातून भागविलेला खर्च याचा मेळ बसत नसलेचे दिसून येते.

आयकर अधिनियम 1961 कलम 194C प्रमाणे ठेकेदारांकडून 2% टी.डी.एस. कपात करणे अनिवार्य असलेने रक्कम रु. 6514575/- x 2% प्रमाणे रु.130292/- वसुलपात्र आहे.

वरील अ.क्र. 1 ते 37 प्रमाणे खरेदी केलेल्या मालाची नोंदवही अपूर्ण आहे. साहित्य वाटप केलेच्या नोंदी नाहीत. त्यामुळे खरेदीची आवश्यकता पडताळून पाहता आली नाही.

लेखापरीक्षणास ठेकेदारास आदा केलेल्या देयकांची प्रमाणके दाखविणेत आलेली नाहीत.

DATRMJM6101 (Ref No : 38)

## *20 पाटबंधारे विभाग (नदीच्या पाण्याचा आकार) विलंब आकार भरणा केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 584252.00 रु.,

***पाटबंधारे विभागाचे बिगर सिंचन देयकामध्ये देयके वेळेत भरणा न केलेस विलंब आकार भरणा करणे आवश्यक असता त्यानुसार मनपाने रु. 5,84,252/- विलंब आकार भरणा केलेला नाही.***

| अ क्र | तपशील | देयक दिनांक | एकूण रक्कम | अंतिम देयक दिनांक | भरणा दिनांक व प्र क्र | विलंब आकार 10% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सांगली 03/11 | 18/5/11 | 18,62,083 | 27/5/11 | 6793 5/3/12 | 1,86,208 |
| 2 | मिरज 03/11 | 18/5/11 | 8,39,356 | 27/5/11 | 7659 31/3/12 | 83,935 |
| 3 | मिरज 02/11 | 17/3/11 | 7,90,758 | 27/5/11 | 7958 31/3/12 | 79,075 |
| 4 | सांगली 02/11 | 17/3/12 | 23,50,349 | 20/3/12 | 7957 31/3/12 | 2,35,034 |
| | | | | एकूण | | 5,84,252 |

पाटबंधरे उपविभाग सांगली यांचेकडून महानगरपालिका नदीमधून अशुध्द पाणी उचलून त्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करुन पिण्याचे शुध्द पाणी नागरिकांना पुरविते. पाटबंधारे उपविभाग सांगली यांनी दिलेल्या बिगर सिंचन पाणी देयकांचे लेखापरीक्षण केले असता महानगरपालिकेने देयके विलंबाने भरणा केलेने रु. 5,84,252/- चा विलंब आकार देयकामध्ये नमुद केला आहे. परंतु महानगरपालिकेने विलंब आकार भरणा केलेला नाही.

अर्धसमास पत्रास पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये पाटबंधारे विभागाने विलंब आकारामध्ये सुट दिलेचे नमुद आहे. परंतु मुख्य लेखाधिकारी यांनी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजूक असलेने सुट मागणेबाबतची कार्यवाही चालू असलेबाबत नमुद केले आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

पाटबंधारे विभागाने विलंब आकारात सुट दिलेचे कोणतेही पत्र महानगरपालिकेस दिले नसलेने विलंब आकार तात्काळ भरणा करणेत यावा.

उपरोक्त आक्षेपाचे पुर्ततेस्तव रु. 5,84,252/- वसूलपात्र करणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 106)

## *21 मिरज येथे 10 द.ल.लीटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल अभियान अनुज्ञेय अनुदान राज्य शासन 70% कर्ज 20% स्वनिधी 10%**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 39831500.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 4850.00 रु.,

***मिरज जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 19.20 द.ल.लीटर वरुन 28 द.ल. लीटर या कामाची निविदा रद्द करुन कामात बदल करुन 10 द.ल.लीटर क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र बांधणे व अस्तित्वातील 19.20 द.ल. लीटर क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामात बदल करणेच्या प्रक्रियेत 18 महिन्याचा विलंब लागल्याने योजनेचा अपेक्षित लाभ मिळालेला नाही. या कामामध्ये अनावश्यक विलंब झालेने योजनेची किंमत वाढून आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच कामातील बदलास शासनाची फेर मान्यता घेणेत आलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता :- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. सुनिअ-2010/प्र.क्र. 460 पापु-22 दि. 23/11/2010

तांत्रिक मान्यता :- घेणेत आलेली नाही.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रुपये 1 कोटी 70 लाख.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

दि. 23/11/2010 चे शासन निर्णयानुसार मिरज येथील जलशुध्दीकरण केंद्राचे विस्तारीकरण करणे व नुतनीकरण करणे या कामासाठी 4 कोटीचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. व दि. 27/3/2011 चे वर्तमान पत्रामधून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टने निविदा मागविण्यात आले. निविदा जादा दराने आलेने रद्द करुन व सदर काम रद्द करुन स्थायी समिती सभा क्र. 14 ठराव क्र. 289 दि. 30/8/2011 नुसार 10 द.ल. लीटर क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र बांधणे रुपये 1.70 कोटी व उर्वरित रुपये 2.30 कोटी मधुन अस्तित्वातील 19.2 द.ल.ली. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणेस रितसर निविदा मागविणेस मंजूरी देणेत आली.

नवीन कामाची शासनाकडून प्रशासकीय मान्यता न घेताच कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

कामाची निविदा किंमत 1 कोटीपेक्षा जास्त असल्याने सुधारणा क्र. नप्रस/निविदा मागविणे/105/प्र.क्र. 151 / 05/9 दि. 5/6/2006 नुसार 1 कोटीपेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रक्कमेचे काम राष्ट्रीय, राज्य व 20 हजार प्रती खप असलेले जिल्हा स्तरावरील दैनिकामध्ये देणे आवश्यक असता फक्त दै. पुढारी या जिल्हास्तरीय दैनिकामध्ये देणेत आलेने जास्त ठेकेदारापर्यंत निविदा न पोहोचलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास मिळालेला नाही.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र. सनिअ- 2011 / प्र.क्र.618 पापु 22 मंत्रालय दि. 25 नोव्हें. 2011 मधील अ.क्र. 6 मधील अ नुसार ज्या कामांना प्रशासकीय मंजुरी देवून 1 वर्ष पूर्ण झाले आहे. परंतु काम सुरु केलेले नाही. अशा योजनांचे प्रशासकीय आदेश रद्द करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. असे नमुद असतानाही उपरोक्त कामाची निविदा 1 वर्षानंतर मागवून दि. 9/3/2012 रोजी कामाची वर्क ऑर्डर देणेत आलेली आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शा.नि.क्र. नापाक.-2008 /प्र.क्र. 1 /पापु -22 मंत्रालय दि. 22/10/2008

अ.क्र. 5(अ) अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छतेचे स्वतंत्र अंदाजपत्रक व ॲक्युअल बेस्ड डबल एंट्री सिस्टीम (दुहेरी नोंद लेखा पध्दती) सुरु करणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

अर्धसमास पत्रास पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये सन 2010-11 ची दरसूची नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,70,00,000/- ची निवदा मागवून रुपये 1,98,31,500/- वर ठेकेदार श्री. एस.बी. जाधव यांना मुळ निविदा दरावर 11.10% जादाने मंजूर केले आहे. परंतु नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. युआयडी-09 /प्र.क्र. 158/ नवी-33 दि. 10/8/2009 प्रमाणे 10% हून अधिक रक्कमेच्या निविदा आलेस त्याचे काळजीपुर्वक दरपृथ:करण करुन फेर निविदा मागविने आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता निविदा मंजूर केली आहे.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अ.शा.क्र. क्रमांक मुद्रांक 2009/2007 /प्र.क्र. 326/म-1/दि. 12/11/2009 नुसार रुपये 10 लाखापर्यत 100 व 10 लाखाचे पुढील 1 लाखाकरीता रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असलेने रुपये 19850/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक असता 15000/- घेतलेने रुपये 4850/- भरुन घेणे आवश्यक असलेचे अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये मान्य केले आहे.

लेखापरीक्षण वर्षामध्ये फक्त निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. कामाची वर्क ऑर्डर दि. 09/3/2012 रोजी दिली असलेने एकही देयक खर्च पडलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 107)

## *22 पाईप पुरवठा करणेसाठी वार्षिक दर करारावर एजन्सी नियुक्त करणे कामामध्ये झालेल्या अनियमीततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 2660099.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 114667.00 रु.,

***स्थायी समितीने सन 2009-10 चे मंजूर दर सुचीचे एस्टीमेट पेक्षा शे. 5.10% कमी दराने पाईप पुरविणेस मान्यता दिलेने सदर पाईपची किंमत रुपये 2765340 - 0141032 (5.10% कमी) = रुपये 2624308/- आदा करणे आवश्यक होते. त्यामुळे जादा रक्कम रुपये 2660099 - रुपये 2624308 = रुपये 35791/- वसूल करणेत यावेत.***

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती सभा क्रं.01 ठराव क्रं.29 दि.19.04.2011

तांत्रिक मान्यता :- जल अभियंता यांचे पत्र 62 /2011 - 12 दि. 08.07.2011

अंदाजपत्रकीय रककम :- 26,28,909/- , मंजुर दर :- अंदाजपत्रकीय दराने

मक्तेदाराचे नांव :- मे श्रीनिवास इंडस्ट्रीज, जयसिंगपुर

खालील आक्षेप घेणेत येत आहेत. .

स्थायी समिती सभा क्र. 01 ठराव क्र. 29 दि. 19/4/2011 ने श्रीनिवास इंडस्ट्रीज कडून दर करारावर एच.डी.पी.ई. पाईप सन 2009-10 चे मंजूर दरसूचीच्या एस्टीमेट पेक्षा शे. 5.10 कमी दराने अधिनियम 1949 चे प्रकरण 5, संविदा खंड 2(2) अन्वये पुरवठा करणेस मान्यता दिली आहे.

त्याप्रमाणे खालील साहित्य विविध कामासाठी वर्षभर खरेदी करुन सन 2010-11 चे दरसूची प्रमाणे देयके आदा केली आहेत. सन 2010-11 मध्ये (सन 2010-11 DSR)

| पाईप | र.मीटर | दर | एकूण |
|---|---|---|---|
| 90 मी.मी. | 11890 | 156 | 18,54,840/- |
| 75 मी.मी. | 2700 | 112 | 03,02,400/- |
| 110मी.मी. | 2885 | 227 | 06,45,815/- |
| | | | 28,03,055/- |
| (Less 5.10% Below) - | | | 01,42,956/- |
| एकूण | | | 26,60,099/- |

स्थायी समितीने सन 2009-10 चे मंजूर दर सुचीचे एस्टीमेट पेक्षा शे. 5.10% कमी दराने पाईप पुरविणेस मान्यता दिलेने सदर पाईपची किंमत रुपये 2765340 - 141032 (5.10% कमी) = रुपये 2624308/- आदा करणे आवश्यक होते. त्यामुळे जादा रक्कम रुपये 2660099 - रुपये 2624308 = रुपये 35791/- वसूल करणेत यावेत.

सदर पाईप DSR प्रमाणे IS 4984 या मानांकनाचे असलेबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणेत आलेले नाही. पाईप वापरण्यास योग्य असले बाबतचा शासकीय मान्यता प्राप्त प्रयोगशाळेचा अहवाल न घेताच देयके आदा करणेत आली आहेत.

म.जि. प्रा. दरसूची सन 2010-11 जनरल नोट्स अ.क्र. 21 नुसार A.C. /PVC/HDPE पाईप शहरी भागामध्ये वापरणेत येवू नये असे स्पष्ट नमुद असताना पाईप वापरणेत आले आहेत.

उपरोक्त वार्षिक एजन्सीकडून सन 2011-12 या आर्थिक वर्षात रुपये 26,28,909/- किंमतीच्या HDPE पाईप्स पुरविल्या आहेत. त्याच्या जकात भरलेल्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रुपये 2628909/- x 3% प्रमाणे रुपये 78876/- जकात वसूल करणेत यावी. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रुपये1,14,667/- वसुलपात्र व रुपये 25,14,242/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 108)

## *23 बंद पाणी मिटरमुळे पाणी आकारणी नियमानुसार होत नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस,*
*अनियमितता कलम : 9ब*

***महानगरपालिका क्षेत्रात सन 2011-12 या आर्थिक वर्षात एकूण 61423 मिटर धारक असून त्यापैकी एकूण 39882 मिटर नादुरुस्त आहेत. एकुण बंद मिटरची टक्केवारी 65% असल्याने पाणी वापर आकारणी नियमानुसार होत नसल्याचे दिसून येते.***

सांगली व मिरज या विभागात एकूण 61423 मिटर धारक असून त्यापैकी एकूण 39882 मिटर बंद आहेत. एकूण बंद मिटरची टक्केवारी 65% आहे. अर्धसमास पत्रास उत्तर दिलेल्या बंद मिटर चालू करण्याबाबत ग्राहकास नोटीस देण्यात येऊन मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसुची प्रकरण 10 कलम 12 अ नुसार मिटर बंद पडल्यावर आगोदरच्या तीन महिन्याची सरासरी काढून बिल आकारणी करण्यात येते. व ज्यांचा पाणी वापर जास्त आहे अशा नळ जोडण्या बंद करण्यात येतात. असे नमुद आहे. परंतु बंद मिटरमुळे किती नळ जोडण्या तोडल्याची माहिती देण्यात आलेली नाही.
खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.
महानगरपालिकेकडून ग्राहकास पाणी बिलापोटी जे बिल दिले जाते त्याच्यावर जर मिटर 3 महिने बंद राहिले तर कनेक्शन बंद करण्यात येईल असे स्पष्ट नमुद आहे. त्याप्रमाणे लेखापरीक्षण वर्षात एकही कनेक्शन बंद करण्यात आले नाही. त्यामुळे बंद मिटरची टक्केवारी वाढलेची दिसून येते.
बंद मिटरचे जास्त टक्केवारीमुळे वापर केलेल्या पाण्याचे योग्य परिमाणानुसार पाणी पट्टी वसुल केली जात नाही.
अर्धसमास पत्र क्र.87 दि.05.02.2013 ला दिलेल्या उत्तरामध्ये दररोज 76.91 द.ल.ली. पाणी उपसा होत असून त्या पैकी 53.70 द.ल.ली. पाणी पुरवठा होतो. फील्टर वॉश व अन्य कारणां मुळे एकूण गळती 21 द.ल.ली. म्हणजेच 27.46% होत असलेचे नमुद आहे. बंद मीटरची संख्या 67% असल्याने पाणी पुरविलेचे मोजमाप योग्य रितीने होत नसलेचे व त्याचा आकारही योग्य तऱ्हेने काढला जात नसलेने महानगरपालिकेची आर्थिक नुकसान होत असलेचे स्पष्ट होते.

## *24 वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणी पुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 मधील अनियमितते बाबत.*

**लहान व मध्यम शहरासाठी पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) (केंद्र 80% + राज्य 10% व मनपा 10%**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, केंद्र, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 206759318.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 206759318.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 34420659.00 रु.,

***केंद्र शासनाने लहान व मध्यम शहरासाठी पाणी पुरवठ्याची सोय करणेसाठी ही योजना सुरु केली असून त्या अंतर्गत सांगली महानगरपालिकेने केलेल्या कामामध्ये टेंडर दरापेक्षा निविदा दर 111.85% जादाने मान्य केला आहे. सदर देकार चालु दरसूची 2009-10 चे दरापेक्षा 19.56% जादा ने मंजुर केला आहे. परंतू जादा दराची मनपा निधी मध्ये तरतुद केलेली नाही. जादा दर व भाववाढ किंमत (प्राइस एस्कलेशन) मान्य केलेमुळे ठेकेदाराचे हित जोपासणेत आलेने महानगरपालिकेचे रुपये 2,86,27,579/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

| अ.क्रं. | प्रमाणक क्रं | दिनांक | रक्कम | मोजमाप रक्कम पुस्तक क्रं. | पान क्रं. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 10 | 08/3/11 | 10,60,00,000/- | 18 | 1 ते 06 |
| 2 | 11 | 25/03/11 | 60,08,269/- | 18 | 1 ते 06 |
| 3 | 02 | 04/06/11 | 5,31,41,377/- | 18 | 13 ते 21 |
| 4 | 03 | 06/07/11 | 2,50,00,000/- | 18 | 13 ते 21 |
| 5 | 06 | 13/10/11 | 23,85,257/- | 18 | 22 जे 45 |
| 6 | 09 | 14/12/11 | 48,50,000/- | 18 | 22 ते 45 |
| 7 | 5831 | 20/01/12 | 1,29,04,529/- (स्वनिधी) | 18<br>105 | 45 ते 88<br>01 ते 33 |
| 8 | 7656 | 31/03/12 | 03,59,59,235/- (स्वनिधी) | 24 | 01 ते 52 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | 07 | 15/10/12 | 03,08,27,654/- | 24<br>25 | 52 ते 100<br>01 ते 61 |
| एकूण | | | 27,70,86,318/- | | |

प्रशासकीय मान्यता :-

No. DMA/UIDSSMT - Letters 2006/C R- 264/4, Director of Municipal Administratinon Dt. 28/09/2006 (2nd meeting of the state level sanctioning committee)

No. DMA/UIDSSMT/3rd SLSC/2006/CR-1175/55, Director of Municipal Administratinon Dt.13 Feb 2007

तांत्रिक मान्यता :-

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग पत्र CE PUNE/TB-3/Sangli WSS/Technical Deviation/3577 Dt. 12/10/10

स्थायी समिती सभा क्र.09 ठराव क्र.127 दि.22/07/10 अन्वये निविदा मागविणेस मान्यता

स्थायी समिती सभा क्र.20 ठराव क्र.359 दि.23/11/10 अन्वये मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीस प्रा.लि. यांची निविदा प्राकलण रक्कमेच्या 111.85% जादा दराने व चालु दरसूची (09/10) चे 19.56% जादा दराने मंजुर केली आहे.

सदर निविदेमध्ये माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र ते हिराबाग पाणी पुरवठा केंद्रापर्यंत 800 मी.मी. डी.आय के-9 दाबनलिका टाकणे, शालीनीनगर व वानलेसवाडी येथे उंच टाक्यासाठी शुदध पाण्याची गुरुत्व नलिका टाकणे व कुपवाड वानलेसवाडी व अन्य 5 ठिकाणी विविध लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याच्या उंच टाक्या उभारणे या कामाचा अंतर्भाव आहे.

उपरोक्त कामासाठी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (इओआय) च्या माध्यमातून दैनिक इंडियन एक्सप्रेस व दैनिक पुढारी या दि.27/03/10 चे वर्तमान पत्रातुन अर्ज मागविणेत आले असून निविदापूर्व बैठकी नंतर ठेकेदाराकडून निविदा मागविणेत आल्या होत्या.

प्राकलन रक्कम रुपये14,90,51,271/- रुपये (जिल्हा दरसूचि 2005-06) वर एकूण 5 निविदा आल्या असून त्यापैकी सर्वात कमीची निविदा मे. लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हीस प्रा.लि. ची निविदा दरावर 111.85% जादा ची मान्य करणेत आली आहे.

उपरोक्त कामाचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास पत्र क्र.146 दि.28/2/13 ने निर्गमित केलेला असून त्यास पाणी पुरवठा विभागाने मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरांचे अवलोकन केले नंतर खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

बी-1 टेंडर वरील आयटम 6 पान 47 नुसार ठेकेदाराने टेंडर भरणेपूर्वी सर्व गोष्टींचा विचार करुन सर्वकष दर भरणे आवश्यक असलेचे नमुद आहे. परंतू ठेकेदाराने टेंडर स्विकृत केलेनंतर उपायुक्त (पा.पु.) यांचे दि.25/10/10 चे विषयपत्रानुसार स्थायी समिती सभा क्र.20 ठराव क्र.359 दि.23/11/10 अन्वये निविदा

अटी शर्ती मध्ये बदल केला आहे. सदर बदल नियमबाह्य आहे.

पाणी पुरवठा विभागाने निविदा किंमत रुपये14,90,51,241/- (सन 05-06 चे जिल्हा दरसूचीप्रमाणे) वर अंतिम वाटाघटीनंतर रुपये31,57,67,118/- किंमतीचा देकार (111.85 % जादा) मान्य केला आहे. तो चालु दरसूचीशी रुपये 26,52,52,612/- शी तुलना करता 19.56 % जादा येतो. नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक क्रं.युआयडी-2009/प्र.क्रं 158/नवि 33, मुंबई दि.10 ऑगस्ट 2009 व शासन परिपत्रक क्रं.जीइएन-1093/2365/प्र.क्रं.126/93/नवि 14 दि.20/10/93 नुसार स्पर्धात्मक दरपत्रकातील कमीत कमी दराचे दरपत्रक हे चालू वर्षाच्या जिल्हा दरसूची किंवा मंजूर प्राकलनातील रकमेपेक्षा कमाल 10% हून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण (रेट ऍनालिसिस) करणे आगत्याचे आहे. तसेच फेर निविदा मागविण्याबाबत गांभिर्याने विचार करणे इष्ट ठरते असे नमुद आहे. परंतु पाणी पुरवठा विभागाने निविदा न मागविता पुन्हा एकदा सन 10-11च्या दरसूचीशी तुलना करुन 9.97% जादा दराने निविदा मंजूर केली आहे. निविदा दि.27.03.2010 ने मागविणेत आले नंतर पूर्वपात्रतेसाठी अर्ज करणेची अंतिम तारीख 26.04.2010 होती. व प्रीबीड मिटींग दि.16.08.2010 रोजी चार महिने विलंबाने ठेवणेत आली होती. व निविदा 24.08.2010 रोजी उघडणेत आली आहे. निविदा मागविणे ते निविदा मंजूर करणे या कामामध्ये 5 महिन्याचा प्रशासकिय विलंब लागलेने कामाची किंमत वाढलेली दिसून येते. त्यामुळे सन 2010-11 चे दरसुची बरोबर पुन्हा दरपृथःकरण करुन निविदा न मागविताच निविदा किंमतीचे 9.97% जादा दराने नियमबाह्यरित्या निविदा मंजूर करणेत आलेचे स्पष्ट होते.

सदर दरपृथःकरणामध्ये डी.आय.पाईप पुरवठा मधील फरक रुपये61,30,828/- हा सन 10/11 च्या मंजूर दरसूची मधील जनरल नोटसच्या आधारे घेतलेचे व एक्साईज ड्युटी मधील फरक (2.06%) प्रमाणे रुपये6,96,233/- व 1% व्हॅट मधील फरक रुपये28,71,395/- घेतलेचे अर्धसमास पत्रात दिलेल्या उत्तरामध्ये नमूद आहे. परंतू बी-1 टेंडर अटी शर्ती क्रमांक 62 अन्वये भाववाढ निर्देशांक शर्त ही मंजूर केली असलेने ठेकेदाराला दुहेरी लाभ दिलेने 61,30,828 + 6,96,233 + 28,71,395 = रुपये96,98,456/- महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच रॉयल्टी फरक रुपये70,12,496/- दाखविला आहे. परंतू अनुषंगिक कागदपत्रे जोडणेत आलेली नाहीत.

सदर दरपृथःकरणामध्ये सर्व बाबींचा विचार केले नंतर रक्कम रुपये 28,71,39,539 वर 9.97% जादा दराने टेंडर मंजूर केलेने महानगरपालिकेचे रुपये 2,86,27,812/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

प्रमाणक क्रं.10व 11 रक्कम रुपये 11,20,08,269/- दि.018/03/11 व दि.25/3/11 ने पाईप खरेदी पोटी ठेकेदारास आदा करणेत आले आहेत. परंतू बी-1 टेंडर पान नं.60 वरील 3.00 नुसार 5% प्रमाणे जकात रुपये 56,00,413/- वसूल करणेत आलेली नाही. अर्धसमास पत्रात दिलेल्या उत्तरामध्ये जकातीचे पावतीचे झेरॉक्स प्रत अवलोकनी सादर करीत आहे असे नमुद केले आहे. परंतू जकात पावत्या दाखविणेत आलेल्या नाहीत.

सन 11-12 मध्ये एकूण सहा देयके देणेत आली असून देयक क्रं.3 ते 5 अखेर रुपये13,83,035/- चे

सिमेंट व देयक क्रं.3 ते 6 अखेर HYSD स्टील रुपये18,38,652/- असे एकूण रुपये32,21,687 x 5 % प्रमाणे जकात रुपये1,61,084/- घेणेत आलेली नाही. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये महानगरपालिका हद्दीत सिमेंट व स्टील खरेदी केली असल्यास त्यावर जकात भरावी लागणार नाही असे नमुद आहे. परंतू सदर साहित्य मनपा हद्दीत घेतलेच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविणेत आलेल्या नसलेने जकात वसूल करणेत यावी.

6 व्या रनिंग देयकापर्यंत M-300 प्रमाणे सिमेंट कॉंक्रीटचे एकूण काम 443.60 घ.मी. इतके झालेने रॉयल्टी 156.75 ब्रास x रुपये 200 ब्रास प्रमाणे रुपये31,350/- वसूल करावी.

भाववाढ निर्देशांक अटी/शर्ती 62 प्रमाणे 7 व्या धावत्या देयकामधून रुपये17,99,610/- भाववाढ निर्देशांक (प्राईस एस्कलेशन) डी.आय.पाईप्स, सिमेंट व लोखंड यावर दिला आहे. टेंडर 09/10 चे चालु दरसूचीप्रमाणे 9.97% जादा दराने दिले असलेने व 10-11 चे दरसूचीवर दरपृथ:करण करुन दिलेने पुन्हा भाववाढ निर्देशांकप्रमाणे फरक दिला आहे. अर्धसमास पत्रामध्ये दिलेले उत्तर संयुक्तिक नसलेने रक्कम रुपये17,99,160/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

सातव्या धावत्या देयकापर्यंत एकूण रक्कम रुपये 20,67,59,318/- ठेकेदारास आदा केली आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे एकूण रक्कम रुपये 10,61,53,634/- होत असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 111.85% जादा दराने निविदा मंजूर असलेने उर्वरित रक्कम रुपये10,06,15,683.94/- महानगरपालिकेने स्वहिस्सा म्हणून आदा करणे आवश्यक असता स्वनिधीमधून प्र.क्र.5831 ने रुपये1,29,04,526/- + प्र.क्र.7656 ने रुपये 3,59,69,235 = रुपये 4,88,73,761/- दिलेली आहे.उर्वरित रक्कम रुपये5,17,41,922/- केंद्रशासनाचेच निधीतून दिलेने मनपा ने स्वनिधीची तरतुद केली नसलेचे स्पष्ट होते. तसेच अन्य कामांचा केंद्रशासनाचा निधी या कामावर वळविलेने ती कामे भविष्यात रेंगाळण्याची शक्यता नाकारता येत नाही. कामाची वर्क ऑर्डर 23/12/10 रोजी देणेत आली असून मुदत 18 महिने दिली आहे. परंतू लेखापरीक्षण तारखे अखेर काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे नागरिकांना पिणेसाठी शुध्द पाणी पुरविणेचा हेतू साध्य झालेला नसलेचे स्पष्ट होते.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये3,44,20,659/- वसूलपात्र व रुपये 20,67,59,318/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 19)

## *25 पॅकेज क्र. 1.1 आणि 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे कामातील त्रुटी बाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: पाणी पुरवठा व मलनि:स, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 103195932.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 103195932.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 9547586.00 रु.,

| | | | |
|---|---|---|---|
| ***खालील प्रमाणे देयकातून कराची रक्कम वसूल केली नाही.कामगार विमा*** | | | ***रु. 4,60,336/-*** |
| ***रॉयल्टी*** | ***रु. 15,41,876/-कामगार कल्याण उपकर*** | | ***रु. 60,001/-मुल्यवर्धीत*** |
| ***(वॅट) कर*** | ***रु. 10,40,672/-*** | ***रु. 31,02,885/-*** | |

प्रमाणक क्रमांक :- 30 दिनांक :-15.02.2012 रक्कम :- 38,83,357/-

एकूण खर्च :- 4,60,33,579/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 10,31,95,932/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.126 दि.12.07.2010

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र दि.09.04.2011

ठेकेदाराचे नांव :- मे. एस.एम.सी. इन्फ्रास्टक्चर, प्रा.लि. ठाणे

कार्यादेश दिनांक :- 23.12.2010 कामाची मुदत :- 14 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 20 पृष्ठ क्रमांक :- 09 ते 17

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मक्तेदाराची पुर्व पात्रता समजून घेणेसाठी जाहीर प्रकटन क्र. 260/10-11 दि 2/8/10 ने (इओआय) द्वारे निविदा मागविल्या असून, त्या पूर्णपणे मोघम स्वरुपाच्या आहेत. त्यामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम व इतर तपशील नमुद नाही. मोघमपणे जाहिर प्रसिध्दी दिल्याने व्यापक प्रतिसाद मिळाला नाही. अशी मोघम प्रसिध्दी देवून आलेल्या मक्तेदरातून मक्ता निश्चित करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र. 137/ का-34 दि. 31/8/2009 नुसार र.रु. 55 लाखापेक्षा जास्त रक्कमेचे काम असल्याने विभागातील "अ" वर्ग दैनिंक एक व त्या विभागातील "ब" वर्ग व ज्या जिल्हयाचे काम आहे त्या जिल्हयातील क वर्ग दैनिंकात जाहिरात देणे आवश्यक होते परंतु दैनिंक पुढारी या एकाच दैनिकात निविदा प्रसिध्द केली असलेने जास्त ठेकेदारांच्या पर्यंत निविदा न पोहोचलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास झालेला नाही.

मुद्रांकाबाबत अर्धसमास पत्रात दिलेले उत्तर योग्य आहे.

एकूण खर्च आतापर्यत रक्कम रु. 4,60,33,579/- झाला आहे. विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रु. 4,60,336/- वसूल केला नाही. रक्कम वसूल करुन सबंधीत जमा लेखा शिर्षाखाली जमा करावी. मक्तेदाराने कामाचा विमा उतरविला असे अर्धसमास पत्राचे उत्तर देताना नमुद केले आहे. परंतू विमा कपात केल्याची कागदपत्रे दाखविणेत आलेली नाहीत.

महसूल व वने विभाग अधिसुचना क्र. गौणखनिज 1011009/Pk-3009/स्व-3 दि. 11/2/2010 नुसार

रॉयल्टी चार्जेस रक्कम रु. 7,70,938/- अंदाजपत्रकात दाखविताना किती गौण खनिज लागणार व रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे एवढी रक्कम कशी याची गणना केली याबाबतचे कागदपत्रे नस्तीत नाहीत. जिल्हा दरसूचीतील दर हे सर्व करासह असतात असे असतानाही रॉयल्टीची रक्कम परत अधिक दाखविणेत आली आहे. त्यामुळे दुप्पट र.रु. 15,41,876/- रॉयल्टी म्हणून वसूल पात्र आहे. जिल्हादरसूचीमध्ये अगोदरच रॉयल्टी हा कर धरला नसलेबाबत ज्या प्राधिकारी /अधिकारी यांनी जिल्हा दरसूची तयार केली त्यांचे पत्र उपलब्ध करुन दाखविले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात जादा दाखविलेली रॉयल्टी रक्कम व जिल्हा दरसूचीतील रॉयल्टी समाविष्ट असलेली रक्कम असा दुबार लाभ मक्तेदारास झाल्याने सर्व र.रु. 15,41,876/- वसूल करणेत यावी.

अंदाजपत्रकातील रॉयल्टी र.रु. 7,70,938/- दाखविली आहे. या कामात गौण खनिजाचा किती वापर केला त्याबाबतच्या वापराची (वापर पत्रक) प्रपत्र देयकासोबत नाही. तसेच गौण खनिज वापरानुसार वसुली पत्रक देयकासोबत नाही. तसेच नस्तीतही नाही. त्यामुळे रॉयल्टीची रक्कम रु. 7,70,938/- मंजुरी वेळी अंदाजपत्रकात अधिक दाखविली असलेने, ती सर्व रक्कम वसूल करुन भरणा करावी.

उद्योग व उर्जा विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए. 2009/ प्रक्र 108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु. 4,00,335/- शासनाच्या जमेच्या लेखाशिर्षाखाली जमा केले असलेचे चलन लेखा परिक्षणास दाखविले नाही. तसेच आतापर्यतचा एकूण खर्च रक्कम रु. 4,60,33,579/- च्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. परंतु पूर्ण रक्कम वसूल केली नसलेने. उर्वरित रक्कम रु. 60,001/- वसूल करुन भरणा करावी.

सार्व. बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. बीडीजी-2005/प्र.क्र. 324/ इमारती-2 दि. 3/3/2006 मधील परि. 5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुल्य वर्धीत कर अधिनियमाचा कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडले नसलेने, वर्कटॅक्स रक्कम 4% ने वसूल होणे आवश्यक होते. परंतु 2% ने रक्कम रु 8,00,671/- वसूल केली आहे. सहा धावत्या देयकाने र.रु. 4,60,33,579/- च्या 4% रक्कम रु. 18,41,343/- होणे आवश्यक होते. परंतु यापैकी रक्कम रु.8,00,671/- वसूल केलेने फरकाची रक्कम रु. 10,40,672/- वसूल करणेत यावी. अर्धसमास पत्राच्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे मक्तेदाराच्या वर्कटॅक्स नोंदणीची प्रत उत्तरा सोबत नाही.

लेखा संहिता नियम 182 नुसार देयक किती रक्कमेला पास केले ते दर्शवून मोजमाप पुस्तकातील पृष्ठ दुहेरी लाल रेषेने क्रॉस कारणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर व सुरेंद्र इंजिनिअरींग या दोघांचे दर अंदाजपत्राकीय रक्कम रु.10,21,95,932/- या रक्कमेवर समान म्हणजे रु. 45.50% वाढीव आहेत. पाणी पुरवठा विभागाने चालु दरसूची (सन 09/10) प्रमाणे दरपृथ:करण केले असता सदर दर 14% जादा येतो. नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक क्रं.युआयडी-2009/प्र.क्रं 158/नवि 33, मुंबई दि.10 ऑगस्ट 2009 व शासन परिपत्रक क्रं.जीइएन-1093/2365/प्र.क्रं.126/93/नवि 14 दि.20/10/93 नुसार स्पर्धात्मक दरपत्रकातील कमीत कमी दराचे दरपत्रक हे चालू वर्षाच्या जिल्हा दरसूची किंवा मंजूर अंदाजपत्रकातील रक्कमेपेक्षा कमाल 10%

हून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण (रेट ऍ़नालिसिस) करणे आगत्याचे आहे. तसेच फेर निविदा मागविण्याबाबत गांभिर्याने विचार करणे इष्ट ठरते असे नमुद आहे. परंतु पाणी पुरवठा विभागाने पुन्हा निविदा न मागविता 14% जादा दराने निविदा मंजूर केली आहे. सन 09-10 च्या जिल्हा दरसूचीप्रमाणे दर असून वाटाघाटीने ते 14% वाढीव आहेत. सुधारित अंदाजपत्रक केले नाही. तसेच जादा 14% दराने निविदा मंजूर केलेने अद्याप पर्यंत मनपाचे रु.4,60,33,579/- x 14% = रक्कम रु. 64,44,701/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. ते संबंधिताकडून वसुल करणेत यावे.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रु. 95,47,586/- वसुलपात्र व रक्कम रु. 10,31,95,932/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

DATBPCM5601 (Ref No : 20)

## *26 पंपीग मशिनरी व त्याला लागणारे इलेक्ट्रीक उपांगे बदलणे इत्यादी कामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 40525754.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 40625714.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 1015643.00 रु.,

***1) EOI (एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस्ट) निविदा प्रसिध्दी पध्दत चुकीची असलेचे दिसून येते.2) कामगार विमा र.रु. 2,03,128/- वसूल केला नाही.3) शासन निर्णय दि. 03 मार्च 2006 नुसार वॅटची नोंदणी न केल्याने 4% रक्कम वसूल करणे ऐवजी 2% रक्कम केली व उर्वरीत रुपये 8,12,515/- वसूल करावी.***

प्र.क्र. 12 दि. 07/09/2011 ने व इतर दोन धावत्या देयकाने र.रु. 4,05,25,714/- एवढा खर्च केला

प्रमाणक क्रमांक -:12 दिनांक -:07.09.2011 -: रक्कम 40,23,224/-

एकूण खर्च -:4,05,25,754/-

अंदाजपत्रकीय रक्कम -: 5,77,98,243/-

प्रशासकीय मान्यता -:स्था.ठराव क्रं.स.126 दि .12.07.2010

तांत्रिक मान्यता -:मुख्य अभियंता यांचे पत्र दि .09.04.2010

ठेकेदाराचे नांव -: योगीराज प्रायव्हेट लि. नवी मुंबई

कार्यादेश दिनांक :- 24.03.2011 कामाची मुदत :- 12 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक -:23 पृष्ठ क्रमांक :- 1 ते 3 , 7 ते 12 , 20 ते 31

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

या कामासाठी राज्य शासन 70% व स्वनिधी 30% असा खर्च करावयाचा आहे. 70% ने शासन खर्च रुपये 2,84,37,999/- व 30% ने महानगरपालिका 1,21,87,714/- असा खर्च होणे आवश्यक होते. 30% मनपाने स्वनिधीतून भरलेली रक्कम योग्य आहे. परंतु मुळ अंदाजपत्रकाच्या 25.60% जादा दर असल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु. 5,77,98,243/- च्या 25.60% प्रमाणे रु. 7,25,94,593 – 4,05,25,754/- = रुपये 3,20,68,839/-(सन 2011-12 अखेर झालेला खर्च) एवढा जादा होणारा खर्च स्वनिधीतून करणेत आलेला नाही.

या तक्त्यामध्ये 6 निविदा प्राप्त झाल्या त्यातील योगीराज प्रा. लि. नवी मुंबई यांची निविदा 25.60% जादा दराची ही सर्वात कमी दराची आहे. त्याचेंशी वाटाघाटी केल्या व 4.40% अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी असे तक्ता मसुदीचा ठराव क्र. 512 दि. 17/2/11 मध्ये स्पष्ट नमुद आहे. ठरावातील बाब ही घटनात्मक नियमानुसार अधिकृत असल्याने ग्राहय धरणे अत्यावश्यक आहे असे असल्याने 21.20% जादा दिलेला दर हा नियमबाहय ठरतो. अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.40% कमी असल्याने रक्कम रु. 1,04,00,182/- वसूल पात्र ठरतात. अर्धसमास पत्रास दिलेले उत्तर व ठरावातील मजकुर यात साम्य नाही.

प्रमाणक क्र. 12 दि. 7/9/11 ने र.रु.40,23,229/- देयक मुख्य लेखापरीक्षक यांनी पारीत केलेले देयक लेखा विभागाने र.रु. 20,00,000/- या देयकाद्वारे आदा केले व नंतर झेरॉक्स प्रतीतील देयकावर प्रमाणक क्र. 18 दि. 13/9/11 ने रक्कम रु. 17,01,370/- अदा केले व र.रु. 15,00,00,000/- तरतुद असताना पार्टपेंमेंट केले आहे. तरतुद शिल्लक असताना पार्ट पेमेंट करणेचे अधिकार कोणास आहेत या बाबतचा नियम व शासन निर्णय लेखा परिक्षणास दाखविणेत आलेले नाहीत. व झेरॉक्स प्रतीत देयक नियमबाह्यरित्या आदा केले आहे.

प्रमाणक क्र. 27 दि. 21/1/12 अन्वये र.रु. 2,76,61,500/- चे देयक मुख्य लेखापरीक्षक यांनी पारित केले असताना लेखा विभागाने र.रु. 2,00,00,000/- चे देयक अदा केले व 54,48,579/- चे देयक अद्याप आदा केले नाही. ते देयकानंतर कधी पारित झाले. ते पाणी पुरवठा खात्यास माहित नाही व मुख्यलेखा परिक्षक यांनी पारित केलेली देयके नंतर छाया प्रतीत आदा केली आहेत. देयक पारित करणेची प्रक्रिया अनियमित आहे.

कार्यारंभ आदेश 24/3/11 रोजी दिला. दि. 23/3/12 पर्यत 12 महिने मुदतवाढ मंजूर केली या मुदतीतही काम पूर्ण न झाल्याने दि. 31/3/13 पर्यत मुदतवाढ मागितली आहे. मुदत वाढ देताना दंडाची तरतुद करुन त्या प्रमाणे दंड वसुल करणे आवश्यक होते. तसेच वारंवार मुदतवाढ देण्यापेक्षा ठेका रद्द करणेचा निर्णय घेणेत आलेला नाही. अर्धसमास पत्रात दिलेला खुलासा मोघम आहे.

मोजमाप पुस्तक क्र. 23 पृष्ठ क्र. 1 ते 3, 7 ते 12, 20 ते 31 वर मापे नोंदविली आहेत. उपअभियंता

यांनी मोजमापे नोंदविली नाहीत. परंतु 100% तपासलेले नमुद केले आहे. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 180 व 182 प्रमाणे देयक आदा करताना मोजमाप पुस्तकातील नोंदीवर काट मारली नाही तसेच नोंदीवर दुहेरी लाल रेषा काढल्या नाहीत. तसेच देयक पारित केलेल्या रक्कमेचा शेरा मोजमाप पुस्तकामध्ये नोंदवला नाही.

दैनिक इंडीयन एक्सप्रेस व दैनिक पुढारी मधून दि. 27 मार्च 2010 रोजी ईओआय (मक्तेदार पुर्व अहर्ततेसाठी) जाहिर निविदा मागविल्या आहेत. या सर्व मोघम स्वरुपाच्या आहेत. यात कामाची अंदाजपत्रकीय रक्कम व इतर अनुषंगिक बाबी नमुद नाहीत. अशा पध्दतीने निविदा मागविणेबाबत शासन निर्णय किंवा नियमातील तरतुदी दाखविण्यात आल्या नाहीत. अर्धसमास पत्रात दिलेले उत्तर योग्य नाही.

विमा संचालनालयाचे संचालक यांचे पत्र दि.7/5/2011 ने कामाचा विमा र.रु. 2,89,073/- उतरविला परंतु महाराष्ट्र शासन निर्णय जिपर/2003/प्र.क्र.837/35 दि. 8/5/2002 नुसार कामगार विमा रक्कम वसुल केली नाही. विमा अधिनियम 1938 व विमा संचालक, मुंबई यांचे पत्र दि. 8 सप्टेंबर 2010 नुसार 0.50% विमा रक्कम 2,03,128/- वसूलपात्र आहे.

सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. बीडीजी- /प्र.क्र.324/इमारती-2 दि. 3 मार्च 2006 नुसार मक्तेदारांची नोंदणी झालेली नाही. त्यामुळे 4% वॅट वसूल न करता 2% वसूल केला आहे. तरी उर्वरीत 2% रुपये 8,12,515/- वसूल करावा.

DATBPCM5601 (Ref No : 21)

## *27 शामरावनगर येथे टाकी बांधणे, इंटेकवेल नुतनीकरण करणे हिराबाग ते शामरावनगर फिडरमेन टाकणे, वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे याकामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 24086749.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 24086749.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 993468.00 रु.,

***निधी उपलब्ध करणेसाठी 20% कर्ज व 10% लोकवर्गणी न घेता महानगरपालिकेने स्वउत्पन्नातून 30% रक्कम भरणेचा निर्णय घेतला त्यापैकी रु. 30,11,975/- व 45.50% जादा दराने रक्कम रु. 4,69,54,149/- अशी एकूण रक्कम रुपये 4,99,66,124/- सुजल निर्मल अभियान खात्यात भरली नाही.***

प्रमाणक क्रमांक -:32 दिनांक -:31/03/2012 -: रक्कम 73,89,015/-

एकूण खर्च 2,40,86,749/-

अंदाजपत्रकीय रक्कम -: 10,31,95,932/-

प्रशासकीय मान्यता 2010 सुनिअ.शनि क्र -:/प्र.क्र.460-पु.पा/22 दि .23/11/2010

तांत्रिक मान्यता .यांचे पत्र दि मुख्य अभियंता -:09.04.2010

ठेकेदाराचे नांव -: श्री. सुरिंदर इंजिनिअरींग - मुंबई

कार्यादेश दिनांक -:23.12.2010 कामाची मुदत :-14 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक :- अप्राप्त पृष्ठ क्रमांक :- अप्राप्त

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

या कामासाठी शासन अनुदान 70% कर्ज 20% व लोकवर्गणी 10% असा खर्च करावयाचा आहे. एकूण चार धावत्या देयकाने र.रु. 2,40,86,749/- एवढा खर्च शासकीय अनुदानातून केला आहे. व पुढेही काम चालू आहे अद्याप 20% कर्ज व 10% लोकवर्गणी घेतले नाही. कर्ज व लोकवर्गणी न घेता या कामासह सर्व कामांचे एकत्रित पॅकेज रु. 29.85 कोटी पैकी 30% मनपा हिस्सा रक्कम रु. 11.04 कोटी सुजल निर्मल अभियान खात्यात भरणा केले असे अर्धसमास पत्राच्या उत्तरात नमुद केले आहे. 30% भरणा रक्कमेचा तपशील तपासला असता रु. 8,65,38,025/- एवढेच भरणा केलेचे आढळून आले आहे. अद्याप रक्कम रु. 30,11,975/- मनपा हिस्सा भरणा केला नाही. तसेच श्री. सुरिंद्र इंजिनिअर यांनी 45.50% हा दर चालू दरसूचीशी जूळवून करुन घेतला परंतु मुळ अंदाज पत्रकानुसार र.रु. 10,31,95,932/- च्या 45.50% र.रु. 4,69,54,149/- + 30,11,975/- = रुपये 4,99,66,124/- मनपाच्या स्वनिधीतून सुजल निर्मल योजनेच्या खात्यावर जमा केली नाही.

EOI (मक्तेदार पुर्व अर्हता) साठी जाहिर निविदा मागविणेत आली. सेक्रेटरीच्या पत्रानुसार EOI निविदा मागविली असे नमूद आहे. परंतु हे पत्र लेखापरीक्षणास दाखविले नाही तसेच EOI निविदेबाबत मार्गदर्शक तत्व काय आहेत याबाबत शासन निर्णय किंवा नियमातील तरतुदी लेखापरीक्षणास दाखविल्या नाहीत. निविदेमध्ये पूर्णपणे मोघम मजकुर आहे. अंदाजपत्रकीय रक्कम इत्यादी बाबी निविदेत नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तरात केवळ खुलासा केला शासन निर्णय तसेच नियमातील तरतुदी विषद केल्या नाहीत.

याकामासाठी 53.85 टन सिमेंट लागले त्याप्रमाणात खडी वाळु इत्यादी माल लागतो. खडी, वाळू बोल्डर इत्यादी मालाचे वापर पत्रक देयकासोबत तसेच नस्तीत नाही. त्यामुळे खनिज संपत्ती किती लागली हे लेखापरीक्षणास आढळले नाही. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसूल करावी. अर्धसमास पत्रास समर्पक उत्तर दिलेले नाही.

या कामाचे नुतनीकरण केले असे नस्तीत नमुद आहे. काम सुरु करण्यापुर्वी नस्तीच्या सुरवातीस पूर्वीच्या कामाचे सर्वसाधारण वर्णन नमुद असते परंतू या कामाचे नस्तीत नमुद नाही. नुतनीकरणावेळी पूर्वीचे सामान किती काढले व ते काढतानाचा पंचनामा यादी नाही. तसेच जुने सामान लिलाव केलेचे कागदपत्रेही नस्तीत नाही. अर्धसमास पत्रास योग्य उत्तर दिलेले नाही.

स्टील अ‍ॅथॉरेटी ऑफ इंडिया या शासकीय कंपनीकडून लागणारे स्टील सामान खरेदी केले असल्याचा उल्लेख आहे. खरेदीची उपप्रमाणके व जकात भरलेची कागदपत्रे दाखविली नाहीत. या बाबत अर्धसमास पत्रास योग्य उत्तर दिलेले नाही .

एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर यांनी दि. 6 सप्टे 2010 पर्यत श्री. शिवाजी देसाई यांनी पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी दिली आहे. ठेक्याचा कालावधी हा त्या कालावधीच्या पुढे आहे. पॉवर ऑफ ऍटर्नी स्विकारली कशी हे स्पष्ट झाले नाही. अर्धसमास पत्रास पुढील कालावधीबाबत स्पष्ट उत्तर नाही.

प्रमाणक क्रमांक 3 दि. 24 मे, 2011 ने रू. 43,00,000/- चे देयक हे पुर्वी पारित केलेल्या रु. 92,55,193/- च्या मुळ देयकांची छायांकित प्रत काढून त्यावर पास केले आहे. प्र.क्र. 24 दि. 4/2/2012 हे देयक पुर्वी प्र.क्र. 25 दि. 14/12/2011 च्या मुळ प्रतीच्या छाया प्रतीवर पारित करुन रु. 2,00,000/- मक्तेदारास देणेसाठी धनादेश काढला आहे. छायाप्रतीवर मुख्य लेखापरीक्षक, कार्यकारी अभियंता आणि इतर सक्षम अधिकारी यांच्या मुळ सहया नसताना छायाप्रतीत देयक खर्च घातले आहे .याबाबत नियमातील तरतुदी विषद केलेल्या नाहीत.

रु. 15,00,00,000/- अनुदान मंजूर आहे व यातील अनुदान शिल्लक असताना पार्टपेमेंट करणेत आले आहे..

चार धावत्या देयकातून 2% वर्क टॅक्स रु. 9,63,468/- घेतला असून. मक्तेदार यांचे विक्रीकर नोंदणीची कागदपत्रे दाखविली नसलेने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बी डी जी 2005/प्र क्र 324 /इमारती 2 दिनांक 03.03.2006 मधील परिच्छेद 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे अधिनियम कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नसलेने 4% प्रमाणे र.रु. 9,93,468/- वसूलपात्र आहेत.

कामासाठी लागणारा माल बाहेरुन सांगली मनपाचे हद्दीत आणलेबाबत जकात पावत्या दाखविल्या नाहीत. त्यामुळे जकात वसुल करण्यात यावी .अर्धसमास पत्रातील उत्तरानुसार पावत्या व कागदपत्रे नियमानुसार जोडले नसलेने जकात वसूल करावी.

लेखासहिता 1971 नियम 180 व 182 नुसार लाल शाईने मोजमाप पुस्तकाच्या पृष्ठावर दुहेरी रेषा नाहीत तसे किती रक्कमेचे देयक पारित केले त्याबाबत मोजमाप पुस्तकावर शेरा घेवून मुख्य लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी केली नाही.

सुरेंद्र इंजिनिअरींग यांच्या व्यापारी दराचा लिफाफा मिळाला परंतू तांत्रिक लिफाफा व त्यातील कागदपत्रे दाखविणेत आली नाहीत.

निविदा उघडताना मक्तेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असतात या सर्वासमक्ष नोंदवहीत इतिवृत्त लिहिले जाते या मकत्याच्या इतिवृत्ताची संक्षिप्त नोंद नोदवहीत आहे. परंतू निविदा उघडल्याची तारीख नोंद वहीत नमूद नाही. मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग यांचा दर सर्वात कमीचा एस्टीमेंट पेक्षा 135.10% जादा आहे असे नमुद करुन त्याखाली कार्यकारी अभियंता, मुख्यलेखापरीक्षक, आयुक्त यांच्या सहया आहेत. या सहयाच्या अगोदर मक्तेदार यांच्याही सहया आहेत या सर्व लिखाणा नंतर आणखी पुढे लिखाण करुन मे. एस.सी.एम. इन्फ्रास्ट्रक्चर, ठाणे व मे सुरिंद्र इंजिनिअरींग या दोघांचा दर सर्वात

कमीचा एस्टीमेंट पेक्षा 45.50% जादा आहे. असे नमुद करुन त्याखाली कार्यकारी अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांचे शिक्के उमटविले आहेत. परंतु दोन्ही सक्षम अधिकऱ्याच्या सहया नाहीत. मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग यांचा सर्वात कमीचा दर नमुद असताना नंतर अनधिकृतपणे दोघांचा दर कमी कसा नमुद केला ते स्पष्ट करणेत आलेले नाही. अर्धसमास पत्राच्या उत्तरात मानवी चुका झाल्या असे नमुद केले आहे .परंतु इतक्या मोठ्या कामामध्ये अशा प्रकारे दिलेले उत्तर लेखापरीक्षणास संयुक्तिक वाटत नाही.

DATBPCM5601 (Ref No : 22)

## *28 जॅकवेल ते माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यत 1219 मी.मी. व्यासाची अशुध्द पाणी दाब नलीका टाकणे कामातील त्रुटी बाबत.*

**लहान व मध्यम शहरासाठी पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) (केंद्र शासन 80%+ राज्य शासन 10%+म**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस, केंद्र , राज्य व म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 79071390.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 79071390.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 5277609.00 रु.,

***डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केला असून त्यामध्ये रोड क्रॉसींग व रेल्वे क्रॉसींग करणेबाबत नमुद आहे. परंतु अंदाजपत्रकामध्ये या दोन्ही गोष्टींचा समावेश करणेत आलेला नाही. तसेच संबंधीत विभागाच्या परवानगी बार चार्टप्रमाणे वेळेत न घेता कामाचे सोयीस्तव विना निविदा र.रु. 62,92,200/- ची कामे मंजूर ठेकेदाराकडून करणेत आली आहेत.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मोजमाप पुस्तक | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 5406 | 11/1/2010 | 1,00,00,000/- स्वनिधी | 01 | 1 ते 2 |
| 2 | 5563 | 15/1/2010 | 69,82,691/- स्वनिधी | 01 | 1 ते 2 |
| 3 | 5590 | 16/1/2010 | 30,17,309/- | 01 | |
| 4 | 6192 | 11/2/2010 | 17,00,000 | 01 | 3 ते 4 |
| 5 | 6364 | 18/2/2010 | 9,57,291/- | 01 | |
| 6 | 6315 | 18/2/2010 | 77,86,597/- | 01 | 4 ते 8 |
| 7 | 6944 | 12/3/2010 | 1,00,00,000/- | 01 | 8 ते 12 |
| 8 | 919 | 14/5/2010 | 23,67,552/- | 01 | 8 ते 12 |
| 9 | 2485 | 16/8/2010 | 56,22,491/- (UIDSSMT) | 01 | 12 ते 16 |
| 10 | 02 | 16/10/210 | 31,62,336/- | 01 | 16 ते 21 |
| 11 | 03 | 2/11/2010 | 8,73,600/- | 01 | 16 ते 21 |
| 12 | 08 | 11/2/2011 | 3508604/- | 01 | 21 ते 31 |
| 13 | 09 | 15/2/2011 | 6384364/- | 01 | 43 ते 43 |
| 14 | 01 | 25/5/2011 | 6781022/- | 01 | 44 ते 45 |
| 15 | 05 | 15/10/2011 | 2882479/- | 01 | 56 ते 65 |
| 16 | 08 | 14/12/2011 | 3450000/- | 01 | 46 ते 65 |
| 17 | 04 | 31/8/2012 | 3468918/- | 01 | 56 ते 65 |
| | | एकूण | 7,90,71,390/- | | |

प्रशासकीय मान्यता :- No.DMA/ UIDSSMT -letters 2006 / CR-264/4 Director of municipal Administration Dt. 28/09/2006 (2nd meeting of the state level sanctioning committee)

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, पुणे :ताशा-3/सांगली/ पापुयो/दि. 25/11/2005

महासभा ठराव क्र. 50 दि. 30/7/2006 ते UIDSSMT योजना राबविणेस मंजूरी मिळाली आहे.

महासभा ठराव क्र. 193 दि. 10/1/2011 अन्वये योजनेमध्ये अस्तित्वातील जॅकवेल उदभव धरुन योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता. नवीन तांत्रिक बदलास जा.क्र. मुख्य अभियंता तांशा 3/सांगली /पापुयो/ तांत्रिक बदल /3577 दि. 22/10/2010 ने मान्यता

योजनेच्या तांत्रिक बदल प्रस्तावास नगर विकास विभाग नवी दिल्ली व CPHEEO यांनी दि. 14/12/2011 रोजी मान्यता देणेत आली आहे. उपरोक्त कामामध्ये 1400 मि.मि. एम.एस. पाईप ऐवजी 1219 मी.मी. एम.एस. पाईप 3.5 कि.मी. टाकणे असा तांत्रिक बदल करणेत आलेने अंदाजपत्रकीय र. 6,08,57,379/- चे नवीन एस्टीमेट तयार करुन दि. 10/3/2009 चे दै. सकाळ, टाईम्स ऑफ इंडीया, पुणे आवृत्ती व दै. ललकार, सांगली आवृत्तीमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असून, सुरेंद्र इंजिनिअरींग, मुंबई यांची 35.50% जादाची निविदा र.रु. 8,24,61,748/- ची मंजूर करणेत आली आहे. सन 2008-09 चे चालू दरसूचीनुसार प्राकलन किंमत रु. 10,84,41,732/- होत असून चालू दरसूचीशी तुलना करता रु. 23.95% कमीचा देकार आलेला आहे.

उपरोक्त कामाचे नस्तीचे व मोजमाप पुस्तके व देयकाचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास पत्र क्र. 127 दि. 15/2/2013 रोजी निर्गमित केला असून त्यास पाणी पुरवठा विभागाने मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. त्याचे अवलोकन केले नंतर खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

बी.-1 टेंडर अट क्र. 5 नुसार सुरक्षा अनामत रु. 8,24,61,748/- चे 5% प्रमाणे रु. 41,23,087/- पैकी 2.5 % प्रमाणे रु. 20,61,543/- रु. करारपत्र करणेपुर्वी भरणे आवश्यक असता रु. 16,49,234/- भरणा केले असलेने र.रु. 4,12,309/- वसूल करणेत यावे. तसेच देयकामधून 2.5% प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम वसूल करणे ऐवजी 2% वसूल केलेने र.रु. 4,12,309/- असे एकूण 8,24,316/- कमी वसूल केल्याने बँकेचे एक वर्ष मुदत ठेवीचे 10% व्याजाप्रमाणे रु. 82,461/- कंत्राटदाराकडून वसूल करावेत. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये बी.-1 क्लॉज 1 नुसार 4% कपात केली असे नमुद आहे. उत्तर अमान्य करणेत येत आहे.

बी-1 टेंडर अट क्र. 5 मधील सी अन्वये टेंडर दर 15% पेक्षा कमी आलेस सुरक्षा अनामत रक्कम टेंडरचे 6% प्रमाणे व उर्वरीत 2% रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक होते. एस्टीमेट सन 2008-09 चे दरसूचीप्रमाणे तुलना केली असलेने 23.95% कमीने आलेने रु. 8,24,61,748/- चे 6% प्रमाणे रु. 49,47,409/- व देयकातून 2% प्रमाणे रु. 16,49,235/- असे एकूण रु. 65,96,939/- वसूल केले नसलेने बँकेचे एक वर्षाचे मुदत ठेवीचे 10% व्याजाप्रमाणे रु. 6,59,694/- कंत्राटदाराकडून वसूल करणेत यावे.

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 चे अंमलबजावणी बाबत अ.शा. क्रमांक मुद्रांक 2009/2707/प्रक्र 326/म-1 दि. 12/11/2009 प्रमाणे अनुच्छेद 63 नुसार कार्य करारात नमुद केलेली रक्कम रु. 10 लाखापेक्षा अधिक नसेल तेव्हा रु. 100 रु. व 10 लाखावरील प्रत्येक रु. 1 लाखासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु. 100 परंतु जास्तीत जास्त 5 लक्ष मर्यादेपर्यत मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रु. 10 लाखापर्यत 100 व उर्वरीत 8,14,61,748/- चे रु. 81,46,174/- असे एकूण रु. 81,561.72/- भरणे आवश्यक असता रु. 73,000/- भरणा केलेने उर्वरीत रु. 8561.42 भरणा करणेचे पाणी

पुरवठा विभागाने मान्य केले आहे. परंतु प्रत्यक्षात भरणा केलेले नाहीत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे 15/5/2009 चे पत्रामध्ये सदर कामासाठी भाववाढ मुद्दा (प्राईम एस्कालेशन) समाविष्ठ केलेमुळे कामाची किंमत वाढणेची शक्यता असलेने स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली नाही.

बी-1 टेंडर पान क्र. 60 मुद्दा क्र.2 नुसार कामात वापरलेल्या साहित्याचे दर हे सर्व करासहित असलेने साहित्याची जकात भरलेच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेल्या नाहीत.

अ) पाईपची जकात रु. 11,332/- र.मी. + 35.5% जादा रु. 15,354.86/- x 3500 र.मी. = रु. 53,74,201/- जकात 5% प्रमाणे रु. 2,68,710/- वसूल करणेत यावेत.

ब) एम.एस. स्पेशल = 2500.00 कि.ग्रॅ. x रु. 43/- कि.ग्रॅ. = 1,07,509/- + 35.5% जादा = रु. 1,45,674/- चे 5% प्रमाणे जकात रु. 7284/- वसूल करावी.

क) अ.क्र. 31 बाब क्र. 1 1800 मी.मी. dia m NP3C Clab & पाईप 65 र.मी. x = रु. 11,57,650x 5% जकात रु. 57,882/- वसुल करणेत यावेत.

ड) अ.क्र. 32 1700 मी.मी. dia m M.S. pipe 27s.30 र.मी. x रु. 70,500/- र.मी. = रु. 19,40,865 x 5% जकात रु. 97,043/- वसूल करणेत यावेत.

वरील प्रमाणे अ+ब+क+ड ची जकात रु. 4,30,919/- होत असून अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये जकात भरलेच्या छायांकित पावत्या लगत केलेचे नमुद आहे. परंतु छायांकित पावत्याची प्रत जोडणेत आलेली नाही.

सार्व. बांधकाम विभागाचे रस्त्याचे खालून पाईप लाईन टाकणेसाठी रु. 16,42,000/- 1800 मी.मी. NP3 केसिंग पाईप टाकणेचे काम DPR चे वेळी अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन काम सुरु होणेपुर्वी आवश्यक त्या परवानगी घेवून करणे आपेक्षित असता सदर कामाचा समावेश नंतर करणेत येऊन टेंडर न काढताच स्विकृत निविदा धारकाकडून काम करणेत आले आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये काम वेळेची बचत करणेसाठी तसेच कमीत कमी खर्च होणेचे दृष्टीने वेगळे टेंडर न काढता काम स्विकृत निविदा धारकाकडून काम केलेचे नमुद आहे. परंतु उत्तर समर्थनीय नाही.

अशाच प्रकारचा विलंब रेल्वे क्रॉसिंगची परवानगी वेळेत न घेतलेने झाला आहे. तसेच अंदाजपत्रकामध्ये सदर बाब न धरलेने अतिरीक्त बाब म्हणून रु. 49,50,200/- चे अंदाजपत्रक तयार करुन निविदा न मागविता मंजूर ठेकेदाराकडून करणेत आले आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये रेल्वे खात्याकडून परवानगी मिळविणेसाठी माहे 2008 पासून परवानगी मिळविणेचे प्रयत्न चालू असलेचे नमुद आहे. परंतु कंत्राटदाराने कामाचे बार चार्टप्रमाणे सदर मंजूरी 2008 मध्येच घेतली असलेचे नमुद आहे. कामाचे नस्तीची तपासणी केली असता याकामी मध्य रेल्वे प्र (कार्ये) पुणे दि. 12/1/2010 Ref No. PA/W/SDE MTP/DB/360 & 361 ने 1200 एमएम एम.एस. पाईप वरील कव्हरसाठी 1700 एमएम 22 एमएम जाडीची पाईप वापरणेस परवानगी दिली आहे. व प्रत्यक्षात काम मंजूर ठेकेदाराकडून दि. 16/5/2011 रोजी सुरु करुन दि. 22/8/2011 रोजी पूर्ण केले आहे. त्यामुळे कार्यालयीन विलंबामुळे कामास

मंजूरी 12/01/2010 रोजी मिळूनही काम सुरु करणेस दिड वर्षाचा कालावधी लागला आहे. कंत्राटदारास भाववाढ निर्देशांक द्यावा लागणार असलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.

रेल्वे क्रॉसिंग खालून पाईप घालणे कामाचे अंदाजपत्रक सदर कामाचे दर दरसूचीमध्ये नसलेने कोटेशन मागवून रु 46,50,200/- चे अंदाजपत्रक तयार करुन निविदा न मागविता मंजूर ठेकेदारास 2% कमीने दिले आहे. परंतु रेल्वे खालून पाईप पुशिंग करुन घालणेसाठी रेल्वे खात्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे अशा प्रकारचे काम करणेचे लायसन्स आवश्यक असलेने ते कंत्राटदाराकडे नसताना अशा जोखमीचे काम कंत्राटदाराकडून नियम बाह्यरीत्या करुन घेणेत आले आहे.

पाणी पुरवठा विभागाकडून लेखा शाखेकडे पाठविलेल्या देयकामधून विमा कपात केली नसलेने विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनि/2305/सहविमा/सांबावि/फ-2 दि. 12/9/2005 नुसार 1 % विमा देयकातून कपात करणे आवश्यक असलेने रु. 8,24,61,748 x 1% प्रमाणे रु. 8,24,617/- वसूल करणेत यावेत. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये ठेकेदाराने कामाकरीता विमा उतरविला असलेस त्याची पावती सादर करणेत येईल अथवा सदरची रक्कम पुढील देयकातून वसुल करणेत येईल असे नमुद आहे. त्यामुळे विम्यापोटी रु. 8,24,617/- वसूल करण्यात यावेत.

महसूल व वने विभाग अधिसुचना क्र. गौणखनिज 1011009/Pk-3009/स्व-3 दि. 11/2/2010 नुसार रॉयल्टी चार्जेस रु. 70.67/ घ.मी. प्रमाणे खालील प्रमाणे वसूल करणेत यावेत. बाब क्र. 17 साठी मोजमाप पुस्तकेप्रमाणे 77 घ.मी. सिमेंट क्रॉक्रीट (1:2:4) साठी रु. 5441/- + बाब क्र. 18 एम-200 एकूण 196 घमी. साठी रु. 13851+एम-200 एकूण 69.17 घमी. साठी रु. 4888/- एम-150(1:2:4) एकूण 409.65 घमी. साठी रु. 28950/- असे एकूण रु. 53130/- वसूल करणेत यावेत.

उद्योग व उर्जा विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए. 2009/ प्रक्र 108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने रु.7,90,71,390/- x 1% प्रमाणे रु.7,90,713/- वसुल करण्यात यावे.

लेखापरीक्षण तारखेपर्यंत काम पूर्णत्वाचा दाखला दिला नसलेने काम अपूर्ण असलेचे स्पष्ट होते. त्यामुळे नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करणेचा हेतू साध्य झालेचा नसल्याचे दिसून येते.

कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 6,08,57,379/- असून निविदा 35.50% जादा दराने मंजूर केली असलेने कामाची किंमत रु. 8,24,61,748/- झाली आहे. भाववाढ निर्देशांक कलम मंजूर केले असलेने कामाची किंमत वाढणेची शक्यता आहे. आजपर्यंत रु. 7,90,71,390/- रु. खर्च पडले असून जादाची तरतुद स्वनिधी मधून करुन खर्च करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

उपरोक्त आक्षेपाचे पुर्ततेस्तव रु. 52,77,609/- वसूलपात्र व रु. 7,37,93,781/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 23)

## *29 महापौर उपभोक्ता विशेष पाणी बिल सवलत योजना राबविल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस,*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 27823732.00 रु.,

***महानगरपालिकेने सन 2008-09 ते 2011-12 या आर्थिक वर्षात महासभेच्या मान्यतेने पाणी पट्टी वेळेत न भरल्याने आकारलेले विलंब शुक्ल माफ केले आहे. व ही सवलत योजना दिर्घकाळ चालू ठेवल्याने महानगरपालिकेचे रुपये 2,78,23,732/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 152(1)अ नुसार सुट देणेचे अधिकार राज्य शासनास असल्याने शासनाचे मान्यतेशिवाय नियमबाह्यरित्या सुट देणेत आली आहे.***

महासभा क्र. 8 ठराव क्र. 185 दि. 20/12/10 विषय क्र. 1 ज महासभा क्र. 8 ठराव क्र. 172 ऐनवेळचा विषय दि. 19/11/2011 नुसार माहे 31 मार्च 2012 पर्यंत विशेष पाणी बिल सवलत योजनेची मुदत वाढविली आहे. पुन्हा महासभा क्र. 11 ठराव क्र. 234 विषय क्र. 10 दि. 20/3/2012 मध्ये सन 2008-09 ते 2010-11 आर्थिक वर्षात विलंब शुक्ल माफ केल्याने रुपये 2,78,23,732/- चे आर्थिक नुकसान झाल्याने सदर योजनेस मुदत वाढ देवू नये असे प्रशासनाने निदर्शनास आणले आहे. तरीसुध्दा महासभेने दि. 30/4/2012 पर्यंत योजनेस मुदतवाढ दिली आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

महासभेला पाणी पट्टी वेळेत भरली नाही तर विलंब शुल्क माफ करणेचा अधिकार असलेची अधिनियम 1949 मधील कोणत्याही तरतुदीचा आधार न घेता सुट देणेत आली आहे. त्यामुळे नियमबाह्यरित्या विलंब शुल्क माफ केलेचे स्पष्ट होते.

योजनेला दिर्घकाळ मुदतवाढ दिली असल्याने नागरिकांची वेळेत पाणी देयके न भरणेची मानसिकता निर्माण झाली आहे. व थकबाकीचे प्रमाण वाढले आहे. तसेच वेळेत देयके भरणाऱ्या नागरिकांच्यावर अन्याय झाला आहे.

पाणी पुरवठा विभागाकडून नागरिकांना दैनंदिन पाणी पुरवठा होत असल्याने योजनेचा खर्च भागविणेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. परंतु वसूली नियमित होत नसल्याने आर्थिक नियोजन कोलमडलेले आहे असे दिसून येते.

महानगरपालिकेकडून सुजल निर्मल योजना UIDSSMT या योजनेतून केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या

प्रमाणात निधी उपलब्ध झाला असून त्यामधून विविध ठिकाणी कामे सुरु आहेत. त्यासाठी महानगरपालिकेच्या वाट्याचा स्वनिधी वापरणेची अट नमुद आहे. अशा प्रकारे विलंब शुल्कामध्ये सवलत दिल्याने योजना पूर्ण करण्यासाठी आर्थिक निधी कमी पडू लागला आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नापाक-2008/प्र.क्र. 1/पापु-22 दि. 22/10/2008 मधील 9 नुसार पाणी पट्टीची आकारणी व वसूली 100% करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता विलंब शुल्क माफ केले आहे.

अर्धसमास पत्रास पाणी पुरवठा विभागाने उत्तर दिले असून त्यामध्ये विलंब शुल्क अधिनियमातील कोणत्या तरतुदीनुसार माफ केले आहे याबाबत माहिती दिलेली नाही. विलंब शुल्कात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचेही मान्य केलेले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 (1) अ नुसार जी व्यक्ती महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील अशा पात्र व्यक्तीस राज्य शासन मान्य करीत अशी सुट देता येईल. अधिनियम 1949 चे कलम 134(3) अन्वये मिटरणे पाणी पट्टी देणेची व ती जर देय तारखेस भरली नाही तर पाणी पट्टीची थकबाकी असलेप्रमाणे वसूल करणेची तरतुद आहे. अधिनियम 1949 चे कलम 128(अ)(1) नुसार मालमत्ता करामध्ये पाणी पट्टीचा समावेश आहे. त्यामुळे महानगरपालिकेने राज्य शासनाची मंजूरी न घेताच योजना राबविल्याने महानगरपालिकेची रुपये 2,78,23,732/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. ते संबंधिताकडून वसूल करणेत यावे.

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 10 नियम 12(1) (अ) नुसार पाणी पट्टीचा कोणताही हप्ता किंवा पाण्याबद्दल किंवा मिटरच्या भाड्या बद्दल किंवा नियम 3, 9 किंवा 17 च्या तरतुदीन्वये किंवा तरतुदींच्या आधारे केलेल्या कोणत्याही कामाच्या खर्चा बद्दल देय असलेल्या कोणत्याही रक्कमेचा कोणताही हप्ता, अशा पट्टी बद्दल किंवा रक्कमे बद्दल मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसुर करणेत आली तर खाजगी पाणी पुरवठा आयुक्तांनी तोडून टाकण्यात यावा असे नमुद आहे. या प्रमाणे पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई न करता नियमबाहयरित्या विलंबशुल्क माफ केले आहे.

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 219 नुसार नियम , उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश हे प्रकरण समाविष्ठ करणेत आले आहेत. कलम 453 नुसार वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या (अनुसुची ड) मधील नियम हे या अधिनियमाचा भाग आहे. असे समजणेत येईल व कलम 454 नुसार अनुसूचीत फेरफार करणे किंवा तीत भर घालणेचा अधिकार महानगरपालिकेस आहे. कलम 457 अन्वये महानगरपालिकेस (7) नुसार नगरपालिका कर (अ) नगरपालिका कराची आकारणी व वसूली बाबत नियम करणेचा अधिकार आहे. परंतु सदर नियम करण्यास राज्य शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार विलंब शुल्क माफ करणेस राज्य शासनाची मंजूरी घेणेत आलेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 28)

## *30 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाण्याचा कोटा वाढवून न घेतल्याने झालेले आर्थिक नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: पाणी पुरवठा व मलनि, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 15087671.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 745614.00 रु.,

***महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून मंजूर कोट्यापेक्षा जादा पाणी वापर केलेने व मंजूर पाणी कोटा वाढवून न घेतलेने त्यापोटी रक्कम रुपये 7,45,614/- जादा अदा केलेले आहेत.***

महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने ज्या भागात पाणी पुरवठा विभागास पाणी पुरवठा करणे शक्य नाही व जेथे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून पाणी घेवून नागरिकांना पुरविले जाते त्यासाठी महामंडळ रुपये 7.50/ घ.मी. दर आकाराते. मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापरलेस रुपये 11.25/ घ.मी. दराने पाणी पट्टी आकारते. सोबत जोडलेल्या परिशिष्ठाचे अवलोकन करता सन 2011-12 या आर्थिक वर्षात रुपये 7,45,694/- कोट्यापेक्षा जादा पाणी वापराबद्दल महामंडळास आदा करणेत आले आहेत.

अर्धसमास पत्र क्र. 98 ला पाणी पुरवठा विभागाने उत्तर दिले असून महामंडळाकडून पाण्याचा कोटा वाढवून देणेची मागणी दि. 20/2/2010 दि. 20/3/2010 व दि. 9/4/2010 चे पत्रान्वये करणेत आली. परंतु कोटा वाढवून देणेचे शक्य नसलेचे दि. 5/7/2010 चे पत्रान्वये महामंडळाने कळविले आहे. परंतु पाणी पुरवठा विभागाने सन 2011-12 मध्ये कोणताही पत्र व्यवहार महामंडळाशी केलेला नाही. तसेच उपरोक्त बाबींची माहिती वरिष्ठांना, महासभा व स्थायी सभेला दिली नसलेने त्यांचे उत्तर मान्य करता येणार नाही.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासोबत महानगरपालिकेने पाणी वापरासाठी केलेल्या कराराची प्रत लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

सन 2011-12 मध्ये मंजूर कोटयापेक्षा जास्त कोटा वाढवून घेणेबाबत पाणी पुरवठा विभागाने कोणताही प्रयत्न केलेला नाही व ही गोष्ट वरीष्ठांचे निदर्शनास आणलेली नाही.

सन 2009-10 या आर्थिक वर्षापासून महानगरपालिकेस सुजल व निर्मल अभियान तसेच UIDSSMT योजनेमधून केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळाले असलेने ज्या भागामध्ये महानगरपालिका पाणी पोहचवू शकत नाही त्या भागामध्ये प्राधान्याने कामे घेवून काम पूर्ण करणे आवश्यक असता त्या

दिशेने काम न केलेने महानगरलिकेस सन 2011-12 या आर्थिक वर्षात वार्षिक लेखा (B2833) नुसार महामंडळास पाणी देयकापोटी रुपये 1,50,87,671/- देणेत आले आहेत. व मंजूर कोटयापेक्षा जादा पाणी वापर केलेने रुपये 7,45,614/- चे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. ते सबंधिताकडून वसूल करणेत यावे.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये 7,45,614/- वसूलपात्र करणेत यावेत.

DATSBKM7201 (Ref No : 41)

## *31 तुरटी, ब्लीचींग पावडर , क्लोरीन इत्यादी खरेदी मधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 6201450.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 6201450.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 1483510.00 रु.,

***खरेदीच्या दरातील तफावतीमुळे रक्कम रुपये 4,43,840/- वसूल करावी. तसेच सोलापुर जिल्हयात प्राप्त झालेल्या दराशी तुलना केली असता सांगलीने केलेल्या खरेदीत रक्कम रुपये 9,21,420/- जास्त दराची तफावत आढळते.***

तुरटी 491.38 टन x रुपये 5220/टन = रु.25,65,000/- मक्तेदार -मे. सायली इरिगेटर्स,जयसिंगपुर
ब्लिचींग पावडर 54 टन x 16390/टन = रु.8,85,000/- मक्तेदार -
क्लोअराईड 116.8 टन x 22500/टन = रु.23,12,640/- मक्तेदार - आनंद केमिकल्स
पी.ए.सी. बेरिक 19.500 टन x 22500/टन = रु.4,38,750/- मक्तेदार - एम.एम. अग्रवाल
एकूण खरेदी रक्कम रुपये = रु.62,01,450/-

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मुळ खरेदी प्रमाणके लेखापरीक्षण कामी उपलब्ध झाली नाहीत.

जाहिर व ई-टेंडरद्वारे निविदा मागवून मक्ता निश्चित करुन मक्तेदाराशी करार करणेत आला आहे. यामुळे मक्तेदराकडून एकूण खरेदीची रक्कम रुपये 62,01,450/- वर आयकर अधिनियम 1961 चे 194 (सी) प्रमाणे 2% आयकर रुपये 1,27,750/- वसूल करणेत आलेला नाही.

चारही प्रकारचे खरेदी बाबत एकत्र निविदा दि. 15/3/2011 रोजीच्या दैनिक पुढारी मधून मागविली आहे. एवढ्या मोठ्या रक्कमेची निविदा असल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा निर्णय क्र. जाहिरात 2009 /प्र.क्र. 137/क-34 दिनांक 31 ऑगष्ट 2009 नुसार रुपये 50 लाखापेक्षा जास्त रक्कमेची निविदा असल्याने अ वर्ग ब वर्ग क वर्ग अशा तीन्ही दैनिकातून जाहिर प्रसिध्दी देऊन करणे आवश्यक होते. शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली नाही.

दि. 15/3/2011 अखेर निविदा मागविल्या त्या दि. 30/3/2011 रोजी उघडणेचे निश्चित करणेत आले. निविदा उघडताना कोणते व किती मक्तेदार उपस्थित होते या बाबतचे इतिवृत्त दाखविले नाही.

क्लोरीन गॅसची टेंडर मुदत दि. 26/4/2011 चे दै. पुढारी मध्ये जाहिरात देवून ती दि. 29/4/2011 पर्यत वाढवली असून, दि. 30/3/2011 रोजी निविदा उघडले नंतर त्वरीत मुदत वाढ देणे आवश्यक असताना ती 29 दिवसांनी प्रसिध्दीस देणेत आलेली आहे.

या चारही निविदांसाठी बयाणा रक्कम भरताना वसंतदादा सहकारी बँकेचे चलन वापरुन बयाणा रक्कम शेतकरी बँकेत भरल्याचे आढळते. बँकेकडे 40 कोटीची केलेली गुंतवणुक परत मिळत नसताना ही रक्कम भरणेत आली आहे. युनियन बँकेत पैसे भरल्याचा अस्पष्ट शिक्का छाया प्रतीत आलेल्या चलनावर आढळत आहे. या राष्ट्रीयकृत बँकेत रक्कम रुपये 2,26,500/- जमा झाली असलेबाबत पासबुकातील नोंदी दाखविण्यात आल्या नाहीत. तसेच शेतकरी बॅकेची चलने का वापरली ते स्पष्ट केले नाही.

या चारही प्रकारचा माल पाठविताना डिलीव्हरी चलने दिली आहेत. चारही प्रकारच्या मालाची डिलीव्हरी चलने कार्बन प्रतीत आहेत. या चलनावर मालाची किंमत, परिमाण या स्तंभामध्ये कोणत्याही नोंदी नाहीत. चलनावरील सर्व मजकुर कार्बन प्रतीत आहे. परंतु मालाचे प्रमाण मात्र शाईपेनाने नमुद केले आहे. हे लिखाना नंतर करणेत आलेचे स्पष्ट होते. मुळ चलने दाखविली नाहीत.

लिक्वीड क्लोरीन चा सन 2011-12 या दरसूचीतील दर हा प्रत्येक टनास रुपये 16000/- आहे. अंदाजपत्रकातील दर रुपये 16800/- आहे. व प्रत्यक्ष खरेदी रुपये 19,800/- ने टन अशी केली आहे. दरसूचीत रुपये 16000/- दर असताना रुपये 19800/- दर दिल्याने रुपये 3800/- प्रत्येक टनास फरक आहे.

रुपये 3800 x 116.8 टन = 4,43,840/- इतके महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. जास्त दर आलेने फेर निविदा मागविणे आवश्यक होते.

सार्वजनिक आरोग्य अभियंता म.न.पा सोलापुर यांचे पत्र क्र. साआअ/भालि/37 दि. 7/6/2011 ने त्यांनी निश्चित केलेला क्लोरीनचा दर प्रत्येक टनास रुपये 12600/- व ब्लिचींग पावडरचा दर रुपये 14900/- आहे. या आधारे दरातील तफावत खालील प्रमाणे आहे.

| तपशील | सांगली | सोलापुर | तफावत रक्कम |
|---|---|---|---|
| क्लोरीन दर / टन | 19800 | 12600 | 7200 |
| ब्लिचींग पावडर दर / टन | 16390 | 14900 | 1490 |

लिक्वीड क्लोरीन खरेदीमध्ये 116.8 टन X रु.7200 = रुपये 840960/- व ब्लिचींग पावडर खरदीमध्ये 54 टन x रु.1490/- = रु.80960/- इतके असे एकूण रुपये 921920/- मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. खरेदी करताना बाजारभाव पाहून दराच्या वाटाघाटी केल्या नसलेचे स्पष्ट होते. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त नाही.

DATBPCM5601 (Ref No : 43)

## *32 मिरज विभागांतर्गत 71 मी.मी. व्यासाची व 6.4 मी.मी. जाडीची एम. एस. अशुध्द जलदाब नलिका टाकणे कामातील त्रुटी बाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस, राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 52461319.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 52461319.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 1575740.00 रु.,

***या देयकातून रॉयल्टी,विमा,उपकर वसूल केले नाहीत. याकामासाठी मंजुर असलेले अनुदान रक्कम रु. 3,13,05,800 पेक्षा रु. 2,11,55,519 चे जास्त काम करण्यात आले.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 30 दिनांक :-06.07.2012 रक्कम :- 22,12,261/-

एकूण खर्च :- 5,24,61,319/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,16,50,000/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.485 दि.21.02.2004

तांत्रिक मान्यता :- कार्यकारी अभियंता यांचे पत्र दि.05.05.2005

ठेकेदाराचे नांव :- श्री. शशांक व्ही. जाधव

कार्यादेश दिनांक :- 03.06.2006 कामाची मुदत :- 24 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 99 पृष्ठ क्रमांक :- 31 ते 36 , 42 ते 45 , 53 ते 72 ,86 ते 90 , 91 ते 94

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.485 दि.21.02.2004 परंतू कामाचा कार्यादेश दि. 03.06.2006 रोजी म्हणजेच जवळपास दोन वर्षांनी दिलेला आहे. लेखा संहिता 1971 नियम क्र.171 (6) नुसार निविदा उघडलेल्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत त्यानिकाली काढणेत आल्या पाहिजेत. आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक होता काम नये. असे नमुद असता त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

ग्राम विकास व जलसंधरण विभाग महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्रं. जीप्रर 2000 / प्रक्रं 837/ पंरा 8 (35) दि. 15 सप्टेंबर 2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.5,24,613/- देयकातून कपात केलेली नाही. दर सुचीमध्ये 1 टक्का विमा रक्कमेची तरतूद केली नसल्याने विमा रक्कम वसुल केली नाही असे अर्धसमास पत्रच्या उत्तरात नमुद आहे. परंतु विमा 1 टक्का विमा रक्कम कपात करणेबाबत यापुर्वीच तरतुद असलेने दरसूचीत नमुद नसले तरी प्रत्यक्ष अंदाजपत्रक तयार करताना 1 टक्का विमा रक्कमेची तरतुद दाखवुन प्रत्यक्ष देयक पारित करताना ही रक्कम कपात करुन विमा संचलनालयाकडे जमा केले नाही. यामुळे कामगाराच्या विम्यावर परिणाम झालेला आहे. म्हणून सदरची रक्कम वसूलपात्र ठरते. अर्धसमास पत्रच्या उत्तरास वसुलीबाबत नमुद केलेली स्थिती योग्य आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं. बी डी जी 2005/प्र.क्र.324/इमारती -2 दिनांक 03/03/2006 मधील परिच्छेद क्रं. 5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुल्यवर्धीत कर अधिनियमाचे कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने 4 % रक्कम रु. 20,98,452/- वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष 2 % प्रमाणे रक्कम रु. 10,53,123/- वसूल केली असल्याने बाकी रक्कम रु. 10,45,329/- वसूल पात्र आहे. मक्तेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र 8 प्रमाणे आहे असे अर्धसमास पत्राच्या उत्तरात नमुद आहे. परुंतु हे प्रमाणपत्र कलम 9 प्रमाणे नाही. यावरुन सदरचे प्रमाणपत्र परिपूर्ण नाही असे निदर्शनास येत असल्याने रक्कम वसुल पात्र ठरते.

जादा दर 29.40 टक्केसह रक्कम रु. 4,05,09,705/- एवढे काम महानगरपालिकेच्या अनुदानातुन मंजुर

होते. परंतु नंतर महानगरपालिकेकडून निधी मिळणेचे अडचणीचे झाल्यामुळे वरील कामासाठी शासनाची मान्यता घेतली असे अर्धसमास पत्रात दिलेले उत्तर योग्य आहे.

एम.एस. पाईपच्या खरेदी दरास संरक्षण दिले असलेने प्रत्यक्ष खरेदीची उपप्रमाणके/इनव्हाईस लेखा परीक्षणास दाखविणेत आली नाही. तसेच कार्यारंभ आदेश दोन वर्ष उशीरा दिलेने भाववाढ तरतूदी नुसार मनपाला ठेकेदारास जादा रक्कम द्यावी लागणार असलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. ते संबंधिताकडून वसुल करावे.

एकूण 23 रनिंग बिलाचे लेखापरीक्षण विशेष लेखा परीक्षणावेळी झाले आहे व त्याबाबतचे अभिप्राय परिच्छेद क्रं.32 मध्ये नोंदविले आहेत. प्रमाणक क्रं. 24 दिनांक 6/7/2012 ने र.रु. 22,12,799/- चे देयक पारीत केले आहे.

या कामामध्ये गौण खनिजाचा खालील प्रमाणे मोठया प्रमाणात वापर केला आहे. परंतु महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही.

बाब क्रं 13- विट बांधकाम -9.90 घ.मी. 3.49 ब्रास x रु. 200/ब्रास = 698

बाब क्रं 14- सिमेंट प्लास्टर 12 मी.मी. 109 चौ.मी. 0.77 ब्रास x 200 = 154

बाब क्रं 5- सिमेंट मॉर्टर 160 चौ.मी. 1 ब्रास x 200 = 200

बाब क्रं 10- सिमेंट कॉंक्रीट 18.50चौ.मी.23.53 ब्रास x रु.200/ ब्रास = 4706

--------------

रू.5798

--------------

गौण खनिज प्रत्यक्ष बाबवार किती ब्रास लागले याबाबत वापर पत्रक देयका सोबत नाही. लेखा परिक्षणावेळी केलेल्या गणनेप्रमाणे रॉयल्टी रु. 5758 वसूल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 79)

## *33 वसंतदादा सह.बँकेतील गुंतवणूकीस जबाबदार असणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***वसंतदादा सह.बँकेतील गुंतवणूकीस जबाबदार असणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर उच्च न्यायालयाने*** |

***याचिका क्रं.177/2009 नुसार दि.14.06.2011 च्या आदेशा प्रमाणे कारवाई करणेचे आदेश देऊन ही मनपाने कोणतीही कारवाई केलेली नाही.***

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग विशेष लेखापरीक्षण अहवाल सन 2006-07 ते सन 2009-10 मधील परिच्छेद क्रं.55 मध्ये नियमबाह्यरित्या वसंतदादा सहकारी बँकेत रक्कम ठेवलेमुळे झालेले नुकसानीबाबत परिच्छेदामधील मुद्दा क्रं.4 मध्ये नगरविकास विभागाचे पत्र क्रं.3011/प्र. क्र.471/नवी 22 दि.18.10.2011 अन्वये आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांना बँकेची आर्थिक परिस्थिती योग्य नसताना सदर बँकेत गुंतविलेल्या रक्कमा बाबत अधिकारी , कर्मचारी यांच्यावर जलद गतीने नियमानुसार कारवाई करुन त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करणेस कळविले आहे. तसेच मुद्दा क्रं.8 मध्ये उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रं. 177/2009 ने श्री.वी.द.बर्वे यांनी महाराष्ट्र शासनाचे विरुध्द याचिका दाखल केली असल्याचे व त्याबाबत उच्च न्यायालयाचे दिनांक 14.06.2011 च्या आदेशाप्रमाणे ठेवी संदर्भात संबंधीत अधिकारी व जबाबदार कर्मचारी यांच्यावर आवश्यक ती कारवाई करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार केलेल्या कारवाईची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेली नाहीत.

अर्धसमास पत्रास उत्तर देणेत आलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 116)

## *34 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग,*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 762908.00 रु.

***प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध केलेली नाहीत.***

खालील प्रमाणके लेखा परिक्षणाकरीता प्राप्त झालेली नाहीत.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1. | 7050 | 21/03/2012 | 717943/- | साफसफाई मानधन |
| 2. | 7051 | 21/03/2012 | 17419/- | साफसफाई मानधन |
| 3. | 7423 | 31/03/2012 | 8325/- | पा.पु. वाहन दुरुस्ती |
| 4. | 7827 | 31/03/2012 | 19221/- | पगार नगररचना |

| | | |
|---|---|---|
| एकूण | 762908/- | |

उपरोक्त प्रमाणके रेखांकनास प्राप्त झाली नसलेने रक्कम रुपये 762908/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

DATSVKM7201 (Ref No : 119)

## 35 विद्युत बिलाची उप प्रमाणके रेखांकनास प्राप्त न झाले बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 1377703.00 रु.

***विद्युत बिलाची उप प्रमाणके रेखांकनास प्राप्त झालेली नाहीत.***

लेखा विभागाकडे प्रमाणकांची लेखा परिक्षण करत असताना परिशिष्ठ क्रमांक ( 14 ) मध्ये दर्शविलेल्या विद्युत / टेलीफोन बिलाची उप प्रमाणके रेखांकनास प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे प्रमाणकांची एकूण रक्कम रुपये 1377703/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

DATSVKM7201 (Ref No : 120)

## 36 सामान्य रोख पुस्तक व बँक पासबुक (वेतन राखीव निधी) मधील तफावती बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सामान्य रोख पुस्तक व पासबुक (वेतन राखीव निधी) बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र. 40830 यातील तफावतीची रक्कम रु. 3,03,50,377/- बाबतचा सविस्तर गोषवारा वर्षा अखेरीस नाही. तसेच लेखापरीक्षण तारीख 05/12/12 पर्यत मागील सुमारे 18 महिने सामान्य रोख पुस्तक बंद करुन सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी केली नाही.***

वेतन राखीव निधीचे बँक ऑफ महाराष्ट्र मधील खाते क्र. 40830 मधील रोख पुस्तक शिल्लक रु. 3,04,25,134/- व पासबुक शिल्लक रु. 74,757/- = तफावत रु. 3,03,50,377/- आढळुन आली आहे.

वसंतदादा सहकारी बँक मधील गुंतवणुक रक्कम रु. 3,00,42,000/- आहे. गुंतवणूक पावती दाखविली नाही व न.पा. लेखा संहिता 1971 चे प्रकरण 12 नियम क्र. 187 नुसार सर्व गुंतवणूकची नोंद नमुना क्र. 142 या नोंदवहीमध्ये एकत्रित ठेवली नाही. तसेच सहकारी बँक खाते पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नाही.

स्टेट बँक खाती रक्कम रु. 30,57,745/- शिल्लक दिसून येते. सदर रक्कम कधी पासून बँक खाती आहे. याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.

वसंतदादा सहकारी बँक मध्ये गुंतवणुक रक्कम रु. 3,00,42,000/- व शिल्लक रक्कम रु. 2602.5/- च्या सद्यस्थितीबाबत माहिती अप्राप्त आहे. मार्च 12 अखेर व्याजासह किती रक्कम आहे ते स्पष्ट झाले नाही.

न.पा. लेखा संहिता 1971 चे नियम 32(2) व (4) व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे फॉर्म जनरल 1 चे टिप नुसार रोकड वही संबंधीत अधिकाराच्या स्वाक्षरीने बंद करणे आवश्यक असता दि. 30/6/2011 ते 31/3/12 पर्यंत मुख्य लेखाधिकारी यांनी रोकड पुस्तकावर स्वाक्षरी केलेली नाही.

राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँक नसताना वसंतदादा सह. बँकेत रक्कम ठेवण्यात आली आहे. याबाबत सविस्तर परिच्छेद विशेष लेखापरीक्षण अहवाल सन 2006 ते 2010 मध्ये घेणेत आला आहे. गुंतवणूकीबाबतची नस्ती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेली नाही.

सामान्य रोकड पुस्तक व पासबुक यातील रक्कम रु. 3,03,50,377/- ची तफावत वर्षाअखेर दिसून येते. विहित पध्दतीने गोषवारा काढलेला नाही.

दि. 30/6/2011 पासून दि. 5/12/12 पर्यत सुमारे 18 महिने सामान्य रोख पुस्तक बंद करुन सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही. या संदर्भात दिलेल्या अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त नाही.

DATBPCM5601 (Ref No : 82)

## *37 सामान्य रोख पुस्तक व पासबुकात (IHSDP) मार्च 2012 अखेरच्या शिल्लकेत तफावत.*

**एकात्मिक शहर विकास योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, केंद्रशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 56104829.00 रु.

***वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेत ठेवीमध्ये गुंतवणूक केलेली रक्कम रु.5,45,61,398/- व याच बँकेतील***

***बचत खात्यावरील शिल्लक रुपये 15,43,431/- अशी एकूण रक्कम रु.5,61,04,829/- महानगरपालिकेस व्याजा सहित अप्राप्त आहे.***

लेखा विभागाचे लेखापरीक्षण करताना एकात्मिक शहर विकास योजना युनियन बँकेत खाते क्र. 424202010502709 च्या पासबुकात सामान्य रोख पुस्तकातील मार्च 2012 अखेरच्या रक्कमेत तफावत आहे.

तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| गुंतवणूकीसह अ. शि. रु. | | 5,79,50,262.69 |
| गुंतवणूक | (-) | 5,45,61,398.00 |
| शेतकरी बँक खात्यावरील | (-) | 15,43,461.98 |
| निव्वळ शिल्लक रु. | = | 18,45,432.70 |
| न वटलेले धनादेश | (+) | 1,49,895.00 |
| चलने आली नाहीत म्हणून नोंद नाही | (+) | 2,73,489.00 |
| | = | 22,68,816.70 |
| पासबुक शिल्लक | | 23,34,276.70 |
| | (-) | 22,68,816.70 |
| फरक र.रु. | | 65,460.00 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

पासबुक व सामान्य रोख पुस्तकातील मार्च अखेरच्या शिल्लकेचा मेळ घेतला असता सामान्य रोख पुस्तकापेक्षा पासबुकात र. रु. 65,460/- जास्त शिल्लक आढळते. लेखासंहिता नियम 51 प्रमाणे ताळमेळ घेवून लेखे बंद केले नाहीत.

चलने आली नाहीत म्हणून पासबुकावर जमा झालेली रक्कम सामान्य रोख पुस्तकात नोंदली नाही. अशा र.रु. 2,73,489/- चा फरक आहे. लेखा संहिता 1971 चे नियम 32 (1)(2) व 51 प्रमाणे विहित पध्दतीने लेखे लिहून ताळमेळ घेतला नाही. चलने न दिलेल्या विभागाची यादी लेखापरीक्षणास दिली नाही.

वसंतदादा शेतकरी बँकेतील गुंतवणूक र.रु. 5,45,61,398/- व खात्यावरील शिल्लक रु. 15,43,431/- याची विहित मुदत होवून गेल्याने आतापर्यत व्याजाची गणना करुन किती रक्कम वसुल करावी लागेल याची सविस्तर माहिती लेखा परिक्षणास देणेत आली नाही.

वसंतदादा शेतकरी बँकेत या रक्कमेसह गुंतविलेल्या इतर सर्व रक्कम याचा बँकेत गुंतवावी. म्हणून कोणी कोणत्या नियमानुसार निर्णय घेतला याबाबतची सर्व कागदपत्रे / नस्ती लेखापरीक्षण कामी दिल्या नाहीत.

न वटलेल्या धनोदश र.रु. 1,49,895/- चा तपशील रोख पुस्तकात नाही तसेच किती धनादेश वटले नाहीत व किती रद्द केले या बाबतची लेखी माहिती लेखापरीक्षणास दिली नाही.

दि. 3/12/2011 ते 27/3/2012 या कालावधीत लेखापरीक्षण दि. 5/2/2013 तारखेपर्यत सक्षम अधिकारी

यांच्या सामान्य रोख पुस्तकावर सह्या नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 83)

### *38 कॅशबुक व पासबुकातील (सुवर्ण जयंती) रक्कमेतील तफावती बाबत.*

**अ) केंद्र शासन पुरस्कृत योजना , ब) सुवर्ण जयंती रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, केंद्रशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 32 प्रमाणे रक्कमेसह चलने आली असताना र. रु. 1,26,994/- सामान्य रोख पुस्तकात नोंदवली नाही.***

सन 11-12 या आर्थिक वर्षाचे केंद्र शासन पुरस्कृत योजनेचे सामान्य रोख मार्च 12 अखेरची शिल्लकेचा मेळ घेतला असता.

सा. रोख पुस्तक शिल्लक रु. 56.38,674/-

पासबुक शिल्लक रु. 57,65,668/-

एकुण शिल्लक रू. 1,26,994/-

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सामान्य रोख पुस्तकापेक्षा पासबुकातील शि. र. रु. 1,26,994/- ने जास्त आढळते. पासबुकात मार्च 12 अखेर पर्यंत रक्कम जमा असताना दि. 25/9/12 ला रु. 113000/- व दि. 17/12/2012 ला रु. 14000 चलनाने जमेस आली असे अर्धसमास पत्रास दिलेले उत्तर चुकीचे आहे. सर्वच खात्याकडून वेळीच चलने आली आहेत. असे असताना सामान्य रोख पुस्तकात ती पुढील वर्षात अनियमितपणे जमा दाखविणे नियमबाह्य आहे. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 32 प्रमाणे कार्यवाही केली नाही.

लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी पासबुकाशी मेंळ न घेताच सामान्य रोख पुस्तकातील व्यवहार बंद केले आहेत.

दि. 16/12/11 ते दि.31/03/12 या कालावधीत सामान्य रोख पुस्तकावर लेखा परिक्षणाची तारीख 6/12/12 पर्यंत सक्षम अधिकारी यांनी सही केली नव्हती. यावरुन विहित वेळेत मेळ घेतला गेला नाही हे स्पष्ट होते.

केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानापैकी र.रु. 57,65,668/- एवढे शिल्लक राहिले आहे व रु. 31,88,947/- युको बँक सांगली येथे गुंतवणूक केली आहे. अशी र.रु. 89,54,615/- एवढी स्वच्छता गृह बांधणे साठी दिलेले अनुदान विहित वेळेत खर्च केले नाही.

सुवर्ण जयंती रोजगार खाते क्र. 16001020001154 मध्ये न वटलेले धनादेश र.रु. 4317742/- चे आहेत. यापैकी वटलेले व रद्द केलेले धनादेश किती याचा मेळ सामान्य रोख पुस्तकात घेतला नाही.

सुवर्ण जयंती सुवर्ण जयंती सामान्य रोख पुस्तकात र.रु. 16322480.86 एवढी रक्कम शिल्लक आहे. ही योजना कशी राबवावी याबाबतचे शासन निर्णय लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाहीत. खर्चाचे नियोजन न करता रक्कम शिल्लक ठेवली असल्याचे आढळते.

अर्धसमास पत्रात म्हटल्याप्रमाणे कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविले नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 84)

## *39 पासबुक व सामान्य रोख पुस्तकातील (विकास निधी) शिल्लक रक्कमेतील तफावतीबाबत.*

**विकास निधी खाते**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***विकास निधीच्या सामान्य रोख पुस्तकात व पासबुकात मार्च 12 अखेर र.रु. 4,96,870.64 एवढी तफावत आहे.***

लेखा विभागाचे लेखा परिक्षण करीत असताना युनियन बँकेत विकास निधीचे खाते आहे. त्याचा खाते नं. 424202170000001 आहे. मार्च 12 अखेर सामान्य रोख पुस्तकाशी मेळ घेतला असता शिल्लक रकमेत फरक आढळला आहे. तपशील खालील प्रमाणे

सा रोख पुस्तक शि.रु. 80,78,356.46/-

न वटलेले धनादेश रु. + 18,121.00/-

= 80,96,477.46/-

पासबुक शि. रु. (+) 85,03,100.82/-

फरक = 4,06,623.36/-

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सामान्य रोख पुस्तकातील शिल्लकेपेक्षा पास बुकातील शिल्लक र.रु. 4,06,623.36/- जास्त आहे. चलने आली नसल्याने सामान्य रोख पुस्तकात रक्कम नोंदली नाही. असे अर्धसमास पत्रास दिलेले उत्तर चुकीचे आहे. लेखा संहिता 1971 चे नियम 35(1) नुसार चलनासह रक्कम स्विकारायची आहे. सर्व खात्याने वेळीच चलने दिली असताना ती आली नाही असे म्हणणे व रक्कम वेळीच न नोंदणे लेखा संहिता1971चे नियम 32 नुसार नियमबाह्य आहे.

विकास निधीच्या वरील मुख्य बँक खात्याशिवाय याच विकास निधीसाठी मिरज येथे युनियन बँकेत खाते क्र. 470002010509943 उघडलेले आहे. या खात्यावर दि. 31/3/11 ला अखेरची शिल्लक रु. 29,481.02/-व 31/3/12 अखेर रु. 90,247.28/- एवढी शिल्लक होती. लेखे बंद करताना रक्कम काढून ती सामान्य रोख पुस्तकात नोंदवली नाही. यामुळे मार्च 2012 अखेर र.रु. 4,06,623.36/ अधिक व या नवीन खात्यावरील शिल्लक रु. 90,247.28/ अशी एकूण रु. 4,96,870.64/ एवढा फरक आहे. लेखा संहिता नियम 51 प्रमाणे सक्षम अधिकारी यांनी एकत्र मेळ घेवून लेखे बंद केले नाहीत.

सन 2010-11 च्या वार्षिक लेख्यात र.रु. 29,481.02 व सन 2011-12 वार्षिक लेख्यात र.रु. 90,247.28 ची तफावत येत आहे.

लेखा संहिता नियम 32 (1) प्रमाणे सामान्य रोख पुस्तक नमुना क्र. 11 मध्ये ठेवली नाही. अर्धसमास पत्रास उत्तर दिल्याप्रमाणे कागदपत्रे दाखविले नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 85)

## *40 सामान्य रोख पुस्तक व पासबुक (सेवा कर) मधील तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, 0 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सामान्य रोख पुस्तक व पासबुक यांचा नागरपालिका लेखा संहिता 1971 नियम 51(3) प्रमाणे मेळ घेतला नाही. व जमा झालेल्या रक्कमांचे विहित पध्दतीने लेखे ठेवले नाहीत.***

सन 11-12 या आर्थिक वर्षाचे केंद्र शासन पुरस्कृत सेवाकर बाबत सिंडीकेट बँकेत खाते क्र. 53902200043929 आहे. मार्च 12 अखेर सामान्य रोख पुस्तकातील शिल्लकेत फरक आढळतो.

| | |
|---|---|
| सा.रो. पु.शि. | 2,32,105.77 |
| पासबुक शिल्लक | 2,71,432.77 |
| फरक रु. | 39,327.00 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सामान्य रोख पुस्तकापेक्षा पासबुकात र.रु. 39,327/- जास्त आढळते लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार सक्षम अधिकारी यांनी पासबुकाशी मेळ न घेताच सामान्य रोख पुस्तक बंद केले आहे.

लेखा संहिता नियम 32 व 51 नुसार सक्षम अधिकारी यांनी मेळ न घेताच 31 मार्च अखेर सामान्य रोख पुस्तक बंद केले आहे. त्यामुळे रक्कमेत तफावत आहे.

न वटलेल्या धनादेशाचा तपशील सामान्य रोख पुस्तकात मार्च 12 अखेर नमुद केला नाही. न वटलेले धनादेश व रद्द केलेले धनादेश यांचा दरमहा अखेर व वर्षाच्या आखेरीस तपशीलवार गोषवारा काढला नाही.

फरक र.रु. 39,327/- ची नमुना नं. 13 ची चलने लेखा परिक्षणास दाखविली नाही. लेखा संहिता नियम 1971 चे 35(1) प्रमाणे चलने तयार करुन संबंधीत खात्याने सादर केल्या शिवाय रक्कम भरता येत नाही. बँक खात्यावर रक्कम भरली आहे. व सामान्य रोख पुस्तकात चलने आली नाहीत म्हणून नोंदविली नाहीत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 33(2) 65,70(2), 73(5), 78(3), 97(5) व 107 नुसार कार्यवाही केली नाही. अर्धसमास पत्रास दिलेले उत्तर संयुक्तिक नाही. तसेच उत्तराप्रमाणे कागदपत्रे दाखविले नाहीत.

## *41 सामान्य रोख (सुरक्षा अनामत) पुस्तक व बँक पासबुक मधील तफावती बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9ब*

***नगरपपालिका लेखा संहिता 1971 नियम 32 नुसार बँकेच्या खात्यावर जमा झालेली रक्कम त्याच तारखेस सामान्य रोख पुस्तकात नोंदविली नाही. त्यामुळे र.रु. 1,12,94,231.79/- ची तफावत सामान्य रोख पुस्तक व पासबुकात आहे.***

युनियन बँक ऑफ इंडीया खाते क्र. 424202010502708 मध्ये अनामतीच्या रकमा ठेवल्या आहेत. दिनांक 31/3/2012 अखेरची स्थिती.

रोकड वही शिल्लक रु. 2,07,37,480.54/-

पासबुक शिल्लक रु. 3,40,50,991.48/-

तफावत रु. 1,33,13,510.94/-

लेखा संहिता 1971 नियम 32 व 51(1) नुसार बँक पासबुकाशी मेळ घेवून रोकड वहीत नोंदी करावयाच्या आहेत. त्याप्रमाणे मेळ घेणेत आलेला नाही.

लेखा संहिता 1971 नियम 32(2) व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे फॉर्म जनरल 1 चे टिप नुसार रोकड वही संबंधित अधिकारयाच्या स्वाक्षरीने बंद करणे आवश्यक असता दिनांक 25/10/2011 पासून दि. 31/3/2012 पर्यत सक्षम अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी रोकड पुस्तकावर नाही. दि. 07/12/2012 पर्यत सुमारे 13 महिने अंत्यत महत्वाच्या अशा सामान्य रोख पुस्तकावर ते बंद करुन स्वाक्षरी केली नाही.

वसंतदादा सह. बँकेत रु. 2,16,90,000/- गुंतवणूक केली आहे. व याच बँकेत बचत खाते क्र. 420 वर रु. 6,37,056/- शिल्लक आहेत. बँकेने दिलेल्या माहितीप्रमाणे या खाते वरील व्याजासह रक्कम रु.2,40,19,462/- झाली आहे. सदर बँकेत नियमबाह्यरित्या रक्कम गुंतविलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

र.रु.1,12,94,231.79/- पासबुकात बँकेत जमा केली परंतु संबंधीत खात्याकडून चलन न आल्याने सामान्य रोख पुस्तकात नोंदविले नाही. त्यामुळे मार्च अखेर सामान्य रोख पुस्तकातील शिल्लकेत एवढी रक्कम कमी आहे. नगरपालिका संहिता 1971 नियम 35(1) नुसार कार्यवाही झाली नाही. अर्धसमास पत्रातील उत्तर संयुक्तिक नाही.

## 42 सामान्य रोख पुस्तक (जनरल फंड) व बँक पासबुक यांचेमधील तफावती बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***1) एकाच लेख्यासाठी नियमबाह्यरित्या एकापेक्षा जास्त खाती ठेवणेत आली आहेत.2) र.रु. 66,240.53/- रोखपुस्तकाशी जुळत नाही. तफावत आहे.3) कॅशबुक पासबुकात र.रु. 3,10,66,098.50/- व र.रु. 68,86,461.25/- ची तफावत आहे.4) सन 2010-11 या वर्षात रु. 1,54,17,739.05/- व सन 2011-12 या आर्थिक रु. 5,68,09,888.95/- एवढी रक्कम लेख्या बाहेर ठेवली आहे.***

जनरल फंड युनियन बँकखाते क्र. 42420101093245 या व्यतिरीक्त या जनरल फंडाशी सलंग्न खाती युनियन बँक खाते क्र. 470002010509946, सारस्वत बँक खाते क्र. 165100100001181 युनियन बॅकेतील जकातीचे खाते क्र. 424202010502707 घरपट्टीसाठी सारस्वत बँकेतील खाते क्र. 165100100001180 या चार खात्यावरची रक्कम जनरल फंडात जमा होते. अन्य खात्यावरची रक्कम ही लेखा संहिता 1971 नियम क्र. 32 प्रमाणे एकाच अधिकृत खात्यात जमा होत नाही. तसेच जनरल फंड या एकाच खात्यासाठी आणखी चार खाती ठेवणेत आली आहेत. त्यांचे परवानगीची कागदपत्रे व नस्ती लेखा परिक्षणात दाखविल्या नाहीत.

इतर चार खातेवरील अखेरच्या शिलके व्यतिरीक्त केवळ जनरल फंडाचे मुख्य बँक खाते क्र. 42420101093245 बरोबर कॅशबुकाचा मार्च 12 अखेर मेळ घेतला असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| रोख पुस्तक शिल्लक | रु. 19,16,17,168.76/- |
| न वटलेले धनादेश | रु. 1,23,39,156.00/- |
| चलन न आलेने पासबुकात नोंद झाली परंतु रोख पुस्तकात नोंद नाही. | रु. 3,10,66,098.50/- |
| | रु. 33,50,22,423.26/- |
| पासबुक शिल्लक रुपये | रु. 32,81,35,962.01/- |
| फरक रुपये | रु. 68,86,461.25/- |

सामान्य रोख पुस्तकापेक्षा बँक पासबुकात रु. 68,86,461.25/- कमी आहेत. याबाबत स्पष्टता झाली नाही.

बँक पासबुकात र.रु. 3,10,66,098.50 आहेत. परंतु चलने आलेली नाहीत. म्हणून ती रक्कम सामान्य

रोख पुस्तकात नोंदविली नाही. असे सामान्य रोख पुस्तकाच्या गोषवाऱ्यात नमुद आहे. कोणत्या खात्याने वेळीच चलने दिली नाहीत त्याची यादी लेखा परिक्षणास दिली नाही.

सामान्य रोख पुसतकात र.रु. 66240.53 अद्याप जूळत नाहीत असे नोंद आहे. लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल 5.33 (इ) प्रमाणे दर महिन्याचे शेवटी बँक ताळमेळ घेणेत आला नसलेचे स्पष्ट होते.

लेखा परिक्षण तारखेपर्यत मार्च 12 अखेरच्या गोषवाऱ्यावर मुख्यलेखाधिकारी यांची सही नाही. यावरुन लेखा संहिता 1971 चे नियम 51(1) प्रमाणे मेळ घेण्याची कार्यवाही झाली नाही.

जनरल फंड मुख्य खात्या व्यतिरीक्त इतर चार खात्यावर रक्कम जमा होतात. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| संक्षिप्त खाते क. | 1/3/2011 रोजी अखेरची शि.रु. | 31/3/2012 ची अखेरची शि. रु. |
|---|---|---|
| 9946 | 87243.69/- | 99016.69/- |
| 1181 | 605214.23/- | 628779.41/- |
| 1180 | 13832807.16 | 7353064.55 |
| 2767 | 892473.97/- | 48729028.30 |
| एकूण | 15417739.05/- | 56809888.95/- |

दि. 31/3/2011 रोजी उपरोक्त 4 खात्यावर रु. 1,54,17,739/- शिल्लक असून ती सामान्य रोकडवहीवर घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही. त्यामुळे सन 2010-11 चे वार्षिक लेख्याबाहेर ही रक्कम राहिल्याचे दिसून येते. तसेच दि. 31/3/12 रोजी संबंधीत इतर 4 बँक पासबुकावर असलेली शिल्लक र.रु. 5,68,09,888.95/- दि. 31/3/12 रोजी सामान्य रोकडवहीत नोंदविणे आवश्यक असता ती नोंद घेतली नसल्याने लेखा सहिता 1971 नियम 51(1) प्रमाणे सर्वसाधारण रोकडवहीतील लेखे रोजच्यारोज बंद करुन समतोलीत केले नसलेचे स्पष्ट होते.

किमान मार्च अखेर तरी पूर्ण रक्कम मुख्य खात्यावर वर्ग करुन मेळ घेवून सामान्य रोख पुस्तक बंद करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झालेली नाही. लेखा संहिता नियम 32(2) नुसार कार्यवाही झाली नाही.

मनपाकडून मार्चमध्ये खास मोहिम राबवून वसूली केली जाते. मुख्य खात्यावर दि. 3/4/12 ते 16/4/12 या कालावधीत पुढील आर्थिक वर्षात 2012-13 ला जमा झालेल्या रक्कमा मागील आर्थिक वर्षात मार्च 12 अखेर सामान्य रोख पुस्तकात रु. 1,18,18,361/- जमा केले आहेत. मात्र मोहिम न राबविता मार्च 12 अखेर जमा झालेली र.रु. 5,68,09,888.95 मार्च अखेर लेख्या बाहेर ठेवली आहेत. तसेच सदर रक्कमेचा समावेश वर्षा अखेरीच्या वित्तीय विवरणपत्रातही करण्यात आलेला नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अर्ध समास पत्राचे उत्तर दिले नाही.

## *43 सामान्य रोख पुस्तक व पासबुकातील (दलित वस्ती) रक्कमेत तफावती बाबत.*

**दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग, राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***दलित वस्ती सुधार योजनेच्या खात्यावर रक्कम रु.14,11,147/- जमा नसताना सामान्य रोख पुस्तकावर एवढी रक्कम जमा दाखवून त्यातुन रक्कम रु. 4,34,940/- नियमबाह्य खर्च केला आहे.वसंतदादा शेतकरी सह. बँकेच्या खात्यावरील र.रु.21859.19 व गुंतवणूकीची रक्कम 30,00,000/- परत मिळाली नाही. ती वसूल करणे आलेली नाही.***

लेखा विभागाचे लेखा परिक्षण करीत असताना दलित वस्ती सुधार योजनेचे बँक पासबुक व सामान्य रोख पुस्तकाचा 31 मार्च 2012 अखेरचा मेळ खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सामान्य रोख पुस्तक अ.शि. 97207 | |
| न वटलेले धनादेश | 1681135/- |
| | 2657342/- |
| पासबुक शिल्लक | 1246140/- |
| फरक | 1411202/- |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मार्च 12 अखेर बॅक खाते क्र. 20050040829 वर सामान्य रोख पुस्तकातील जमेपेक्षा 14,11,202/- रक्कम कमी आहे.

गुंतवणूकीची पावती र.रु. 14,05,507/- व व्याज रु. 5640/- अशी एकूण र.रु. 14,11,147/- बॅक खात्यावर प्रत्यक्ष दि. 11/4/2012 रोजी जमा झाले आहेत. असे असताना मार्च 12 अखेर सामान्य रोख पुस्तकात जमा दाखवून व त्या खात्यावर रक्कम नसताना र.रु. 4,34,940/- एवढा जास्त खर्च मार्च 12 अखेर केला आहे. खात्यावर रक्कम नसताना नियमबाह्यरित्या खर्च केला आहे ही बाब गंभीर आहे.

या खात्यावरील रक्कमेतून शेतकरी बँकेत र.रु. 30,00,000/- गुंतलेले आहेत. तसेच शेतकरी बँकेच्या खात्यावर त्यावेळी र.रु. 21,859.19/- शिल्लक राहिली आहे. या दोन्ही रक्कमा मनपाला अद्यापही मिळाल्या नाहीत. या दोन्ही रक्कमावर ठेवीच्या व्याज दराने व्याजाची गणना करुन व्याजासह सर्व रक्कम वसूली करावी.

मनपा लेखा संहिता 1971 चे कलम 51(3) व नॅशनल म्युनिसिपल अकौंट मॅन्युअल चे नियम 30.5 नुसार न वटलेले धनादेश र.रु. 16,81,135/- चा तपशील मार्च 12 अखेर नोंदविला नाही. यातील अद्यापही न

वटलेले व रद्द झालेले धनादेश किती व कोणते याचा तपशील लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.
लेखापरीक्षणावेळी दि. 31/12/11 ते 11/7/2012 पर्यंत सुमारे 7 महिने मुख्यलेखाधिकारी यांनी सामान्य रोख पुस्तकावर सह्या केल्या नाहीत. यावरुन सामान्य रोख पुस्तक पडताळले जात नाही असे लेखा परिक्षणास आढळले आहे. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 32 व 51 नुसार सर्वसाधारण रोकड वहीतील लेखे वेळीच बंद केली नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर विहित कार्यपध्दतीत व नियमानुसार नाही.

## 44 भ्रमणध्वनी मनोरे (मोबाईल टॉवर) ची दंडात्मक व नुतनीकरण फी वसुल केली नसले बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगररचना,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 16875000.00 रु.,

***मनपा हद्दीत विविध मोबाईल कंपन्यांनी इमारतींच्या छतावर अनाधिकृत टॉवर्स् उभे केलेले आहेत. परंतु महासभेच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे अनाधिकृत टॉवर्स् साठी ठरविलेली दंडात्मक व विकास शुल्क वसुल करणेत आलेली नाही.***

महासभा ठराव क्र. 41 दिनांक 19.05.2011 नुसार खालील प्रमाणे अटी नमुद केलेल्या आहेत.
विना परवाना टॉवर्स् साठी प्रत्यकी रुपये 1 लाख शुल्क वसुल करावे.
नवीन टॉवर अद्याप ज्यांनी कनेक्शन जोडलेले नाही अशा टॉवर्स् ना रुपये 25000/- फक्त विकास

आकार वसुल करावा.

नुतनीकरण फी पाच वर्षांची एकत्रित रुपये 25000/- घेणेत यावी.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

नगररचना विभागाने लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेल्या परिशिष्ठ क्रमांक ( 04 ) मध्ये नमुद एकूण 135 टॉवर्सना महानगरपालिकेची परवानगी घेतली नसलेचे स्पष्ट होते.

सदर विनापरवाना मोबाईल टॉवर्स् कधी पासून चालू आहेत. याबाबत मालकाशी केलेल्या भाडे कराराची प्रमाणीत प्रत लेखापरीक्षणास दाखविणेत आलेल्या नाहीत. त्यामुळे टॉवर्स् ची नुतनीकरण शुल्क रुपये 5000/- प्रती वर्ष याप्रमाणे कोणत्या वर्षापासून घेण्यात यावे ते समजून येत नाही.

एकूण विनापरवाना प्रत्येक टॉवर्सला रुपये 1 लाख परवाना शुल्क व पाच वर्षाची नुतनीकरण फी रुपये 25000/- प्रमाणे एकूण रुपये 125000/- x 135 टॉवर्स = रुपये 16875000/- + विकास शुल्क प्रमाणे वसुल करण्यात यावे.

नगररचना विभागाने महासभा ठराव व महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम 1966 चे नियम 52 व 53 नुसार संबंधीत टॉवर्सचे मालमत्ता धारकावर कारवाई न केलेने मनपास रुपये 16875000 + विकास शुल्काचे महसूलास मुकावे लागले आहे.

DATRMJM6101 (Ref No : 27)

## *45 इमारतीचा वापर मंजुर नकाशाप्रमाणे न करता वापरामध्ये बदल केल्याने दंडात्मक रक्कम 18 % व्याजासह वसुल केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगररचना,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 1907798.00 रु.,

***इमारतीमधील वापर हा मंजूर नकाशाप्रमाणे न करता त्यामध्ये बदल केल्याने सदर इमारतीचे विकसनकर्ते मे. शिव कन्स्ट्रक्शनस् तर्फे भागीदार श्री. राजेश गंगवानी व इतर यांच्यावर दंडात्मक कारवाई प्रमाणे दंड वसुल करणेत आलेला नाही.***

सांगली सि.स.नं. 404/3 या मिळकतीवर बांधकाम परवाना क्रमांक 18, दि.8/7/2008 ने इमारत बांधली आहे. परंतू इमारतीचा वापर हा मंजुर नकाशाप्रमाणे न करता त्यामध्ये बदल केल्याने ( रहीवास परवानगी असताना वाणिज्यिक वापर केला आहे.) सदर इमारतीचे विकसनकर्ते मे. शिव कन्स्ट्रक्शन्स् तर्फे भागीदार श्री. राजेश गंगवाणी यांना दंडात्मक कारवाईबाबत नोटीसा बजावल्या आहेत.

महासभा ठराव क्रं. 127, दि.20/10/2010 मधील हार्डशिप धोरणानुसार दंडात्मक शुल्क आकारणी करुन विषयांकित इमारतीचा वापर बदल अनुज्ञेय करणे योग्य होणार असल्याचे दि. 6/1/2011 च्या कार्यालयीन टिप्पणी नमुद केले आहे. त्यानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तद्नंतर नोटीस क्रं. 2448, जा.क्रं. बांध/विशु/442/12-13, दि. 4/4/2012 अन्वये मे. शिव कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागीदार श्री. राजेश लखमीचंद गंगवाणी यांना दंडात्मक शुल्क 28,51,424/- तात्काळ भरणेबाबत कळविले आहे. तसेच रक्कम विहित मुदतीत जमा न केल्यास 18 % दराने व्याज आकारणी करण्यात येईल असेही कळविले आहे. परंतु अद्याप संपूर्ण रक्कम संबंधिताने पालिकेकडे जमा न केल्याचे निदर्शनास आले आहे.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तरात एकूण दंडात्मक शुल्क रक्कम रु. 28,51,424/- पैकी रु. 11,70,544/- पालिकेकडे जमा झाल्याचे व उर्वरित रक्कम रु. 16,80,880/- वसुल होणे अपेक्षित असल्याचे नमुद केले आहे. परंतु 18% व्याजाची आकारणी / वसुली केलेली नाही. याबाबत कोणताही खुलासा करण्यात आला नाही.

वसुल केलेल्या रक्कम रु. 11,70,544/- या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| अ.क्रं. | सदनिके मधील युनिट क्रं. | दंडात्मक शुल्क रक्कम | जमा पावती क्रंमांक | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | एस. 9,10,11 | 6,13,625/- | 6803672 | 30/05/2012 | 6,13,625/- |
| 2 | एफ टी 1 ते 9 | 3,36,375/- | 6803673 | 30/05/2012 | 3,36,375/- |
| 3 | बी.1 ते बी 3, टी 9 | 52,233/- | 6803674 | 30/05/2012 | 52,233/- |
| 4 | पी. 5 ते एफ 6 | 50,000/- | 6803675 | 30/05/2012 | 50,000/- |
| 5 | बी 5 | 84,775/- | 6804036 | 20/06/2012 | 84,775/- |
| 6 | एफ 3 ए, एफ 4 ए | 33,536/- | 6804081 | 03/07/2012 | 33,536/- |
| | एकूण | 11,70,544/- | | | 11,70,544/- |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सादर केलेल्या तपशीलामध्ये पावती क्रमांक 6803675, दि. 30/052012 रक्कम रु. 50,000/- ची पावती तपासणीकरीता उपलब्ध झाली नाही.

पावती क्रंमांक 6804180, दि. 3/7/2012 रक्कम रु. 33,536/- च्या पावतीमध्ये चेक वटल्याची तारीख नाही.तसेच रक्कमा कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा आहेत ते सादर केले नाही.

अर्धसमास पत्रामध्ये उर्वरित वसुली करणेत येत आहे असे नमुद आहे. परंतु वसुली करणेत आलेली नाही. त्यामुळे रु.16,80,880/- अधिक त्यावर 18% व्याज (मे 2012 ते जाने 2013 = 9 महिन्यासाठी ) रु.2,26,918/- असे एकूण रु.19,07,798/- वसुलपात्र आहे.

सदर दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 42 अन्वये

जप्तीची नोटीस देणे आवश्यक आहे. व कलम 45 अन्वये ती स्थावर मालमत्ता जप्त करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

DATRMJM6101 (Ref No : 32)

## *46 पावती पुस्तकांचा वापर न केलेने खरेदी व छपाई खर्च वाया गेलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 37259.00 रु.,

***पावती पुस्तकांचा वापर न केलेने खरेदी व छापाई खर्च वाया गेलेचे दिसून येते.***

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 367 | 10/5/2011 | 37,259/- |

सां.मि.कु.मनपा कडील जकात विभागातील मार्गस्थ (ESCORT) पुस्तकांची साठा नोंदवही पडताळणी करता र.रु. 10/- व 25/- दर्शनी मुल्य असणारी अनुक्रमे 160 व 700 पुस्तके शिल्लक असलेचे दिसते. जकात दरसुधार समिती ठ.क्रं. 34/ दि. 25/10/2010 व महासभा ठराव क्रं. 178 दि. 20/12/2010, तसेच महा. शासन नि.क्र. सांमपा 3011/342/प्र.क्र.120/नवि-22 मंत्रालय मुंबई दि. 31/03/2011 समक्रमांक शा.नि.दि. 13/04/2011 चे शुध्दीपत्रकानुसार मार्गस्थ (ESCORT) रक्कमेत रु. 10/- व 25/- ऐवजी 50/- व 100/- अशी वाढ झालेली आहे.

परंतु जकात विभागाने सदर निर्णया नंतर जुन्या ठरावा प्रमाणेच छपाईचा आदेश दिला असून, त्याचे देयक दिनांक 10.05.2011 रोजी दिले असलेने र.रु. 10/- दर्शनीमुल्याची शिल्लक पुस्तके 160 x 10 x 100 = 160000 व रु. 25/- ची 1700 x 25 x 100 = 42,50,000/- या दर्शनी मुल्यांसह (160000 + 4250000) = रु.4410000/- दर्शनी मुल्य किंमतीचे पावत्यावरील छपाई खर्च रु. 37259/- वाया गेला आहे.

वरील प्रमाणे दरसुधार समिती, महासभा ठराव, शासन निर्णयानुसार मार्गस्थ फी मध्ये वाढ झालेली असताना छपाई खर्च 37259/- पावती पुस्तके छपाई आदेश देणाऱ्याकडून वसुल करणेत यावा.

DATASJF7201 (Ref No : 114)

## *47 जकातीच्या चालू खातेधारकाकडून जकात ठेव व नुतनीकरण फी घेतली नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 33618817.00 रु.,

***जकातीच्या चालू खातेधारकाकडून जकात ठेव व नुतनीकरण फी घेतली नसलेने ती व्याजासहीत वसुल करणेत यावी.***

सां.मि.कु. मनपा कडील जकात विभागाकडील जमा पावती पुस्तकांची पडताळणी करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8, कराधान नियम नि.क्र.28 तसेच स्थायी समिति ठराव क्रं. 688 दि. 26/02/03 नुसार सोबतच्या चालू खाते धारकांनी प्रत्येक वर्षी नुतनीकरण फी रु. 3000/- व तीन महिन्याच्या जकाती इतकी रक्कम अनामत सदरी बिन व्याजी ठेवणे बंधनकारक आहे.
सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक ( 05 ) मधील चालू खाते धारकांनी दि. 05/02/99 ते 06/02/08 या कालावधीमध्ये चालू खाते घेतलेचे दिसते. परंतु दि. 26/02/03 च्या ठरावानुसार संबंधीतांनी दरवर्षी नुतनीकरण फी रु. 3000/- प्रमाणे भरलेली नाही. त्यामुळे सन 2003 पासून 23 चालू खाते धारकांची 9 वर्षाची नुतनीकरण फी 23 x 9 x 3000 = रक्कम रुपये 6,21,000/- वसुल करणेत यावी.
तसेच उपरोक्त स्थायी सभा ठरावानुसार सोबतच्या यादीतील चालू खाते धारकांची तीन महिन्याच्या जकातीइतकी रक्कम रुपये 3,87,28,485/- ठेव म्हणून घेणे आवश्यक असता रुपये 1,10,61,361/- घेतली असलेने, उर्वरित रुपये 2,76,67,124/- वसुल करेणेत यावी. तसेच सन 2003 पासून प्रती वर्षी 10% व्याजाप्रमाणे 9 वर्षाचे व्याज रुपये 59,30,693/- असे एकूण रक्कम रुपये 3,29,97,817/- + 621000 = 33618817/- संबंधीताकडून वसुल करणेत यावेत.
जकात विभागाने केलेल्या दुर्लक्षामुळे सदर रक्कम वेळोवेळी वसुल झाली नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेचे दिसून येते.

DATASJF7201 (Ref No : 30)

## *48 जिल्हा उदयोग केंद्राच्या मान्यतेशिवाय जकातीमध्ये 50% सवलत दिलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 2597064.00 रु.,

***जिल्हा उदयोग केंद्राच्या मान्यतेने जकातीमध्ये 50% सवलत दिले बाबतची कागदपत्रे नसताना जकातीमध्ये उद्योगांना सवलत दिलेने मनपाचे रुपये.2597064/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

सां.मि.कु. मनपा, जकात विभागाने अहवाल काळात जकात जमा करणेकामी वापरलेली 7960 पावती पुस्तकांपैकी 462 पावती पुस्तके तपासता कांही आयातकांना जकातीत 50% सवलत दिलेचे दिसून येते.

याबाबत नगरविकास, विभाग शां.नि.क्रं.एस.एम.सी. 10-2004/ प्र.क्र.171/नवि-24 दि.16/05/05 तसेच न.वि.वि. शा.न.क्रं. सांमपा/3006/1089/प्र.क्र.191/06/ नवि-22 दि. 27/06/06 नुसार सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक ( 06 ) मधील लाभधारक हे ट्रेडिंगचा व्यवसाय करणारे तसेच त्यांची खालीलप्रमाणे नोंदणी झालेली कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

जिल्हा उदयोग केंद्राकडे नोंदणी

एस.एस.आय. खाली रजिस्ट्रेशन नोंदणी

एस.एस.एफ.आय. खाली नोंदणी

याशिवाय दि. 16/09/2005 च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात आदेशित केल्या नुसार उदयोजकांनी जिल्हा उदयोग केंद्राकडून त्यांचेकडे आवक होणाऱ्या कच्च्या मालाच्या साहित्याची प्रामाणित यादी सादर केल्यावरच त्यांना जकात माफी देणेची आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 105 दि. 11/02/2013 ने अशा सवलत धारकांची जिल्हा उदयोग केंद्राकडील प्रामाणित यादी मागविली असता ती लेखापरीक्षण कालावधीत देणेत आलेली नाही.

त्यामुळे जकात विभागाने दिलेली सवलत लेखा परिक्षणास मान्य करता येत नाही. सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक (06) नुसार 50% सवलत दिलेची रक्कम रु. 25,97,064/- संबंधीताकडून वसुल करणेत यावी. सदरची बाब चाचणी लेखा परिक्षण केलेल्या 462 पुस्तकामधील पावत्या तपासले असता दिसून आलेली आहे.

## *49 मालमत्तांचे पुन:सर्वेक्षण व भाडेमुल्य दर निश्चित करणेचे कामास विलंब लागलेने झालेले आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 753200000.00 रु.

***महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे पुन:सर्वेक्षण व भाडेमुल्याचे दर ठरविणेचे काम सन 2001-02 मध्ये सुरु होऊन सन 2009-10 पासून नवीन दराने कर आकारणी लागू केलेली आहे. कामामध्ये 10 वर्षाची अक्षम्य दिरंगाई झालेने महानगरपालिकेस कोट्यावधी रुपयाचे महसुलास मुकावे लागले आहे.***

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 21(2) अन्वये दर चार वर्षांनी एकदातरी नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. व आयुक्तास कराधान नियम 20 अन्वये आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षात कोणत्याही वेळी अन्य कोणतीही माहिती मिळाल्यावर त्या आकारणी पुस्तकात (क) अन्वये कोणत्याही करयोग्य मुल्याची (किंवा यथास्थिती भांडवली मुल्याची) आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करुन सुधारणा करता येते.

मनपाचे सन 11-12 चे लेखापरीक्षण केले असता सुधारित करनिर्धारण सन 09-10 मध्ये केलेचे दिसून आले. करनिर्धारण व संकलन विभाग क्रं.मनपा/करवि/10/दि.1/2001-02 दि.12/11/01 चे कार्यालयीन अहवालाचे अवलोकन केले असता सांगली मिरज कुपवाड मनपा हद्दीतील मालमत्तांचे पुन:सर्वेक्षण व भाडेमुल्याचे दर ठरविणेस सन 2001-02 मध्ये मान्यता झाली आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

टी 15 वरील टिपणीमध्ये सन 2001-02 ऐवजी सन 2003-04 या आर्थिक वर्षात पूनसर्वेक्षण करणेबाबतचे टिपणीस आयुक्त यांची दि.28/4/2003 रोजी मान्यता झाली आहे. तसेच क्रं.मनपा/करवि/10/1075/2007-08 पा.नं.टी-19 करनिर्धारण व संकलन विभाग दि.18/1/08 चे कार्यालयीन टिपणीमध्ये सन 2001-02 मध्ये तयार करणेत आलेल्या भाडेमुल्याचे दरपत्रकास सन 2002-03 मध्ये आयुक्तांनी दोन वर्ष विलंबाने मान्यता दिली आहे. म्हणजेच प्रत्यक्षात पुनसर्वेक्षणास व भाडेमुल्य दरपत्रकास मंजुरी देणेचे कामास विलंब लागलेने दोन वर्षाचा कालावधी गेलेच दिसून येते. मंजुर भाडेमुल्य दरपत्रकानुसार प्रथम सन 2004-05 मध्ये कुपवाड, सन 06-07 मध्ये मिरज उपविभाग व 2007-08 मध्ये सांगली विभागाचे पून:सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करणेत आले आहे. अर्धसमास पत्रास

दिलेल्या उत्तरामध्ये अपुरा स्टाफ, सन 2005 साली आलेला पुर व सन 08-09 मधील महानगरपालिका निवडणुक या कारणामुळे सर्व्हेक्षणास विलंब लागलेचे नमुद केले आहे. घरपट्टी ही महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असलेने व दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेचे नियोजन न केलेने महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावरील महसुलास मुकावे लागले आहे.

कार्यालयीन टिपणी टी-29 मुद्दा क्र.4 मध्ये सांगली व मिरज या दोन्ही विभागासाठी सन 07-08 मध्ये अंतिम बिले देणेबाबत सूचित केले आहे. त्यास आयुक्त कार्यालय दाखल तारीख 18 जाने 2008 क्रं.2386 ते दि.28/1/2008 रोजी मान्यता दिली आहे. पुन्हा टी-43 वरील आयुक्त दा.ता.17 मार्च 2009 व क्रं.1785 ने आयुक्त यांनी दि.19/03/2009 रोजी सन 09-10 पासून पुनर्मुल्यांकन मालमत्ता कर आकरणीस सांगली, मिरज साठी मान्यता दिली आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये विलंबाची कारणे देणेत आलेली नाही.

पत्रास दिलेल्या उत्तरामधील मुद्दा क्र.6 मध्ये दि.28/04/2003 रोजी पुनर्मुल्यांकनासाठी व नवीन बांधकामाच्या नोंदी करीता दर मंजुर केलेचे नमुद आहे. परंतु मुद्दा क्र.8 मध्ये सन 1998-99 पासूनचे नवीन दर नवीन मिळकतींना लागू केले असून तेच दर पुनर्मुल्यांकन व सांगली, मिरज व कुपवाड साठी लागु करणेत आले आहेत. त्यामुळे आर्थिक नुकसान झालेले नाही तसेच दर ठरविताना पुढील 20 वर्षाचा विचार केला आहे असे नमुद आहे. पुनर्मुल्यांकन व नवीन बांधकामाचे दर दि.28/4/2003 रोजी मंजुर करणेत आलेने सन 1998-99 मध्ये आणखी कोणते दर मंजुर करणेत आले त्या बाबतची कोणतीही कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाहीत. तसेच पूनर्मुल्यांकन दर 4 वर्षांनी होत असलेने करनिर्धारक यांनी 20 वर्षाचा विचार करुन दर ठरविलेचे उत्तर वित्तीय औचित्याचा भंग करणारे व नागरिकांवर अनावश्यक रित्या जादा करांचा बोजा टाकणारे आहे.

प्रस्तावित नस्ती नुसार सन 2003-04 पासून पुनर्मुल्यांकन व करनिर्धारण दर पूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु होणे आवश्यक असता कुपवाड साठी 2004-05 पासुन व सांगली मिरजसाठी सन 09-10 पासुन नवीन दर लागु केलेने महानगरपालिकेचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

सांगली, मिरज , कुपवाड महानगरपालिका सन 1998 मध्ये स्थापन झालेनंतर सन 2001 मध्ये आयुक्तांनी अधिनियम 1949 चे प्रकरण 2 कराधान नियम 2 (क) नुसार आकारणी पुस्तकात करयोग्य मुल्याची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करुन आकारणी पुस्तकात सुधारणा करणेचे ठरविले आहे. त्यासाठी 03-04 मध्ये दर ठरविणेत आले असून त्यावर्षापासून दर लागु करणे आवश्यक असताना प्रत्यक्ष अंमलबजावणी सन 09-10 या आर्थक वर्षात म्हणजेच सुमारे 07 वर्षांनंतर केली.

उपरोक्त नस्तीमध्ये पान क्रं.154 वरील टी-27 वर सांगली व मिरज या दोन्ही विभागासाठी सदर दर लागू केलेमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये दर वर्षी 10.76 कोटी रुपयांची भर पडणार आहे, असे नमुद आहे. महानगरपालिकेने 7 वर्षानंतर नवीन दर लागु केलेने 7 वर्ष x 10.76 कोटी रु = एकूण 75.32 कोटींचे महसुलापासून वंचित रहावे लागलेचे स्पष्ट होते.

अधिनियम 1949 मधील अनुसुची ड प्रकरण 8 कराधान नियम 21 (2) नुसार दर चार वर्षांनी नियमितपणे नवीन कर आकरणी पुस्तक केले नसलेने 2001-02 ते 2009-10 या कालावधीत दोन वेळा पुन:सर्वेक्षण हाऊन आकारणी पुस्तकात सुधारणा झाली असती परंतु त्या प्रमाणे कार्यवाही न झाल्याने वाढीव महसुलाचा लाभा मनपास झाला नसलेचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 18)

## *50 घरपट्टी बिलाच्या वसुल न झालेल्या रक्कमेवर शास्तीची रक्कम आकारली नसलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 36436370.00 रु.,

***अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 41 अन्वये बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर शास्ती आकारणी आवश्यक असता ती आकारण्यात आलेली नाही. घरपट्टीची थकबाकी रुपये 202424281/- असलेने नियम 41 नुसार महिन्याला 2 % प्रमाणे 9 महिन्यासाठी 18% प्रमाणे रुपेय 36436370/- ची शास्ती वसुल न केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

घरपट्टी विभागाने घरपट्टीची बिले विलंबाने वाटलेली आहेत. तसेच थकबाकीवरील शास्तीची रक्कम

वसुल केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 30 नुसार मालमत्ता कर प्रत्येक वर्षी 1 एप्रील व 1 ऑक्टोंबर रोजी याप्रमाणे साहामाही हप्त्याने आगाऊ भरणे आवश्यक आहे. परंतु घरपट्टी बिले विलंबाने देणेत आली असलेने मनपास घरपट्टीची रक्कम वेळेत न मिळालेने त्याचा विकास कामावर परिणाम झालेचे स्पष्ट होते.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 39 (1) नुसार मालमत्ता कर किंवा वहाने, नावा व जनावरे या वरील कर किंवा ज्या कराच्याबाबतीत तो मालमत्ता कर वसुल करण्यासाठी तरतुद केलेल्या रितीने वसुल करता येईल, असे या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेंव्हा, आयुक्तांनी फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहिजे. असे असताना घरपट्टीची बिले वेळेत देणे आवश्यक असता ती माहे डिसेंबर 2011 मध्ये विलंबाने देणेत आलेली आहेत.

घरपट्टी बिले 9 महिने विलंबाने वाटप केलेने व त्यानंतर बिलांची वसुली केलेने करनिर्धारण विभागाच्या वसुली आस्थापनेवर केलेला खर्च वाया गेलेचे स्पष्ट होते. घरपट्टी विभागाच्या वसुली कर्मचाऱ्यांच्या दैनंदिनी डायऱ्या लेखाप रिक्षणास दाखविलेल्या नाहीत. त्यांनी केलेल्या कामाच्या दैनंदिनी डायऱ्या लिहुन त्या मंजूर झाले नंतरच त्यांचे वेतन देणे आवश्यक असता त्यांची दैनंदिनी मंजूर नसताना त्यांचे वेतन दिलेचे स्पष्ट होते.

अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 41 अन्वये बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर शास्ती आकारणी आवश्यक असता ती आकारण्यात आलेली नाही. मत्ता व दायित्व विवरणपत्राप्रमाणे घरपट्टीची थकबाकी रुपये 202424281/- असलेने नियम 41 (1) नुसार उपरोक्त प्रमाणे दिलेली असेल अशा बिला मध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांका पासून तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे दुसऱ्या सहा माही कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबर पर्यंत भरावयाची असेल, आणि जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे आवश्यक असल्या प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रक्कमेचा भाग या व्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांका पर्यंत असा कर भरावयाचा होता त्या शेवटच्या दिनांका नंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या 2% इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देई पर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील. त्यानुसार महिन्याला 2 % प्रमाणे 9 महिन्यासाठी 18% प्रमाणे रुपये 36436370/- ची शास्ती वसुल न केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

सदर थकबाकीच्या कार्यपध्दती व शास्तीची रक्कम या बाबतचे नियम मागणी बिलामध्ये नोंदणे

आवश्यक असता सदर बाबींचा देयकामध्ये समावेश केलेला नसलेने नियमाबाबत नागरीक अनभिज्ञ असलेचे दिसून येते.

घरपट्टी वेळेत वसुल होणेसाठी नियमाप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित असता त्यानुसार वेळेत बिले पाठविणे, वेळेत बिले न भरलेस त्यावर शास्ती आकरणेची कार्यवाही केली नसलने घरपट्टी थकबाकीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 29)

## *51 घरपट्टी करनिर्धारण चुकीचे केलेने करावयाच्या वसुली बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 2213879.00 रु.,

***कर निर्धारण प्रपत्रामध्ये करनिर्धारण मुंबई प्रांतिक अधिनियम कलम 150 (अ) व कलम 267 (अ) प्रमाणे केले नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेल आहे.***

घरपट्टी विभागाने मालमत्ता धारकांच्या कर निर्धारण केलेल्या कर निर्धारण प्रपत्रांचे लेखा परिक्षण केले असता, करनिर्धारण मुंबई प्रांतिक अधिनियम कलम 150 (अ) व कलम 267 (अ) प्रमाणे केले नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

घरपट्टी विभागाने करनिर्धारण करताना ज्या मालमत्ता धारकांनी मनपाची परवानगी न घेता इमारतींचे बांधकाम केले आहे. त्यांना अधिनियम 1949 चे कलम 150 (अ) प्रमाणे 6 वर्ष आगोदरची नोटीस देवुन त्यानुसार कर आकारणी करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

ज्या मालमत्ता धारकांनी इमारतींचे बांधकाम परवानगी घेऊन केले आहे. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये समाप्ती प्रमाणपत्र, भोगवटा घेतलेला नाही. त्यांचेवर कलम 267 (अ) प्रमाणे दुप्पट शास्तीची कार्यवाही केलेली नाही.

करनिर्धारण प्रपत्रावर सर्व्हेअरच्या सह्या नसलेने करनिर्धारण कोणत्या वर्षी कोणी केले ते समजून येत नाही.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट ( 07 ) मध्ये नमुद केलेल्या मालमत्ता धारकांचे करनिर्धारण नियमाप्रमाणे केले नसलेने रुपये 22,13,879/- वसुल करावेत.

घरपट्टी विभागास अर्धसमास पत्र क्र.53 दि.17/01/2013 व दि.01/05/2013 रोजी घरपट्टी विभागाने दप्तर

न दिलेबाबत आयुक्त यांना पत्र देवूनही त्यांनी सन 11/12 चे करनिर्धारण केलेली संपूर्ण प्रपत्रे व रजिस्टर्स लेखा परिक्षणास हजर केलेली नाहीत.

DATSBKM7201 (Ref No : 39)

## *52 करारपत्र नसताना मालमत्तांचे कर निर्धारण केलेने झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 1311632.00 रु.

***मालमत्तांचे करयोग्य मुल्य ठरविणेसाठी मालकाने भोगवटादाराशी केलेले करारपत्र आवश्यक असता करारपत्र नसताना वार्षिक भाडेमुल्य ठरविणेत आले आहे.***

मोबाईल टॉवरचे करनिर्धरण प्रपत्राचे लेखापरीक्षण केले असता सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक ( 08 ) मधील टॉवरचे करनिर्धारण विभागाचे मालमत्तेचे भाडेमुल्य ठरविल्याबाबतचे तक्ते पाहिले असता अ.क्र. 1 ते 32 मालमत्तांचे कर निर्धारण सन 2009-10 या आर्थिक वर्षात केले आहे.
खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.
मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान मधील नियम 7 व 8 (ब) नुसार कर योग्य मुल्य ठरविणे व त्यानुसार मालमत्ता कराची गणना करणेस मालक व भोगवटादार यांचेमध्ये वार्षिक भाडे करार झाल्याचे करारपत्र आवश्यक असता करारपत्र नसतानाही कर निर्धारण केले आहे.
अधिनियम 1949 नियम 20(1)(अ) नुसार संबंधित व्यक्तीचे नांव नोंद केल्याचे आकारणी पुस्तक लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नाही. अर्धसमास ज्ञापनास मालमत्ता विभागाने उत्तर दिलेले नाही.

उपरोक्त आक्षेपाचे पुर्ततेस्तव रुपये 13,11,632/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 44)

## *53 भ्रमणध्वनी मनोऱ्याचे (मोबाईल टॉवर) वार्षिक भाडे मुल्य करार दिनांकापासून निश्चित न केलेने करावयाचे वसूली बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 370214.00 रु.,

| |
|---|
| ***करनिर्धारण विभागाने मोबाईल टॉवरचे वार्षिक मुल्य करारपत्र दिनांकापासून निश्चित केले नसलेने फरकाची रक्कम रुपये 3,70,214/- वसूल करणेत यावी.*** |

सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक ( 09 ) मधील भ्रमणध्वनी (मोबाईल टॉवरचे) करनिर्धारण प्रपत्राचे लेखापरीक्षण केले असता खालील आक्षेप घेणेत येत आहे.

करनिर्धारण विभागाचे टॉवरचे भाडेमुल्य ठरविण्यासाठी मालकाने भोगवटादाराशी अधिनियम 1949 चे प्रकरण 8 मधील नियम 8 (अ)(ब)(क)(ड) नुसार केलेल्या करारपत्राचे दिनांकापासून वार्षिक भाडेमुल्य निश्चित करुन त्यानुसार करांची आकारणी करणे आवश्यक असता सन 2009-10 पासून करांची आकारणी केली आहे. त्यामुळे करारपत्राचे दिनांकापासून मिळकत धारकाकडून फरकाची रक्कम रुपये 3,70,214/- वसूल करण्यात यावी.

ज्ञापन क्र.132 दि.21/02/2013 मध्ये नगररचना विभागाने अनाधिकृत टॉवरची माहिती लेखापरीक्षणास पुरविली आहे. सदर टॉवरवर दंडात्मक कार्यवाहीचा ठराव महासभा ठराव क्र. 41 दि. 19/5/2011 नुसार झाला आहे. त्यामध्ये परिशिष्ठामधील टॉवरचा समावेश आहे. मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 267 (अ) नुसार अवैध इमारतीवर बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती वसूल करणेत यावी.

DATSBKM7201 (Ref No : 45)

## *54 वार्षिक आकारणी कमी धरलेने करनिर्धारण फरकाची रक्कम वसूल करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 208862.00 रु.,

| |
|---|
| ***मोबाईल टॉवर मालमत्ता धारकांची वार्षिक आकारणी कमी आकारल्याने करनिर्धारक फरकाची रक्कम रुपये 208862/- वसुल करणेत यावी.*** |

भ्रमनध्वनी (मोबाईल टॉवरचे) कर निर्धारण प्रपत्राचे लेखापरीक्षण केले असता खालील टॉवरचे कर निर्धारण विभागाचे मालमत्तेचे भाडेमुल्य ठरविण्याबाबतचे तक्त्याचे लेखापरीक्षण केले असता अ.क्र. 1 ते

13 मालमत्ता धारकांची वार्षिक आकारणी कमी धरल्याने करनिर्धारण फरकाची रक्कम रुपये 208862/- वसूल करणेत यावी.

| अक्र | मिळकत नंबर | मालकत्ता धारकाचे नाव | करनिर्धारण वर्ष | वार्षीक आकारणी रक्कम | करनिर्धारणा प्रमाणे आकारणी रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 130/305/1 | रिलायन्स, कुरणे शब्बीर मुन्ना | 09-10 | 49248 | 61560 | 1 |
| 2 | 134/215/2 | रिलायन्स, जोशी चिंतामणी दत्तात्रय | 09-10 | 42336 | 61560 | 1 |
| 3 | 119/881/1 | जि.टी.एल.लि. पुणे, अजमेरा नरेश | 09-10 | 31752 | 61560 | 2 |
| 4 | 128/211/5 | रिलायन्स, मुळीक दिलीप तातोबा | 09-10 | 42336 | 61560 | 1 |
| 5 | 141/142/1 | रिलायन्स, पवार उदय यशवंत | 09-10 | 42336 | 61560 | 1 |
| 6 | 151/121/1 | रिलायन्स,विज मंडळ सेवक सह.पतसंस्था | 09-10 | 39690 | 47628 | 7 |
| 7 | 206/139/1 | टाटा इंडिकॉम, लोंढे सुनिता दयानंद | 09-10 | 37044 | 47628 | 1 |
| 8 | 205/106/1 | जि.टी.एल., पारिख प्रतिभा | 09-10 | 44982 | 52920 | 7 |
| 9 | 203/1046/2 | एस्सार, डॉ.बसवराज पाटील | 09-10 | 37044 | 52920 | 1 |
| 10 | 207/639/1 | बी.एस.एन.एल., चुध नंदलाल सदोरामल | 09-10 | 44452 | 52920 | 8 |
| 11 | 213/372/1 | रिलायन्स, अठवले अभय | 09-10 | 37044 | 52920 | 1 |
| 12 | 217/481/1 | रिलायन्स, केसरखाने व. रामगोंडा | 09-10 | 23760 | 52920 | 2 |
| 13 | 206/1655/1 | रिलायन्स, शोभना प्रताप पवार | 09-10 | 39690 | 52920 | 1 |
| | | | | | एकूण | 2 |

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATSBKM7201 (Ref No : 46)

## *55 हॉटेल आयकॉन, सांगली चे चूकीचे करनिर्धारण केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 2961656.00 रु.,

***मनपा उपविधी व विकास नियंत्रण नियमावली 2003 मध्ये 4 स्टार वा त्यापेक्षा जास्त दर्जाच्या***

***हॉटेलला केंद्र व राज्य शासनाचे पर्यटन मंत्रालयाने मान्यता दिलेस 15 % वाढील FSI मान्य करावा अशी तरतुद आहे. परंतु सदर प्रकरणात केंद्र शासनाने 3 स्टार दर्जाचे  हॉटेल बांधकामासाठी परवानगी दिली असलेने त्यांना जादा FSI अनुज्ञेय होत नसतानाही 0.5 जादा FSI नियम बाह्यरित्या देणेत आलेला आहे. व त्यास शासनाची मान्यता घेणेत आलेली नाही.***

खिलारे मिलींद जयंद्र, हॉटेल आयकॉन विश्रामबाग, सरस्वती नगर, सांगली  वॉर्ड क्र.142/147/1 यांना बांधकाम परवानगी परवाना क्र.483 दि.29.04.2006 रोजी मिळालेली आहे. सुधारीत बांधकाम परवानगी अर्ज आवक.क्र. 465 दि.12.02.2007 रोजी करणेत आलेला असून त्यास आयुक्त यांनी परवानगी दिलेली नाही.

मनपा बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावली पान नं.181, N-2.9 नुसार 4 स्टार व त्यापक्षा जास्त दर्जाचे आर 2 झोन मधील हॉटेल बांधकामास  प्रिमीयम आकारुन जादा 15% FSI देणेचा अधिकार आयुक्त मनपा यांना आहे. जादा प्रिमीयम ची रक्कम आयुक्त यांनी डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॉनींग यांचे मान्यतेने ठरविणेची आहे. त्यासाठी सदर हॉटेलला केंद्र शासन व राज्य शासनाची मान्यता आवश्यक आहे.

नस्ती मध्ये केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने दि.05.02.2007 रोजी तीन स्टार हॉटेलसाठी मान्यता दिली असून, त्या नुसार आर्किटेक्ट यांनी नकाशा तयार करुन सुधारीत परवानगी अर्ज नगररचना विभागाकडे आ.क्र.465 दि.12.02.2007 रोजी दिला आहे. त्यानुसार नगररचना विभागाने बांधकाम विकास शुल्क रुपये25,047/- दंडात्मक शुल्क 1,33,429/- व बांधकाम मटेरीयल शुल्क रुपये1000/- भरणेबाबतदिलेल्या नोटीशी प्रमाणे विकासकाने रक्कम रुपये1,59,476/- भरणा केली आहे.

एकूण जमिनीचे क्षेत्र 912.9 चौ.मी. असून FSI 1:1 आहे. भारत सरकारचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने दि.05.02.2007 रोजी 3 स्टार हॉटेल बांधणेस परवानगी दिलेली असलेने 0.5 जादा FSI मिळत असलेने त्या प्रमाणे आर्किटेक्ट यांनी सुधारीत बांधकाम परवानगीसाठी अर्ज दिलेला आहे.

| तपशील | परवानगी प्लॅन प्रमाणे चौ.मी. | सुधारीत प्लॅन प्रमाणे चौ.मी. | कपात न करता एकूण क्षेत्र चौ.मी. | करनिर्धारणा प्रमाणे एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| बेसमेंट | 367 | 367 | -- | 395.92 |
| तळ मजला | 183.93 | 257.70 | 394.221 | 512 |
| दुसरा मजला | 215.96 | 203.94 | 394.221 | 275.90 |
| तीसरा मजला | 111.461 | 203.94 | 394.22 | 275.90 |
| चौथा मजला | 111.461 | 203.94 | 394.22 | 275.90 |

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

घरपट्टीविभागाने मुं.प्रां.अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 7 नुसार केलेल्या करनिर्धारणामध्ये संपूर्ण इमारतीचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत असलेने नगररचनाविभागाने खालील प्रमाणे बांधकाम विकास शुल्काची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

रहिवास बांधकाम शुल्क (भरलेली) 1019.70 चौ.मी. X रुपये40 / चौ.मी. = रुपये 40788/-

वाणिज्य वापर शुल्क (भरावयाची) 1019.70 चौ.मी.X रुपये80 /चौ.मी. = रुपये 81576/

-------------------------------

फरक रुपये 40,788/-

बंदीस्त बाल्कनी प्रिमीयम (रहिवासी) 165.3 चौ.मी X रुपये350/चौ.मी. = रुपये 57855/-

भरावयाचा प्रिमीयम (वाणिज्य) 163.3 चौ.मी. X रुपये500/चौ.मी. = रुपये 82650/-

------------------------------

फरक रुपये 24,795/-

जिना व पॅसेज (फ्री FSI) 340 चौ.मी. X रुपये300/चौ.मी. = रुपये 102150/-

जिना व पॅसेज (वाणिज्य) 340 चौ.मी. X रुपये450/चौ.मी = रुपये 153000/-

-------------------------------

फरक रुपये 50850/-

सदर दर महानगरपालिका सभा क्र.5 2004-05 दि.03.12.2004 विषय क्र. 14 ठराव क्र. 133 ने ठरविले असून एकूण रुपये 1,16,438/- वसुल करणेत यावे.

मनपा उपविधी व विकास नियंत्रण नियमावली 2003 मध्ये 4 स्टार वा त्यापेक्षा जास्त दर्जाच्या हॉटेलला केंद्र व राज्य शासनाचे पर्यटन मंत्रालयाने मान्यता दिलेस 15 % वाढील FSI मान्य करावा अशी तरतुद आहे. परंतु सदर प्रकरणात केंद्र शासनाने 3 स्टार दर्जाचे हॉटेल बांधकामासाठी परवानगी दिली असलेने त्यांना जादा FSI अनुज्ञेय होत नसतानाही 0.5 जादा FSI नियम बाह्यरित्या देणेत आलेला आहे. व त्यास शासनाची मान्यता घेणेत आलेली नाही.

सुधारीत बांधकाम नकाशा प्रमाणे चौथ्या मजल्या पर्यंत एकूण बांधकाम 1861.84 चौ.मी. झाले आहे. परंतू घरपट्टी विभागाने एकूण 1736.56 चौ.मी. क्षेत्रचे करनिर्धारण केलेने 1861.84 – 1736.56 = 125.28 X 50.01 = रुपये 6265 /- - 10 % दुरुस्ती 626.5 = रुपये5639/- X 58 % प्रमाणे रुपये3270/- वसुल करणेत यावे.

सुधारीत बांधकाम परवानगीस आयुक्त यांनी मान्यता दिली नसलेने अधिनियम 1949 चे कलम 267 अ (1) (ड) नुसार मालमत्ता कराचे दुप्पट शास्ती रुपये8,30,979/- X 57% = रुपये4,73,660/- X 2 प्रमाणे रु 9,47,316/- वसूल करण्यात यावी.

बांधकाम परवानगी परवाना क्र.483 दि.29.04.2006 रोजी दिला आहे. सुधारीत बांधकाम परवाना बांधकाम मागणीदि.12.02.2007 रोजी विकासकाने केली आहे. त्यामुळे अधिनियम 1949 चे कलम 151 अ नुसार 6 वर्षे आगोदरची नोटीस देऊन कर निर्धारण करणे आवश्यक असता ते केलेले नाही. बांधकाम

परवानगीची मुदत 1 वर्ष असलेने सुधारीत बांधकाम परवानगी घेणेत आलेली नाही. त्यामुळे सन 08-09 पासून कर निर्धारण केले नसलेने रुपये9,47,316/- X 3 वर्षे = रुपये28,41,948/- मालमत्ता कराची वसुली करणेत यावी.

नगररचना विभागाने नियमानुसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये नमुद केले अटी प्रमाणे मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी करणे, जोतालेव्हल पर्यंत बांधकाम प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही.

अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.

अधिनियम 1949 चे कलम 129 (1) (क) महानगरपालिकेने सामान्य कराचे दर ठरविलेले नाहीत. तसेच कलम 129 (2) नुसार महानगरपालिकेला कलम 99 च्या तरतुदीनुसार तीला निर्धारीत करता येईल अशा दराने व अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासून इमारतींच्या व जमिनीच्या भांडवलीमुल्याच्या अधारे शहरातील इमारतींवर व जमिनीवर मालमत्ता कर बसविणेची पध्दत स्वीकारण्याचा ठराव संम्मत करणे आवश्यक असता तो न घेताच भांडवली पध्दत नियमबाह्यरित्या लागु करण्यात आली आहे.

अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 7 (अ) 2 नुसार पोटनियम 1 अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रायोजनाकरीता स्थायी समितीच्या मान्यतेने इमारतीचे किंवा जमिनीच्या प्रवर्गाचा तपशीलांच्या बाबतीत बहुविध भारांकाच्या बाबतीत विनिमय तयार करणे आवश्यक असता ते न करताच नियमबाह्यरित्या भांडवली मुल्यावर आधारीत करप्रणाली चालु केली आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये 29,61,656/- वसुल करणेत यावे.

DATSBKM7201 (Ref No : 48)

## *56 गाडगीळ व इतर यांची मिळकत क्र.107/22/2 चे करनिर्धारण चुकीच्या पध्दतीने केलेने झालेल्या नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 1366164.00 रु.,

***गाडगीळ व इतर यांची मिळकत क्र.107/22/2 चे करनिर्धारण चुकीच्या पध्दतीने केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

गाडगीळ व इतर यांची मिळकत क्र.107/22/2 चे करनिर्धान सन 11-12 या वर्षात केलेले आहे. असेसमेंट पत्रकाचे लेखापरीक्षण केले असता त्याचे वर असेसमेंट केलेची तारीख नमुद नाही. सदर इमारतीस बांधकाम परवानगी क्र.494 दि.05/05/2007 रोजी दिलेली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणपत्राचे मागील पानावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे तरतुदी खालील व 6.7.1 नुसार अटी नमुद आहेत. त्यामधील अट क्र.2 नुसार बांधकाम परवानगी 1 वर्ष मुदती करीताच अनुज्ञेय असलेने सुधारीत बांधकाम परवानगी घेतली नसलेने दि.01.05.2008 घरपट्टी आकारणे ऐवजी सन 11-12 मध्ये घरपट्टी आकारणी केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

बांधकाम परवानगी नकाशा प्रमाणे व्यापारी करणासाठी 0.50 व निवासी वापरासाठी 1.50 FSI खालील प्रमाणे मंजूर करणेत आला आहे.

एकूण प्लॉटचे क्षेत्र 411.40 चौ.मी.

एकूण बांधकाम क्षेत्र 411.40 X 2 = 822.80 चौ.मी.

व्यापारी बांधकाम (0.50 FSI) 411.40 X 0.50 = 205.70 चौ.मी.

निवासी बांधकाम (1.50 FSI) X 411.40 = 617.10 चौ.मी.

एकूण करणेत आलेले बांधकाम (चौ.मी.)

| तपशील | अस्तित्वातील | प्रस्तावीत | एकूण |
|---|---|---|---|
| तळमजला | 279.24 | 52.27 | 331.51 |
| पहिला मजला | -- | 243.70 | 243.70 |
| दुसरा मजला | -- | 59.02 | 59.02 |
| एकूण | 279.24 | 354.99 | 634.23 |

बेसमेंट क्षेत्र 88 चौ.मी.

सदर इमारतीचे घरपट्टीविभागाने खालील प्रमाणे करनिर्धारण केले आहे.

| वापर | एकूण चौ.मी. | आकरणी प्रती चौ.मी. | वार्षीक भाडेमूल्य |
|---|---|---|---|
| वाणिज्य | 686.05 | रुपये35/- | 2,88,141/- |
| बेसमेंट | 75.60 | रुपये17.50/- | 15,876/- |
| वाणिज्य दगड/ वीट | | | |
| पोट माळा प.मजला | 44.80 | | |
| जनरेटर दु.मजला | 51.83 | | |
| रुम पत्रा ती.मजला | 15.15 | | |
| एकूण | 69.97 | रुपये23.10 | 19,396/- |

एकूण भाडे मूल्य 3.32.821/- - 10% दुरुस्ती रुपये33,282/- = करपात्र भाडे मूल्य 2,99,539/-

एकत्रीत कर 22% प्रमाणे रुपये 65,899/-

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

नगररचना विभागाने दिलेल्या नकाशा मंजूर प्रमाणे एकूण वाणिज्य बांधकाम 205.70 व रहिवास 617.10 चौ.मी. बांधकामासाठी परवानगी दिली आहे. परंतू घरपट्टी विभागाने केलेल्या कर आकारणी प्रमाणे एकूण क्षेत्र 831.62 चौ.मी बांधकामाचा वापर वाणिज्य कामासाठी केलेचे नमुद करुन त्या प्रमाणे कर आकारणी केलेली आहे. वापरात बदल केलेने बांधकाम परवानगी शुल्क 831.62 X 40/चौ.मी. = 33,265/- व दंड वसुल करण्यात आलेला नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 253 (आय) नुसार इमारतीचा वापर अन्य कारणासाठी करणे बाबत मालमत्ता धारकाने आयुक्तास नोटीस देणे आवश्यक असता देणेत आलेले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 258 नुसार कलम 253 किंवा 254 प्रमाणे दिलेल्या नोटिशीमध्ये नमुद केलेल्या माहिती व्यतीरीक्त अन्य वापर केलेस अशी परवानगी रद्द करता येईल. आणि त्याखाली केलेले कोणतेही काम हे त्याच्या परवानगी वाचून करणेत आले आहे. असे मानले जाईल. या नियमान्वये बेकायदा इमारत वापरात बदल केलेने कोणतीही कारवाई करणेत आलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 263 अन्वये भोगवटा किंवा समाप्ती प्रमाणपत्र न घेताच नियमबाह्य रीत्या इमारतीचा वापर चालु असलेचे दिसून येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने एकूण मालमत्ता कर रुपये2,99,539/- X 57 % = एकूण मालमत्ता कर रुपये1,70,773/- चे दुप्पट दराने रुपये3,41,546/- वसुल करणेत यावेत.

बांधकाम परवानगी दि.05.05.2007 रोजी दिली असलेने सन 2008 पासून मालमत्ता कराची आकारणी 3,41,546/- X 3 वर्षे = रुपये13,66,184/- प्रमाणे वसुल करणेत यावी.

महासभा क्र.7 ठ.क्र.127 दि.20.10.2010 हार्डशिप प्रिमीयम तरतुदी नुसार दंडात्मक शुल्क आकारुन बाजारमूल्य दर तक्त्यातील रहिवास व ऑफीससाठी दराच्या फरकाच्या 15% आकारणी करुन वापरातील बदल कायम करावा असे नमुद आहे. परंतू उपविधी बदलास अ धिनियम 1949 चे कलम 461 अन्वये राज्य शासनाची मान्यता घेणेत आलेली नाही.

बांधकाम परवानगी नकाशा प्रमाणे बेसमेंट 88 चौ.मी. दाखविले असून ते FSI मुक्त आहे. मनपा विकासनियंत्रण नियमावली 17.12 प्रमाणे तळमजल्याचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येऊ नये असे स्पष्ट नमुद असताना भोगवटादाराने 75.60 चौ.मी. बेसमेंटचा वापर वाणिज्य कारणासाठी केलेने

त्यांचेवर नियमानुसार कारवाई सक्षम प्राधिकाऱ्यांने केलेली नाही.
नगररचना विभागाने बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र अट क्र.4 नुसार मंजुर नकाशाप्रमाणे जागेवर आखणी झाल्यावर तसेच अट क्र.5 नुसार जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यावर महानगरपालिकेची संम्मती घेणे आवश्यक असता भोगवटादाराने ती घेतलेली नाही. व त्याबाबत नगररचना विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही.
नगररचना व घरपट्टी विभागामध्ये ताळमेळ नसलेने भोगवटादारावर अवैध बांधकाम करुनही कोणत्याही प्रकारची कारवाई करणेत आलेली नाही. हे स्पष्ट होते. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रुपये13,66,164/- वसुलपात्र करणेत येत आहेत. तसेच अन्य आक्षेपावर स्वतंत्र कार्यवाही करणेत यावी.

DATSBKM7201 (Ref No : 49)

## *57 डॉ.शरद शामराव सावंत सांगली यांचे करनिर्धारण चुकीचे केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 1078901.00 रु.,

***बांधकाम परवानगी निवासी कारणासाठी घेतलेली आहे. परंतू प्रत्यक्षात वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत आहे.***

डॉ.शरद शामराव सावंत सि.स.नं.8545/8586 विश्रामबाग, सांगली वॉर्ड क्र./भाग क्र.148 यांनी बांधकाम परवानगी बांधकाम परवाना क्र.480 दि.20.06.2009 रोजी घेतली असून ती रद्द करुन बांधकाम परवाना क्र.262 दि.10.06.2011 रोजी सुधारीत बांधकाम परवाना घेतलेला आहे. एकूण रहिवास वापर 633 चौ.मी. व वाणिज्य वापर 197.83 चौ.मी. ला परवानगी देणेत आली आहे. एकूण मंजूर बांधकाम 831.40 चौ.मी. + FSI मुक्त बांधकाम 1171 चौ.मी. झालेले आहे. परंतू कर निर्धारण विभागाने 1045 चौ.मी. करनिर्धारण केले आहे. त्यामुळे खालील प्रमाणे करणनिर्धारणाची रक्कम वसुल करणेत यावी.

| तपशील | एकूण क्षेत्र फळ | आकरणी प्रती/चौ.मी. | एकूण मूल्य |
|---|---|---|---|
| आर.सी.सी. | 1171 | 69.69 X 12 महिने | 9,79,284/- |
| पार्कींग | 91.20 | 37.11 X12 महिने | 40,613/- |

एकूण 10,19,897/- - दुरुस्ती 10% रुपये1,01,989/- = रुपये 9,17,907/- वर एकत्रित मालमत्ता कर 56% प्रमाणे रुपये5,14,028/- वसुल करणेत यावे.

बांधकाम परवानगीमध्ये एकूण वाणिज्य वापर 197.83 चौ.मी. दाखविणेत आला आहे. परंतू कर निर्धारणविभागाने केलेल्या मोजमापाप्रमाणे पूर्ण इमारतीचा वापर नर्सींग कॉलेज व हॉस्पिटल या वाणिज्य कारणासाठी करणेत येत असलेने एकूण रहिवास क्षेत्र 633.57 X रुपये 80/- प्रती चौ.मी. प्रमाणे बांधकाम शुल्क एकूण रुपये50,845/- वसुल करणेत यावे.

विकास योजने मध्ये सदर भुखंडाचा वापर रहिवास दर्शविला आहे. परंतू भोगवटा दाराने संपूर्ण इमारतीचा वापर वाणिज्य कारणासाठी केला आहे. अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 253 (आय) नुसार जागा वापर बदलास मनपाची मान्यता घेणेत आलेली नाही.

नगररचना विभागाने नियमानुसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये नमुद केले अटी प्रमाणे मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी करणे जोतालेव्हल पर्यंत बांधकाम प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही.

अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) नुसार या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेताच किंवा अशा परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन जमिनीवर बांधकाम केले असलेने अशा अवैध बांधकामावर बसवणे योग्य मालमत्ता कराचे दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असलेने एकूण मालमत्ता कर रुपये5,14,028/- X 2 = एकूण मालमत्ता कर रुपये10,28,056/- चे दुप्पट दराने वसुल करणेत यावेत.

करनिर्धार पत्रकावर सर्व्हेअर म्हणून डी.डी.पाटील यांची नांव व स्वाक्षरी आहे. अस्थापना सुची प्रमाणे ते शिपाई पदावर कार्यरत असलेने त्यांना कोणत्या प्राधिकाराने सर्व्हेअर या पदाचा कार्यभार देणेत आला आहे तो कार्यालयीन आदेश लेखा परीक्षाणास दाखविणेत आलेला नाही. कर निर्धारण व संकलन हे जबाबदारीचे काम असलेने चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्याकडून करणेत येत आहे. ही गंभीर बाब आहे.

नगररचना विभागाने नियमानुसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये नमुद केले अटी प्रमाणे मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी करणे जोतालेव्हल पर्यंत बांधकाम प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही.

अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.

अधिनियम 1949 चे कलम 129 (1) (क) महानगरपालिकेने सामान्य कराचे दर ठरविलेले नाहीत. तसेच कलम 129 (2) नुसार महानगरपालिकेला कलम 99 च्या तरतुदीनुसार तीला निर्धारीत करता येईल अशा दराने व अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासून इमारतींच्या व जमिनीच्या भांडवलीमुल्याच्या अधारे शहरातील इमारतींवर व जमिनीवर मालमत्ता कर बसविणेची पध्दत स्वीकारण्याचा ठराव संम्मत करणे आवश्यक असता तो न घेताच भांडवली पध्दत नियमबाह्यरित्या लागु करण्यात आली आहे.
अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 7 (अ) 2 नुसार पोटनियम 1 अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रायोजनाकरीता स्थायी समितीच्या मान्यतेने इमारतीचे किंवा जमिनीच्या प्रवर्गाचा तपशीलांच्या बाबतीत बहुविध भारांकाच्या बाबतीत विनिमय तयार करणे आवश्यक असता ते न करताच नियमबाह्यरित्या भांडवली मुल्यावर आधारीत करप्रणाली चालु केली आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.
उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये10,78,901/- वसुल पात्र करणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 50)

## ***58 इंगळे आप्पासाहेब वसंत यांचे मालमत्ता कर निर्धारण चुकीचे केले बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 333117.00 रु.,

***बांधकाम परवानगी निवासी कारणासाठी घेतलेली आहे. परंतू प्रत्यक्षात वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत आहे. तसेच बेसमेंटचा वापर पार्कींग ऐवजी अवैधपणे लॅब, मेडीकल दुकानासाठी करणेत येत आहे.***

इंगळे आप्पासाहेब वसंत, सांगली वॉर्ड क्र.124/455/2 यांचे करनिर्धारण सन 11-12 मध्ये करणेत आलेले आहे. बांधकाम परवानगी बांधकाम परवाना क्र.219 दि.22.12.2009 रोजी मिळाले असून

करनिर्धारण बेसमेंट 47.15 चौ.मी. व तळ मजला 164.25 चौ.मी. वर करणेत आले आहे. बांधकाम परवानगी प्रमाणे एकूण क्षेत्र 468.90 चौ.मी. असून एकूण बांधकाम तळ मजला + पहिला मजला असे एकूण 331.12 चौ.मी. आहे. सर्व बांधकाम निवासी आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

विकास योजनेमधील सदर भूखंडाच्या वापराप्रमाणे निवासी बांधकामासाठी 332.12 चौ.मी. X रु40 प्रती चौ.मी. प्रमाणे रुपये 13,245/- विकास शुल्क घेणेत आलेले आहे. परंतू इमारतीचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत असलेने जादा विकास शुल्क 332.12 चौ.मी. X रु40 प्रती चौ.मी. प्रमाणे रुपये 13,245/- घेणेत यावे. तसेच जागा वापर बदलास अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 253 (आय) नुसार मान्यता घेण्यात आलेली नाही.

नकाशाप्रमाणे बेसमेंट मध्ये पार्कींग दाखवणेत आलेले आहे. परंतू प्रत्यक्षात कर निर्धारणा प्रमाणे त्याठिकाणी दुकान, लॅब रुम बांधणेत आलेली आहे. त्यामुळे अधिनियम 1949 चे कलम 267 (अ) (1) (ड) प्रमाणे दुप्पट दराने मालमत्ता कराची आकारणी करणेत आलेली नाही.

नगररचना विभागाने नियमानुसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये नमुद केले अटी प्रमाणे मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी करणे, जोता लेव्हल पर्यंत बांधकाम प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही.

अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.

बेसमेंटचा वापर नियमबाह्यरित्या करणे, वापर बदल करणे, भोगवटा प्रमाणपत्र न घेणे अशा नियमबाह्य गोंष्टींमुळे अधिनियम 1949 चे कलम 267 अ (1) (ड) प्रमाणे रुपये1,63,200/- वर 49 % प्रमाणे रुपये79,968/-वर दुप्पट दराने शास्तीची रक्कम रुपये159,936/- वसुल करणेत यावी.

एक वर्षा नंतर नियमानुसार सुधारीत बांधकाम परवानगी घेतली नसल्याने सन 10-11 व 11-12 एकूण घरपट्टी 1,59,936 X 2 = रुपये3,19,872/- वसुल करणेत यावी. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रुपये3,33,117/- वसुलपात्र करणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 51)

### *59 शहा मिताली यांचे करनिर्धारण चुकीचे केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 1077216.00 रु.,

***भांडवली मुल्यावर आधारित कर निर्धारण पध्दत महानगरपालिकेच्या महासभेची व स्थायी समितीची मान्यता न घेता राबविण्यात आली आहे. तसेच अवैध बांधकामाबाबत शास्ती आकारणेत आलेली नाही.***

शहा मीताली आणि शहा ब्रम्हा अशोक इंद्रप्रस्थ नगर, सांगली वॉर्ड क्र.124/456/11 यांचे करनिर्धारण सन 11-12 मध्ये करणेत आलेले आहे. बांधकाम परवानगी बांधकाम परवाना क्र.452 दि.25.04.2008 रोजी मिळाला असून करनिर्धारण बेसमेंट 243.95 चौ.मी. व सुशोभित आर.सी.सी. इमारत 516.01 चौ.मी. वर करणेत आले आहे. सदर इमारत 150 चौ.मी. पेक्षा जास्त असलेने भांडवली दरावर आकारणी केलेली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणे एकूण क्षेत्र 730.70 चौ.मी. आहे. एकूण बांधकाम क्षेत्र वाणिज्य + रहिवासी (तळ मजला) 268.99 व रहिवास पहिला मजला 222.79 चौ.मी. आहे.

भोगवटा दाराने परिपुर्ती प्रमाणपत्राची मागणी दि. 23.09.2009 रोजी केलेली आहे. व नगररचना विभागाने जा.क्र.652 दि.19.12.2009 समजे द्वारे जादा बांधकाम केलेने भोगवटा प्रमाणपत्र नाकारले आहे.

सर्व्हेअर यांनी दि.09.07.2010 रोजी प्रत्यक्ष जागेवर ज्या प्रमाण बांधकाम आहे त्या प्रमाणे सुधारीत नकाशा तयार करुन नगररचनाकार व सहाय्यक नगररचनाकार यांचे मान्यतेने आयुक्तांकडे पाठविला आहे. आयुक्त यांनी दि.03.07.2010 चे टिपणीने प्रस्ताव फेरसादर करणेस सांगितले आहे. त्या नंतर प्रस्तावावर काहीही कार्यवाही करणेत आलेली नाही.

आर्किटेक्ट यांनी सुधारीत परवानगी प्रस्ताव आवक क्र.431 दि.22.12.2009 रोजी दाखल केला आहे. त्यामध्ये तळघर , तळमजला व पहिल्या मजल्याचे एकूण क्षेत्र 916.05 चौ.मी. दाखविले आहे. व जिना, लिफ्ट व बाल्कनी यांची हार्डशिप प्रिमीयम धरुन व FSI मध्ये सुट घेऊन एकूण 770.54 चौ.मी. चा प्रस्ताव दाखल केलेला आहे.

घरपट्टी विभागाने खालील प्रमाणे करनिर्धारण केलेले आहे.

| तपशील | एकूण क्षेत्र चौ.मी. | आकरणी दर/चौ.मी | एकूण |
|---|---|---|---|
| बेसमेंट | 243.95 | 22.19 x 12 | 65,252/- |
| बेसमेंट + प.मजला | 516.10 | 50.1 x 12 | 3,09,668/- |

एकूण रुपये3,74,940/- - 10% दुरुस्ती रुपये37,494/- एकूण करपात्र भाडे मूल्य रुपये3,37,446/- वर एकूण 49 % प्रमाणे रुपये 1,65,349/- मालमत्ता कर आकारणेत आला आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहे.

करनिर्धारण सन 11-12 या वर्षात केलेले आहे. असेसमेंट पत्रकाचे लेखापरीक्षण केले असता त्याचे वर असेसमेंट केलेची तारीख नमुद नाही. सदर इमारतीस बांधकाम परवानगी क्र.452 दि.25/04/2008 रोजी दिलेली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणपत्राचे मागील पानावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे तरतुदी खालील व 6.7.1 नुसार अटी नमुद आहेत. त्यामधील अट क्र.2 नुसार

बांधकाम परवानगी 1 वर्ष मुदती करीताच अनुज्ञेय असलेने सुधारीत बांधकाम परवानगी घेणेत आलेली नाही.

नगररचना विभागाने नियमानुसार बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामध्ये नमुद केले अटी प्रमाणे मंजूर नकाशा प्रमाणे जागेवर आखणी करणे, जोता लेव्हल पर्यंत बांधकाम प्रमाणित करणे आवश्यक असता ते केलेले नाही.

आर्किटेक्ट यांनी जागेवर बांधकाम केले नुसार प्रस्तावित केलेल्या सुधारीत बांधकाम नकाशामध्ये एकूण बांधकाम 916.05 चौ.मी. केलेचे नमुद आहे. परंतू घरपट्टी विभागाने एकूण 759.96 चौ.मी. चे करनिर्धारण केले आहे. त्यामुळे 159.09 चौ.मी. X रुपये 50/- x 12 = 95,454/- - 10% दुरुस्ती = 85,908/- X 49 % = रुपये42,095/- वसुल करणेत यावे.

नकाशा प्रमाणे एकूण प्लॉटची जागा 730.70 चौ.मी. असून जागेचा FSI 1:1 असेलेने एकूण बांधकाम 730.70 चौ.मी. ऐवजी 770.54 चौ.मी. केलेने नगररचना विभागाकडून अवैध बांधकामवर कोणतीही कारवाई केलेली नाही.

मुळ बांधकाम नकाशामध्ये कार्यालयीन परवाना क्र.452 दि.25.04.2008 अन्वये वाणिज्य वापरासाठी एकूण 180.06 चौ.मी. व घरगुती वापरासाठी 311.72 चौ.मी. क्षेत्र मंजूर करणेत आले आहे. नवीन सुधारीत बांधकाम परवानगी अर्जामध्ये एकूण बांधकाम 916.05 चौ.मी. दर्शविले आहे. सदर सुधारीत बांधकामास आयुक्त यांनी परवानगी दिली नसलेने अधिनियम 267 अ (1) (ड) नुसार अवैध बांधकामावर बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी रक्कम वसुल करणेत यावी. तसेच वाणिज्यप्रमाणे बांधकाम शुल्क नगररचना विभागाकडून वसूल करण्यात यावे.

घरपट्टी विभागाने मालमत्ता कर निर्धारणामध्ये संपूर्ण इमारतीचा वापर वाणिज्य कामासाठी होत असलेने त्या प्रमाणे कर आकरणी केली आहे. त्यामुळे अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 253 (आय) नुसार इमारतीच्या वापरात झालेल्या बदलास आयुक्तांची मान्यता घेणेत आलेली नसलेचे स्पष्ट होते.

अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र न घेताच इमारतीचा वापर करणेत आला आहे.

घरपट्टी विभागाने प्रत्यक्ष जागेवर चुकीची मापे घेतलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेचे दिसुन येते.

सुधारीत नकाशा परवानगीचा अर्ज जागेवर प्रत्यक्ष बांधकाम केले नुसार तयार केला असून त्यामध्ये एकूण बांधकाम 916.05 चौ.मी. दाखविलेले आहे. त्यामुळे 916.05 चौ.मी. X रुपये50/- X 12 महिने = रुपये5,49,600/- X एकूण 49% प्रमाणे एकूण मालमत्ता कर रुपये 2,69,304/- होत असून अवैध बांधकामाची दुप्पट दराने शास्ती रुपये5,38,608/- प्रमाणे घरपट्टी वसुल करणेत यावी.

प्रत्यक्ष जागेवर बांधकाम 2009 मध्ये पूर्ण झाले असल्याने मागील 2 वर्षाची एकूण घरपट्टी 5,38,608/- X 2 = रुपये10,77,216/- वसुल करणेत यावे.

सुधारीत बांधकाम नकाशा मध्ये पार्कींग क्षेत्र नियमाप्रमाणे दाखविले नाही.

अधिनियम 1949 चे कलम 129 (1) (क) महानगरपालिकेने सामान्य कराचे दर ठरविलेले नाहीत. तसेच

कलम 129 (2) नुसार महानगरपालिकेला कलम 99 च्या तरतुदीनुसार तीला निर्धारीत करता येईल अशा दराने व अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासून इमारतींच्या व जमिनीच्या भांडवलीमुल्याच्या अधारे शहरातील इमारतींवर व जमिनीवर मालमत्ता कर बसविणेची पध्दत स्वीकारण्याचा ठराव संम्मत करणे आवश्यक असता तो न घेताच भांडवली पध्दत नियमबाह्यरित्या लागु करण्यात आली आहे.

अधिनियम 1949 चे प्रकरण 8 कराधान नियम 7 (अ) 2 नुसार पोटनियम 1 अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रायोजनाकरीता स्थायी समितीच्या मान्यतेने इमारतीचे किंवा जमिनीच्या प्रवर्गाचा तपशीलांच्या बाबतीत बहुविध भारांकाच्या बाबतीत विनिमय तयार करणे आवश्यक असता ते न करताच नियमबाह्यरित्या भांडवली मुल्यावर आधारीत करप्रणाली चालु केली आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.

उपरोक्त आक्षेपांच्या पुर्ततेस्तव रक्कम रुपये10,77,216/- वसुल करण्यात यावे.

DATSBKM7201 (Ref No : 52)

## *60 सचिन शहा, शिवम अॅसेट सांगली, यांचे करनिर्धारण चुकीचे केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 91468.00 रु.,

***मंजूर बांधकाम परवानगी पेक्षा जादा क्षेत्राचा वापर करणेत आला असलेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 15 कलम 267 अ (1) (ड) प्रमाणे कारवाई करणेत आलेली नाही.***

सचिन शहा, शिवम अॅसेट इंद्रप्रस्थ नगर, सांगली, वॉर्ड क्र.124/456/10 यांनी खरेदीपत्र 7 जुलै, 2011 दुकान गाळा नं.1 ते 4, पहिला मजला एकूण क्षेत्र 164.45 चौ.मी. खरेदी केले आहे.

भोगवटा प्रमाणपत्र क्र. 31 दि.14.12.2009 रोजी मिळाले आहे.

असेसमेंट पत्रकाप्रमाणे एकूण क्षेत्र (चौ.मी.)

| वापर | तळमजला (चौ.मी) | आकारणी दर/चौ.मी | वार्षीक भाडे मूल्य |
|---|---|---|---|
| वाणिज्य सुशोभित | 67.10 | 34 | 27,370/- |
| साधे | 114.86 | 30 | 41,350/- |
| पोटमाळा | 104.92 | 15 | 18,886/- |
| एकूण | 286.88 | | 87,613/- |

एकूण भाडेमूल्य 87,613 – 10% दुरुस्तीसाठी रुपये 8761/- एकूण करपात्र मुल्य रु. 78,852/-
खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.
भोगवटा प्रमाणपत्र दि.14.12.2009 रोजी दिलेने सन 10-11 या वर्षाची घरपट्टी वसुल करणेत आलेली नाही.
एकूण वाणिज्य वापरातील क्षेत्र फळ 164.45 चौ.मी. आहे. परंतु वापर 286.88 चौ.मी असल्याने 122.43 चौ.मी. क्षेत्राचा वापर अवैध होत असल्याने व बांधकाम क्षेत्र वाढविल्याने अधिनियम 1949 चे कलम 267 अ (1) नुसार मालमत्ता कराचे दुप्पट रुपये45,734/- X 2 = रुपये91,468/- वसुल करण्यात यावी.
नगररचना विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नियम 51 नुसार अवैध बांधकामाबाबत कारवाई केलेली नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर देण्यात आलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 53)

## *61 गाळा भाडे रक्कम कमी वसुली केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भूमी व मालमत्ता,*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 161547.00 रु.,

***मनपा मालकीचे दुकान गाळ्यांचे भाडे कमी वसुल केलेने रुपये 136905/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

मनपा मालकीच्या छ.शिवाजी मंडई एकूण 86 व पेठभाग भाजी मंडई एकूण 64 दुकान गाळे यांचे भाडे दि. 18/12/2008 रोजीच्या महासभेतील ठराव क्रं. 94 नुसार हस्तांतरण फी अनुक्रमे रक्कम रु. 30,000/-, 50,000/- व 10,000/- असे निश्चित केले होती व दर तीन वर्षाने 20% भाडेवाढ करणेत यावी असे ठरावात नमूद आहे.
खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.
दुकान गाळे भाड्याने दिले नंतर डिसेंबर 11 मध्ये तीन वर्ष पूर्ण झाली असलेने 20% भाडेवाढ करुन मागणी करणे आवश्यक होते. परंतु जुन्या दराने भाडयाची मागणी करण्यात आलेली आहे. तफावतीबाबतचे परिशिष्ठ क्रमांक (11) या सोबत जोडण्यात आलेले आहे. त्यानुसार रक्कम रु. 1,36,905/- ची भाडेवाढ मागणी कमी करण्यात आलेली आहे.
प्रत्येक तीन वर्षानी रक्कम 20% भाडेवाढ करण्याबाबत महासभेने सन 2008 ला ठराव केला असताना

त्याची अंमल बजावणी संबंधीत कार्यालयाने केलेली नाही. त्यामुळे म.न.पा.चे नुकसान झालेले आहे. यामध्ये कार्यालयाने दुर्लक्ष केल्याने संबंधीताकडून 18% व्याजासह रक्कम रुपये 24642 + रुपये 136905/- = रुपये 161547/- वसुल करावी. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATSVKM7201 (Ref No : 97)

## *62 भटक्या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण करणेच्या कामातील अनियमिततेबाबत .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 710000.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 710000.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 400000.00 रु.,

***सदर कामाची निविदा न मागविता काम सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन, कोल्हापुर या संस्थेला विना निविदा दिलेले आहे. व काम देणेबाबतचा ठराव दि 2/8/2011 विषय पत्रानुसार आयत्या वेळेचा विषय म्हणुन घेण्यात आला. भारतीय जीवजंतु कल्याण बोर्ड यांचे दि.20/10/2005 चे पत्रामध्ये रु.300/- प्रती कुत्रा इतका हिस्सा मनपाने सबंधितांना देणेबाबत सुचित केले असता रु 700/- प्रती कुत्रा या प्रमाणे ठेकेदारास अदा केलेले आहे.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 4719 | 23/11/2011 | 2,82,000/- |
| 5952 | 25/01/2012 | 82,000/- |
| 5953 | 25/01/2012 | 10,000/- |
| 6413 | 18/02/2012 | 3,36,000/- |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत भटक्या कुत्र्यांना पकडणे,नसबंदी करणे,लसीकरण करणे व सोडुन देणे या कामासाठी निविदा मागवुन न करता निविदा सोसायटी फॉर ऍनिमल प्रोटेक्शन, कोल्हापुर या संस्थेला दिल्याचे कामाच्या नस्तीवरुन दिसुन येते.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सदर काम देणेबाबतचा स्थायी समिती सभा क्र.10 ठराव क्र.200 दि 2/8/2011 विषय पत्रानुसार आयत्या वेळेचा विषय म्हणुन घेण्यात आला.

क्र.मनपा / आरोवि/6/1/2011-12 दि.30.07.2011 चे नस्तीमध्ये संस्थेकडे 1. चार व्हेर्टनरी तज्ञ 2. तीन टेक्नीकल स्टाफ 3. एक फिल्ड क्लिनिक सहाय्यक 4. चार कुत्री पकडणारी कर्मचारी आणि अद्यावत

डॉगव्हॅन असणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे. परंतु त्याबाबत अनुषंगिक कागदपत्रे सोबत नसताना संस्थेची नियुक्त केलेली आहे.

सोसायटी ऍ़निमल रेस्क्यु , ठाणे यांनी रु.445/- प्रति कुत्रे या प्रमाणे निर्बीजीकरण / लसीकरण करणेस तयार असलेचे दि.19.04.2011 रोजी पत्र दिले आहे. परंतु त्यांना काम देणेत आलेले नाही.

भारतीय जीवजंतु कल्याण बोर्ड (पर्यावरण एवं वन मंत्रालय) चेन्नई यांचे दि.20/10/2005 चे पत्रामध्ये रु.300/-प्रतिकुत्रा इतका हिस्सा मनपाने सबंधितांना देणेबाबत सुचित केले असता रु 700/- प्रति कुत्रा या प्रमाणे ठेकेदारास अदा केलेले आहे. त्यामुळे जादाची रक्कम रुपये 400 X 1000 प्रमाणे रु. 4 लाख वसुल करणेत यावेत.

मंजुर दर एकुण 1000 कुत्र्यांसाठी 700/- प्रति कुत्रा प्रमाणे रु.700000/- मात्र व कुत्र्यांचा सर्व्हे करणेसाठी रु.10000/- असे एकुण 710000/- ची वर्क ऑर्डर क्र. जाक्र/ मनपा/आरोवि/6/1/211/2011 दि.18.08.2011 संबधित संस्थेला दिली आहे. तसेच पत्र क्र. जा.क्र. मनपा/आरोवि/6/1/ /11 सामिकु मनपा दि.20/8/11 नुसार सदर कामावर देखरेख ठेवणेसाठी स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांची सकाळी 9.00 ते संध्याकाळी 6.00 पर्यंत नेमणुक केलेली आहे. तथपी संबधित स्वच्छता निरीक्षक / मुकादम यांचा अहवाल न घेताच देयक अदा केले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 47)

## *63 श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदीमधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 1141140.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 1513775.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 30275.00 रु.,

***महाराष्ट्र शासन ऊर्जा, उद्योग व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस.1088/(2512)/उद्योग 6 . दि.2 जानेवारी 1992 च्या शासननिर्णय परिच्छेद 8.3 अ नुसार तिन आठवडयाचा कालावधी देण्यात आरोग्य विभागाने 31.05.2011 ते 14.06.2011 असे फक्त 15 दिवस मुदत देण्यात आल्याचे दिसते.त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार निविदा प्रक्रीयेत जास्तीत जास्त पुरवठाधारकांना भाग घेता आला नाही.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | पुरवठाधारकाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| 6205 | 02.07.2012 | विशाल एंटरप्रायजेस् | 245700/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 7588 | 31.03.2012 | विशाल एंटरप्रायजेस् | 409500/- |
| 2392 | 13.08.2012 | विशाल एंटरप्रायजेस् | 485940/- |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या मेडीकल स्टोअर्स मार्फत श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदी करण्यात येते त्या बाबतच्या निविदा काढण्यात आल्या.
खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.
आरोग्य विभागाच्या जाहिरात क्र.3 -2011-12 नुसार श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदीची निविदा महानगरपालिकेच्या www.smkctenders.com या बेवसाईटवर व दैनिक सकाळ मध्ये दि.31.09.2011 रोजी प्रसिध्द करण्यात आली. निविदा सादर करण्याची मुदत दि.14.06.2011 पर्यत मागविण्यात आली. महाराष्ट्र शासन ऊर्जा , उद्योग व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस 1088/(2512)/उद्योग 6 दि. 02 जानेवारी 1992 च्या परिच्छेद 6.3 अ नुसार तिन आठवडयाची मुदत असे स्पष्ट आहे. तथापि आरोग्य विभागाने 31.05.2011 ते 14.06.2011 असे फक्त 15 दिवस मुदत देण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार निविदा प्रक्रीयेत जास्तीत जास्त पुरवठाधारकांना भाग घेता आला नाही.अर्धसमासज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ही बाब मान्य करण्यात आली आहे.
देयकामधुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार 2 % प्रमाणे आयकर कपात केला नसल्याने रुपये 15,13,775/- X 2 % प्रमाणे रु. 30275/- कपात करणेत यावा.
शासकीय आरोग्य प्रयोगशाळेकडुन औषधाचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक पारीत करण्यात आले आहेत.
मिरज आणि कुपवाड शहरातील महानगरपालिकेच्या ज्या दवाखान्यांमध्ये एक्स रे ची सोय आहे.त्याचे कडुन वापरलेले एक्स रे हायपो सोल्युशन सन 2011-12 मध्ये किती प्रमाणात प्राप्त झाले. व त्यानंतर त्या एक्स रे हायपो सोल्युशन चे काय करण्यात आले व त्याबाबतचे अभिलेख तपासणी साठी वारंवार मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

DATSPSM5701 (Ref No : 90)

## *64 प्रभाग समिती क्र.4 च्या औषध खरेदीमधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष:आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 1245500.00 रु.

***साठा नोंदवहीत खरेदीच्या नोंदी आहेत. मात्र सदर औषधाचे वितरण केल्याच्या नोंदी आढळत नाहीत.***

***काही ठिकाणी वितरणाचे फक्त आकडे नोंदलेले दिसतात. तेथे तारखा नाहीत कोणाला दिले , कोणत्या वॉर्डात वापर झाला याच्या कुठेही नोंदी नाहीत, स्वाक्ष-या नाहीत.साठा नोंदवही , विहीत पध्दतीने लिहिली जात नाही.अनुक्रमणिका नाही. त्यामुळे सदर औषधे वापरली किंवा नाही याचा बोध होत नाही.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | पुरवठाधारकाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| अप्राप्त | 31/03/2012 | रमेश ॲग्रोकेम,मित्राहर्बल | 291400/- |
| अप्राप्त | 31/03/2012 | रमेश ॲग्रोकेम,मित्राहर्बल | 954100/- |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाअंतर्गत प्रभाग समिती क्र.4 च्या अभिलेखाची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

आरोग्य विभागाचे औषध पुरवठा पत्र क्र / मनपा/ आरोवि/6/1/315/2011-12 दि.31.10.2011 रोजी खालील प्रमाणे खरेदी केली .

| अक्र | औषधाचे नांव | प्रमाण | रक्कम | पुरवठादाराचे नावं |
|---|---|---|---|---|
| 1 | बेसिल्स थुरेगिन्सीस इझायलेन्सीस लिक्विड | 100 लिटर | 1,47,400/- | रमेश ऍग्रो केम कॉर्पोरेशन |
| 2 | नॅचरल सिलीकेट बेस हर्बल डिसइन्फेक्टंट ऍण्ड डिओड्रन्ट पावडर | 80x25kg | 1,44,000/- | मित्रा हर्बल |
| | एकुण | | 2,91,400/- | |

तसेच जाक्र./मनपा/आरोवि/6/1/282/2011-12 दि.17.01.2012 नुसार खालील खरेदी केली.

| अक्र | औषधाचे नांव | प्रमाण | दर | रक्कम | पुरवठादाराचे नावं |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डेल्टामेथ्रीन 2.5 % प्रमा.क्र.7609/31.03.2012 | 100 लि | 1095 | 109500/- | रमेश ऍग्रो.केम |
| 2 | अल्फासायपर मेथ्रीन 10 % प्रमा.क्र.7599/31.03.2012 | 100 लि. | 1190 | 119000/- | डॉल्फीन सेल्स |
| 3 | टेमिफॉस 50 % प्रमा.क्र.7601/ 31.03.2012 | 100 लि. | 1180 | 118000/- | श्रीराम ऍग्रो. |
| 4 | बायफेनर्थिन 10 % प्रमा.क्र.7609/31.03.2012 | 10 किलो | 4160 | 41600/- | रमेश ऍग्रो. |
| 5 | पायरेथ्रम .0.05 % प्रमा. क्र.7599/31.03.2012 | 100 लि. | 980 | 98000/- | डॉल्फीन सेल्स |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | नॅचरल सिलीकेट बेस हर्बल डिसइन्फेक्टंट ऍण्ड डिओड्रन्ट पावडर | 25किलो x 160 बॅग | 73 | 292000/- | मित्रा हर्बल |
| 7 | बायोलॉजिकल बॅसिलस स्पोर्स( odofresh ) | 100 किलो | 1760 | 176000/- | बायोकेअर सोल्युशन |
| | एकुण | | | 954100/- | |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

नस्ती प्रमाणे वरील सर्व औषधांची प्रभाग समिती क्र.4 मार्फत खरेदी करण्यात आली. साठा नोंदवहीत खरेदीच्या नोंदी आहेत. मात्र सदर औषधाचे वितरण केल्याच्या नोंदी आढळत नाहीत. काही ठिकाणी वितरणाचे फक्त आकडे नोंदलेले दिसतात. तेथे तारखा नाहीत कोणाला दिले , कोणत्या वॉर्डात वापर झाला याच्या कुठेही नोंदी नाहीत, स्वाक्ष-या नाहीत.साठा नोंदवही , विहीत पध्दतीने लिहली जात नाही.अनुक्रमणिका नाही. त्यामुळे सदर औषधे वापरले किंवा नाही याचा बोध होत नाही. त्यामुळे वरील रु.291400/- व रु.954100/- असे एकुण 1245500/- रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वरील खरेदीची नस्ती तपासणीसाठी उपलब्ध झाली नसल्याने सदर खरेदी कोणत्या पध्दतीने करण्यात आली याची तपासणी करता आली नाही त्यामुळे वरील रक्कम रु 1245500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

DATSPSM5701 (Ref No : 91)

## *65 प्रभाग समिती क्र.4 कडे घेणेत आलेल्या साहीत्य खरेदी मधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 312150.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 312150.00 रु.

***आरोग्य विभागाने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2 ) (1) अन्वये निविदा मागवुन साहीत्य खरेदी करणेचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला होता.परंतु स्थायी समितीने सर्वात कमीचे कोटेशन धारक श्री. ए.आर. बेडेकर या पुरवठादाराकडुन 5 (2) (2) खाली विना निविदा साहीत्य खरेदीचा ठराव नियमबाह्यरित्या केलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | पुरवठाधारकाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|

7521 31/3/2011 अवधुतआर.बेडेकर 3,12,150/-

खालील साहित्य खरेदी करणेत आलेले आहे.

| अक्र | वस्तुचे नांव | दर | परीमाण | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | टाटा खोरे | 325 | 300 | 97500/- |
| 2 | समृध्दी पाटया 14 इंची | 225 | 300 | 67500/- |
| 3 | समृध्दी पाटया 16 इंची | 250 | 50 | 12500/- |
| 4 | खराटे | 25 | 880 | 22000/- |
| 5 | ताडपत्री | 4790 | 10 | 47900/- |
| 6 | स्प्रेईंग पंप | 1900 | 5 | 9500/- |
| 7 | कडीच्या बादल्या | 220 | 170 | 37400/- |
| 8 | खुरपी 6 इंची | 127 | 100 | 12700/- |
| 9 | खुरपी 7 इंची | 145 | 60 | 8700/- |
| 10 | कु-हाड | 265 | 10 | 2650/- |
| 11 | संडास धुण्याचे ब्रश | 59 | 100 | 5900/- |
| 12 | छोटी खोरी | 110 | 30 | 9900/- |
| | एकुण | | | 3,12,150/- |

आरोग्य विभागाने महानगरपालिका प्रभाग समिती क्र.4 चे कार्यक्षेत्रात दैनदिन स्वच्छतेच्या साहीत्य खरेदीसाठी रु.3,12,150/- चे खर्चास दि.16.12.2010 रोजी आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.व आरोग्य विभागाने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे संविदा प्रकरण 5 (2) (1) अन्वेय निविदा मागविणेचा प्रस्ताव स्थायी समिती कडे दि.23.12.2010 रोजी सादर करणेत आला होता.स्थायी समिती सभा क्र.24 ठराव क्र.438 विषय क्र.26 दि.29.12.2010 अन्वये आरोग्य विभागाकडे स्वच्छतेसाठी साहीत्य संपलेने तातडीने साहीत्य मागविणे आवश्यक असलेचे नमुद करुन मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 च प्रकरण 5 (2) (2) अन्वये विना निविदा साहीत्य खरेदी करणेस मान्यता दिली आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

आरोग्य विभागाने निविदा दर निश्चित करणेसाठी बाजार भाव चौकशीसाठी मागविलेल्या तीन कोटेशनधारकापैकी सर्वात कमीचा कोटेशनधारक श्री. ए.आर. बेडेकर यांचेकडुन साहीत्य विना निविदा घेणेचा ठराव नियमबाह्य आहे. कारण बाजारभाव चौकशीसाठी मागविलेल्या कोटेशनमध्ये किती प्रमाणात साहीत्य खरेदी करणार आहे याची नोंद नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत.

मान्य ठेकेदाराचे मुंबई दुकान संस्था अधिनियम 1948 प्रमाणे नोंदणीप्रमाणपत्र नसलेने अधिकृत विक्रेता असल्याचे स्पष्ट होत नाही.

महाराष्ट्र शासन ऊर्जा, उद्योग व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस.1093/(2635)/उद्योग 6 दि. 16 जुलै 1993 नुसार 50,000/- चे वरील कामाची / खरेदीची निविदा मागविणे आवश्यक असता दर पत्रकानुसार नियमबाह्यरित्या खरेदी करणेत आलेली आहे.

सदर खरेदी तातडीची आवश्यकता असलेने विना निविदा करणेचे स्थायी समिती ठराव क्र.438 दि.29.12.2010 मध्ये नमुद आहे. परंतु खरेदीचा पुरवठा आदेश जा क्र/ मनपा/आरोवि/6/मि/2010-11 दि.21.03.2011 ने देणेत आली आहे. व साहित्य 24.03.2011 रोजी प्राप्त झाले असुन त्याची नोंद स्टॉक बुक रजिस्टर पान क्र.68,69,70 वर घेणेत आली आहे. व साहित्याचे वाटप दि.14.05.2012 रोजी म्हणजेच पुढील आर्थिक वर्षात करणेत आले आहे. याचाच अर्थ खरेदीची प्रक्रीया 3 महीने चालली असून, साहित्याचे वाटप 2 महीने विलबांने केलेने तातडीची आवश्यकता नसताना साहित्याची खरेदी नियमबाह्यरित्या दरपत्रके मागवून केलेचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 92)

## *66 आरोग्य विभागाच्या औषध खरेदी मधील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष:आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 1162759.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 23255.00 रु.,

***उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस 1094/2679 / उद्योग 6 , मंत्रालय दि:30 मार्च 1994 मधील 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर किमान 3 ग्राहय निविदा प्राप्त झाल्या असतील तरच त्यांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात यावेत. तसेच 1.10 नुसार अल्प प्रतिसादामुळे नियमाप्रमाणे निविदा चौकशीस 2 वेळा मुदतवाढ देणेत यावी असे नमुद आहे. परंतु एका औषधसाठी एकच निविदाधारक आलेने स्पर्धा झालेली नाही.***

| प्रमाणक क्रं. | दिनांक | पुरवठाधारकाचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| 7592 | 31/03/2012 | प्रतिक एंटरप्रायजेस | 73293/- |
| 7593 | 31/03/2012 | संहयाद्री फार्मा | 194115/- |
| 7594 | 31/03/2012 | संहयाद्री फार्मा | 93871/- |
| 7595 | 31/03/2012 | प्रतिक एंटरप्रायजेस | 50205/- |

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या मेडीकल स्टोअर्स मार्फत औषधांची खरेदी करण्यात येते.व महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने व आरोग्य केंद्रांना औषधे वितरीत करण्यात येतात.त्यांच्या अभिलेखाची तपासणी केली असता खालील उणिवा निर्दशनास आल्या.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

आरोग्य विभागामार्फत आयुर्वेदिक औषधाच्या खरेदीसाठी सन 2011-12 साठी वार्षिक एजन्सी नियुक्तीसाठी दि.21.05.2011 रोजी निविदा मागविण्यात आल्या.सदर निविदा 2 लिफाफा पध्दतीने www.smkctenders.com या वेबसाईटवर व स्थानिक वृत्तपत्र सकाळ या वर्तमानपत्रात जाहीरात देऊन मागविण्यात आल्या.महाराष्ट्र शासन ऊर्जा, उद्योग व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस.1088/(2512)/उद्योग 6.दि.2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णय परिच्छेद 8.3 अ नुसार तीन आठवडयाचा कालावधी देण्यात यावा असे स्पष्ट आहे. तथापि सदर विभागाने 21.05.2011 रोजी निविदा प्रसिध्द करुन दि.02.06.2011 पर्यतची म्हणजेच 13 दिवसाची मुदत देण्यात आली.नियमानुसार तीन आठवडे म्हणजेच 21 दिवसांची मुदत देणे आवश्यक होते.त्यामुळे जास्तीत जास्त पुरवठाधारकांना सदर निविदा प्रक्रीयेत भाग घेता आलेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ही बाब मान्य करणेत आली आहे.

सदर निविदा प्रक्रियेत 4 पुरवठाधारकांनी भाग घेतला.त्यामध्ये सहयाद्री सांगली, प्रतिक सांगली, विशाल कोल्हापुर व इमानी मुंबई यांनी भाग घेतला. तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता एकुण 147 औषधांकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यापैकी काही औषधे वगळता अन्य औषधासाठी एकाच निविदा धारकाने एकाच औषधासाठी दर भरले आहेत. एका औषधासाठी तीन पात्र निविदाधारकांनी दर देणे आवश्यक असुन त्यातील कमी रक्कमेच्या निविदाधारकास मंजुरी देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. एका औषधासाठी एकच निविदाधारक असलेने स्पर्धा झालेली नाही. शासन नि.क्र. भांखस-1094/(2679)/उद्योग-6 मंत्रालय दि.30 मार्च 1994 मधील 1.10 प्रमाणे अल्प प्रतिसादामुळे नियमाप्रमाणे निविदा चौकशीस दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता एकाच पात्र निविदाधारकाची निविदा मंजूर केली आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ही बाब अमान्य केली आहे.

औषध खरेदी करण्यासाठी शासनाचे संचालनालय,वैद्यकिय शिक्षण व संशोधन औषध खरेदी कक्ष यांचेकडुन दरवर्षी शासन दर करार केले जातात. त्यामुळे शासन दर करार कंपनी कडून प्रथम औषधांची मागणी करणे आवश्यक होते.व त्यांनी पुरवठा करण्यास असमर्थता दाखविल्यानंतर निविदा मागवुन औषधांची खरेदी करणे योग्य होते.

औषध खरेदी करण्यासाठी शासनाने दरकरार केलेले आहेत. तथापि शासनाच्या दरकरारानुसार खरेदी न करता स्थानिक पातळीवर निविदा मागवुन खरेदी करण्यात आली आहे. अर्धसमास पत्राचे दिलेल्या उत्तरामध्ये महानगरपालिकेने शासनाच्या संबधीत विभागाशी सन 2002 मध्ये पत्र व्यवहार केला असता संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन औषध खरेदी कक्ष मुंबई यांचे पत्र क्र.सवेशिवसं/ औख

क.6/915/2002 दि.8.04.2002 नुसार नगरपालिका व महानगरपालिका यांना दरकरारानुसार औषध खरेदी करणे बंधनकारक नसल्याचे कळविले आहे. शासनाचे दर करार दरवर्षी होत असल्याने निविदा प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन औषध खरेदी कक्ष मुंबई यांचे दरवर्षी वार्षिक दर करार मागवुन औषध खरेदी करणे योग्य होते.

आरोग्य विभागाने सन 2011-12 मध्ये एकुण रु.11,62,759/- ची वार्षिक औषध खरेदी केली आहे.परंतु देयकामधुन आयकर अधिनियम 1961 कलम 194 ( क ) नुसार सन 2011-12 या वर्षासाठी 2 % प्रमाणे आयकर कपात केली नसल्याने रु.11,62,759 x 2% प्रमाणे रु.23255/- मात्र वसुल करणेत यावेत. औषध वापरणेस योग्य असलेबाबतचा शासकीय आरोग्य प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल न घेताच देयक अदा करणेत आले आहे.

उपरोक्त आक्षेपाचे पुर्ततेस्तव रु.23255/- मात्र वसुलपात्र करणेत येत आहेत व रु.11,39,504/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

DATSPSM5701 (Ref No : 93)

## *67 नर्सिंग होम नोंदणी फी दंडासहीत वसूल केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आरोग्य,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 24000.00 रु.,

***मुंबई नर्सिंग होम नोंदणी कायदा 1949 चे कलम 6 नुसार ज्या नर्सिंग होमची नोंदणी करण्यात आलेली नाही. त्यांचे कडुन फी अधिक रु.500/- प्रमाणे पेनाल्टी वसुल करणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.***

मुंबई नर्सिंग होम नोंदणी कायदा 1949 चे कलम 6 मध्ये ज्या नर्सिंग होमची नोंदणी करण्यात आलेली नाही. त्यांचे कडुन फी अधिक रु.500/- प्रमाणे पेनाल्टी वसुल करावी असे नमुद केलेले आहे. आरोग्य विभागाच्या नोंद वहीची तपासणी केली असता परिशिष्ठ क्रमांक ( 10 ) मध्ये नमुद एकुण 48 दवाखान्यांनी उशिराने नोंदणी केल्याचे आढळले.

अर्धसमासज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये पेनल्टी वसुल करणेचे मान्य केले आहे.परंतु लेखापरीक्षण कालावधीमध्ये पेनल्टी वसुल केली नाही.

वरील एकुण 48 दवाखान्यांनी उशिराने नोंदणी केल्यामुळे 48 X रुपये 500/- प्रमाणे रुपये. 24000/- वसुल करण्यात यावेत.

DATSPSM5701 (Ref No : 94)

## *68 जनावरांचा कत्तलखाना चालविणेस देताना केलेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :आरोग्य,*

*अनियमितता कलम : 9ब*

, आक्षेपाधीन रक्कम : 1139412.00 रु.

***महानगरपालिकेने स्वमालकीचा कत्तलखाना चालविणेसाठी निविदा प्रक्रिया न राबविता विद्यमान ठेकेदारास तीन वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे***

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळाने पत्र क्रं.BO/P&L Division /B-729/दि.20/11/10 ने अट क्रं.5 नुसार Enfluent Treatment Plant दि.31/1/11 पर्यंत पूर्ण करणेचे अटीवर कत्तलखाना चालु करणेस परवानगी दिली आहे.

स्थायी समिती सभा क्र.01 ठराव क्र.26 दि.15/4/2010 नुसार उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे विषयपत्रानुसार 2009-10 साठी मक्तेदार नेमणेकामी प्रसिध्द केलेली निविदा प्रक्रियेबाबत अद्याप निर्णय झाला नाही व 2010-11 साठी निविदा प्रक्रिया राबविणेस दिनावधी लागणार आहे असे नमुद आहे. व विलंब टाळणेचे दृष्टीने विद्यमान मक्तेदारास मान्यता देणेबाबतचे प्रस्तावानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सुचविलेली कामे रु.11,39,412/- श्री. बेपारी करणेस तयार असलेने त्यांना पुढील तीन वर्षासाठी प्रत्येक वर्षी रॉयल्टीमध्ये 10% वाढ करुन अनुक्रमे सन 2010-11 साठी रु.2,17,800/- सन 2011-12 साठील रु.2,39,580/- व सन 2012-13 साठी रु.2,63,538/- या प्रमाणे रॉयल्टी रु.7,20,920/- मनपास मिळणार आहेत. त्याबदली रु.11,39,412/- ची कामे ठेकेदार करणेस तयार असलेने त्या एजन्सीला मुदतवाढ देणेत आली आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.15.04.2010 चे विषयपत्रनुसार स्थायी समिती सभा क्रं.01 ठराव क्र.26 दि.15.04.2010 नुसार सन 2008/09 चे मंजुर वार्षिक ठेकेदार मेसर्स बाबाजान अब्दुल बेपारी यांना तीन वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. वार्षिक ठेकेदाराचे मुदत संपलेनंतर नियमाप्रमाणे निविदा मागवुन ठेकेदार निश्चित करणे आवश्यक असता सन 2009-10 व 2010-11 मध्ये त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे कंपोस्ट युनिट, जनरेटर व्यवस्था व बोअरवेल व सबमर्सिबल पंप यांची उपाययोजना करणेचे अटीवर कत्तलखाना चालु करणेस परवानगी दिली आहे. त्यानुसार विविध विभागांनी रु.11,39,412/- ची एस्टीमेंट तयार केली आहेत.

वरील कामे ठेकेदाराने स्वखर्चाने करणेचे अटीवर त्यास कत्तलखाना चालविणेस दिला आहे. सदर विभागांनी पूर्णत्वाचे दाखलेही दिलेले आहेत. परंतु त्याकामांची मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणात दाखविणेत आलेली नसलेने रु.11,39,412/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहेत.

भारतीय जीव जंतु कल्याण बोर्ड, D no.43/2009 PCA दि.14 ऑक्टोबर 2009 नुसार प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टु ऍनिमल (स्लॉटर हाऊस) नियम 2001 3) मधील (IV) नुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे फीटनेस प्रमाणपत्र शिवाय जनावर कापता येणार नाही. तसेच करारपत्र अट क्र.13 प्रमाणे कत्तल करण्यापुर्वी पशुवैद्यकीय अधिकारी मिरज यांचेकडून जनावरे कत्तल करणेस योग्य असलेबाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

करारपत्र स्टँप पेपर (F020918) मधील अट क्र.14 नुसार मक्तेदाराने मनपाच्या सुचनेप्रमाणे कत्तलखाना नोंद रजिस्टर व पावती पुस्तके ठेवणेची आहेत व आठवडा अहवाल मनपास देणेचा आहे. तो लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

अट क्र.24 नुसार कत्तल फी मोठी जनावरे रु.25 व मिटव्हॅन भाडे रु.30/- या दराने व्यावसायिकांकडुन वसुल करणेचे आहे. त्याबाबत मनपा ने प्रमाणित केलेली पावती पुस्तके मक्तेदारास दिलेचे रेकॉर्ड लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATSBKM7201 (Ref No : 95)

## *69 दैनिक परवाना शुल्क गोळा करणेचा ठेका नियमबाह्यरित्या देणेत आले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 20880.00 रु.,

***निविदा मागवुन जास्त देकाराची निविदा मंजूर करणे आवश्यक असता अर्ज घेऊन नियमबाह्यरित्या ठेकेदारास काम देणेत आले आहे.***

सां.मि.कु. मनपाने दैनिक परवाना वसुली बाबत स्थायी समिती ठ.क्र.32 दिन.20/04/2010 नुसार रु.5/- प्रमाणे सांगली रु.10,000/- ,मिरज रु.5000/- , कुपवाड 500/- प्रतिदिन देकार रक्कम ठरवून

दै.ललकार दि.15.05.10 , दै केसरी दि. 12.06.10 , नवसंदेश दि.23.10.10 च्या दैनिकामध्ये लिलावाच्या जाहिर नोटीसा दिल्या. त्यावेळी प्रतिसाद न मिळालेने मनपाने स्वत: वसुली केले नंतर खालील प्रमाणे प्रती महिना उत्पन्न प्राप्त झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| सांगली | रु.32,400/- | (प्रतीदिन 1080) |
| मिरज | रु.7400/- | (प्रतीदिन 247) |
| कुपवाड | रु.1200/- | (प्रतीदिन 40) |

दिनांक 09.12.10 रोजी श्री. दिलीप रामचंद्र जाधव यांनी अर्ज करुन रु.2200/- प्रतीदिन भरणेची तयारी दर्शविली वाटाघाटीने ती रु.2400/- प्रतीदिन करुन स्थायी सभा क्र.3/18.05.11 ठ.क्र.82 ने मक्तेदारास मान्यता देऊन दि.23.07.11 रोजी वर्क ऑर्डर दिली.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

निविदा मागवुन जास्त देकाराची निविदा मंजूर करणे आवश्यक असता अर्ज घेऊन नियमबाह्यरित्या ठेकेदारास काम देणेत आले आहे.

वर्क ऑर्डर सोबतच्या अटी / शर्ती मधील अट क्र.5 पहाता रु.2400/- प्रमाणे 90 दिवसांच्या रक्कमेइतकी अनामत रक्कम रुपये 216000/- त्यांनी ठेका स्विकारणे पूर्वी भरणे बंधनकारक असता ठेकेदार श्री. दिलीप रामचंद्र जाधव यांनी पावती क्र.277736 ने रु.1 लाख इतकी अनामत भरलेने रुपये 1,16,000/- x 18% व्याज = रुपये 20880/- रक्कम ठेकेदाराकडून वसुल करणेत यावी. याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 100)

## *70 देकार रक्कम वेळेत भरणा न केलेल्या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 4527.00 रु.,

***पे-पार्क ठेकेदाराने दर आठवड्यात देकार रक्कम भरणा वेळेत न केल्याने तसेच त्यावरील व्याजाची आकरणी न केल्याने मनपाचे नुकसान झाले आहे.***

सां.मि.कु.मनपा मालमत्ता विभागाने सन 11-12 करीता पे ॲण्ड पार्क निविदा न मागविता सन 10-11 चा ठेकेदार श्री. प्रविण हिंदुराव पाटील यास मागील वर्षाच्या देकार रक्कमेमध्ये 15% वाढ करुन (रुपये 225 चे 15% चे 34 रु.) रु.259/- प्रतीदिन देकार रक्कम ठरवुन त्याच ठेकेदाराला नियमबाह्यरित्या ठेका दिला आहे.

सदर ठेकेदाराने सन 10-11 मधील याच ठेक्याची माहे मे 2010 ते नोव्हें 2010 अखेरची रक्कम 46,125/- पावती क्र.277712 दि.27.04.2011 ने भरणा केला आहे.

याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

सन 10-11 मध्ये पे ॲण्ड पार्क करीता ठेका दिलेल्या ठेकेदाराला स्थायी समिती ठराव क्र.41 दि.20.04.10 ने प्रविण हिंदुराव पाटील यांना दैनंदीन रु.225/- प्रमाणे ठेका देणेत आला होता. त्याच ठेकेदाराला देकार रक्कमेत 15% वाढ करुन 11.12 मध्ये ठेका दिला आहे. मागील वर्षीची पे-पार्कची रक्कम विहीत वेळेत ठेकेदाराने भरलेली नसतानाही त्याचा ठेका रद्द न करता त्यास पुढील वर्षीचा ठेका नियमाबाह्यरित्या दिलेने या ठेकेदाराचे आर्थिक हित जोपासले गेलेचे स्पष्ट होते.

सन 11-12 मध्ये वेळेत निविदा मागवून ठेका निश्चित करणे आवश्यक असता, मागील वर्षीच्या ठेकेदारास मुदतवाढ दिलेने मनपास स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

वर्क ऑर्डर दिनांक 11.04.2011 सोबतच्या अटी व शर्ती मधील अट क्र.4 नुसार ठेकेदाराने दर आठवड्याच्या सोमवारी रक्कम मालमत्ता विभागात भरणा करणेची आहे. 2 आठवड्यापेक्षा जादा विलंब झाल्यास प्रचलित बँक व्याज दराने दंड वसुल करणेचा आहे असे असतादि.27.04.2011 रोजी माहे मे 10 ते नोव्हे 10 ची रक्कम भरणा केलेबाबत व्याजाची रक्कम रु.3271/- ऐवजी र.रु.2835/- घेतलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे ते खालील प्रमाणे.

| महिना | रक्कम भरणा केलेला महिना | विलंब | व्याजाची रक्कम |
|---|---|---|---|
| मे 2010 | एप्रिल 2011 | 11 महिने | 640/- |
| जून 2010 | एप्रिल 2011 | 10 महिने | 563/- |
| जुलै 2010 | एप्रिल 2011 | 9 महिने | 523/- |
| ऑगस्ट 2010 | एप्रिल 2011 | 8 महिने | 465/- |
| सप्टेंबर 2010 | एप्रिल 2011 | 7 महिने | 450/- |
| ऑक्टोंबर 2010 | एप्रिल 2011 | 6 महिने | 349/- |
| नोव्हेंबर 2010 | एप्रिल 2011 | 5 महिने | 281/- |
| | | एकूण र.रु | 3271/- |

3271 – 2835 = 436/- इतके व्याजाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करणेत यावी.

सन 11-12 मध्ये याच ठेकेदाराला सदरचा ठेका 259/- ने देणेत आला आहे. दि.01.09.11 ते 31.10.11 ची देकार रक्कम 15,799/- (61 दिवस x 259 = 15,700/-) पावती क्र.271376 दि.07.12.11 ने पे पार्क किर्द पृष्ठ क्र.71 वर जमा आहे.परंतु 2 महिनेचे व्याजाची रक्कम रु.263/- घेतलेली नसलेने ती वसुल करणेत यावी. दि.01.11.11 ते 31.01.12 अखेर 92 दिवसांचे रु.259/- प्रमाणे र.रु.23,828/- पावती क्र.10149 दि.01.03.12 रोजी जमा केले आहेत. परंतु 5 महिन्याचे व्याज रु.993/- घेतलेली नसलेने ती वसुल करणेत यावी.
याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 101)

## *71 पे-पार्क ची वसुली केली नसलेने झालेल्या नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 377690.00 रु.,

***पे-पार्क करीता निविदा धारक न आलेने मनपाने स्वत:ची यंत्रणा वापरुन वसुली केली नसलेने आर्थिक नुकसान झालेले आहे.***

सन 2011-12 मध्ये इतर जागांचे ठेक्याकरिता निविदा प्राप्त नाहीत. तर मनपाने आपल्या कामगारांकरवी पे ॲण्ड पार्क रक्कम वसुल करणेचे नियोजन न केलेने आर्थिक वर्षात मनपाचे खालील नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | पे व पार्क जागा | प्रतीदिन देकार रक्कम | वर्षातील दिवस कार्यक्रम संख्या | वर्षभरात जमा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद थिएटर | 120 x | 365 दिवस | 43880 |
| 2 | जयश्री चित्रामंदीर | 120 x | 365 दिवस | 43880 |
| 3 | मा.दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहातील कार्यक्रमाच्यावेळी | 475 x | 134 कार्यक्रम | 63650 |
| 4 | महावीर नगर वखारभाग स.न.99/2 मधील ट्रक पार्किंग | 500 x | 365 दिवस | 182500 |
| 5 | आमराई उद्यान आवारात | 120 x | 365 दिवस | 43880 |
| | | | एकूण र.रु. | 3,77,790/- |

मालमत्ता विभागाने मनपाचे कर्मचाऱ्यांमार्फत उपरोक्त 6 ठिकाणची पे ॲण्ड पार्क रक्कम वसुल केली नसलेने र.रु.3,77,690/- चे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. ते संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसुल करणेत यावे.

याबाबत अर्धसमास ज्ञापना चे उत्तर देणेत आलेले नाही.

DATASJF7201 (Ref No : 102)

## *72 खुल्या जागांचे भाडे मागणी न केलेने झालेले आर्थिक नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 24531.00 रु.,

***हरीपूर रोड जागा क्र.12 खुली जागा लिलाव तसेच इतर 10 जाणांकडून भाडे मागणी न केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

मालमत्ता विभागाकडील मक्तेबाब रजिस्टर नगरपालिका लेखा संहिता नियम 110 (1) नमुना क्र. 81 मध्ये ठेवणेत आलेले असून त्याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

रजिस्टर मधील पट्टा मंजूर करणाऱ्या आदेशाचा क्रमांक व दिनांक, भोगवट्याचा दिनांक, पट्ट्याची मुदत या स्तंभामधील कोणतीही माहिती भरणेत आली नसलेने पट्टा कोणत्या वर्षी पासून देण्यात आलेला आहे. त्याची मुदत याबाबतची माहिती समजुन येत नाही. तसेच रजिस्टरवर सक्षम प्राधिकाऱ्याने सह्या केलेल्या नाहीत.

सन 11-12 चे रजिस्टर दाखविणेत आलेले नाही.

सन 10-11 च्या मक्तेबाबत रजिस्टर पृष्ठ क्र. 51 ते 57 वर खालील प्रमाणे नोंदी आहेत. परंतु

मालमत्तेचा तपशील पट्टा मंजूर करणात्या आदेशाचा क्रमांक व दिनांक, भोगवट्याचा दिनांक, पट्टयाची यामधील कोणतेही स्तंभ भरणेत आलेले नाहीत. त्यामुळे सदर मालमत्ता भोगवटादार विना मोबदला वापरत असलेचे स्पष्ट होते. तसेच मालमत्ता विभागाने अक्षम्य दुर्लक्ष केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेचे दिसुन येते.

| अ.क्र. | रजि.पा.क्र | नाव |
|---|---|---|
| 1 | 19 | नाना श्रीमंधर आरवाडे |
| 2 | 20 | गणी अजीज शिकलगार |
| 3 | 23 | स्कॉटर हाऊस चेअरमन गंजीखाना |
| 4 | 25 | सि.स.नं. 369 पैकी 60x90 शिवाजी नगर संस्था, जीवन विद्यालय सांगली. |
| 5 | 27 | सि.स.नं.447 पैकी सांगली शिक्षण संस्था. |
| 6 | 28 | सि.स.नं.1622/2 एकर 8381.45 चौ.मी.32 गुंठे अर्बन पब्लिक हेल्थ सेंटर अपार्टमेंट 13740 रोट्री क्लब सांगली. |
| 7 | 45 | दिनानाथ नाट्यगृह 440/1 नं.117 ची 5226.97 चौ.मी. दत्ता रंगाप्पा मद्रासी. |
| 8 | 49 | शहर कुपवाड येथील स.न.331 व 311 अ, 312 ब,क , 312 अ खुली जागा चेअरमन बालाजी नगर सद्‌गुरु नर्माण संस्था मार्या. कुपवाड 30 वर्षे मुदत. |
| 9 | 50 | शहर सांगली येथील सि.स.नं.1502/12 ची 1875 चौ.मी. परांजपे पार्क फ्लॅट ओनर्स सोसा. 30 वर्षे मुदत. |

हरीपूर रोड सी.स.नं. 552/3 मधील क्र.12 ची 14 फुट x 14 फुट खुली जागा याचा लिलाव न करता ठेवली आहे.

रजिस्टर मधील क्र.24 सि.स.नं. 291/2 ची जागा काळीखण हरीपूर ग्रुप भूईराज मच्छीमार सह. संस्थेची थकबाकी रु.24,531/- असलेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 (ब) नुसार जागा ताब्यात घेणेची व फेर लिलाव करणेची कार्यवाही केली नसलेने मनपास आर्थिक लाभापासून वंचित रहावे लागले आहे.

याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 103)

### *73 बीफ मार्केट मधील गाळ्यांचे भाडे व थकीत रक्कम वसुल न केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 26880.00 रु.,

***बीफ मार्केट मधील गाळ्यांचे भाडे व थकीत रक्कम वसुल न केलेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.***

मालमत्ता विभागाचे मक्तेबाब रजिस्टर सन 10-11 पृष्ठ क्र.20 वरील बीफ मार्केट मधील गाळयांची नोंद आहे. यातील गाळा क्र.2 रिकामा आहे. गाळा क्र.1,3,4 ची थकबाकी व चालू मागणी वसुल करणेत आलेली नाही.

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

मनपाच्या ताब्यात असणारा गाळा क्र 2 चा लिलाव करुन भाडेने देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

गाळा क्र.1, 3 व 4 ची अनुक्रमे थकबाकी रु.14,520/- , रु.11,400/-, रु.960/- व्याजासहित वसुल करणेत आलेली नाही.

याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 104)

### *74 रेवणी प्लॉट्स येथील भाडयाने दिलेल्या जागेची भाडे मुल्य ठरविले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

***रेवणी प्लॉट्स येथील भाडयाने दिलेल्या जागेचे भाडे मुल्य ठरविण्यात आलेले नसून भोगवटादार विना मोबदला जागा वापरत असलेचे स्पष्ट होते.***

मालमत्ता विभागातील मक्तेबाब रजिस्टर सन 10-11 पृष्ठ क्र.6 वरील सि.स.नं. 1086 मधील एकूण 5 जागांपैकी अ.क्र. 4 व 5 च्या जागा अनुक्रमे 20 फूट X 20 फूट व 21 फूट X 23 फूट या श्री. तुकाराम लक्ष्मण पवार यांस दिलेची नोंद आहे.

याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

श्री. तुकाराम लक्ष्मण पवार यांस सि.स.नं. 1086 मधील 20 फूट X 20 फूट व 21 फूट X 23 फूट या दोन जागा कोणत्या ठरावाने काय भाडे दराने, किती वर्षा करिता भाडेने दिल्या या बाबतचे ठराव, याच्या नोंदी इ. रजिस्टरला नोंदविल्या नाहीत.

श्री. पवार यांना दिलेल्या 21 फूट X 23 फूट जागे चे भाडे सन 10-11 पासून मागणी करणेत आलेले नोंदवहीवरुन दिसत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 79 (ड) नुसार भाडे दंडनीय व्याजासह संबंधितांकडून वसुल करणेत यावे.

याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 105)

## *75 रॉकेल डेपोला भूई भाडयाने दिलेल्या खुल्या जागांच्या 1993 पासूनच्या थकबाकीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष:भूमी व मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 17904397.00 रु.,

***मालमत्ता विभागाने वेळेत भाडे न वसुल केलेमुळे म.न.पा.चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

सां.मि.कु. मनपाकडील मालमत्ता विभागाने तत्कालीन न.पा. असताना 1960 पूर्वीपासून सि.स.नं. 143 ते 151/3 या जागा रॉकेल डेपो करिता भूई भाडयाने दिले असलेचे वसाहत रजिस्टर सन 10/11 मधील पृष्ठ क्रं. 26 तसेच त्या सोबत दिलेल्या पत्रव्यवहाराच्या फाईल वरुन दिसते.

***कामाच्या प्रस्तावीत जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसताना प्रकल्प राबविणेत आलेने व झोपडपट्टी धारकांनी विरोध केलेने योजना पूर्ण होणेत अडचणी निर्माण झालेने शासनाचा निधी नाहक गुंतून पडला आहे.***

धोत्रे आबा, सांगली स.नं.305 येथे बाह्य पायाभुत सुविधेसह 94 घरकुले बांधणे.

प्र.क्रं. 07 दि.13.10.2011, रक्कम रुपये 7,64,669/- एम.बी.नं. 17 पा.नं.06

सांगली येथील स.नं. 225/1, 226 संजयनगर,विजयनगर येथे 535 घरकुलांची पायाभुत सुविधेसह बांधकाम करणे.

प्र.क्रं. 06 दि.13.10.2011 रक्कम रुपये 5,09,669/- एम.बी.नं. 17 पा.नं.06

प्रशासकीय मान्यता :- केंद्रीय मान्यता समितीची मंजुरी दि.26 फेब्रु, 2009 दि.02.03.2009 चे पत्रान्वये

स्थायी समिती मान्यता :- स्था.स. सभा क्र.23 ठराव क्र.589 विषय क्र.25 दि.18.02.2010 अन्वये पाच कामे निविदा दरापेक्षा 9.63% जादा दराने मंजुर करणेत आले.

तांत्रिक मान्यता :- दाखविली नाही.

ठेकेदाराचे नाव :- स्ट्रेसक्रीट इंडिया लि. मुंबई

| अ.क्र. | झोपडपट्टीचे नाव | मंजुर घरकुल | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|---|
| 1 | स.नं.305 धोत्रे आबा सांगली | 94 | 1,73,90,000/- |
| 2 | स.नं. 225/1, 226 संजयनगर , विजयनगर पत्र चाळ, सांगली | 535 | 10,70,00,000/- |
| 3 | म्हेतर समाज सांगली | 63 | 1,07,10,000/- |
| 4 | स.नं.443 इंदिरानगर,सांगली | 1406 | 28,12,00,000/- |
| 5 | स.नं.138 इंदिरानगर घरकुल, मिरज | 622 | 12,44,00,000/- |

निविदा मंजूरी समज :-

स.नं.305 धोत्रे आबा सांगली येथे 94 घरकुलांचे बांधकाम करणे. जा.क्र.मनपा/सां/बांधवि/721/2009-10 सांबावि दि.17.03.2010

म्हेतर समाज सांगली येथे 63 घरकुलांचे पायाभुत सुविधांसह बांधकाम करणे. जा.क्र.मनपा/सां/बांधवि/722/2009-10 सांबावि दि.17.03.2010

इंदिरानगर स.नं.443 येथे 1406 पायाभुत सुविधांसह बांधकाम करणे. जा.क्र.मनपा/सां/बांधवि/718/2009-10 सांबावि दि.17.03.2010

सनं225/1, 226 संजयनगर,विजयनगर पत्र चाळ, सांगली येथे 535 घरकुलांचे पायाभुत सुविधांसह बांधकाम करणे. जा.क्र.मनपा/सां/बांधवि/4/2009-10 सांबावि दि.07.04.2010

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे पत्र जा.क्र.उमुअ/जेएनएनयुआरएम/1106/09 दि.26/11/2009 नुसार जे प्रकल्प मंजुरीनंतर सुरु झाले नहीत ते जर 15/12/2009 पर्यंत सुरु झाले नाही तर रद्द करणेत येतील असे नमुद आहे. परंतु मनपा ने त्यानंतर दि.07/01/2010 रोजी लेटर ऑफ इन्व्हीटेशन ने टेंडर मागवून स्थायी समिती सभा क्रं.23 ठराव क्रं. 589 ने दि.18/2/2010 ने निविदा विलंबाने मंजुर केली आहे.

सदर IHSDP कामाच्या D.P.R. तसेच योजना मंजुरीस महासभेची मान्यता न घेताच नियमबाह्यरित्या योजना राबविणेत आली आहे.

धोत्रे आबा स.नं.305 येथे 94 घरकुले बांधणे कामाची वर्क ऑर्डर दि.08.04.2010 रोजी देणेत आली आहे. परंतु नस्तीमध्ये प्रत्यक्षात दिनांक 01..3.2011 रोजी वर्षानंतर काम चालु केलेचे व झोपड्यांचे स्थानांतरण मार्च 11 मध्ये करणेत आलेचे नमुद आहे. जागा ताब्यात घेणे अगोदर वर्क ऑर्डर नियमबाह्यरित्या देणेत आली आहे.

सांगली येथील स.नं.225/1,226 संजयनगर,विजयनगर येथे 535 घरकुलांचे पायाभुत सुविधेसह बांधकाम करणे या कामात तात्क. सांगली न.पा. ने 140 घरांचे साधारण 18 x 12’ आकाराचे भुखंड भाडेतत्वावर दिलेचे निदर्शनास येते. झोपडपट्टी धारकांची बैठ्या घरांची मागणी व विरोधामुळे काम चालु नाही. परंतु त्याच सर्व्हे नंबरमधील मनपाचे मोकळ्या जागेवर 93 घरकुलांचे बांधकाम दि.04.01.2011 रोजी नगररचनाची मान्यता घेवुन चालु करणेत आले आहे. परंतू जागा बदलास महासभेची मान्यता घेणेत आलेली नाही .

म्हेतर समाज झोपडपट्टी सांगली :- झोपडपट्टी धारकांचा घरकुल बांधणेस विरोध व कोर्टामधुन स्थगिती आदेश आणल्याने कामास सुरवात नाही.

इंदीरानगर झोपडपट्टी सांगली :- सन 1984 चे दरम्यान तात्कालीन न.पा.ने 99 वर्षाचे भाडेपट्ट्याने येथील कुटूंबधारकांना जमीन दिलेचे 7/12 पत्रकी इतर हक्कात नमुद आहे. प्रत्येकी 12’ x 18’ मोकळी जागा रेखांकन करुन सुमारे 708 झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसन केले आहे. जागा मनपाचे ताब्यात नसताना नियमबाह्यरित्या या जागेचा D.P.R. मध्ये समावेश करुन मान्यता घेणेत आली. तसेच झोपडपट्टी धाकरांचा विरोध असलेमुळे काम सन 11-12 या आर्थिक वर्षात सुरु नाही.

D.P.R. ला महासभेची मंजुरी न घेणे, तसेच D.P.R. मध्ये नमुद केलेल्या सर्व जागा मनपाचे ताब्यात असून त्या अतिक्रमण मुक्त आहेत. असे प्रमाणपत्र D.P.R. मंजुरी वेळी आयुक्त मनपा यांनी दिले आहे. परंतु लेखापरीक्षणामध्ये झोपडपट्टी धारकांचा विरोध असलेने बांधकामास सुरवात झाली नसलेचे स्पष्ट होते. त्यामुळे पुन्हा बांधकामाचा खर्च वाढुन मनपावर आर्थिक बोजा पडणार आहे. सन 11-12 या आर्थिक वर्षात धोत्रे आबा स.नं.305 मधील 93 घरकुलांचे कामाचे 1 ले रनिंग बील व संजयनगर,विजयनगर मधील 62 घरकुल कामांचे 1 ले बील खर्ची पडले आहे. योजना पूर्ण होणेबाबत  कार्यवाही झालेली नाही.

लाभार्थ्यांची संमती न घेताच प्रकल्प राबविणेत आलेने योजनेस विरोध होऊन शासनाचे व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच योजना यशस्वी होणे बाबत साशंकता निर्माण झालेचे लेखापरीक्षणात दिसून आले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रा विकास मंडळ, पुणे जा.क्र.पुम/मुअ/ स्विस -2/ 1939/11 दि.03.09.2011 3798 घरकुलाकरीता केंद्र शासनाचे हिश्श्याचे अनुदान रक्कम रु.368.333 लाख व राज्य शासनाचे हिश्श्याचे अनुदान रक्कम रु.201.54 असे एकूण अनुदान रक्कम रु569.873 लाख यापुर्वी मनपास मिळाले आहे. व या पत्रामध्ये केंद्र शासनाच्या हिश्श्याचे अनुदान 2123.267 लाख व राज्य शासनाचे हिश्श्याचे अनुदान

रु.222.10 लाख असे एकूण अनुदान रु.2345 लाख मनपास आदा केले आहे. त्यापैकी 20 कोटी रुपये मुदतबंद ठेवीमध्ये मनपाने गुंतविलेले आहेत. उपरोक्त पत्रातील अट क्र.8 नुसार शासनाचे परिपत्रक क्र. जनियो/2009/प्र.क्र.128/गृनियो-2 दि.01.12.2009 नुसार मनपाने वितरीत झालेल्या निधीचा 3 महिन्यात विनियोग न केलेस त्यावर पी.एल.आर.नुसार व्याज आकारणेत येईल असे नमुद आहे. त्याप्रमाणे शासनाकडुन 5 कोटी 69 लाख दि. 7/4/08 रोजी प्राप्त झाले आहेत. व सदर रक्कम सन 2011/12 या आर्थिक वर्षापर्यंत खर्च पडलेली नाही. त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाचे दि.7/4/08 ते दि. 31/3/12 अखेरचे प्राईम लँडींग रेट ( PLR) चा सरासरी दर 13.13 % होत असल्याने रु. 5 कोटी 69 लाख x 13.13% प्रमाणे रु. 74,70,917 x 4 वर्ष= रु. 2,98,83,880 शासनाकडे भरणा करण्यात यावे. तसेच रु. 23,45,00,000 दि . 18/10/11 रोजी प्राप्त झालेने व सन 11- 12 मध्ये पी एल आर प्रमाणे व्याज दर 14.75% असलेने रु. 23,45,00,000 x 1.22 %व्याज प्रतिमहिना प्रमाणे रु. 28,60,900 x 5 महिने = 1,43,04,500/- शासनाकडे भरणा करावेत. परिशिष्ठ क्रमांक ( 03 ) मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचे PLR दर नमुद आहेत.

धोत्रे आबा सांगली येथील झोपडपट्टी धारकांची ट्रांन्झिट कँम्पमध्ये सोय करणेत आली आहे व त्यांचे वैयक्तिक विद्युत देयकावर दिनांक 5/4/11 ते दि. 31/3/13 पर्यत एकूण रु.10,50,068/- नियमबाह्यरित्या खर्च करणेत आला आहे. तो संबंधिताकडून वसूल करण्यात यावा.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रु. 4,52,38,448/- वसूल करण्यात यावी.

DATSBKM7201 (Ref No : 26)

## *95 सांगली महावीर उद्यानामध्ये बागेसाठी इरिगेशन सिस्टीम करणे कामामधील अनियमीतते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 798853.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 798853.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 74372.00 रु.,

***स्थायी समितीने मंजुर निविदा धारकास काम न देता अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2)(2) अन्वये ग्रीनमेक हॉर्टीमेक प्रा.लि. पुणे. यांना अंदाजपत्रकीय दराने नियमबाह्यरित्या काम दिलेने महानगरपालिकेचे रक्कम रुपये 74,372/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 07 दिनांक :- 24/02/2012 रक्कम रुपये :- 7,98,853/-

प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा स्तरीय समिती सांगली यांचे

आदेश क्रं. नपा./मुलभूत/आर.आर./622/ 2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे पत्र 390 - 20 दि. 09/06/2011

स्थायी समिती ठराव क्रं.241 / 11-12 दि.12/08/2011

अंदाजपत्रकीय रककम :- 7,99,900/- , मंजुर दर :- अंदाजपत्रकीय दराने

मक्तेदाराचे नांव :- मंजूर ठेकेदारा ऐवजी मुं.प्रां.अधिनियम 1949 चे प्रकरण 5 (2) (2) अन्वये ग्रीनमेक हॉर्टीमेक प्रा.लि. पुणे.

कार्यादेश :- क्र.मनपा/सां बांधवि/362/11-12 दि. 02/12/2011

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 10 पृष्ठ क्रंमांक :- 9 ते 14

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

सांगली महावीर उद्यानामध्ये बागेसाठी इरिगेशन सिस्टीम करणे या कामासाठी सर्वात कमी निविदा दर 8.80 % कमी ठेकेदार जी.व्ही.पाटील यांचा आला होता. परंतु उक्त ठेकेदारास कामाचा अनुभव नसलेने कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी सदर काम सद्या आमराई व महावीर उद्यान विकसित करण्याची कामे सुरु असलेले मक्तेदार ग्रीनमेक हॉर्टीमेक प्रा.लि. पुणे. यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेबाबत प्रस्ताव ठेवला आहे त्यानुसार आयुक्त यांनी सदर प्रस्तावास मा.आयुक्त निर्णय क्रं.214/2011-12 दि.30.09.2011 ने मान्यता दिली आहे व त्यानुसार स्थायी समिती सभा क्रं.20 ठराव क्रं.402 दि.15.11.2011 ने ग्रीनमेक हॉर्टीमेक प्रा.लि. पुणे. कडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड (2)(2) अन्वये विना निविदा अंदाजपत्रकीय दराने काम करणेस नियमबाह्यरित्या मान्यता दिली आहे.

निविदा अटी व शर्ती मधील अट क्रं.44 नुसार टेंडर मंजुरीनंतर एस्टिमेट रक्कमेच्या 2.5 % सुरक्षा अनामत रोखीने बँक खातेवर भरणे आवश्यक असता 1% अनामत रुपये8000/- पावती क्रं 3402 ने 1.12.2011 रोजी भरणा केली आहे. एस्टीमेट च्या 2.5% प्रमाणे रुपये19,992/- भरणा केली नसलेने रुपये19,992 - 8000 = 11,992/- वरील 10% प्रमाणे बँक व्याजाप्रमाणे रुपये1199/- वसुल करणेत यावेत.

एकूण तीन निविदा धारकांनी निविदा भरल्या असून पात्र निविदा धारकांचा तांत्रिक व दराचा लखोटा उघडलेनंतर मंजुर ठेकेदार श्री.जी.व्ही.पाटील (8.8 % कमी) यांना सदर कामाचा अनुभव नसलेने अपात्र ठरविले आहे.

ग्रीनमेक हॉर्टीमेक प्रा.लि. पुणे. यांची निविदा नसताना तसेच मागणी अर्ज नसताना प्रशासनाचे विषयपत्रानुसार स्थायी समितीने 5 (2)(2)खाली स्थायी समिती सभा क्रं.20 ठराव क्रं 402 दि. 15.11.2011 ने मान्यता दिली आहे. परंतु सदर काम मंजुर ठेकेदाराप्रमाणे 8.8 % कमी दराने काम करणेस तयार असलेबाबत तयार आहे किंवा नाही याची विचारणा न करताच अंदाजपत्रकीय दराने काम देणेत आलेने म.न.पा.चे रुपये70,373/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

सदर काम रद्द करुन नव्याने टेंडर प्रक्रिया राबविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

बागेचे तज्ञ व्यक्तीकडून प्रमाणित केलेले आराखडे सोबत नाहीत तसेच बागा खातेचे सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही.

सदर कामाचे अंदाजपत्रक मान्य दरसूची प्रमाणे न करता दरपृथ:करण केले आहे. परंतु बाजारभावाप्रमाणे साहित्याचे दर विहित पध्दतीने ठरविणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाहीत.

निविदा अटी शर्ती अ.क्र. 29 प्रमाणे कामामध्ये वापरलेल्या साहित्याची जकात भरलेची पावती लेखापरीक्षणास दाखविणेत आलेली नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रं. प्रविति 2305/सहविमा/साबावि/फ-2 दि.12/09/2005 नुसार 1% विमा देयकातून कपात करणे आवश्यक असता 0.50 % कपात केलेने उर्वरित रक्कम रुपये3,999/- कपात करणेत यावी. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रुपये 74,372/- वसुलपात्र व रुपये 7,24,481/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 54)

## *96 सांगली वॉर्ड क्र.71 शामराव नगर महादेव मंदिर कॉलनी रस्ता डांबरी करणे कामामध्ये झालेल्या अनियमीतते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 507901.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 507901.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 32200.00 रु.,

***निविदा कमी दराने आलेने झालेल्या बचतीचे रक्कम अतीरीक्तबाबी साठी वापरणे करीता सक्षम प्रधिकाऱ्याची मंजुरी न घेताच खर्च करणेत आला आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 16 दिनांक :- 26/03/2012 रक्कम रुपये :- 5,07,901/-

प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा स्तरीय समिती सांगली यांचे आदेश क्रं. नपा./मुलभूत/आर.आर./622/ 2011

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे पत्र 152/9/6/201

अंदाजपत्रकीय रककम :- 5,49,000/- , मंजुर दर :- 7.55% कमी.

मक्तेदाराचे नांव :- एस.जी.कुकरेजा,सांगली.

कार्यादेश :- क्र.मनपा/सां बांधवि/371/11-12

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 25 पृष्ठ क्रंमांक :- 24,25,26

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

अंदाजपत्रक बाब क्रं.7 प्रमाणे BBM करणे एकूण काम 1280 चौ.मी. आहे. परंतु मोजमाप पुस्तिका क्रं.25 पान.नं.26 मध्ये एकूण काम 1987.67 चौ.मी. झालेले आहे. सदर जादा कामाची रक्कम रुपये707.07 चौ.मी. x रुपये176.60/- चौ.मी. = रुपये124868.56/- इतकी आहे. तसेच बाब क्रं.8 सिलकोट करणे अंदाजपत्रका प्रमाणे एकूण काम 1280 चौ.मी. आहे. परंतू मोजमाप पुस्तिकेप्रमाणे एकूण काम 1987.07 चौ.मी. आहे. एकूण 707.07 चौ.मी. x रुपये47.95/- चौ.मी. = रुपये33904/- चे इतके काम जादा झाले आहे. मुळ अंदाजपत्राकीय तरतुदी पेक्षा सदर दोन्ही कामे 35% पेक्षा जास्त झाली आहेत. निविदा अटी/शर्ती क्रं.38 प्रमाणे व निविदेमध्ये अंतर्भूत असलेल्या परिमाणापेक्षा 25 % पर्यंत जास्तीचे काम अभियंत्याचे लेखी मान्यता आदेश मिळालेनंतर कंत्राटदाराने करणे आवश्यक आहे. परंतू लेखी मान्यता न घेताच जास्तीचे काम करणेत आले आहे.

सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीका परिच्छेद 227 (1) प्रमाणे अतिरिक्त कामाची रक्कम रुपये10,000/- पेक्षा अधिक होणार नाही असे नमुद आहे. तसेच 228 प्रमाणे कार्यकारी अभियंत्यांनी ज्या ज्या वेळी अतिरिक्त बांधकामासाठी त्याच्या मंजुरीच्या अधिकाराच्या मर्यादेपेक्षा अधिक असलेले दर निश्चित केले असतील तर त्यास उच्च सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक असलेने त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नसलेने जादा कामाची रक्कम रुपये1,58,772/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

निविदा रक्कम रुपये5,49,000/- चे 7.55 % कमीने रुपये5,07,550/- चे मर्यादेपर्यंत काम होणे आवश्यक असता मोजमाप पुस्तक व देयकाप्रमाणे एकूण काम रुपये5,49,379.51/- चे करणेत आले असून त्यामधुन 7.65 % कमीची रक्कम रुपये41,478 /- वजा करुन रुपये5,07,901.36/- चे देयक आदा केले आहे. परंतू जादा कामास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणेत आलेली नाही.

जिल्हा दरसूची सन (10-11), जनरल नोट्स अ.क्रं.023 नुसार तसेच महसुल व वने विभाग अधिसुचना क्र.गौण खनिज 10/1009/PK 309/य-3 दि. 11 फेब्रु. 2010 नुसार रॉयल्टी चार्जेस रुपये200/- प्रती ब्रास प्रमाणे ठेकेदाराने जर महसुल खातेकडे भरले नसतील तर देयकातुन वसुल करणे अवश्यक आहे. त्यानुसार हार्डमुरुम 22 घ.मी. + मृदु मुरुम 38 घ.मी. + 60 मि.मी खडी 113 घ.मी. + BBM 75 मि.मी. जाडीसाठी लागणारी खडी 244.40 घ.मी. असे एकूण 417 घ.मी. साठी रुपये70.67/- घ.मी. प्रमाणे रुपये 29,469.39/- वसुल करणेत यावेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्रा क्रं. प्रविति 2305/सहविमा/साबावि/फ-2 दि.12/09/2005 नुसार 1% विमा देयकातून कपात करणे आवश्यक असता 0.50 % कपात केलेने उर्वरित रक्कम रुपये2731/- कपात करणेत यावीत.

क्रं.न पा / मुलभूत/ आर आर/ 622/ 2011 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, नगरपालिका प्रशासन शाखा दि.08/08/2011 चे पत्रातील अट क्रं.23 नुसार विकास कामांची त्रयस्त संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण

करुन घेणेत आलेले नाही. अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रुपये32,200/- वसुलपात्र व रुपये5,16,800/- आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 55)

## *97 वॉर्ड क्र.74 मिरज येथील बौध्द वसाहत मध्ये 18 सिटचे सुलभ शौचालय कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 2236922.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 2236922.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 129769.00 रु.,

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची ड संविदा प्रकरण 5 (2) (2) नुसार स्थायी समिती ठराव क्र.247 दिनांक 11.08.2009 ने मक्ता मंजूर करणेत आला आहे. कार्यादेश दिनांक 31.08.2009 रोजी दिला असून काम 15.04.11 रोजी पूर्ण झाले आहे. कामासाठी 5 महिन्याची मुदत दिली होती परंतु पूर्ण होणेस 18 महिने लागले आहेत. तातडीची बाब नसताना थेट काम दिले बाबतची कारणे इतिवृत्तात नमुद केलेची कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविणेत आली नाहीत. जाहिर निविदा मागविली नसलेने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7632 दिनांक :- 31.03.2012 रक्कम :- 22,36,922/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 13,85,263/- + 8,52,237 = 22,37,500

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.247 दिनांक 11.08.2009

तांत्रिक मान्यता :- दिनांक 27.01.2009

ठेकेदाराचे नांव :- श्री. पी. आर. कन्स्ट्रक्शन.

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 31.08.2009 कामाची मुदत :- 5+6=11 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 16 पृष्ठ क्रमांक :- 23 ते 42

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचालननालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.23369/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु. 23369/- देयकातून कपात केलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची ड संविदा प्रकरण 5 (2) (2) नुसार मक्तेदार श्री. पी.आर. कन्स्ट्रक्शन यांना स्थायी समिती ठराव क्र.247 दिनांक 11.08.2009 ने मक्ता मंजूर करणेत आला. त्यांना कार्यादेश दिनांक 31.08.2009 रोजी दिला असून सदरचे काम 15.04.11 रोजी पूर्ण झाले आहे. कामासाठी 5 महिन्याची मुदत दिली होती परंतु पूर्ण होणेस 18 महिने लागले आहेत. तातडीची बाब नसताना थेट काम दिले बाबतची कारणे इतिवृत्तात नमुद केलेची कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविणेत आली नाहीत. जाहिर निविदा मागविली नसलेने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही. काम करणेस मूळ मुदतीपेक्षा सुमारे 13 महिन्याचा कालावधी लागला आहे. विलंबाबाबतची कारणे नस्तीमध्ये नमुद केलेली नाहीत

मक्तेदारास निविदा फॉर्म देऊन त्यातील अटीशर्ती प्रमाणे करारानामा करुन घेतला नाही. मक्तेदाराच्या कार्यक्षमते बाबत निविदा फॉर्म मधील क्र.1 ते 4 भरुन घेतले नाहीत. व कार्यक्षमता जाणून घेण्या अगोदरच थेट काम दिले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक्र क्र.सिएटी 09/05/प्रक्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15/05/2007 नुसार मक्तेदारासबी-1 टेंडर फॉर्म देऊन त्याची किंमत रु.1000 वसूल केले नाहीत.

स्थायी समिती ठराव क्र.293 दि. 28/09/10 मुदतवाढ प्रस्ताव मान्य केला आहे. परंतु विलंबाबाबत दंड वसुल करणेत आलेला नाही.

मोजमाप पुस्तक क्र.16 च्या पृष्ठ क्र.23 ते 42 वर मापे नोंदली आहेत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 प्रमाणे पृष्ठ लाल शाईने क्रॉस केली नाहीत. व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा नमूद केला नाही.

बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बी.डी.जी. 2005/प्रक्र 324/ इमारती -2 दिनांक 03 मार्च 2006 मधील परिच्छेद क्र. 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे मुल्यवर्धीत कर अधिनियमाचे कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने उर्वरित रक्कम रुपये 44731/- वसुल पात्र आहे.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर मोठया प्रमाणात झालेला आहे. परंतू महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी.

बाब क्र.2- रबल फिलींग ट्रॅप हॅण्ड ब्रोकन 49.62 घ.मि.

49.62/2.83=17.53ब्रास x रु.200= रु. 3506 रु. 3506

बाब क्र.3- सिमेंटकॉंक्रीट 50.84 घ.मी.

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.4- | सिमेंटकॉंक्रीट | 08.23 घ.मी. |
| बाब क्र.5- | हार्ड मुरुम | 328.58 घ.मी. |
| बाब क्र.6- | सिमेंटकॉंक्रीट | 09.29 घ.मी. |
| बाब क्र.7- | सिमेंटकॉंक्रीट | 09.43 घ.मी. |
| बाब क्र.9- | सिमेंटकॉंक्रीट | 24.82 घ.मी. |
| बाब क्र.10- | सिमेंटकॉंक्रीट | 12.47 घ.मी. |
| बाब क्र.11- | सिमेंटकॉंक्रीट | 0.98 घ.मी. |
| | | ---------------- |
| | | 444.64 घ.मी. |

444.64/2.83=157ब्रासx रु. 200 = रु.31400/ रु. 31400/

बाब क्र.14- पाईप फुटींग फौंडेशन बिम कॉलम् 6.70 मे.टन

6.70x1.35=9.04/2.83=3.19ब्रासx रु. 200= रु. 638 रु. 638

बाब क्र.18- सिमेंटप्लास्टर 338.83 घ.मी.

बाब क्र.19- आतील प्लास्टर 86.83 घ.मी.

---------------

425.66 घ.मी.

425.66/100=4.25x2.6=11.5/2.83=3.90ब्रास x रु.200=रु. 780 रु. 780

बाब क्र.20- प्लास्टर 532.45 चौ.मी.

532.45/100=5.32x2.6=13.83/2.83= 4.88 ब्रास Xरु.200= रु. 976 रु. 976

-----------------

रु. 37,300/

बाब क्र.21- फरशी बसविणे वाळूसह 48.00 चौ.मी.

बाब क्र.63- वोव्हर ग्रीव्ह प्लास्टर 98.93 चौ.मी.

या कामासाठी बाबवार खडी वाळू किती लागली या बाबत वापर पत्रक तयार करणेत आलेले नाही.

दिनांक 31/08/2009 च्या वर्क ऑर्डर मध्ये रुपये 13,85,263/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे काम होते. दिनांक 26/10/2010 रोजी आणखी रुपये 8,52,237 चे काम वाढीव काम मंजूर करणेत आले आहे. परंतु सुधारित अंदाजपत्रक तयार करुन मान्यता घेणेत आलेली नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 56)

## ***98 वॉर्ड क्र.14 उत्तर कला नगर ओपन स्पेस मधील सांडपाण्याचा निचरा करणे कामातील अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 497910.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 497910.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 23198.00 रु.,

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" संविदा प्रकरण 5 (2) (2) नुसार 13.12.2011 ने थेट काम दिले आहे. वर्क ऑर्डर दिनांक 06.01.2012 ला देणेत आली व सदरचे काम 06.02.2012 ला पूर्ण झाले या प्रक्रियेस सुमारे 13 महिने कालावधी लागला असे असताना विना निविदा काम देणेचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7215 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 4,97,910/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,98,400/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.460 दिनांक 13.12.2011

तांत्रिक मान्यता :- दिनांक 16.11.2011

ठेकेदाराचे नांव :- विनल जोशी

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 06.01.2012 कामाची मुदत :- 60 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 18 पृष्ठ क्रमांक :- 30

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रुपये 4984 देयकातुन कपात केला नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए. 2009/ प्रक्र 108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 4984 देयकातुन कपात केले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" संविदा प्रकरण 5 (2) (2) नुसार मक्तेदार विमल जोशी यांना स्थायी समिती ठराव क्र.460 दिनांक 13.12.2011 ने थेट काम दिले आहे. परंतु थेट काम देणेपूर्वी स्थायी समितीने कार्यवृत्तात असे करण्याची कारणे नमुद केल्याचे लेखा परिक्षणात दाखविणेत आले नाही. काम करणेबाबत रेल्वेचे पत्र दिनांक 20.11.2010 ने मंजुरीमिळाली असून, त्याबाबतचा प्रस्ताव दिनांक 16.11.2011 ला टिपणीद्वारे ठेवला आहे. दिनांक 13.12.2011 रोजी ठराव क्र.460 मंजूर केला व वर्क ऑर्डर दिनांक 06.01.2012 ला देणेत आली व सदरचे काम 06.02.2012 ला पूर्ण झाले या प्रक्रियेस सुमारे 13 महिने कालावधी लागला असे असताना विना निविदा काम देणेचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही. निविदा न मागविलेने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

मोजमाप पुस्तक क्र.18 पृष्ठ क्र.30 वर मापे नोंदली आहेत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182

नुसार पृष्ठ लाल शाईने क्रॉस केले नाहीत व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा नोंदला नाही.
अंदाजपत्रकावर दरपृथ:करण केलेची नोंद आहे. परंतु प्रत्यक्ष दरपृथ:करण करुन सहीनिशी मान्य केलेचे कागदपत्रे दाखविले नाहीत.
बाब क्र.1 नुसार या कामामध्ये 110 ते 600 एम.एम. व्यासाची 45 रनिंगमीटर पाईप व बाब क्र.2 नुसार जी आय पाईप 45 रनिंग मीटर चा वापर झाला आहे. 3% जकात रक्कम रु.13,230/- भरणा केलेची पावती किंवा सुट दिल्या बाबतचे कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 57)

## *99 मिरज अविकसीत भागात मुरुम टाकणे याकामातील अनियमीतते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 246981.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 246981.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 55040.00 रु.,

***स्थायी समिती ठराव क्र.455 दिनांक 13.12.12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील संविदा 5 (2)(2) नुसार मक्तेदारास थेट अंदाजपत्रकीय दराने नियमबाह्यरित्या मक्ता मंजुर केला आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 6969 दिनांक :- 15.03.2012 रक्कम :- 2,46,981/-
अंदाजपत्रकीय रक्कम :- 2,49,277/-
प्रशासकीय मान्यता :- मा. स्थायी समिती ठराव क्रमांक 455 दि.13.12.2011
तांत्रिक मान्यता :- 459 दिनांक 08.07.2011
ठेकेदाराचे नांव :- मुस्तफा मुश्रीफ
कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 21.01.2012 कामाची मुदत :- 30 दिवस
मोजमाप पुस्तक क्रमांक :- 21 पृष्ठ क्रमांक :- 45
सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.
स्थायी समिती ठराव क्र.455 दिनांक 13.12.12 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील संविदा 5 (2)(2) नुसार मुस्तफा मुश्रीफ या मक्तेदारास थेट अंदाजपत्रकीय दराने मक्ता मंजुर केला याच नियमातील तरतुदी प्रमाणे थेट मक्ता मंजूर करणे पुर्वी स्थायी समितीच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करणे आवश्यक

आहे. कार्यवृत्त लेखा परीक्षण कामी दाखविणेत आलेले नाही. थेट काम दिल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

मक्तेदारास बी-1 फॉर्म दिला नाही व त्यातील क्लॉज प्रमाणे फॉर्म मधील पृष्ठावर मक्तेदाराची स्वाक्षरी घेऊन त्यासह करार केला नाही.

सा.बां.वि. शासन परीपत्रक क्र.सी.ए.टी. 09/05/प्रक्र381 इमारती-2 दिनांक 15.05.2007 अन्वये बी-1 निविदा फॉर्मची किंमत रुपये 500/- वसुल केली नाही.

विमा संचलनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र प्रविनी 2305 सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रुपये 2470/- कपात केला नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र बीसीए/2009 प्र क्र 108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकर रुपये 2470/- देयकातुन कपात केला नाही.

अंदाज पत्रक व देयकातील बाब क्र.1 नुसार 702.15 घन मीटर हार्ड मुरुम कामासाठी वापरणेत आला. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी 248 ब्रास मुरुम x रु.200/- = रु.49,600/- देयकातुन वसुल केलेले नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 58)

## *100 धुळबूळु गल्ली अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 393830.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 393830.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 22776.00 रु.,

***देयकामधून विमा, रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल करणेत आलेला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 693 दिनांक :- 15.03.2012 रक्कम :- 3,93,830/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,02,631/-

प्रशासकीय मान्यता :- प्रभाग समिती क्रमांक 4 ठराव क्रमांक 30 दिनांक 12.01.2009

तांत्रिक मान्यता :- 329 दिनांक 01.12.2008

ठेकेदाराचे नांव :- चंद्रकांत हुडेद

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 25.01.2010 / 01.12.2011 कामाची मुदत :- 45 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 6 पृष्ठ क्रमांक :- 15 ते 16

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बीसीए 2009 प्र.क्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रु.3938/- देयकातुन कपात केला नाही.

विमा संचलनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र प्रविती 2305 सहविमा/साबाबी/ फ-2 दिनांक 12.09.05 नुसार 1% कामगार विमा रक्कम रुपये 3938/- देयकातून कपात केला नाही.

या कामामध्ये गौण खनिज मुरुम व खडी यांचा वापर करणेत आला आहे. व वापर पत्रक तयार करणेत आलेले नाही. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे बाब क्र.2 व 3 ची रॉयल्टी 189.62 घन मीटर x रुपये 70.67/घन मीटर प्रमाणे रक्कम रु.13,400/- वसुलपात्र आहे. तसेच बाब क्र.5 सीलकोट 1505 चौ.मीटर ची रॉयल्टी गणना करुन वसुल करावी.

कूण 3 निविदा आल्या पैकी श्री.चंद्रकांत हुडेद याची निविदा 4.20 जास्त व सर्वात कमी दराची प्राप्त झाली आहे. परंतु निविदा बी-1 फॉर्म त्यांना देणेत आला नाही. व फॉर्ममधील अटी शर्ती प्रमाणे करार केलेला नाही.

सर्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र सीए टी09/05/प्रक्र 381 इमारती-2 दिनांक 15.05.2007 नुसार फॉर्मची किंमत र.र 500x3 = 1500/- वसुल केले नाहीत.

निविदेस जाहीर प्रसिध्दी दिल्या बाबतचे वर्तमान पत्राचे कात्रण अथवा मुळ वर्तमान पत्र प्रत नाही. प्रस्तावावर सक्षम अधिकारी यांचे वित्तीय अभिप्राय घेणेत आले नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 59)

## *101 सांगली वॉर्ड क्र.1 धावडे घर ते सदा शिंदे घर रस्ता डांबरीकरण कामातील लेखा विषयक त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 708048.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 708048.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 73868.00 रु.,

***सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीका नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा आल्याने घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची घट अंदाजपत्रकास मंजूरी घेतली नाही. कामास तांत्रिक मान्यता दि:27/08/2010 रोजी मिळाली असून कार्यादेश दि:28/07/2011 रोजी जवळपास एक वर्ष विलंबाने देणत आलेला आहे. नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 171 चे 6 प्रमाणे कार्यवाही***

| |
|---|
| ***करणेत आलेली नाही.*** |

प्रमाणक क्रमांक :- 7214 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 7,08,048/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 8,96,555/-

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय क्रमांक 194 दिनांक 13.09.2010

तांत्रिक मान्यता :- दिनांक 27.08.2010

ठेकेदाराचे नांव :- तुषार वसंतराव चव्हाण

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 28.07.2011 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 10 पृष्ठ क्रमांक :- 31 ते 35

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचलनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1 % कामगार विमा रक्कम रुपये 7084 कपात केले नाहीत.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र बीसीए 2009 प्रक्र 108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रु.7084/- देयकातुन कपात केला नाही.

दैनिक पुढारीत दिनांक 05.12.2010 रोजी जाहीर प्रसिध्दी देऊन निविदा फॉर्म विकले व दोन मक्तेदार यांनी निविदेत भाग घेऊन निविदा दिली. श्री. तुषार वसंतराव चव्हाण या मक्तेदाराची निविदा सर्वात कमी दराची 21% कमीने आली. एवढ्या कमी दराने काम कसे करणार याबाबत मक्तेदार यांचा खुलासा घेतला नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र दि.15.05.2007 नुसार 3 निविदा फॉर्म x किंमत रु.500/- = 1500/- वसुल केले बाबतचे कागदपत्रे दाखविले नाहीत. रक्कम रुपये 1500/- वसुल करणेत यावेत.

सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीका नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा आल्याने घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची घट अंदाजपत्रकास मंजूरी घेतली नाही.

मोजमाप पुस्तक क्र 10 पृष्ठ क्र 31 ते 35 वर नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार लाल शाईने क्रॉस करुन पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा नमुद नाही.

छाया प्रतीत देयक आहे. मुळ प्रतीत देयक पारीत न करता छाया (झेरॉक्स) प्रतीत देयक पारीत करणे बाबतची नियमातील तरतुद विषद केली नाही.

या कामात गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.2 | हार्ड मुरुम | 581.36 घन मीटर |
| बाब क्र.3 | 40 mm टॉप मेटल | 188.70 घन मीटर |
| बाब क्र.6 | सॉफ्ट मुरुम | 54.840 घन मीटर |

------------------------------------

824.90 ÷ 2.83 = 291 ब्रास

-------------------------------------

291 ब्रास x रु.200/- = रुपये 58,200/- रॉयल्टी वसुल पात्र आहे.

वापर पत्रक तयार केलेले नाही व बाब क्र.9 सील कोट 3188.72 चौ.मीटर मध्ये वापरलेल्या खडीचे प्रत्येक ब्रासला रु.200/- प्रमाणे रॉयल्टी वसुल करणेत आलेली नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 60)

***102 प्रभाग समिती क्र.4 च्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील बी.बी.एम. सीलकोट करणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 966861.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 966861.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 50874.00 रु.,

***मोजमाप पुस्तक क्र. 5 पृष्ठ 29 ते 42 वर मापे नोंदली आहेत. सार्व.बांध.विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 1097/सी आर 622/ इमारती 2 दिनांक 29/06/1999 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी 5% चेकींग दिले नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7309 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 9,66,861/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 9,75,187/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र. 435 दिनांक 22.11.2011

तांत्रिक मान्यता :- 261 दिनांक 08.09.2010

ठेकेदाराचे नांव :- गणपती मजूर सह. सोसायटी

कार्यादेश क्रामंक / दिनांक :- 06.01.2012 कामाची मुदत :- 60 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 5 पृष्ठ क्रमांक :- 29 ते 42

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए 2009 प्रक्र108 /कामगार 7 अ दिनांक 17 जूल 2010 नुसार कामगार कल्याण उपकर र.रु.9689/- देयकातून वसुल केले नाहीत.

मोजमाप पुस्तक क्र. 5 पृष्ठ 29 ते 42 वर मापे नोंदली आहेत. सार्व.बांध.विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 1097/सी आर 622/ इमारती 2 दिनांक 29/06/1999 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी 5% चेकींग दिले नाही.

गणपती मजूर सहकारी संस्थेस दिनांक 21.10.2011 च्या पत्राने कामाचे वाटप करणेत आले आहे. या संस्थेस बी-1 टेंडर फॉर्म दिला नाही व या फॉर्ममधील अटी शर्तीवर मक्तेदार यांच्या सह्या घेतल्या नाहीत. तसेच फॉर्म मधील क्लॉज प्रमाणे करारही केला नाही.

सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र. सीएटी.09/05/प्रक्र 381/इमारत-2 दिनांक 15.05.2007 नुसार बी-1 टेंडर फॉर्मची किंमत रु.500/- घेतली नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्राविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रुपये 9689/- कपात केली नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार उपकर रक्कम रु.9689/- कपात केला नाही.

या कामात गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे. तपशील खालील प्रमाणे.

बाब क्र.2 40 mm trap metal 298=67 घन मीटर

बाब क्र.4 सॉफ्ट मुरुम 114.92 घन मीटर

---------------------

413.59 घ.मी.

413.59/2.83=146.14 ब्रास x रु. 200 = रु. 29,228

बाब क्र.8 सील कोट 2780.30 चौ.मी.

2780.30/100=27.80 x 0.9 = 25.02 / 2.83 = 8.84ब्रासx200= रु. 1768

------------------

रु. 30,996

किती ब्रास खनिज वापरले या बाबतचे वापर पत्रक तयार करणेत आलेले नाही. महाराष्ट्र शासन,

महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 61)

## *103 वॉर्ड क्र.45 रमामाता कॉलनी मिरज ड्रेनेज पाईप टाकणेकामातील लेखाविषयक त्रुटी बाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बाधकाम, राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 339322.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 339322.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 34452.00 रु.,

***स्थायी समिती ठराव क्र.655 दिनांक 12.03.2010 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा 5 (2)(2) अन्वये जाहीर निवीदा न काढता मक्तेदार श्री.भागवत रोकडे यांना थेट काम दिले. कोणतेही खास कारण नसताना थेट काम दिले. यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही.***

प्रमाणक क्रमांक -: 257 दिनांक -: 17.09.2010 रक्कम -: 3,39,322-/

अंदाजपत्रकीय रक्कम -: 8,38,995/-

प्रशासकीय मान्यता मा.स्थायी समिती ठराव क्र.655 दिनांक -:12.03.2010

तांत्रिक मान्यता -: 63 दिनांक 12.01.2010

ठेकेदाराचे नांव :- श्री.भागवत रोकडे

कार्यादेश क्रमांक -: दिनांक 31.03.2010 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक -:67 पृष्ठ क्रमांक :- 95 ते 98

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.655 दिनांक 12.03.2010 ने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा 5 (2)(2) अन्वये जाहीर निवीदा न काढता मक्तेदार श्री.भागवत रोकडे यांना थेट काम दिले. कोणतेही खास कारण नसताना थेट काम दिले. यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही.

र.रु. 50,000/- वरील अंदाजपत्रकीय दराने काम असलेने मक्तेदारास "बी-1" फॉर्म विकून त्यातील क्लॉज प्रमाणे करार करणेत आला नाही. बी-1 फॉर्म ही कराराचा एक भाग आहे नियम बाहृय करार करणेत आला आहे.

सा.बा.वि. शासन परिपत्रक क्र.सी ए टी 09/05 प्र क्र 381/ इमारती – 2 मंत्रालय दिनांक 15.05.07 अन्वये बी-1 फॉर्मची किंमत रुपये 500/- घेतली नसलेने रक्कम रु.500/- वसुल करुन भरणा करावी.

हे काम सुरु करणेचा आदेश दिनांक 31.03.2010 रोजी दिली व 90 दिवसांची मुदत देणेत आली. जून 2010 अखेर काम पूर्ण होणे आवश्यक होते. 6 महिने विलंबाने दिनांक 11.01.2011 रोजी पूर्ण झाले मुदतवाढ प्रस्ताव दाखविणेत आला नाही. तसेच वेळीच काम पूर्ण करणेची मक्तेदाराची क्षमता नसताना त्यांना थेट काम देणेत आलेचे स्पष्ट होते.

मोजमाप पूस्तक क्र.67 पृष्ठ क्र.95 ते 98 व मोजमाप पूस्तक क्र.2 पृष्ठ क्र.39 ते 41 वर मापे नोंदविली आहेत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार देयक पारीत केल्यानंतर लाल शाईने पृष्ठ क्रॉस केले नाहीत व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा मोजमाप पूस्तकात नोंदला नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दि.12.09.2005 नुसार 1% प्रमाणे रक्कम रु.8448/- विमा कपात करणेत यावा.

उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार कामगार उपकर र.रु.8448/- वसुल करुन जमेच्या लेखाशिर्षाखाली जमा केली नाही.

वॅटची रक्कम रु.16,736/- वसुल केली आहे 2% प्रमाणे 16896/- होते यातही रु.160/- ची तफावत आहे.

रक्कम रुपये 160/- वसुल पात्र आहे. सार्वजनिक बांधकामविभागाचा शासन निर्णय क्र.बी डी जी 2005/प्र क्र 324 /इमारती 2 दिनांक 03.03.2006 मधील परिच्छेद 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे अधिनियम कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नाही. त्यामुळे 4% र.रु.33,792/- वसुल करणे आवश्यक होते. परंतु रु.16,736/- एवढीच रक्कम वसुल केल्याने उर्वरीत रक्कम रुपये 17,056/- वसुल करावी.

या कामात खडी, वाळु,वीट, माती अशा गौण खनीजांचा वापर केला आहे असे गौण खनिज कोणत्या प्रकारचे, किती ब्रास वापरले याबाबत वापर पत्रक नाही. व महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रु.200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करणेत आलेली नाही.

खुदाई केलेली शिल्लक माती वहातुक करुन टाकली आहे व या कामी रुपये 66.49 दराने रु.11818.59/- आदा केले. माती टाकणेचा वहातुक चार्ट नस्तीत नाही.

बाब क्र.2 प्रमाणे मातीची खुदाई 727.33 घन मीटर व खुदाईतील 56.08 घन मीटर पाईपचे काम झाल्यानंतर तोच खड्डा752.23 घन मीटर मातीने बुजविला व 177.75 घन मीटर माती वाहतुक करुन लांब टाकली. खड्डा कमी आकाराचा असताना नंतर जास्त मातीने भरणेत आला आहे.त्यामुळे 177.75 घन मीटर माती वाहतुकीची रक्कम रु.11818.59/ वसूल करणेत यावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 62)

## *104 वॉर्ड क्र.73 गल्ली अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 73030.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 73030.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 4081.00 रु.,

***सार्व. बांधकाम नियम पुस्तीका नियम 150 प्रमाणे 10% पेक्षा कमी दराची निविदा असल्याने मुळ अंदाजपत्रक रद्द करुन घट अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेतली नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7324 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 73,030/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 1,03,436/-

प्रशासकीय मान्यता :- मा. आयुक्त निर्णय क्रमांक 234 दिनांक 01.10.2010

तांत्रिक मान्यता :- 269 दिनांक 08.09.2010

ठेकेदाराचे नांव :- अजित ना. जाधव

कर्यादेश क्रमांक / दिनांक :- 16.05.2011 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 21 पृष्ठ क्रमांक :- 39 ते 40

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या पैकी श्री.अजीत ना.जाधव यांना 27.80% कमी दराने काम दिले हे काम इतक्या कमी दराने ते कसे करणार या बाबत मक्तेदाराचा खुलासा घेतला नाही.

सार्व. बांधकाम नियम पुस्तीका नियम 150 प्रमाणे 10% पेक्षा कमी दराची निविदा असल्याने मुळ अंदाजपत्रक रद्द करुन घट अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेतली नाही.

मक्तेदार यांना निविदा फॉर्म बी-1 र.रु.500/- ला विकत देऊन त्यातील क्लॉज प्रमाणे काम करणे बाबत त्याच्यासह्या घेतल्या नाहीत नियमबाह्य कार्यवाही केली आहे. र.रु.500/- वसुल करावेत.

मोजमाप पुस्तक क्र.21 मधील पृष्ठ क्र.39, 40 लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार लालशाईने क्रॉस केली नाहीत व रककम पास केलेचा शेरा नोंदला नाही.

शासन परीपत्रक क्र.संकीर्ण 2009/प्र क्र 123/परा 7 दिनांक 30 आक्टों.2009 नुसार कामगार उपकर रक्कम र.रु.730/- वसुल करुन भरणा केला नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा र.रु.730/- कपात केला नाही.

बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी/2005/प्रक्र 324/इमारती-2 दिनांक 03.03.2006 मध्ये दर्शविल्या प्रमाणे मुल्यावर्धीत कर अधिनियम कलम 8 प 9 खाली मक्तेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने 4% ने र.रु.2921/- वसुल केले नाहीत. 2% ने र.रु.1461/- वसुल पात्र आहे.

या कामामध्ये गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.

बाब क्र.2 सिमेंटकाँक्रीट 6.92 घन मीटर

6.92x1.35=9.34/ 2.83=3.30 ब्रासxरु.200 = रु. 660

बाब क्र.5 पेव्हींग ब्लॉक 60 mm 139.69 चौ.मी.

पेव्हींग ब्लॉक बसविणे पूर्वी त्याखाली 139.69 चौ.मी. वाळु किंवा 6 mm बारीक खडीही लेव्हलसाठी पसरावी लागते असे गौण खनिज किती लागले आहे या सह सर्व खनीजाच्या वापरा बाबत वापर पत्रक तयार करणेत आलेले नाही व महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 63)

## ***105 वॉर्ड क्र.35 मार्केटयार्ड येथील एकता कॉलनी अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे कामातील लेखा विषयक त्रुटी बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 1091969.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 1091969.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 22340.00 रु.,

***सां.बां.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण 1097/सी आर 622/इमारती-2 दिनांक 29.06.1999 नुसार मोजमाप पुस्तकात उपअभियंता यांनी मापे नोंदली नाहीत. तसेच 100% चेकींग केलेले नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 6978 दिनांक :- 15.03.2012 रक्कम :- 10,91,969/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 11,99,000/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.242 दिनांक 12.08.2011

तांत्रिक मान्यता :- 228 दिनांक 14.06.2011

ठेकेदाराचे नांव :- आशीफ लष्करी

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 05.11.2011 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 12 पृष्ठ क्रमांक :- 47 ते 48

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

कामाचा विमा 5962 घेतला परंतु विमा संचालनाय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सहविमा/साबावी/फ-2 दिनांक 12-09-2005 नुसार 1% कमगार विमा रक्कम रुपये 10920/- कपात केली नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र बी.सी.ए.2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1 % कामगार कल्याण उपकर रु.10920/- देयकातुन कपात केला नाही.

एकूण प्राप्त निविदा 4 पैकी श्री. आशीफ लष्करी या मक्ते दाराची निविदा सर्वात कमी 8.80 % कमी दराची आहे. त्यांचे नावे मक्ता मंजूर आहे परंतु त्यांना बी-1 टेंडर फॉर्म देऊन त्या प्रमाणे करारनामा केला नाही.

सा.बां.वि. शासन परिपत्रक क्र.सी.टी.09/05/प्रक्र 381/इमारती-2 दिनांक 15.05.2007 अन्वये बी-1 फॉर्मची किंमत रु.500/- वसुल केली नाही.

मोजमाप पुस्तक क्रं.12 पृष्ठ क्र.47 ते 48 मोजमापांची नोंद आहे. नगर पालिका लेखासंहिता 1971 नियम 182 नुसार लाल शाईने पृष्ठ क्रॉस केले नाही व रक्कमेचा शेरा नमुद केला नाही.

सां.बां.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण 1097/सी आर 622/इमारती-2 दिनांक 29.06.1999 नुसार मोजमाप पुस्तकात उपअभियंता यांनी मापे नोंदली नाहीत. तसेच 100% चेकींग दिले नाही.

दैनिक पुढारी मध्ये दिनांक 13.08.2011 ला जाहीर निविदा प्रसिध्द केली. प्रसिध्दी बाबत दैनिक पुढारीची प्रत उपलब्ध केली नाही. मक्तेदाराचे नस्तीतील सर्व कागदपत्रे छायाप्रतीत आहेत.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.

बाब क्र.2 काँक्रीट ब्लॉक 80 mm जाडी 1459.54 चौ.मी. चे खाली वापरण्यात आलेल्या खडी व वाळु चे परिमाण नमुद नाही. व त्याची रॉयल्टीही भरणेत आलेली नाही.

बाब क्र.3 सिमेंटकाँक्रीट 1:2:4 7.32 घन मीटर

या कामात खडी, वाळु इत्यादी खनिजाचा वापर किती ब्रास आहे. या बाबतचे वापर पत्रक तयार केलेले नाही. तसेच महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 64)

## *106 सांगली येथील आशिर्वाद बंगला ते 100 फुटी रोड पर्यंत रस्ता बी.बी.एम करणे कामातील अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 1560837.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 1560837.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 125258.00 रु.,

***देयकातून विमा, रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल केलेला नाही. तसेच मोजमाप पुस्तीकेमध्ये उप अभियंता यांनी 100 टक्के चेकिंग दाखविलेले नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7304 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 15,60,837/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 15,67,220/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.371 दिनांक 02.03.2009

तांत्रिक मान्यता :- दिनांक 11.12.2009

ठेकेदाराचे नांव :- श्री. एस. एफ. चौगुले

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 05.02.2010 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 5 पृष्ठ क्रमांक :- 94 ते 96

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.15608/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.15608/- देयकातून कपात केलेली नाही.

4% मुल्यवर्धीत कर रक्कम रुपये 62433/- घेणे आवश्यक होते . परंतु देयकातून रु. 15221/- घेतले. बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बी.डी.जी. 2005/प्रक्र 324/ इमारती -2 दिनांक 03 मार्च 2006 मधील परिच्छेद क्र. 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे मुल्यवर्धीत कर अधिनियमाचे कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नसलेने 4% प्रमाणे कपात करणे आवश्यक होते बाकी रक्कम रुपये 47212/-वसुल पात्र आहे.

सा.बां.वि.शासन निर्णय संकीर्ण 1097/सी.आर.622 इमारती-2 दिनांक 29.06.1999 नुसार उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात मापे नोंदली नाहीत किंवा 100% चेकींग ही दिले नाही.

मोजमाप पुस्तक क्र. 5 पृष्ठ क्र.94 ते 96 वर मापे नोंदली परंतु नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 प्रमाणे पृष्ठ लाल शाईने क्रॉस केली नाहीत. व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा ही नोंदला नाही.

एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी श्री. एस.एफ. चौगुले मक्तेदार यांची सर्वात कमी 4.90% जास्त दराची निविदा मंजूर केली. बी-1 निविदा फॉर्म मधील अटी शर्ती प्रमाणे करारनामा केला नाही. शासन परिपत्रक्र क्र.सिएटी 09/05/प्रक्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15/05/2007 नुसार मक्तेदारास बी-1 टेंडर फॉर्म देऊन त्याची किंमत रु. 500/- वसूल केले नाही. किंवा वसुलीचे कागदपत्रे दाखविले नाहीत.

निविदा प्रसिध्दीबाबतचे वर्तमानपत्र व कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.

बाब क्र.3- बी.बी.एम.75 मी.मी. जाडी

5330 चौ.मी./ 100= 53.30चौ.मी.

53.30 x 12.30=655.59

655.59 /2.83 = 231.65 ब्रास खडी

231.65 ब्रास x 200 = रुपये 46,330/- रॉयल्टी म्हणून वसुल पात्र आहेत.

गौण खनीज किती ब्रास लागेल या बाबत वापर पत्रक लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 65)

### *107 सांगलवाडी मुकीनसो दर्गा परिसरात दुरुस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 187714.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 187714.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 6115.00 रु.,

***देयकामधुन विमा, रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल केलेला नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7668 दिनांक :- 31.03.2012 रक्कम :- 1,87,714/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 1,88,900/-

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.512 दिनांक 03.01.2012

तांत्रिक मान्यता :- दिनांक 06.06.2011

ठेकेदाराचे नांव :- वैष्णव मजूर सह. सोसा.

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 24.02.2012 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 31 पृष्ठ क्रमांक :- 84 ते 85

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.1877/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.1877/- देयकातून कपात केलेली नाही.

स्थायी समिती ठराव क्र.512 दि. 03/01/12 ने हे काम वैष्णव मजूर सहकारी संस्थेस देणेत आले. बी-1 टेंडर फॉर्म मधील अटी शर्ती प्रमाणे करार केला नाही .

सा.बां.वि.शासन परिपत्रक्र क्र.सिएटी 09/05/प्रक्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15/05/2007 नुसार मक्तेदार सोसायाटीस बी-1 फॉर्म देऊन अटी शर्तीवर सहया घेतल्या नाहीत व फॉर्मची किंमत रक्कम रुपये 500 वसुल केले नाहीत.

मोजमाप पुस्तक क्र.31 पृष्ठ क्र.84 ते 85 वर मापे नोंदली परंतु नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 प्रमाणे पृष्ठ लाल शाईने क्रॉस केली नाहीत. व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा ही नोंदला नाही.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.परंतू महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही.

बाब क्र.3- 20 एम.एम. खडी 4.20 घ.मि.

बाब क्र.5- खडी 15.23 घ.मि.

19.43 घ.मि. / 2.83 = 6.86 x 200 = रक्कम रु. 1373 रॉयल्टी वसुल पात्र आहे.

बाब क्र.6- प्लास्टर 94.08 चौ.मि.

94.08/100=0.94x2.6= 2.44 ब्रास x 200 = रु. 488 रॉयल्टी वसुलपात्र आहे.

अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

## *108 वॉर्ड क्र.58 खणभाग तिवरे गल्ली गटर बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 249322.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 249322.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 11086.00 रु.,

***देयकामधुन विमा, रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल केलेला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7298 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 2,49,322/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 2,49,300/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.293 दि.30.08.2011

तांत्रिक मान्यता :- दिनांक 15.06.2011

ठेकेदाराचे नांव :- श्री. संदीप पाटील

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 27.12.2011 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 12 पृष्ठ क्रमांक :- 42 ते 44

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रु.2493/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु. 2493/- देयकातून कपात केलेली नाही.

स्थायी समिती ठराव क्र.293 दि. 30/08/11 ने श्री. संदीप पाटील सुशिक्षित बेरोजगार यांना हे काम मंजूर करणेत आले बी-1 निविदा फॉर्म त्यांचेकडून भरुन घेतला नाही व त्यातील अटी शर्ती नुसार करारनामा केला नाही. न्यायालयीन बाब उदभवल्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होणेची शक्यता असलेने निविदा फॉर्मशिवाय केलेली प्रक्रिया नियमबाहय आहे.

सा.बां.वि.शासन परिपत्रक्र क्र.सिएटी 09/05/प्रक्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15/05/2007 नुसार मक्तेदारास बी-1 टेंडर फॉर्म देऊन त्याची किंमत रु.500 घेतले नाहीत.

सुशिक्षित बेरोजगार मक्तेदार श्री. संदीप पाटील यांचे रजिस्ट्रेशन कागदपत्रे लेखा परीक्षण कामी दाखविले नाहीत.

या कामासाठी गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.

बाब क्र.2 सिमेंट क्रॉक्रीट 15.10घ.मी.

बाब क्र.4 सिमेंट क्रॉक्रीट 43.42 घ. मी.

---------------

58.52 घ.मी.

58.52x1.35= 79/2.83=28x रु.200= रु. 5600 वसूल करण्यात यावीत.

बाब क्र.6 वीट बांधकाम चेंबर नं 1 - 2896.26 गौणखनिज बाबतचे वापर पत्रक तयार करुन लेखा परिक्षण कामी उपलब्ध केलेले नाही. तसेच रक्कम रुपये 200 प्रती ब्रासप्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 67)

## *109 सांगली पुष्पराज चौक डिसीसी बँके समोरील सांडपाणी निचरा करणेसाठी पाईप लाईन टाकणे कामातील अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 203009.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 203009.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 19294.00 रु.,

***देयकातुन विमा , रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल करणेत आलेला नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7623 दिनांक :- 31.03.2012 रक्कम :- 2,03,009/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 2,03,640/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.469 दि.19.12.2011

तांत्रिक मान्यता :- दिनांक 03.08.2011

ठेकेदाराचे नांव :- जे.के.मजूर सोसायटी

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 02.02.2012 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 3 पृष्ठ क्रमांक :- 82 ते 83

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.2030/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.2030/- देयकातून कपात केलेली नाही.

कामवाटप समिती सांगली यांचे पत्र दिनांक 02.12.2011 ने जे .के.मजूर सोसायटीस कामाचे वाटप केले आहे. परंतु निविदा फॉर्म बी-1 देणेत आला नाही. फॉर्ममधील अटी शर्तीनुसार करारनामा करणेत आला नाही. तसेच शासन परिपत्रक्र क्र.सिएटी 09/05/प्रक्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15/05/2007 नुसार मक्तेदारास बी-1 टेंडर फॉर्म देऊन त्याची किंमत रु.500 /-वसूल केलेचे कागदपत्रे दाखविले नाहीत.

मोजमाप पुस्तक क्र. 3 पृष्ठ क्र.82 ते 83 वर मापे नोंदली परंतु नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 प्रमाणे पृष्ठ लाल शाईने क्रॉस केली नाहीत. व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा ही नोंदला नाही.

अंदाजपत्रकात बाब क्र.1 व 5 मध्ये लेबर सेसे दरात दाखविला आहे. परंतु तो वसूल केला नाही.

खनिज वहातुकीचे पास जोडले आहेत. परंतु त्यांचा या कामाशी मेळ बसत नाही. तसेच पासवर सक्षम अधिकारी यांच्या सहया नाहीत.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर केला आहे.

बाब क्र.2- हार्ड मुरुम 208.49 घ.मी./2.83= 73.67 ब्रास x रु. 200/- = रुपये 14734/- रॉयल्टी वसुल पात्र आहे.

बाब क्र.4- वीट बांधकाम इन्स्पेक्शन चेंबर -6 नग (60x45x90 CM) , 1:4:8 कॉंक्रीट फौडेशन , 1:2:4 सिमेंट कॉंक्रीट

यात वाळू , खडी, किती ब्रास वापर झाला या बाबत वापर पत्रक तयार करुन देयका सोबत लावले नाही. गौण खनिजाची गणना करुन रु. 200 प्रती ब्रास रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 68)

## *110 वॉर्ड क्र.3 औद्योगिक वसाहत नानीबाई मळा अंतर्गत रस्ते डांबरी करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 497797.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 497797.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 52221.00 रु.,

***सा.बां.वि महाराष्ट्र शासन निर्णय क्र संकिर्ण 1097/सी आर 622 दिनांक 29.06.1999 नुसार उप अभियंता यांनी मोजमाप नोंदवहीत मापे नोंदविली नाहीत व 100% चेकींगही केले नसताना देयक आदा करणेत आलेले आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 7341 दिनांक :- 27.03.2012 रक्कम :- 4,97,797/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,98,000/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.240 दि.12.08.2011 / आयुक्त निर्णय क्र.214 दि.30.09.2011

तांत्रिक मान्यता :- 164 दिनांक 15.06.2011

ठेकेदाराचे नांव :- श्री. व्ही.ए.पाटील

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 27.12.2011 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 12 पृष्ठ क्रमांक :- 45 ते 47

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रुपये 4978 देयकातुन कपात केला नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए. 2009/ प्रक्र 108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 4978 देयकातुन कपात केले नाही.

बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बीडीजी 2005/प्रक्र 324/ इमारती-2 दिनांक 03.03.2006 मधील परि 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे मुल्यवर्धीत कर अधिनियमाचे कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाण पत्र असल्यास 2% कर आकारणी करावयाची असते परंतु नोंदणी प्रमाणपत्र नसताना 2% कर रु.9896 देयकातुन कपात केला आहे. उर्वरीत र.रु.9896 वसुल पात्र आहे.

सा.बां.वि महाराष्ट्र शासन निर्णय क्र संकिर्ण 1097/सी आर 622 दिनांक 29.06.1999 नुसार उप अभियंता यांनी मोजमाप नोंदवहीत मापे नोंदविली नाहीत व 100% चेकींगही दिले नाही.

या कामासाठी तीन निविदा आल्या, या पैकी श्री. व्ही.ए.पाटील या मक्तेदाराची सर्वात कमी 0.50 %

कमी दराची निविदा प्राप्त झाली. निविदा फॉर्म बी-1 मधील क्लॉज प्रमाणे करारनामा केला नाही.
मोजमाप पूस्तक क्र.12 पृष्ठ क्र.45 ते 47 वर नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 प्रमाणे लाल शाईने क्रॉस केले नाही. व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा नमुद केला नाही. प्रत्येक कामाचे देयक पारीत करताना मोजमाप पुस्तकांवर मुख्य लेखापरीक्षकांची केवळ सही आहे. पारीत रक्कमेचा शेरा नमुद न करता केवळ सही करणेचे प्रयोजन स्पष्ट होत नाही.
गौण खनिज कामात वापरले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी.

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.2 | 40 mm मेटल | 18 घ.मी. |
| बाब. क्र.5 | हार्ड मुरुम | 300 घ.मी. |

कामामध्ये बाब क्र.2 40 mm मेटल 18 घ.मी. व बाब क्र. 5 हार्ड मुरुम 300 घ.मी. वापरला असलेने 318 घ.मी. x रु.70.67/ घ.मी. = रुपये 22473/- रॉयल्टी वसुलपात्र आहे.

गौण खनिज वापरा बाबत वापर पत्रक तयार करुन लेखापरीक्षण कामी देणेत आलेले नाही.

सर्व मक्तेदारांचे कागदपत्रे छाया प्रतीत आहेत साक्षांकीत केले नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 69)

## *111 वॉर्ड क्रं.21 सांगली आरवाडे पार्क ते कुपवाड रोड डांबरीकरण करणे कामातील त्रुटी बाबत.*

**दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :दलित वस्ती सुधार योज, राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 344408.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 344408.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 26006.00 रु.,

***देयकातुन विमा , रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल करणेत आलेला नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 277 दिनांक :-25/1/2012 रक्कम :- 3,44,408/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,46,600/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.247 दि.16.12.2011

तांत्रिक मान्यता :- 2/12/2010

ठेकेदाराचे नांव :- छ. संभाजी राजे मजूर सोसायटी

कार्यादेश दिनांक :- 11/11/2011 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 32 पृष्ठ क्रमांक :- 17 ते 18

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.3444/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासा निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अवये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.3444/- देयकातून कपात केलेली नाही.

काम पाटप समितीचे पत्र दिनांक 12/8/2011 ने छत्रपती मजूर सहकारी संस्थेस काम दिले. या संस्थेस बी-1 टेंडर फॉर्म दिला नाही व त्यातील अटी शर्ती प्रमाणे करारनामा केला नाही.

सा.बां.वि. शासान परिपत्रक दि. 15/5/2007 नुसार बी-1 निविदा फॉर्मची किमंत रक्कम रु. 500/- वसूल केलेली नाही.

या कामाची मापे मोजमाप नोंद वहीत नोंदविले बाबतची नोंदवही लेखापरीक्षणास सादर केली नाही.

या कामात खालील प्रमाणे गौण खानीजाचा वापर केला आहे.

बाब क्रं. 1- खडी 40 मी.मी. = 75.15 घ.मी.

75.15/2.83=26.55xरु.200 = 5310

बाब क्रं. 2- बी.बी.एम.(डांबरीकरण)

1431.18 चौ.मी./100=14.31

14.31x12.3=176 घ.मी.

176/2.83=62ब्रासखडीx200 = 12,400

बाब क्रं. 3-सील कोट -1431.18 चौ.मी.

1431.18/100=14.31x0.9=12.87 घ.मी.

12.87घ.मी./2.83=36.42=4.54ब्रासx200= 908

-------------

एकूण रॉयल्टी रु. 18,618

-------------

महसूल व वने विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. गौण खनिज-10/1009/प्र क्र 309/ख दि. 11/02/2010 अन्वये रॉयल्टी रक्कम रु. 18,618/- वसूलपात्र आहे.

नस्तीसोबत गौण खनिज वहातुक पास आहेत. त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आहेत.

अ) रॉयल्टी रक्कम वसूल केल्याचा उल्लेख नाही.

ब ) कोणत्या प्रकारचे खनिज आणले त्याची नोंद नाही.

क) पासवर तारखा नाही.

ड) ड्रायव्हरचे नाव व सही नाही.

अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 70)

## *112 सांगली येथील आशिर्वाद बंगला ते 100 फुटी रोड बी.बी.एम करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: सार्वा.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 290004.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 290004.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 50868.00 रु.,

***देयकातुन विमा, रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल करणेत आलेला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7625 दिनांक :- 31.03.2012 रक्कम :- 2,90,004/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,52,900/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.167 दि.02.09.2010

तांत्रिक मान्यता :- दिनांक 01.07.2010

ठेकेदाराचे नांव :- श्री. आशीफ लष्करी.

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 09.05.2011 कामाची मुदत :-45 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 49 पृष्ठ क्रमांक :- 194 ते 195

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.2900/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.2900/- देयकातून कपात केलेली नाही.

निविदा प्रसिध्द केल्या बाबतचे वर्तमान पत्र किंवा कात्रण नस्तीत नाही.

चार मक्तेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री. अशीफ लष्करी या मक्तेदाराची निविदा 17.75 %

कमी दराची मान्य केली असून, बी-1 निविदा फॉर्म देऊन त्यातील अटी शर्तीवर मक्तेदार यांची सही नाही व त्याप्रमाणे करारपत्र केले नाही.

शासन परीपत्रक दिनांक 15/05/2007 नुसार फॉर्मची किंमत रु. 500/- वसूल केलेली नाही.

10% पेक्षा कमी दराची निविदा असल्याने घट अंदाजपत्रक तयार केले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम 208 नुसार 17.75% कमी दर असलेने मक्तेदाराच्या क्षमतेबाबतचे बी-1 फॉर्म मधील मक्तेदाराने दिलेले कागदपत्रे लेखा परीक्षण कामी उपलब्ध झाली नाहीत.

मोजमाप पुस्तक क्रं. 49 पृष्ठ क्रं. 194 ते 195 वर मापे नोंदली आहेत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार लाल शाईने पृष्ठ क्रॉस केली नाहीत व पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा उपलब्ध नाही.

सा.बां.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. संकीर्ण 1097/सी आर 622 इमारती-2 दिनांक 29/06/1999 नुसार उपअभियंता यांनी मापे नोंदविली नाहीत व 100 % चेकींग दिले नाही.

गौण खनिजाचा खालील प्रमाणे वापर या कामात करणेत आला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी.

बाब क्रं 2- हार्ड मुरुम पुरवठा 390.64 घ.मी.

बाब क्रं 3- 40 एम एम खडी 99.96 घ.मी.

बाब क्रं 8- कारपेट 25 एम एम

495चौ.मी./100=4.95

4.95x3.65 = 135.61 घ.मी.

बाब क्रं 10- सील कोट

495/100= 4.95चौ.मी. x 0.9 = 4.45 घ.मी.

---------------

630.66 घ.मी.

==========

एकूण 630.66 घ.मी. / 2.83 = 222.84 ब्रास

222.84 x रु.200/- = रक्कम रुपये 44,568/- रॉयल्टी वसूली पात्र आहे.

गौण खनीजे या कामात किती ब्रास वापरले या बाबत वापर पत्रक लेखा परीक्षण कामी उपलब्ध करून दिले नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर अप्राप्त आहे.

DATBPCM5601 (Ref No : 71)

## *113 वॉर्ड क्रं.59 प्रमोद सारनाथ घर ते सुखनिवास रस्ता डांबरीकरण करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 697664.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 697664.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 118434.00 रु., अंतिम अमान्य रक्कम : 118434.00 रु.

***या देयकातून रॉयल्टी,विमा,उपकर वसूल केले नाहीत. निविदा पध्दतीमध्ये अनियमितता झालेली आहे.***

प्रमाणक क्रमांक :-7570 दिनांक :-31/3/2012 रक्कम :- 6,97,664/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 6,98,913/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.603 दि.29.1.2010

तांत्रिक मान्यता :- 27/7/2009

ठेकेदाराचे नांव :-श्री. आर. बी. आडमुठे

कार्यादेश दिनांक :- 19/4/2010 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :3 पृष्ठ क्रमांक :- 96 ते 98

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.6977/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.6977/- देयकातून कपात केलेली नाही.

मुल्य वर्धीत कर 2 % रक्कम रुपये 13,953/- देयकातून घेतला आहे. बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं. बीडीजी 2005/प्र.क्र.324/इमारती-2 दिनांक 03 मार्च 2006 मधील परिच्छेद क्रं. 5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुल्य वर्धीत कर अधिनियमातील कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नाही. यामुळे 4% कर रक्कम रुपये 27,907/- वसूल करणे आवश्यक होते. परंतु 2% प्रमाणे रुपये 13953/- वसूल केल्याने उर्वरीत रक्कम रुपये 13953/- वसूल पात्र आहेत.

कामाच्या नस्तीतील सर्व कागद पत्रे छाया प्रतीत आहेत व ती सांक्षाकीत ही केलेली नाहीत.

दैनिक लोकमत मध्ये दिनांक 06/08/2009 रोजी निविदा प्रसिध्द झाली व याच कालावधीत निविदा प्रक्रिया पूर्ण केली. मक्तेदार श्री. आर.बी. आडमूठे यांना सुमारे 9 महिन्यांनी दिनांक 19/04/2010 रोजी वर्क ऑर्डर दिली नंतर ती रद्द केली. सुधारित वर्क ऑर्डर दिनांक 01/12/2011 ला दिली. यावरुन दिनांक 19/04/2010 रोजी काम सुरु झालेने दिनांक 08/07/2010 ला मुदतीचे 90 दिवस पूर्ण होतात व सुधारित

वर्क ऑर्डर दिनांक 01/12/2011 दिली. मुदत वाढीचा प्रस्ताव सादर केला नाही व मुदत वाढ देऊन दंडात्मक कारवाई केली नाही.

या कामामध्ये गौण खनिजाचा खालील प्रमाणे मोठया प्रमाणात वापर केला आहे. परंतु महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही.

| | | |
|---|---|---|
| बाब क्रं-2 | हार्ड मुरुम | 174 घनमीटर |
| बाब क्रं-4 | 40/50 एम एम | 58 घनमीटरपूरवली |
| बाब क्रं-5 | मुरुम पुरवठा | 29 घनमीटर |

एकूण 261घ.मी./2.83=92.22 ब्रास x 200= 18444 व बाब क्रं-9 कारपेट 25 एम एम 1915.55चौ.मी./3.65= 525 घ.मी./2.83 = 186.00 ब्रास x200= 37,200/- असे एकूण रुपये 18,444 + 37,200= 55,644/- वसूल पात्र आहेत.

ई-टेंडरची प्रमाणे 3 निविदा प्राप्त झाल्या. संगणक प्रणाली- नुसार मक्तेदारांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता काढून तो नस्तीस लावलेला आहे. तुलनात्मक दराची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | मक्तेदाराचे नाव | दिलेले दर |
|---|---|---|
| 1) | मेस. आर.बी.आडमुठे | सोबतच्या यादीप्रमाणे |
| 2) | मेस हारूगडे कन्स्ट्रक्शन | 7 % जास्त |
| 3) | मेस व्ही. ए. पाटील | 35% जास्त |

मे.आडमुठे यांनी निविदेत नमुद केल्याप्रमाणे दर दर्शविणारी सोबतची यादी ई-टेंडरची कार्यवाही झाल्यानंतर साध्या कागदावर तयार करून सोबत लावलेली आहे. या छाया प्रतीतील यादीवर मक्तेदारांच्या सही व्यतिरिक्त दर पाहिलेबाबत सक्षम अधिकाऱ्याची सही नाही.

ई-टेंडरची मधील तुलनात्मक दराचा या ई-टेंडर पध्दतीमुळे तिन्ही अधिकाऱ्यांनी त्याच्या गोपनीयकोड नंबरचा वापर केल्यानंतर दराचा तुलनात्मक तक्ता व तक्त्यावर इतर माहितीही निघते त्याचवेळी सक्षम तीन्ही अधिकाऱ्यांच्या त्यावर सहया होतात. हया कामाचा तुलनात्मक तक्ता वगळून इतर सर्व कामांच्या तुलनात्मक तक्त्यावर सर्व तीनही अधिकाऱ्यांच्या सहया आहेत. फक्त या कामाच्या तक्त्यावर व सोबतच्या यादीवर या निविदेसाठी नियुक्त केलेल्या तीन अधिकाऱ्यांच्या सहया नाहीत.

त्यामुळे ई-टेंडर नुसार दर प्राप्त न होता नियम बाहयरित्या नंतर 5% जास्त दर देऊन मक्ता मंजूर केला असलेचे लेखा परीक्षणाच्या निदर्शनास आहे आहे.

मक्तेदारास नियम बाहय कृती करून मक्ता मंजूर केला त्याहून अधिक तोटा म्हणजे निविदेत नसलेला दर 5% जास्त दिला आहे. जास्तीची रक्कम रु.34,883/- वसूल पात्र ठरते. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 72)

## *114 वॉर्ड क्र.28 वारणाले मनपा शाळा पाठीमागे हॉट मिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामातील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 374149.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 374149.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 44865.00 रु.,

***या देयकातून रॉयल्टी,विमा,उपकर वसूल केले नाहीत. निविदा पध्दत व काम वाटपातील अनियमितता झालेले आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 7315 दिनांक :-27/3/2012 रक्कम :- 3,74,149/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,87,400/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.85 दि.31.5.2010

तांत्रिक मान्यता :- 21/8/2009

ठेकेदाराचे नांव :- श्री. आर. बी. आडमुठे

कार्यादेश दिनांक :- 14/2/2011 कामाची मुदत :-15 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 14 पृष्ठ क्रमांक :- 51 ते 52

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्काम रु.3741/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.3741/- देयकातून कपात केलेली नाही.

कामाची मापे नोंदविले बाबतचे मोजमाप पुस्तका लेखा परिक्षण कामी उपलब्ध केले नाही

मक्तेदाराचे रजिस्ट्रेशन व त्याच्याशी अनुषंगिक कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविले नाहीत.

बी-1 टेंडर फॉर्म नस्तीत नाही. त्यातील अटी प्रमाणे करारपत्र केले नाही. तसेच शासन परिपत्रक 15.05.2007 प्रमाणेनिविदा फॉर्म ची किंमत रक्कम रुपये 500/- वसुल केलेचे कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविली नाहीत.

वॅटची 4% रक्कम रुपये 14966/- पैकी र.रु. 7483/-वसुल करणेत आले बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बी.डी.जी. 2005 / प्रक्र 324/ इमासी-2 दिनांक 03 मार्च 2006 मधील परि.क्र. 5 मध्ये दर्शविल्या प्रमाणे मुल्यवर्धीत कर अधिनियमाचे कलम 8 व 9 खाली नोंदणी प्रमाणपत्र नाही. या मूळे बाकी रक्कम रुपये

7483/- वसुल पात्र आहे.

दिनांक 24/11/2009 रोजी दैनिक पुढारीत निविदा प्रसिध्द केली एकाच निविदेत लाखो रुपयाची 32 कामे होती . तरी प्रतिसाद मिळाला नाही. दैनिक पुढारीत पहिली मुदतवाढ दिनांक 12/12/09 ला दिली याच वर्तमानपत्रात दुसरी मुदत वाढ दिनांक 24/12/12 ला दिली. लाखो रुपयांच्या 32 कामाना एकाच वर्तमान पत्रात वारंवार प्रसिध्दी देऊनही प्रतिसाद मिळाला नाही. प्रसिध्दी बाबतची वर्तमानपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाहीत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. जाहिरात 2009 /प्रक्र.137 का 34 दिनांक 31/08/2009 नुसार 32 कामाच्या एकत्रित रक्कमेचा विचार करुन साप्ताहिक व दैनिकात प्रसिध्दी दिली नाही.

काम वाटप समितीचे पत्र क्र. दि.08.02.10 अन्वये हे काम संग्राम मजूर सहकारी संस्थेस दिले नंतर त्यात बदल करुन स्थायी समिती ठराव क्र. 85 दि. 31/05/2010 ने संविदा 5(2)(2) नुसार श्री. आर. बी. आडसूळे या मक्तेदारास दिले आहे. निविदा बी-1 प्रमाणे हॉट मिक्सला लागणारी यंत्र सामुग्री व कामगार या मक्तेदाराकडे असले बाबतचे कागदपत्रे लेखा परिक्षणास सादर केले नाहीत.

प्रथम निविदा रद्द करुन अन्य ठेकेदारस टेंडर न काढता नियमबाह्यरित्या काम दिलेचे स्पष्ट होते. तसेच असा निर्णय घेण्याची कारणे काय या बाबतचे सविस्तर स्पष्टीकरण प्रस्तावात नाही. टेंडर न मागविता काम दिलेने स्पर्धात्मक दराचा लाभ न मिळालेने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

या कामामध्ये गौण खनिजाचा खालील प्रमाणे मोठया प्रमाणात वापर केला आहे. परंतु महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही.

| | |
|---|---|
| बाब क्र.2:- हार्ड मुरुम | 120.00 घ.मी. |
| बाब क्र.3:- खडी 60 मी.मी. | 156.00 घ.मी. |
| बाब क्र.7:-बी.बी.एम.75 मी.मी. | |
| 878.75 चौ.मि. x 100=8.79 x 12.30 = | 108.00 घ.मी. |
| बाब क्र.9:-कारपेट 25 मी.मी. | |
| 878.75 चौ.मि. x 100=8.79 x 3.65 = | 32.00 घ.मी. |
| | ======== |
| | 416.00 घ.मी. |

एकूण 416 x 2.83= 146.99 ब्रास खनिज या कामासाठी लागली आहे. 147 ब्रास खनिज x रु.200 प्रती ब्रास = 29400/-रॉयल्टी वसुल पात्र आहे.

कामात वापरलेल्या गौण खनिजाचे वापर पत्रक तयार करणेत आलेले नाही. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

## *115 सांगली येथील नंदनवन अपार्टमेंट ते सेठ बंगला रस्ता बी.बी.एम. करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 1376351.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 1376351.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 69036.00 रु.,

***या देयकातून रॉयल्टी,विमा,उपकर वसूल केले नाहीत. निविदा प्रसिध्दीबाबतचे प्रसिध्दी वर्तमानपत्र त्याच्याशी संबंधित कागदपत्रे दाखविली नाहीत.***

प्रमाणक क्रमांक :- 6975 दिनांक :-15/03/2012 रक्कम :-13,76,351/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 23,77,460/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.372 दि.02.03.2009

तांत्रिक मान्यता :- 12/01/2009

ठेकेदाराचे नांव :- एस. एफ. चौगुले

कार्यादेश दिनांक :- 05/02/2010 कामाची मुदत :- 120 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 5 पृष्ठ क्रमांक :- 92 ते 94

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रु.23,749/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.23,749/- देयकातून कपात केलेली नाही.

निविदा प्रसिध्दी बाबतचे वर्तमानपत्र आणि त्यांच्याशी संबंधीत कागदपत्रे लेखा परीक्षणास दाखविली नाहीत.

एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या पैकी मक्तेदार श्री. एस.एफ. चौगुले यांची सर्वात कमी 4.90% जास्त दराची निविदा मंजूर केली. निविदा फॉर्म बी -1 प्रमाणे करारपत्र केले नाही. शासन परिपत्रक दिनांक 15/05/2007 नुसार निविदा फॉर्म किंमत रु.500/- वसूल केलेचे कागदपत्रे दाखविले नाहीत.

सा.बां.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्रं संकिर्ण 1097/सी आर 622/इमारती-2 दिनांक 29/06/1999 नुसार उपअभियंता यांनी मोजमाप नोंद वहीत मापे नोंदली नाहीत किंवा 100% चेकींग दिले नाही.

या कामामध्ये गौण खनिजाचा खालील प्रमाणे मोठया प्रमाणात वापर केला आहे. परंतु महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार

रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही.

बाब क्रं 2 - बी बी एम 75 मी.मी. 429.70

4.29 चौ.मी x 12.3 घ.मी. = 52.76 घ.मी.

52.76 घ.मी. /2.83 ब्रास = 18.64 ब्रास

18.64 ब्रास x रु. 200/- = 3728/-

बाब क्रं 5- कारपेट 25 मी.मी. 671.71 चौ.मी.

67.11चौ.मी.x 3.65 घ.मी. = 244.95 घ.मी.

244.95 घ.मी. /2.83 = 86.55 ब्रास

86.55 ब्रास x रु. 200/- = 17310/-

-----------

रु.21,038/-

-----------

गौण खनिज रॉयल्टी रु. 21,308/- वसूल पात्र आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 74)

***116 वॉर्ड क्र.63 मिरज पंचशील चौक वसाहत येथे पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामातील त्रुटीबाबत.***

**नागरी दलित वस्ती सुधार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 513569.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 513569.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 21534.00 रु.,

***देयकातून विमा व रॉयल्टी रक्कम वसुल केलेली नाही.***

प्रमाणक क्र -: .283 दिनांक -: 31.03.2012 रक्कम -: 5,13,569-/

अंदाजपत्रकीय रक्कम -:5,65,900 -/

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र. 175 दिनांक 12.07.2011

तांत्रिक मान्यता -:353 दिनांक 02.02.2010

ठेकेदाराचे नांव :- श्री. आसीफ लष्करी

कार्यादेश क्रंमांक -: दिनांक/18.01.2012 कामाची मुदत :- 30 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक -:3 पृष्ठ क्रमांक -:79 ते 81

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय 17 जून 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु5136/- देयकातुन वसुल करणेत आला नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा र.रु.5136/- कपात केला नाही.

शासन निर्णय दिनांक 17 जून 2010 नुसार सन 2012-13 या आर्थिक वर्षात दरमहा कामगार कल्याण उपकर किती भरणा केला या बाबतच्या भरणा चलनासह सर्व माहिती लेखा परीक्षणास दाखविण्यात आली नाही.

या कामासाठी गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे. तपशील खालील प्रमाणे आहे.

बाब क्रं.2 मुरुम 86.400 घन.मी.

86.400घ.मी./ 2.83 = 30.53 ब्रास x रु.200/ब्रास = रु. 6106

बाब क्रं.3 कॉंक्रीट 57.600 घन.मी.

57.600 चौ.मी. x 3.6 = 207.36घ.मी./2.83= 73.27 ब्रास x200= रु. 14654.41

बाब क्रं.5 सिमेंटकॉंक्रीट 8.13 घन.मी.

8.13 घ.मी.x 1.35 = 10.97 / 2.83= 3.87 x रु. 200/ब्रास = रु. 774

----------------------

रु. 21,534.41

या कामा मध्ये गौण खनिज किती लागले या बाबतचे वापर पत्रक नस्तीत तसेच देयका सोबत नाही. रु.200 प्रती ब्रास प्रमाणे वसूली करावी.

वाळूची वाहतुक करुन वाळू आणलेची नोंद नाही. किती ब्रास वाळू लागली ते स्पष्ट करावे.

बाब क्रं.4 नुसार 576 चौ.मी. पेव्हींग ब्लॉक बसविले आहेत. ते बसविताना तेवढेच चौ.मी. वाळु किंवा 6 एम.एम. खडी खाली पसरावी लागते. या बाबतची नोंदही वापर पत्रकामध्ये केलेली नाही व महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केलेली नाही

मुरुम व काळा दगड याचे वाहतुक पास नस्तीत आहेत. परंतु रॉयल्टी वसूल केलेचा उल्लेख वहातुक पास मध्ये नसलेने मुरुम 30 ब्रास व काळा दगड 19 ब्रास अशी एकूण 39 ब्रास Xरू. 200 = रक्कम रु.7800/- वसुलपात्र आहे.

अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 75)

### *117 वॉर्ड क्र.63 मिरज जमखानवाला हॉटेल ते पंचशील चौक आर.सी.सी. पाईप घालणे कामातील त्रुटी बाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: सार्व.बांधकाम, राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 466268.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 466268.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 11160.00 रु.,

***ठेकेदाराकडून टेंडर फॉर्मची किंमत घेणेत आलेली नाही. तसेच ठेकेदाराबरोबर करारपत्र न करताच काम मंजूर करणेत आलेले आहे.***

प्रमाणक क्र -: .285 दिनांक -:31.03.2012रक्कम -:4,66,268-/

अंदाजपत्रकीय रक्कम -:4,69,300 -/

प्रशासकीय मान्यता .स्थायी समिती ठरा क्र.मा -: 175 दिनांक 12.07.2011

तांत्रिक मान्यता -:352 दिनांक 02.12.2010

ठेकेदाराचे नांव :- वरद मजूर सह. सोसायटी

कार्यादेश दिनांक :- 16.01.2012 कामाची मुदत -:45 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक -:3 पृष्ठ क्रमांक -:81 ते 82

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

काम वाटप समिती पत्र दिनांक 12.08.2011 ने कामाचे वाटप केले आहे. मक्तेदारास टेंडर फॉर्म दिला नाही व या फॉर्मची रक्कम ही वसूल केली नाही. सा.बां.वि. शासन परिपत्रक क्र.सी.ए.टी09/05/प्र क्र 381 इमारती-2 मंत्रालय दिनांक 15.05.2007 अन्वये फॉर्म किंमत र.रु.500/- वसूल करावी.

बी-1 टेंडर फॉर्म व त्यातील क्लॉज नुसार करार केला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 50,000/- पेक्षा जास्त असूनही टेंडर फॉर्म वापरला नसल्याने नियम बाह्य कार्यवाही केली आहे.

मे वरद मजूर सहकारी संस्था यांच्या नोंदणीची कागदपत्रे लेखा परीक्षणकामी दाखविली नाहीत.

सां.बां.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण 1097/सी आर 622/इमारती-2 दिनांक 29.06.1999 नुसार मोजमाप पुस्तक क्र.3 पृष्ठ क्र.81 ते 82 वर उपअभियंता यांनी मापे नोंदली नाहीत. तसेच 100% चेकींग दिले नाही.

उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय 17 जून 2010 नुसार 1% कामगार कल्याण उपकर

रक्कम रु.4663/- व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा कामगार विमा रु.4663/- एकूण रक्कम रु.9326/- देयकातुन वसूल केले नाहीत.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार देयक पारीत करताना मोजमाप पुस्तकात लाल शाईने क्रॉस केले नाही. व देयक पारीत केल्या बाबत रक्कमेचा शेरा नमुद नाही.

र.रु. 2331/- कामगार विमा घेतला आहे. विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक 12.09.2005 नुसार कामगार विमा र.रु.4663/- कपात केला नाही.

अंदाजपत्रकातील सर्व बाबींवर दर पृथ:करण म्हटले आहे. परंतू प्रत्यक्षात दर पृथ:करण करुन व त्यास मान्यता घेऊन त्या बाबतचे कागदपत्रे अंदाज पत्रकासोबत लावली नाहीत.

खडी, वाळू, विटा अशा गौण खनिजाचा वापर कामात केला आहे. परंतू महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल केली नाही.

बाब क्र.3 सिमेंट कॉंक्रीट 14 घन मीटर

14 घ.मी. x 1.35 = 18.90 / 2.83 = 6.67ब्रास x रु. 200 = रु. 1334

बाब क्र.4 सिमेंट कॉंक्रीट 1:2, 200 Rm, 600 mm

बाब क्र.5 वीट बांधकाम 60x45x90, 10 नग बांधकाम गौण खनिज वापराबाबतचे वापर पत्रक नाही. तरी स्टेटमेंट तयार करुन रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 76)

## *118 वॉर्ड क्र.65 खाजा झोपडपट्टी ते कच्छी हॉल जवळ संरक्षक भिंत बांधणे कामातील लेखाविषयक त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 910774.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 910774.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 48748.00 रु.,

***देयकामधून विमा, रॉयल्टी, कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात आलेला नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7294 दिनांक :- 27.03.2013 रक्कम :- 9,10,774/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 9,71,920/-

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्रमांक 112 दिनांक 05.07.2011

तांत्रिक मान्यता :- 378 दि.16.06.2011

ठेकेदाराचे नांव :- साजीद कुरेशी

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 05.11.2011 कामाची मुदत :- 90 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 21 पृष्ठ क्रमांक :- 13 ते 17

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

मक्तेदार श्री. साजीद कुरेशी यांना 3.77% कमी दराने मक्ता मंजूर करणेत आल आहे. या मक्तेदारास निविदा फॉर्म बी-1 दिला नाही. तसेच सा.बांधकाम खात्याचे परिपत्रक दिनांक 15.05.2007 नुसार फार्मची किंमत रु.500/- वसुल केली नाही.

फॉर्मच विकला गेला नसल्याने त्यातील क्लॉज प्रमाणे करार केला गेला नाही. न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होऊ शकतो तरी करार करताना अनियमितता झालेली आहे.

मोजमाप पूस्तक क्र.21 पृष्ठ क्र.13 ते 17 वर देयक पारीत झाल्या नंतर लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार लाल शाईने क्रॉस केले नाही. तसेच पारीत केलेल्या रक्कमेचा शेरा मोजमाप नोंदवहीत नाही.

शासन परिपत्रक दिनांक 17 जून 2010 नुसार *कामगार कल्याण उपकर रु.9104/- देयकातून वसुल केला नाही.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विमा र.रु.8108/- देयकातुन कपात केला नाही.

52 ब्रास मुरुम वापरलेले वाहतुक पास आहेत परंतु त्यात रॉयल्टी भरलेचा उल्लेख नाही. यामुळे 52 ब्रास मुरुम x रु.200 = 10,400/- वसुल केले नाहीत. जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करावी. श्री. पाटील यांनी मुलानीना मुरुम विकला असी पासवर नोंद आहे. यात मक्तेदार कुरेशी यांचे नाव नाही.

50 % विमा रक्कमेची आकारणी अंदाज पत्रकात आहे. परंतु तीही रक्कम वसुल केली नाही.

या कामामध्ये गौण खनिज म्हणुन खडी, वाळु, मुरुम याचा वापर केला आहे.

| | |
|---|---|
| बाब क्र.2 सिमेंटकॉँक्रीट | 17.240 घन मीटर |
| बाब क्र.3 सिमेंटकॉँक्रीट | 10.210 घन मीटर |
| बाब क्र.4 सिमेंटकॉँक्रीट | 5.32 घन मीटर |
| बाब क्र.5 सिमेंटकॉँक्रीट | 13.64 घन मीटर |
| बाब क्र.7 हार्ड मुरुम | 212.44 घन मीटर |
| बाब क्र.9 सिमेंटप्लास्टर | 109.72 चौ.मीटर |

वापर पत्रक तयार करुन महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-

10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. बाब क्र. 1 ते 9 चे दराबाबत दरपृथ:करण केलेचे नमुद आहे. परंतु त्याची कागदपत्रे नस्तीत नाहीत.

अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 77)

## *119 वॉर्ड क्र.40 गोपाल कृष्ण मंदीर ते शिंदे घर रस्त्याची सुधारणा कामातील लेखाविषयक त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 414490.00 रु., आक्षेपाधीन रक्कम : 414490.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 18740.00 रु.,

***सार्व. बांधकाम नियम पुस्तीका नियम 150 प्रमाणे 10% पेक्षा कमी दराची निविदा असल्याने मुळ अंदाजपत्रक रद्द करुन घट अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेतली नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

प्रमाणक क्रमांक :- 7325 दिनांक :- 27.03.2013 रक्कम :- 4,12,166/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,14,490/-

प्रशासकीय मान्यता :- प्र.स.ठ. क्रमांक 04 दिनांक 31.10.2011

तांत्रिक मान्यता :- 444 दिनांक 08.07.2011

ठेकेदाराचे नांव :- भरत गणपती कुंभार

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 24.01.2012 कामाची मुदत :- 45 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 5 पृष्ठ क्रमांक :- 43 ते 44

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

या कामासाठी एकूण 6 निविदा आल्या त्या पैकी भरत गणपती कुंभार या मक्तेदारास 28.90% कमी दराने मक्ता मंजूर करणेत आला. 10% पेक्षा कमी दराचे काम असलेने सार्व. बाधकाम विभाग नियम पुस्तीका नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा आल्याने घट अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची घट अंदाजपत्रकास मंजूरी घेतली नाही.

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 4,14,490/- आहे. 28.90% कमीने रु.2,94,702.39 एवढी अंदाजपत्रकीय रक्कम येते व प्रत्यक्ष खर्च र.रु.2,92,378/- झाला. एवढ्या कमी रक्कमेत काम कसे झाले याबाबत खुलासा करणेत आला नाही.

28.90% कमी दराने काम कसे करणार या बाबत मक्तेदार यांचा खुलासा घेऊन नस्तीत लावला नाही.

निविदा प्रसिध्दी बाबतचे सर्व कागदपत्रे छाया प्रतीत आहेत. मुळ कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

मक्तेदार यांना बी-1 फार्म विकत दिला नाही. बांधकाम खात्याचे परिपत्रक दि.15.05.2007 अन्वये फॉर्मची किंमत रु.500/- वसुल केली नाही.

निविदा फॉर्म बी-1 मधील क्लॉज व अटी शर्तीवर मक्तेदार यांच्या सह्या नाहीत. नियमानुसार करार करणेत आला नाही.

मोजमाप पुस्तक क्र.5 पृष्ठ क्र.43,44 वर नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 182 नुसार लाल शाईने क्रॉस केले नाही.

शासन निर्णय 17 जून 2010 नुसार कामगार उपकर रक्कम रु.2924/- देयकातुन कापुन घेतले नाहीत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार अन्वये कामगार वीमा र.रु.2924/- देयकातुन वसुल केला नाही.

या कामसाठी गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे. यात खडी, वाळु अशा स्वरूपाचे खनिज वापरले आहे.

बाब क्र.1 सिमेंटकाँक्रीट 1.50 घन मीटर

बाब क्र.2 सिमेंटकाँक्रीट 60mm 709.01 चौरस मीटर

गौण खनिज कोणत्या प्रकारचे किती वापरले या बाबत वापर पत्रक तयार केलेले नाही व महाराष्ट्र

शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी वसुल करावी. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 78)

### *120 HCL कंपनीस आदा केलेल्या देयकाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : संगणक, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम : 44100.00 रु.,

***HCL कंपनीस चार्जेबल ट्रान्झेक्शन बाबत महानगरपालिकेने रुपये1,62,74,474/- सन 2011-12 मध्ये आदा केलेले आहेत. करारपत्रातील जनरल अटी/शर्ती पान नं.22 वरील अट क्रं.7 नुसार संगणकीकरण पूर्ण करणेस 12 महिन्याची मुदत दिली आहे. मुदतीत काम पूर्ण न केलेस प्रतीदिन रुपये300/- प्रमाणे रुपये25 लाखाचे मर्यादेपर्यंत दंड आकारणेचे स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणे दंडाची रक्कम रुपये44,100/- वसुल करणेत आलेली नाही.***

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1270 | 30/06/2011 | 21,68,649/- | 19/03/2010 ते 18/05/2011 |
| 3342 | 13/09/2011 | 30,66,375/- | 19/05/2011 ते 31 /07/ 2011 |
| 4901 | 02/12/2011 | 20,86,860/- | 01/08/2011 ते 31/08/2011 |
| 5086 | 09/12/2011 | 13,87,545/- | 01/09/2011 ते 30/09/2011 |
| 7826 | 31/03/2012 | 74,99,291/- | 01/10/2011 ते 31/10/2011 |

महासभा क्रं. 09 ठराव क्रं.149 विषय क्रं.12 दि.21/2/2009 ते HCL कंपनीस 10 वर्ष कालावधीसाठी E-Governance अंतर्गत संगणकीकरण योजना राबविणे व नागरी सुविधा केंद्र स्थापन करुन त्या मार्फत संगणकीकृत सेवा देणेचे कामास महासभेने मान्यता दिली आहे. सदर कामाचे करारपत्र दि.30/08/2010 रोजी झालेले असून कामाचा कार्यादेश दि.02/03/2009 रोजी दिला आहे. E-Governance प्रकल्प निविदा प्रक्रियेबाबत परिच्छेद क्रमांक 27, विशेष लेखा परीक्षण अहवाल सन 2006-07 ते 2009-10 मध्ये सविस्तर आक्षेप नोंदविणेत आलेला आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

कामाची मुदत 02/03/2010 रोजी संपली असलेने व HCL कंपनीकडून मॉड्युल विकसित करणेचे काम दि.27/07/2010 रोजी एकूण 147 दिवस विलंबाने पूर्ण झालेने 147 दिवस x रुपये 300/- दंड/दिवस प्रमाणे रुपये44,100/- वसुल करणेत यावा.

करारपत्रामधील अटी / शर्ती 7.1 नुसार ANNEXURE II मधील तरतुदीप्रमाणे कंपनीचे काम समाधानकारक चालु असलेचे दर आठवड्यास मुख्य लेखापरीक्षक व सिस्टीम मॅनेजर यांनी प्रमाणित करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

करारपत्रातील अट क्रं.17 (a) नुसार नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेले पैसे दररोज मनपा बँक खातेमध्ये जमा करणे आवश्यक आहे. HCL कंपनीने दररोज बँक खातेमध्ये पैसे जमा केले नाहीतर तो कराराचा भंग मानण्यात येईल. तसेच मनपाने HCL कंपनीच्या हिश्यापोटीची रक्कम प्रत्येक आठवड्याचे दुसऱ्या दिवशी कंपनीचे बँक खातेमध्ये भरणे आवश्यक आहे. मनपाने रक्कम भरली नाही तर मनपाचे वतीने कराराचा भंग होत आहे असे नमुद केले आहे. मनपाचे वतीने करारानुसार कंपनीस रक्कम आदा केलेचे दिसून येत नाही.

करार अटी / शर्ती 21 मधील 21.1 (c) प्रमाणे मनपाने सलग तीन महिने देय तारखेच्या तीन दिवस विलंबाने पैसे आदा केले तर तो कराराचा भंग ठरेल असे नमुद आहे. त्याप्रमाणे मनपाने कंपनीचे हिश्याची रक्कम आदा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

HCL कंपनीने दि.18/1/2010 ते 27/7/2010 पर्यंत अंदाजे रुपये46,58,913/- देयकाची मनपाकडे मागणी

केली आहे. परंतु दि.27/7/2010 पर्यंत कंपनीने वेगवेगळ्या विभागाची मॉड्युल्स विकसित केली नसलेने त्यांना सदर कालावधीचे देयक आदा करणेत येवु नये असे दि.10 ऑगष्ट 2012 चे स्टिअरींग कमिटीमध्ये ठरले आहे. त्यानुसार रुपये46,58,913/- वगळुन अन्य देयक आदा करणे योग्य आहे.
जुलै 2012 अखेर कंपनीने रुपये4,17,15,814/- च्या देयकांची मागणी केली आहे. त्यापैकी रुपये2,02,08,498/- ची देयके मनपाने आदा केली आहेत व स्टिअरींग कमिटीने बैठकीमध्ये रुपये47,03,013/- वगळुन रुपये1,67,36,326/- कंपनीस आदा करणेचे नमुद आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही लेखापरीक्षण तारखे अखेर दि.07/04/2012 झालेचे दिसून आले नाही.
करारातील अ.क्र. 22 अटी / शर्तींचा भंग झालेस करार रद्द करणेबाबतच्या अटी नमुद आहेत त्याप्रमाणे अटी / शर्तींचे पालन दोन्ही बाजुंनी होणे आवश्यक आहे.

DATSBKM7201 (Ref No : 115)

## *121 फौजदारी गुन्हयाबाबत खटला प्रलंबीत असलेल्या सेवकांच्या पुनर्नियुक्ती बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन, 0 निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***अन्वेषण चौकशी किंवा गुन्हयाबाबतचा खटला प्रलंबित असलेल्या सेवकांना नियमबाह्यरित्या पुनर्नियुक्त करणेत आलेले आहे.***

सां.मि.कु. मनपा कडील सेवा पुस्तकांची पडताळणी करता सोबतच्या यादीतील 13 कर्मचाऱ्यांना त्यांना 48 तासापेक्षा जास्त पोलीस कोठडीत ठेवलेने, निलंबीत करणेत आले होते. याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 26,27,32 दि. 21/12/2012 व दि. 28/12/2012 अन्वये विचारणा करता प्रशासन अधिकारी (आस्था) यांनी अर्धसमास पत्र क्रं. 26,27 ला त्यांचेकडील पत्र क्रं. 756/ दि. 31/01/2013, व 757/ दि. 31/01/2013 नुसार दिलेली उत्तरे पहता सा.प्र.शा.नि.क्रं. मिप्रआ-2008/प्र.क्र./2008/11 अ / दि. 14/03/2008 व सा.प्र.वि.शा.नि.क्र. सीआरव्ही-1037/ प्र.क्र. 03/07/2011 दि. 18/10/07 मधील तरतुदी व मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहून सक्षम अधिकारी मा. आयुक्तसो, यांचे मान्यतेने खटल्याचा निर्णय होणेपूर्वी पुन:स्थापित केले आहे. हे म्हणणे मान्य करता येत नाही.
खालील कर्मचाऱ्यांना नियमबाह्यरित्या पुन:स्थापित करणेत आले आहे.

| अ. क्र | कर्मचा ऱ्यांचे नांव | पदनाम | शिक्षेचा प्रकार क्रमांक व दिनांक | पुन:स्थापित क्रमांक व दिनांक | सध्या काम करीत | निलंबनाचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | असलेले ठिकाण | |
| 1 | रघुवीर गोपाल हलवाई | जकात तपासणीस | निलंबीतक्र./आस्था/वि/ 232 06/08/2003 | क्र.मनपा/आस्था/वि/322/04 दि 31/12/04 | गटनेता लिपीक | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 2 | धरमसिंग हिरालाल नगरकर | जकात अधिक्षक | निलंबीतक्र./आस्था/वि/ 230 06/08/2003 | क्र.मनपा/आस्था/वि/323/04 दि 31/12/04 | सहा.आयुक्त, मिरज | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 3 | प्रदिप रामचंद्र जोशी | कनिष्ठ लिपीक | निलंबीतक्र./आस्था/वि/ 231 06/08/2003 | क्र.मनपा/आस्था/वि/324/04 दि 31/12/04 | मागासवर्गीय समिती, सांगली | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 4 | प्रकाश जयसिंग भोसले | कनिष्ठ लिपीक | क्र.मनपा/आस्था/वि/65/03 /04 दि 19/1/2004 | क्र.मनपा/आस्था/वि/161/04 दि 6/12/04 | जकात विभाग, सांगली | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 5 | संदिप सुमतीलाल शहा | कनिष्ठ लिपीक | निलंबीत क्र.मनपा/आस्था/वि/185/05/05 दि 7/5/2005 | दि. 3/6/2006 | जकात विभाग, सांगली | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 6 | महेंद्र विष्णू चंडाले | सफाई कामगार | निलंबीत क्र. मनपा/आस्था/10/ 37/2005/06 दि. 28/12/2005 | पुनर्रस्थापितचा दि. 2/4/2012 चा आदेश स्वीकारला नाही. | - | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | सुरेश जिवाप्पा हाणमापुरे | बागमाळी | निलंबीत क्र.मनपा/आस्था/7/3931/06/07 दि. 2/4/2007 | क्र.मनपा/आस्था/ 17/2009-10 दि. 16/2/2010 | बागा विभाग, सांगली | 48 तासांपेक्षा जास्त पोलिस कोठडी. |
| 8 | सतिश बाबासाहेब सावंत | आरेखक | निलंबीत 28/09/2008 | क्र.मनपा//9/4/2010/दि.20/04/2010 आस्था/वि/92/2010/11 दि. 9/4/2010 | बांधकाम विभाग, सांगली | बेहिशोबी मालमत्ता जवळ बाळगल्याबद्दल. |

उपरोक्त दि. 14/03/08 चे शा. निर्णयानुसार सदरचे अधिकार मा. विभागीय आयुक्तांस असलेने, सन 11/12 मधील वेतनाची रक्कम रु. 2211240/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATASJF7201 (Ref No : 118)

## *122 नगरसेवक लेटरपॅड छपाई नियमबाह्य खर्चा बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: साप्रवी, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम : 612645.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 612645.00 रु.,

***म.शा.न.वि.विभाग शा.नि.क्र. संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दि.24 जानेवारी 2005 नुसार नगरसेवकांना मानधन म्हणून दर महा रुपये 4000/- (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेऊन) देणेत येतात. परंतु मनपा निधीतुन सन 2011-12 या आर्थिक वर्षात नगरसेवक लेटर पॅड छपाईवर रुपये 147504/- इतका खर्च करणेत आला आहे.***

म.शा.न.वि.विभाग शा.नि.क्र. संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दि.24 जानेवारी 2005 नुसार नुसार नगरसेवकांना मानधन म्हणून दर महा रुपये 4000/- (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेऊन) देणेत येतात. तसेच शा.नि.क्र. संकीर्ण 2009/प्र.क्र.148/नवि-26 दि.22 जानेवारी 2010 ने नगरसेवकांचे मानधन दर महा रुपये 7500/- केले आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1. शासन निर्णयानुसार मानधनामध्ये लेखन सामुग्री खर्चाचा समावेश असलेने जन माहिती अधिकारी

तथा प्रशासकीय अधिकारी सा.मि.कु. मनपा ने क्र.मनपा/प्रशावि/5/158/2012-13 दि.24/08/2012 रोजी दिलेल्या पत्रा प्रमाणे सन 2005-06 ते सन 2011-12 या कालावधीत नगरसेवकांचे लेटर पॅड छपाईवरील खर्च रुपये 612645/- संबंधिताकडून वसुल करणेत यावा.

DATSBKM7201 (Ref No : 81)

# कलम ९ क खालील आक्षेप

## गंभीर अनियमितता

-------------------- निरंक -------------------

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

## 123 फिरती दैनंदिनी (डायऱ्या) मंजूर न करताच वेतन आदा केलेबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिःस,*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***पाणी पुरवठा विभागाचे 32 वसुली कर्मचारी बाराही महिने फिरतीवर असतात परंतू त्यांच्या दैनंदिनी नोंदवही मंजूर करुन न घेता वेतन आदा केले आहे.*** |

सांगली मिरज आणि कुपवाड या भागात पाणी पुरवठा अंतर्गत 32 कर्मचारी काम करीत आहेत. यातील प्रत्येक कर्मचाऱ्याने दररोज किती व नेमके केणते काम केले हे दर्शविणारी डायरी 215 पानामध्ये छापून घेतली आहे. प्रशासन अधिकारी रेकॉर्ड यांनी दि. 9/1/2012 रोजी पाणी पुरवठा विभागास डायऱ्या पुरविल्या आहेत. या वेळी किती डायऱ्या पुरविल्या व त्या कोणत्या कर्मचाऱ्यांना दिल्या याबबतची लेखा परिक्षणास नोंदवही दाखविली नाही.

सन 2011-12 या वर्षात कर्मचाऱ्यांनी वापरलेली व त्यात रोजच्या कामाच्या नोंद करुन महिना अखेरीस सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी घेतलेली एकही डायरी लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. दिवसभर हे सारे कर्मचारी कार्यालयाबाहेर फिरतीवर असतात. त्यांच्या डायऱ्या मंजूर न करताच त्यांना भत्ता व वेतन देणेत आले आहे.

सर्व कर्मचाऱ्यांच्या मंजूर दैनंदिन्या लेखा परिक्षण कामी देणेत याव्यात किंवा वेतन भत्याची रक्कम वसूल करुन दाखवावी असे अर्धसमास पत्राने कळवूनही लेखापरीक्षणास पुर्तता दाखविली नाही. अर्धसमास पत्रास समर्पक उत्तर दिले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 137)

## 124 टपाल तिकीट व जंगम स्थावर मालमत्ता नोंदवहया ठेवणेत आले नसले बाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व जलनि, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नगरपालिका लेखा संहिता 1971 नियमानुसार पोस्टेज स्टॅम्प, जंगम स्थावर मालमत्ता नोंदवह्या ठेवणेत आल्या नाहीत.***

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

लेखा संहिता 1971 नियम 143 नुसार टपाल तिकीटांचा हिशोब लेखापरीक्षण कामी देणेत यावा. असे अर्धसमास पत्राद्वारे विचारले असता या कार्यालयात टपाल तिकीटांचा हिशोब ठेवला जात नाही असे कळविले. परंतु पत्र कशी पाठविली जातात याचा खुलासा केला नाही. व पत्र पाठविणेचे रजिस्टर ही दाखविले नाही. मार्च 2011 पासून राजस्व तिकीटांचा हिशोब ठेवला असल्याचे अर्धसमास पत्रास उत्तर आहे. परंतु हिशेब लेखापरीक्षणास दाखविला नाही.

लेखा संहिता1971, नियम 144 नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं. 114 मध्ये दाखविण्यात आली नाही. तसेच विना वापर व पडून राहिलेली मालमत्तेची यादी ठेवणेत आलेली नाही. अर्धसमास पत्राच्या उत्तराप्रमाणे सन 2001 पर्यत जंगम मालमत्ता नोंदवही ठेवली आहे. त्यानंतरची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत नाही.

लेखा संहिता नियम 155 नुसार स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नं. 128 लेखा परिक्षण कामी उपलब्ध केली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड भागात कोणत्या प्रकारची किती स्थावर मालमत्ता आहे या बाबतची सर्व कागदपत्रे लेखा परिक्षणास दाखविणेत आली नाही. अर्धसमास पत्रास दिलेले उत्तराप्रमाणे कागदपत्रे दाखविली नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 152)

## *125 पाणी पुरवठा विभागास होत असलेल्या तोट्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2011-12 मध्ये पाणी पुरवठा विभागाचे उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ घेतला असता योग्य नियोजन अभावी जमेपेक्षा खर्च जास्त होत असलेचे दिसुन येते.***

पाणी पुरवठा विभागाकडून दररोज पाणी उपसा 76.91 द.ल.लिटर होत असून नळ कनेक्शन धारकांना 53.70 द.ल.लिटर , सार्वजनिक नळाद्वारे 2.68 द.ल.लिटर पाणी पुरवठा होत असून गळती व फिल्टर वॉश इ. मुळे 214 ल.लिटर पाणी वाया जात आहे. सदर गळतीची टक्केवारी 27.46% असलेचे दिसुन येते. महानगरपालिकेने अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरानुसार 1 दशलक्ष लिटर पाणी शुध्दीकरण करुन वितरीत करणेस रुपये21,39,000/- खर्च येत असलेचे स्पष्ट होते. त्यामुळे 21 दशलक्ष लिटर पाणी गळतीमुळे 21 x रुपये21,39,000/- = रुपये4,49,19,017/- महानगरपालिकेचे वाया गेलेचे दिसुन येते. त्यामुळे पाणी गळती कमी करणेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागास सन 2011-12 मध्ये पाण्याचा उपसा करुन वितरण करणेसाठी अस्थापना खर्चावर एकूण रुपये16,45,10,513/- खर्च झाला असलेचे अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये नमुद आहे. परंतू वार्षिक लेख्यामध्ये पाणी पुरवठा विभागावर महसुली खर्च रुपये17,84,66,913/- व भांडवली खर्च रुपये4,11,54,969/- असा एकूण रुपये21,96,21,882/- खर्च झाला असलेचे स्पष्ट होते.

पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या प्रपत्राप्रमाणे सन 2011-12 या आर्थिक वर्षात चालु मागणी रुपये14,99,09,112/- व थकबाकी रुपये8,40,97,070/- अशी एकूण रुपये23,40,06,182/- वसूल करणेचे आहेत. त्यापैकी चालु वसूली रुपये10,08,17,123/- + थकबाकी रुपये4,86,54,841/- असे एकूण रुपये14,94,71,964/- वसूल करणेत आले आहेत. त्यामुळे सन 2011-12 वर्षात झालेल्या खर्चाचे तुलनेत प्रत्यक्ष जमा 68% झाली आहे.

महानगरपालिकेने महासभा क्रं.08/2004-05 दि.17/02/2005, ठराव क्रं.192 ने पाणी पट्टीचे दर सन 2005-06 ते सन 2007-08 अखेर तीन वर्षाचे कालावधीसाठी टप्प्या टप्प्याने वाढविले आहेत. परंतू सन 2008-09 पासून 2011-12 पर्यंत पाणी पट्टीचे दर वाढविले नसलेने पाणी पुरवठा विभागाचा तोटा वाढला असलेचे स्पष्ट होते. अस्थापनाखर्च, विद्युत आकार, अशुध्द पाणी उपसाचे दर वाढले असलेने त्याप्रमाणात पाणी पट्टीमध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

सन 2011-12 अखेर पाणी पुरवठा विभागाची थकबाकी रुपये8,40,97,070/- व चालु मागणी रुपये14,99,09,112/- आहे. चालु मागणीशी थकबाकीचे प्रमाणे 56.09% असलेचे दिसुन येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 10 नियम 12 (1) अ नुसार पाणी पट्टी बद्दल किंवा रक्कमेबद्दल मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याचे आत रक्कम

देणेस कसुर केलेस पाणी बंद करणेची तरतुद आहे. सदर तरतुदीची अंमलबजावणी योग्य रितीने केली नसलेने थकबाकीची रक्कम प्रचंड प्रमाणात वाढली असलेचे स्पष्ट होत असलेने थकबाकी वसुलीस प्राधान्य देणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेस सुजल निर्मल अभियान व UIDSSMT या योजने अंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून प्रचंड प्रमाणात निधी उपलब्ध झालेला आहे. योजनांची कामे योग्य रितीने व वेळेत पूर्ण होणेसाठी पाणी पुरवठा विभागाने जमा व खर्चाचे नियोजन योग्य रितीने करुन नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरवठा करणेची दक्षता घेणे आवश्यक आहे.

DATSBKM7201 (Ref No : 156)

## *126 देयकातून 1% विमा कपात केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

वसूलपात्र रक्कम : 31242.00 रु.,

***खुदाईसाठी वार्षिक ठेकेदारास दिलेल्या देयकातुन विम्याची रक्कम कपात करणेत आलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती सभा क्रं.01 ठराव क्रं.29 दि.19.04.2011

तांत्रिक मान्यता :- जल अभियंता यांचे पत्र 62 /2011 - 12 दि. 08.07.2011

अंदाजपत्रकीय रककम :- 31,24,203 /- , मंजुर दर :- अंदाजपत्रकीय दराने

मक्तेदाराचे नांव :- श्री. अभय पाटील, सांगली

खालील आक्षेप घेणेत येत आहेत. .

सन 2011-12 मध्ये पाणी पुरवठा विभागाने पाईप लाईनसाठी चर खुदाई करणे व पाईप टाकणेचे काम मक्तेदार श्री. अभय पाटील (वार्षिक एजन्सी) यांचेकडून करुन घेतली असूनवर्षभर आदा केलेल्या देयकामधून मजिप्रा दरसूची सन 2011-12 मधील जनरल नोट्स अ.क्र. 27 प्रमाणे 1% विमा कपात करणे आवश्यक असता तो केला नसल्याने एकूण कामाची रक्कम रुपये 3124203 चे 1% प्रमाणे रुपये 31242/- वसुल करुन शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा करणेत यावीत.

उपरोक्त आक्षेपांचे पुर्ततेस्तव रक्कम रुपये31,242/- वसुलपात्र करणेत यावी.

DATSBKM7201 (Ref No : 157)

## *127 लेखा विषयक महत्वाच्या नोंदवहया लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केल्या नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेकडे विविध विभागाकडून रोज मोठ्याप्रमाणात रक्कमा जमा होतात. नियमानुसार जमेची चलने व रोखपालाची रोकड नोंदवही लेखा परिक्षणास दाखविली नाही.***

नगरपालिका लेखा संहिता 1971 नुसार महत्वाच्या लेखा विषयक नोंदवहया लेखापरीक्षणास उपलबध केल्या नाहीत.

| नियम | फॉर्म / नोंदवही |
|---|---|
| 25 | 4 |
| 25 | 8 |
| 32(2),65,70(2),73(5),78(3) | |
| 97(5) व 107 | 13 |
| 36(2) | 16 |
| 39 | 18 |
| 42 | 20 |
| 43 व 132 | 23 |
| 49 व 56 | 24 |
| 59 | 27 |
| 60 | 28 |
| 61 | 29 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 33(65,70(2) 73(5),78(3), 95(5) व 107) नुसार नमुना नं. 13 परिपूर्ण होवून चलनासह रोखापालाने रक्कम भरणा करुन घेणेची आहे. परंतू चलने न दाखविलेने जमा रक्कमेबाबत लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 39 नुसार रोखपालाची रोकड वही नमुना क्र. 18 मध्ये ठेवली नाही.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 35 (1) प्रमाणे कार्यालयात रक्कम स्विकारणाऱ्याकडून त्याची पोहोच पावती चलनावर व संकलीत पुस्तकावर घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही न करता रोज कोट्यावधी रुपये काही कार्यालयातून जमा होतात. त्याची पोहोच न देता पिशवित बंद करुन ठेवले

जातात. व दुसऱ्या दिवशी रक्कम खात्यावर भरली जाते.
अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 129)

### *128 धनादेश पुस्तक साठा नोंदवही अपूर्ण असले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखाविभाग,*

*अनियमितता कलम : 9ड*

| ***धनादेश पुस्तक नोंदवही अपूर्ण ठेवणेत आली आहे.*** |
|---|

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 9 नुसार धनादेश पुस्तकासाठी नोंदवही नमुना नं. 1 ठेवणेत आली आहे. परंतु नियम 9,46(1) व 152 नुसार नोंदवहीत नोंदी पूर्ण केल्या नाहीत.

सन 2008 पासून धनादेश पुस्तक वापरले बाबतच्या नोंदी नांदवहीतील स्तंभ क्र. 12 ते 24 मध्ये केल्या नाहीत. त्यामुळे अद्याप किती कोरी धनादेश पुस्तके किंवा धनादेश शिल्लक आहेत हे स्पष्ट होत नाही.

सन 2011-12 या आर्थिक वर्षातील वापरलेल्या धनादेश पुस्तकांच्या स्थळ प्रती लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नाहीत.

सन 2011-12 मधील रद्द केलेल्या धनादेशांची यादी व धनादेश लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

मार्च 2012 अखेर काढलेले धनादेश व ते लेखा परिक्षण तारीख 7/12/2012 पर्यत वटले नाहीत. याची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

युनियन बँकेचे धनादेश नं. 363401 ते 363500 चे धनादेशचे कोरे पुस्तक दाखविणेत आले, परंतु लेखा संहिता नियम 46(2) नुसार धनादेश पुस्तक मिळताच त्यातील धनादेशाची मोजणी करून मलपृष्टावर संख्या दर्शविणारी टिप नमुद करुन सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी केली नाही.

सन 2011-12 मध्ये कार्यालय, विविध संस्था, व्यक्ती इत्यांदीना दिलेल्या धनादेशाची पोहोच लेखा परिक्षणास दाखविणेत आली नाही.

धनादेश पुस्तक वापरणेसाठी ताब्यात घेतलेबाबत, संबंधीत कर्मचारी यांची स्तंभ क्र. 11 मध्ये सही नाही. अर्धसमास पत्राचे उत्तरास नमुद केल्याप्रमाणे त्यांचे कार्यालयात हजर राहूनही कागदपत्रे दाखविली नाहीत.

DATBPCM5601 (Ref No : 130)

## *129 मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा मंजुर कर्मचारी अकृतीबंध व लेखापरीक्षण अहवालाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : लेखापरीक्षण,*
*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्यलेखापरीक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेची लेखापरीक्षा करणे व 5 (3) (4) प्रमाणे अहवाल तयार करुन सादर आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51(1) अन्वये स्थायी समितीने मुख्यलेखापरीक्षक यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते ,कलम 51 चे पोटकलम (4) च्या तरतुदीच्या अधिन ठरविलेचा ठराव लेखापरीक्षणास देणेत आला नाही.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (2) नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने मुख्य लेखापरीक्षकांनी त्यांचे कार्यालयात नेमणुक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची यादी लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. तसेच सन 2011-12 या वर्षात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नेमणुक कोणामार्फत करणेत आली तसेच सदर कर्मचारी कोणत्या विभागातून मुलेप कार्यालयात कोणत्या कालावधीसाठी बदलीने कार्यरत आहेत याबाबतची माहितीही लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे प्रकरण 3 मधील दोन नुसार मुख्यलेखापरीक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेची लेखा परिक्षा करणे आवश्यक आहे व 5 (3) व (4) प्रमाणे अहवाल तयार करुन सादर करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे कलम 105 (1) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी व लेखापरीक्षा करुन अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय 1949 चे कलम 106 (3) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झालेनंतर शक्य तितक्या लवकर,मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 166)

## *130 गुंठवारी प्रशमन शुल्क व विकास आकार वसुल केले बाबतची माहिती उपलब्ध केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नगररचना,*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन 2011-12 या आर्थिक वर्षात जमा केलेले गुंठेवारी प्रशमन शुल्क व विकास आकार याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेली नाही.***

महाराष्ट्र गुंठेवारीविकास अधिनियम 2001 नियम 4 (फ) नुसार गुंठेवारी भूखंड धारकाचे बांधकाम नियमित करणेसाठी आकारल्या जाणाऱ्या प्रशमन शुल्क व विकास आकाराची माहिती खालील नमुन्यात अपेक्षिली होती. तथापी ती उपलब्ध झालेली नाही.

| अ. क्र. | धनाकर्ष क्रमांक, दिनांक | रक्कम रुपये | कोणा कडून प्राप्त झाला. | प्रशमन शुल्क / विकास आकार रक्कम | लेखा परीक्षणास पाठविल्याचा दिनांक | लेखाशाखेने बँकेत जमा केल्याचा दिनांक | धनादेश /धनाकर्ष वटल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अन्वये कलम 52 व 53 खाली अवैध बांधकामाबाबत नगररचना विभागाने किती नोटीसा काढल्या तसेच किती तात्पुरते व अंतिम रेखांकने मंजुर केली आहेत याबाबतची माहिती लेखापरीक्षणास देणेत आलेली नसलेने एकूण किती शुल्क व दंडात्मक रक्कम जमा झाली याचे लेखापरीक्षण करता आले नाही.

अर्धसमासपत्र क्र.71 दिनांक 22/01/2013 अन्वये सन 11-12 या आर्थिक वर्षात बांधकाम परवानगी दिलेल्या मालमत्ता धारकांची यादी मागविणेतआली होती. त्यानुसार यादी दिनांक 29/03/2013 रोजी देणेत आली. परंतु प्रत्येक बांधकामाची परवानगी नस्ती, बांधकाम नकाशे व भरण्यात आलेले शुल्क यांची चलने दाखविणेत आलेली नाहीत.

DATRMJM6101 (Ref No : 133)

## *131 नियमितीकरण केलेल्या गुंठेवारी क्षेत्राच्या 10 % जमीन मनपाने ताब्यात घेतलेची माहिती लेखापरीक्षणास दिली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष:नगररचना, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 व शासन नगर विकास पत्र क्रमांक गुंठेवारी - 1004/190/ प्र.क्र. 11/2004/नवि-30, दि. 14/7/2004 मधील तरतुदीनुसार 15 गुंठ्यापेक्षा (1500 चौ.मी.) जास्त आकाराचा भूखंड या अधिनियमान्वये नियमाधीन करताना किमान 150.00 चौ.मी. किंवा भूखंडाच्या क्षेत्राच्या 10% यामधील जी जास्त असेल तेवढी जागा बालवाडी / स्वच्छतागृह / सार्वजनिक सुविधा इत्यादी प्रयोजनासाठी पालिकेने मोफत ताब्यात घ्यावी असे स्पष्टपणे नमुद केले आहे. त्याप्रमाणे ताब्यात घेतलेल्या जागांची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.***

दि. 25/2/2013 च्या अर्धसमास ज्ञापनाला आपलेकडून उत्तर प्राप्त झालेले नाही.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 व शासन नगर विकास पत्र क्रमांक गुंठेवारी - 1004/190/ प्र.क्र. 11/2004/नवि-30, दि. 14/7/2004 मधील तरतुदीनुसार 15 गुंठ्यापेक्षा (1500 चौ.मी.) दजास्त आकाराचा भूखंड या अधिनियमान्वये नियमाधीन करताना किमान 150.00 चौ.मी. किंवा भूखंडाच्या क्षेत्राच्या 10% यामधील जी जास्त असेल तेवढी जागा बालवाडी / स्वच्छतागृह / सार्वजनिक सुविधा इत्यादी प्रयोजनासाठी पालिकेने मोफत ताब्यात घ्यावी असे स्पष्टपणे नमुद केले आहे. तसेच रेखांकनामध्ये दर्शविलेली एकूण भूखंडाच्या 10% भूखंड न विकलेला व बांधकाम न केलेला असावा अशीही अट आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मनपाने एकूण किती खुल्या जागा ताब्यात घेतल्या व ताब्यात घेतलेल्या खुल्या जागा 7/12 वर किंवा प्रॉपर्टी कार्डवर पालिकेच्या नावे नोंद केलेची माहिती लेखापरीक्षणास देणेत आलेली नाही.

प्रशमन शुल्क व विकास आकार स्वरुपात वसुल केलेल्या रक्कमांचा प्रकरण निहाय तपशील देणेत आलेला नाही.

सन 2011-12 च्या वार्षीक लेख्यामध्ये गुंठेवारी विभागाकडे एकूण रु.85,00,000/- निधी उपलब्ध आहे. परंतु कोणताही खर्च करणेत आलेला नसलेने, नागरिकांना त्यांच्या मुलभूत सोयी सुविधापासून वंचीत ठेवलेचे स्पष्ट होते.

## *132 जकात पावती पुस्तकामध्ये खाडाखोड केलेने झालेले नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम : 37999.00 रु.,

***जकात पावत्यामधील खाडाखोडी केलेल्या असून त्या सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकीत केल्या नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

जकात पावती पुस्तकांची तपासणी करता खालील पावत्यांमध्ये खाडाखोड, उपरीलेखन आढळून आले.

| अ.क्र. | पावती क्रं. दि. | रक्कम रु. | खाडाखोड करुन लिहलेली रक्कम | फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | 119190/ 14/03/2012 | 2250/- | 1350/- | 900/- |
| 2 | 119582/ 20/03/2012 | 1190/- | 893/- | 297/- |
| 3 | 133943/25/03/2012 | 12494/- | 12032/- | 462/- |
| 4 | 147718/31/03/2012 | 60/- | 40/- | 20/- |
| 5 | 80226/01/03/2012 | 866/-<br>16650/- | 555/-<br>8880/- | 311/-<br>7770/- |
| 6 | 80289/03/03/2012 | 3811/- | 3559/- | 252/- |
| 7 | 80369/ दिनांक नाही | 132/- | 102/- | 30/- |
| 8 | 479/05/03/2012 | 2200/- | 1100/- | 1100/- |
| 9 | 734/09/03/2012 | 3164/- | 2989/- | 175/- |
| 10 | 67474/07/03/2012 | 34514/- | 8025/- | 26489/- |
| 11 | 120521/08/02/2012 | 672/- | 480/- | 192/- |
| | | 7703/- | 40005/- | 37999/- |

या खाडाखोडीत मनपा लेखा संहिता 1971 चे नियम क्रं. 9 (8) व 10 नुसार छाननी करुन प्राधिकृत अधिकाऱ्याने साक्षांकित करणे आवश्यक असता त्या करणेत आलेल्या नाहीत.

याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे. सदरची बाब चाचणी लेखा परिक्षणात आढूळन आलेने इतर 11 महिन्यातील पावती पुस्तकांतील खाडाखोडीबाबत आढावा घेऊन त्याप्रमाणे वसुली करावी.

## *133 चालू खाते धारकांची नमुना क्रमांक 39 नोंद वही ठेवली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ड*

***चालू खाते धारकांचे नगरपालिका संहिता 1971 चे नियम 71 (3) अन्वये नमुना क्रमांक 39 नुसार नोंद वही ठेवणेत आलेली नाही.***

लेखासंहिता 1971 चे नियम 71 (2) अन्वये चालू खाते धारकाचे जकात माल आयात करतेवेळी सादर केलेले प्रतिज्ञापत्र लेखापरीक्षणास अर्धसमास ज्ञा.क्र.110 दि.13/02/2013 ने मागणी करुन ही उत्तर व अभिलेखे अप्राप्त आहेत.

नियम 71 (3) प्रमाणे प्रतिज्ञा पत्रावरुन प्रत्येक व्यक्ती वा संस्थेकडून येणे जकात रक्कमेची लेखी नमुना क्रं. 39 प्रमाणे ठेवलेली प्रत लेखा परिक्षणास सादर केली नाही.

DATASJF7201 (Ref No : 159)

## *134 पथकर (मार्गस्थ) पावती पुस्तकांचा साठा नोंदवहीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ड*

***जकात विभागाकडील पथकर (मार्गस्थ) पुस्तकांची साठा नोंदवही पाहता ती नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 73 (2) नुसार नमुना क्रं. 42 मध्ये ठेवणेत आलेली नाही.***

जकात विभागाकडील पथकर (मार्गस्थ) पुस्तकांची साठा नोंदवही पाहता ती नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 73 (2) नुसार नमुना क्रं. 42 मध्ये ठेवणेत आलेली नाही.

नाक्यावरील पथकर जमेबाबत नियम 73 (5) नुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

जकात अधिक्षकाने नियम क्रमांक 69 व 70 नुसार याबाबत लेखे ठेवलेले नाहीत.

नियम 73 (7) नुसार नमुना क्रं. 108 मध्ये ठेवलेली व्यक्तिगत खातेवही लेखापरीक्षणास सादर केलेली

नाही.

तसेच सन 2011-12 मध्ये सुरवातीची शिल्लक, छापलेली पुस्तके (दर्शनी मुल्यांसह) वर्षात वापरलेली पुस्तके, जमा रक्कम व शिल्लक पुस्तकांचा ताळमेळ लेखापरीक्षणास सादर करणेत आला नाही. याबाबत अर्धसमास ज्ञपानाचे उत्तर अप्राप्त आहेत.

DATASJF7201 (Ref No : 160)

### *135 जकात परतावा नोंदवही ठेवली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : जकात,*

*अनियमितता कलम : 9ड*

***ठेवी परतावा नमुना क्रमांक 40 प्रमाणे पुस्तके ठेवणे आवश्यक असता ठेवणेत आलेली नाहीत.***

जकात विभागामार्फत महानगरपालिका लेखा संहिता 1971 नियम क्रं. 72 नुसार ठेवींचा परतावा मुख्य जकात कार्यालयामार्फत केला जातो. सदरच्या ठेवींच्या परताव्यावर लक्ष ठेवणे करिता नमुना क्रं. 40 नुसार नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे सन 11-12 या वर्षात नियमाप्रमाणे किती जकात परतावा देणेत आला ते स्पष्ट होत नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 161)

### *136 कार्यालयीन व भाड्याच्या वाहनांचे लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 313998.00 रु.

***कार्यालयीन व भाड्याच्या वाहनाचे लेखे व हिशोब लेखा परिक्षणास सादर करणेत आलेले नाहीत.***

महानगरपालिकेच्या मालकीची व सन 11-12 या आर्थिक वर्षात भाड्याने घेतलेली जी चार चाकी वहाने घरपट्टी विभागाच्या वापरात आहेत. त्यांचे लेखे व जमा खर्चाचा हिशोब खालील कागदपत्रासहित लेखापरीक्षणास सादर करणेत आलेला नाही.

भाड्याच्या वाहनासह सर्व वाहनाची लॉगबुक्स (स्कंदवही)
कार्यालयाच्या सर्व वाहनांची हिस्ट्रीसीट (इतिहास नोंदवही)
भाड्याच्या प्रस्तावाच्या सर्व नस्ती व भाड्याच्या प्रत्येक वहानावर झालेला खर्च.
सन 2011-12 या आर्थिक वर्षाच्या वार्षीक लेख्यामध्ये अ) 5 मालमत्ता कर विभाग या लेखाशिर्षाखाली वाहन देखभाल दुरुस्ती व इंधन वंगण तेल इत्यादी वर एकूण रुपये 313998/- इतका झालेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATBPCM5601 (Ref No : 128)

## *137 कर निर्धारण बाबतच्या नोंदवह्या व कागदपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन,*
*अनियमितता कलम : 9ड*

***घरपट्टी विभागाने नगर पालिका लेखा संहिता 1971 मधील नियमानुसार नोंदवह्या व कागदपत्रे लेखा परिक्षणासाठी वेळीच उपलब्ध केले नाहीत.***

लेखा संहिता नियम 78 (3) नुसार दैनिक वसूली नोंद वही नं. 50 उपलब्ध आहे. या नोंद वहीतील स्तंभाप्रमाणे नोंदी केल्या नाहीत. दिवसातील सर्व पावत्या वरील रक्कमेची बेरीज करुन एकत्र नोंद घेतली आहे. परंतू स्तंभ 2 नुसार प्रत्येक पावती क्रमांक नमुद केलेला नाही.

लेखा संहिता नियम 79 प्रमाणे सक्षम अधिकारी /कर्मचारी यांनी तपासणी केली नाही. यामुळे नियमानुसार संकलनाचे नोंदीवर नियंत्रण नसलेचे स्पष्ट होते.

कर निर्धारण व संकलन कार्यालयाने खालील प्रमाणे लेखा विषयक नोंद वहया व फॉर्म मधील नोंदी दाखविल्या नाहीत.

| तपशील | नियम | नमुना नं. |
|---|---|---|
| कर निर्धारण सुची | 74 | 43 |
| कर निर्धारण हरकती नोंद वही | 75(5) | 44 |
| इमारत परवाना पुस्तक | 75(6) | 45 |
| मागणी बदल नोंद वही | 75(7) | 46 |
| कर मागणी नोंद वही | 76 (1) | 47 |
| कर देयक फाईल | 77 | 48 |
| दैनिंक वसूल नोंद वही | 78(3) | 50 |
| चलन स्थळ प्रत | - | 13 |
| मागणी नोटीस फाईल | 81(2) | 51 |
| करातून सुट कागदपत्रे | 82 | - |

अर्धसमास पत्राचे उत्तर वेळेत मिळाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 131)

### *138 लेखा परिक्षणाकामी कागदपत्रे उपलब्ध केले नाहीत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ड*

***कार्यवाही केली परंतु विहित नियमानुसार नोंदवहया व कागदपत्रे लेखापरीक्षण कामी दाखविले केले नाहीत.***

सन 2011-12 चे लेखापरीक्षण चालू असताना खालील कागदपत्रे लेखापरीक्षणासाठी देणेत आले नाहीत.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 113 प्रमाणे लिलावाचे प्रस्ताव व लिलाव योग्य जंगम मालमत्ता यादी

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 137 प्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांची आयकर विविरण पत्र

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 138 प्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांनी दिलेली तारणपत्र / जामीन कतबा व त्यांची नोंद असलेली नोंदवही नमुना नं. 106.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 141 प्रमाणे कर विभागाने किती रक्कमेचे अग्रीम घेतले व किती रक्कमेचे समायोजन करावयाचे शिल्लक आहे या संबंधीत कागदपत्रे

लेखा संहिता नियम 143 नुसार नमुना नं. 113 मध्ये टपाल तिकीट हिशोब

नियम 144 नुसार नमुना नं. 114 मध्ये जंगम मालमत्ता नोंदवही

नियम 145 प्रमाणे भाडांर संग्रह नोंदवही नं. 116

नियम 156 नुसार जंगम मालमत्ता यांची वार्षिक पडताळणी

वरील प्रमाणे लेखा विषयक सर्व कागदपत्रे व त्याला अनुषंगिक इतर कागदपत्रे लेखापरीक्षणासाठी प्राप्त केले नाही. अर्धसमास पत्रास उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 132)

## *139 कर निर्धारण व आकारणी पुस्तक नियमानुसार विहित नमुन्यात ठेवले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधीलअनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 9 नुसार आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरविल अशा नमुन्यात व रितीने आकारणी पुस्तक ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.***

अर्धसमास पत्र क्र. 49 ला करनिर्धारण व संकलन विभागाने उत्तर दिले आहे. परंतु अनुषंगिक कागदपत्रे लेखापरीक्षणास पुरविणेत आलेली नाहीत.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 9 नुसार आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरविल अशा नमुन्यात व रितीने आकारणी पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. परंतु स्थायीने मान्य केलेल्या विहित नमुन्यात पुस्तक ठेवणेचा ठराव लेखापरक्षिणास दाखविणेत आलेला नाही.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 19 नुसार प्रभाग आकारणी पुस्तक आयुक्तांनी अधिप्रमाणीत केलेले नाही.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 21(2) अन्वये मालमत्ताचे दर चार वर्षानी पुनर्विलोकन करुन नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये सन 2005-06 मध्ये करनिर्धारण करणेत येवून सुधारित आकारणी सन 2010 मध्ये केलेचे नमुद आहे. याचाच अर्थ दर चार वर्षानी पुनर्विलोकन करणेत आलेले नाही.

महानगरपालिका ठराव क्र. 18 दि. 17/9/98 नुसार सन 1998-99 या वर्षासाठी मनपा क्षेत्रातील मालमत्ता व कर आकारणी एकत्रित अॅसेसमेंट खाजगी एजन्सीकडून घेणेची निविदा मंजूर करणेत आली होती. त्यानुसार झालेल्या अॅसेसमेंटची प्रत लेखापरीक्षणास मागणेत आली असता देणेत आली नाही. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये उपरोक्त रेकॉर्ड सन 2005 चे पुरात भिजून नष्ट झालेचे नमुद करणेत आले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 138)

## *140 कर निर्धारण व आकारणी पुस्तक नियमानुसार विहित नमुन्यात ठेवले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :करनिर्धारण व संकलन, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 9 नुसार आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरविल अशा नमुन्यात व रितीने आकारणी पुस्तक ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.***

अर्धसमास पत्र क्र. 49 ला करनिर्धारण व संग्राहक विभागाने उत्तर दिले आहे. परंतु अनुषंगिक कागदपत्रे लेखापरीक्षणास पुरविणेत आलेली नाहीत.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 9 नुसार आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने तो ठरविल अशा नमुन्यात व रितीने आकारणी पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. परंतु स्थायीने मान्य केलेल्या विहित नमुन्यात पुस्तक ठेवणेचा ठराव लेखापरक्षिणास दाखविणेत आलेला नाही.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 19 नुसार प्रभाग आकारणी पुस्तक आयुक्तांनी अधिप्रमाणीत केलेले नाही.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 21(2) अन्वये मालमत्ताचे दर चार वर्षानी पुनर्विलोकन करुन नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये सन 2005-06 मध्ये करनिर्धारण करणेत येवून सुधारित आकरणी सन 2010 मध्ये केलेचे नमुद आहे. याचाच अर्थ दर चार वर्षानी पुनर्विलोकन करणेत आलेले नाही.

महानगरपालिका ठराव क्र. 18 दि. 17/9/98 नुसार सन 1998-99 या वर्षासाठी मनपा क्षेत्रातील मालमत्ता व कर आकारणी एकत्रित ॲसेसमेंट खाजगी एजन्सीकडून घेणेची निविदा मंजूर करणेत आली होती. त्यानुसार झालेल्या ॲसेसमेंटची प्रत लेखापरीक्षणास मागणेत आली असता देणेत आली नाहे. अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये उपरोक्त रेकॉर्ड सन 2005 चे पुरात भिजून नष्ट झालेचे नमुद करणेत आले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 153)

## *141 संडास बाथरुम व पॅसेजवर कर आकारणी केली नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ड*

***संडास, बाथरुम व पॅसेजवर कर आकारणी केली नसलेने कराची आकारणी कमी होवून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 7 अन्वये मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जमिनीचे व इमारतीचे करयोग्य मुल्य ठरविले जाते. अर्धसमास पत्र क्र. 53 मुद्दा क्र. 5 ला मालमत्ता विभागाने अपूर्ण उत्तर दिले आहे.

खालील आक्षेप घेणेत येत आहेत.

जा.क्र.मनपा/करवि/10/1864/2009-10 नुसार मालमत्ता कर सन 2009-10 पुनसर्व्हेक्षण आवाजवी भाडे मुल्याबाबतचे चौकशी समितीच्या अहवालावर आयुक्त यांनी निर्णय घेतला असून कराची आकारणी

करताना संडास, बाथरुम व पॅसेजवर कर आकारणी करणेबाबत आदेश दिला आहे. त्यानुसार कर आकारणी केली नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

DATSBKM7201 (Ref No : 154)

## *142 मालमत्ता कराच्या आकारणीसाठी यंत्र व सामुग्रीचे विवरण पत्र तयार केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन,*

*अनियमितता कलम : 9ड*

***आयुक्तांनी मालमत्ता कराच्या आकारणीसाठी करयोग्य मूल्य ठरविणेसाठी प्रत्येक वर्गात असणारे कोणतेही सयंत्र व यंत्रसामग्री याचे तपशीलवार वर्णन नमुद करणारे एक विवरणपत्र स्थायी समितीच्या निदेशानुसार तयार करणे आवश्यक असता ते केले नसलेने व्यापारी व औद्योगिक मालमत्तांची आकारणी नियमानुसार झालेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 7(2) नुसार कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा इमारतीवर किंवा जमिनीवर असलेली व आयुक्ताने महानगरपालिकेच्या मान्यतेने जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या वर्गापैकी कोणत्याही वर्गात मोडणारी सर्व संयत्रे व यंत्रसामुग्री ही पोटनियम (1) अन्वये अशा इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरवण्याच्या प्रयोजनासाठी अशा इमारतीचा किंवा जमिनीचा भाग असलेचे मानले जाईल. परंतु वर सांगितल्याप्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त अशा कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर असलेल्या कोणत्याही संयत्राचे किंवा यंत्र सामग्रीचे मूल्य जमेस धरता कामा नये.

आयुक्ताने पोटनियम (2) अन्वये वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या संयत्राचे व यंत्रसामग्रीचे वर्ग स्पष्टपणे दर्शविणारे आणि प्रत्येक वर्गात कोणते संयंत्र व यंत्रसामग्री येते याचे तपशीलवार वर्णन नमूद करणारे एक विवरणपत्र स्थायी समितीच्या निदेशानुसार तयार केले पाहिजे आणि ते विवरणपत्र लोकांना पाहण्यासाठी खुले असले पाहिजे.

मालमत्ता विभागाने अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये अशा प्रकारचे विवरणपत्र तयार केले नसलेचे मान्य केले आहे. सदर विवरण पत्र तयार केले नसलेने व्यापारी 19,021 व औद्योगिक 1008 मालमत्तांचे करयोग्य मूल्य नियमानुसार ठरविले नसलेचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 155)

### *143 व्यावसायीकांना अनुज्ञप्ती देणे व त्याची नोंद ठेवणे यामधील त्रुटी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :आरोग्य,*

*अनियमितता कलम : 9ड*

***अनुज्ञप्ती नोंदवहीत अनुक्रमणीका नाही, नोंदवही विहीत पध्दतीने लिहीली जात नाही. विलंब फी व नोंदणी फी किती घ्यावी या बाबत प्रत्येक प्रकरणात तफावत आढळली आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत महानगर पालिका हददीतील व्यावसायीकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या नियम 386(2) नुसार महापालिकेने विहीत शुल्क घेउन अनुज्ञप्ती देणे व त्याची नोंद ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सदर योजना राबविली जाते. त्यांच्या अभिलेखाची तपासणी केली असता खालिल त्रुटी निदर्शनास आल्या.

अनुज्ञप्ती नोंदवहीत अनुक्रमणीका नाही, नोंदवही विहीत पध्दतीने लिहीली जात नाही.सदर नोंदवहीत व्यवसायानुसार अनुक्रमणीका लिहीण्यात आलेली नाही. प्रत्येक व्यवसायासाठी स्वतंत्र पानावर नोंद घेण्यात आली नाही.

प्रत्येक व्यवसायासाठी विलंब फी व नोंदणी फी व नुतनीकरण फी घेतली जाते. परंतु सदर फी किती घ्यावी या बाबत प्रत्येक प्रकरणात तफावत आढळली आहे. विलंब फी किती घ्यावी याबाबतचा महासभेचा ठराव दाखविणेत आला नाही.

DATSPSM5701 (Ref No : 134)

### *144 अंत्यविधीसाठी खरेदी केलेल्या साहित्याची अभिलेख सादर केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :आरोग्य, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 3602499.00 रु.

***आरोग्य विभागामार्फत महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मृत्यु पावलेल्या व्यक्तिंच्या अंत्यविधी साठी महानगरपालिका मोफत अंत्यसंस्कार करण्याची योजना राबवीत आहे.त्यानुसार सन 2011.12 मध्ये***

***मृत्यु पावलेल्या व्यक्तींच्या अंत्यसंस्कारासाठी झालेल्या खर्चाचे अभिलेख लेखापरीक्षणासा सादर केलेले नाहीत.***

| प्रमाणक क्र. | दिनांक | पुरवठाधारकाचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| अप्राप्त | -- | -- | -- |
| अप्राप्त | -- | -- | -- |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मृत्यु पावलेल्या व्यक्तिंच्या अंत्यविधी साठी महानगरपालिका मोफत अंत्यसंस्कार करण्याची योजना राबवीत आहे.त्यानुसार सन 2011.12 मध्ये मृत्यु पावलेल्या व्यक्तींच्या अंत्यसंस्कारासाठी झालेल्या एकूण खर्चाची माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.
वार्षिक लेख्यामध्ये क 2 दहन भूमी व दफन भूमी या लेखाशिर्षाखाली एकूण 36,02,499/- खर्च झालेचे दिसून येते.

अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATSPSM5701 (Ref No : 167)

## *145 मिरज विभागाची कत्तलखाना फी वसुल केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : आरोग्य,*

*अनियमितता कलम : 9ड*

***सांगली व कुपवाड विभागाकडुन कत्तल फी वसुल करण्यात येत आहे.परंतु मिरज विभागाकडुन कत्तल फी वसुल केली जात नसलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

महानगरपालिका हद्दीतील कत्तल होणा-या सर्व जनावरांची फी गोळा होणे आवश्यक आहे. परंतु पावत्या व नोंदवहीची तपासणी केली असता फक्त लहान जनावरांचीच ( बोकड, मेंढया, बकरे) रु.15/- प्रमाणे एकच व्यक्ती श्री. अहमद इस्माईल जेलर हे फी गोळा करतात. महानगरपालिकेचे क्षेत्र लक्षात घेता सदर फी योग्य प्रमाणात गोळा केली जात नाही. महानगरपालिका क्षेत्रात एकुण किती मटणाची दुकाने आहेत. याचा तपशील अर्धसमास पत्राने मागणी करूनही दिलेला नाही.तसेच फी फक्त सांगली व कुपवाड या

भागातच वसुल झालेले आहे.परंतु मिरजे मधून फी गोळा करण्यात आलेली नाही.कत्तल खाना या शिर्षाखाली वार्षिक लेखा सन 2011-12 नुसार रु.78430/-रु.जमा झालेली आहेत.यासाठी एका कर्मचा-याची नेमणुक केली आहे.व त्याचा मासिक सरासरी वेतन रू.12000/- धरल्यास वेतनावर रु.144000/-खर्च झालेला आहे.याचा विचार करता फी वाढीसाठी व वसुलीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

DATSPSM5701 (Ref No : 170)

## *146 मालमत्ता विभागातील रजिस्टर अपूर्ण असलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ड*

***मालत्ता विभागातील रजिस्टर अपूर्ण असलेचे दिसून आले.***

सां.मि.कु. मनपा मालमत्ता विभागाकडील खोकी संख्या 2822 एकूण 4 रजिस्टर , वसाहत रजिस्टर 1, मक्तेबाब रजिस्टर 1 सन 10-11यातील नोंदी अपूर्ण अवस्थेत आहेत. सन 11-12 चे रजिस्टर ठेवलेले नाही.

या मध्ये जमीनीच्या नोंदी व त्यातील पट्टा मंजुर करणाऱ्या आदेशाचा क्रमांक व दिनांक , भोगवट्याचा दिनांक, पट्ट्याची मुदत, इ. रकाने भरलेले नाहीत. रजिस्टरला सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. हस्तांतरणाच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

भाडेवाढ केली किंवा नाही याच्या नोंदी नाही. कोणत्या व्यक्तिस कोणत्या ठिकाणची जागा, भुखंड, गाळे, खोकी काय मापाचे भाड्याने दिले, त्याचा ठराव मुदत इ. कोणत्याही नोंदी रजिस्टरला लिहिलेल्या नाहीत.

DATASJF7201 (Ref No : 136)

## *147 पुनर्वसन न केलेल्या खोकी धारकांची डिमांड कमी केली नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ड*

***पुनर्वसन न केलेल्या खोकी धारकांची डिमांड मालमत्ता नोंदवहीवरुन कमी न केलेने थकबाकी वाढलेचे दिसून येते.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार सांगली वखारभाग स्टेशन चौक सी.स.नं. 341 येथे व्यवसाय संकुल शॉपिंग सेंटर इमारत बांधकाम खाजगीकरणातून विकसीत करणेबाबत महासभा ठराव क्र.4 दि.19.07.2006 ने ठराव पास केला आहे. यातील मुद्दा क्रं.9 नुसार क्षेत्रातील 500 खोक्यांचे पुनर्वसन या जागेच्या बदल्यात केले जाणार असलेचे ठरविले आहे. उपरोक्त 500 पैकी पूनर्वसन केलेल्या खोक्यांच्या नोंदी मालमत्ता नोंदवहीत नोंदविणेत आल्या नाहीत. तसेच किती खोक्यांचे पुनर्वसन करणेचे बाकी आहे त्यांच्या ही नोंदी नाहीत. परंतु जुन्या रजिस्टर नंबर वरुन 2822 खोकीधारकांकडून दर साल भाडे मागणी नियमबाहयपणे केली जात असलेचे दिसुन येते.

खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

खोकी काढल्या नंतर रजिस्टर वरुन डिमांड कमी होणे आवश्यक असता ती करणेत आलेली नाही. त्यामुळे थकीत रक्कम वाढलेचे दिसुन येते.

ज्या खोकी धारकांचे पुनर्वसन करणेत आले आहे. त्यांच्या नोंदी नवीन रजिस्टरला ओढलेल्या नाहीत. त्यामुळे डिमांड समजून येत नाही.

याबाबत अर्धसमास ज्ञापना चे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 163)

## *148 महानगरपालिकेच्या मालमत्ता स्वत:च्या नावांवर नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेच्या मालमत्ता तत्कालीन नगरपालिका, ग्राम पंचायत, प्रशासक यांच्याच नावावर अद्यापही आहेत.***

मनपा मालमत्ता विभागामधील मालमत्ता नोंद वही क्रं. 1 ते 5 ची तपासणी केली असता, तीनही शहरात 473 मालमत्ता मनपाच्या मालकीचे असलेचे दिसून येते. परंतु त्यांच्या 7/12 अथवा सिटी सर्व्हे उताऱ्यावर मनपाचे नाव नोंदविणेत आलेले नाही.

| अ.क्र. | मालमत्तांची संख्या | 7/12, सिटी सर्व्हे उताऱ्यावरील नोंद |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | 172 | मिरज न.पा. |
| 2 | 78 | प्रशासक न.पा. सांगली |
| 3 | 29 | ग्रा. पं. वानलेसवाडी |
| 4 | 41 | उपआयुक्त सां.मि.कु.मनपा |
| 5 | 75 | कोणाचेही नांव नाही |
| 6 | 78 | सां.मि.कु. मनपा |
| | एकूण :- 473 | |

473 मालमत्ता पैकी फक्त 78 मालमत्तांची गांव नमुना 7/12 वर सां.मि.कु. मनपा ची नांवे आहेत. तसेच 75 मालमत्तांवर 7/12 अथवा सिटीसर्व्हे उताऱ्यावर कोणचीही नांवे नाहीत. 320 सिटी सर्व्हे उताऱ्यावरील इतर नावांची नोंद आहे. खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 155 नुसार नगरपरिषदेने खरेदी व संपादित केलेल्या सर्व जमीनी नमुना क्रमांक 129 प्रमाणे ठेवलेल्य पुस्तकात नमुद करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

सदर जमीनी नावावर नसलेने त्या जागेवर अतिक्रमण होणेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मनपाच्या विविध योजना राबविणेसाठी जागा मनपाच्या ताब्यात असणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास ज्ञापनाचे उत्तर अप्राप्त आहे.

DATASJF7201 (Ref No : 164)

## *149 जाहिरात कर, जाहिरात खुली जागा, शो टॅक्स यांची करवाढ केली नसलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : मालमत्ता,*

*अनियमितता कलम : 9ड*

***मालमत्ता विभागाकडून कर वाढीची कार्यवाही केली नसलेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असलेचे स्पष्ट होते.***

सां.मि.कु. मनपा मालमत्ता विभागातील जाहिरात कर, जाहिरातीची खुली जागा, शो टॅक्स यांची किर्द तपासता अहवाल काळात अनुक्रमे रु. 141351, 102397, 85965/- अशी वसुली झालेचे वार्षिक गोषवाऱ्यावरुन दिसते. सदर वसुली तत्कालीन नगरपालिकेच्या जुन्याच दराने करणेत येत आहे.

करामध्ये वाढ केली नसलेने मनपास जादा उत्पन्नापासून वंचित राहावे लागत आहे.

याबाबतच्या वसुलीचे ठराव अर्धसमास ज्ञापन क्रं. 280 दि. 13/06/13 ने मागणी करता ते अप्राप्त आहेत.

DATASJF7201 (Ref No : 171)

## *150 दैनंदिनी छपाईसाठी करणेत आलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :भांडार, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 135000.00 रु.

***शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस/1088/2512/उद्योग- दि.2/1/1992 व मॅन्युअल ऑफ आफीस प्रोसिजर फॉर परचेस ऑफ स्टोअर्स बाय दि गर्व्हमेंट डिपार्टमेंट निर्णयातील महत्वाचे निकषांचे साहित्य खरेदी करताना उल्लंघन करण्यात आले आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 5810 दिनांक :- 18/01/2012 रक्कम :- 1,35,000/-

महापालिकेच्या सन 2012 च्या दैनंदिनी छपाईसाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून, त्यापैकी सुधा ऑफसेट, सांगली यांचे दर रु. 225/- सर्वात कमी असल्याने त्यांची निविदा मान्य करण्यात आली असून, त्यांचेकडून संपूर्ण छपाईचे काम करुन घेण्यात आले आहे. एकूण 600 नग छपाईसाठी प्रती रु. 225/- प्रमाणे रु. 1,35,000/- एवढा खर्च झाला आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भाखस/1088/2512/उद्योग, दि.2/1/1992 मधील तरतुदीनुसार दरपत्रके सादर करताना दरपत्रकासोबत पुरवठा करावयाच्या साहित्याच्या किंमतीत शेकडा 3 टक्के प्रमाणे रु.4050/- बयाणा रक्कम म्हणून घेणे आवश्यक असता, रु.1375/- घेण्यात आलेली आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही नाही.

छपाई खर्चासाठी रु. 1,37,300/- एवढा खर्च अपेक्षित धरला आहे. परंतु अंदाजित खर्च ठरविणेसाठी दरपत्रक (Quotation) न मागविता निविदा प्रसिध्द केल्या आहेत. तसेच आलेले दर बाजारभावा नुसार योग्य असले बाबत खाते प्रमुखांनी प्रमाणीत केलेले नसलेने नियमानुसार कार्यवाही नाही.

DATRMJM6101 (Ref No : 141)

## *151 आर्थिक दुर्बल घटकातील युवती व महिलांना कुकींग, कॅटरिंग प्रशिक्षण देणेकामी निविदा न मागविता काम दिले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 190000.00 रु.

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस 1093/(2635)/उद्योग 6 दि.16 जुलै 1993 मधील तरतुदीनुसार रक्कम रु. 50,000/- च्या वरील निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतु निविदा न मागविता प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास मिळालेला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 4468 दिनांक :- 15/11/2011 रक्कम रु. :- 95,000/-

प्रमाणक क्रमांक :- 3899 दिनांक :- 15/10/2011 रक्कम रु. :- 95,000/-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर मानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल गरीब व गरजू महिलांना कॅटरिंग व कुकींग प्रशिक्षण देणेकामी शृंगार इन्स्टिट्युट सांगली यांना ठेका देणेत आला होता. प्रति लाभार्थी रु.950/- प्रमाणे 200 लाभार्थीसाठी र.रु.1,90,000/- खर्च करण्यात आला आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस 1093/(2635)/उद्योग 6 दि.16 जुलै 1993 मधील तरतुदीनुसार रक्कम रु. 50,000/- च्या वरील निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतु निविदा न मागविता प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास मिळालेला नाही.

प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्यापूर्वी संबंधीत संस्थेस देयकाची निम्मी रक्कम रु.95000/- प्रमाणक क्र.3899 दि.15/10/2011 ने मा.आयुक्त यांची मंजुरी न घेता नियमबाह्यरित्या आदा केलेली आहे.

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भाखस/1088/2512/दद्योग दि.02/01/1992 मधील तरतुदीप्रमाणे निविदाधारकांने निविदेसोबत एमूण किंमतीच्या 3 टक्के इतकी बयाणा रक्कम म्हणून किंवा कमाल 5000/- बयाणा म्हणून चालनाद्वारे / धनाकर्षाद्वारे भरुन निविदासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतु पालिकेत 1% प्रमाणे बयाणा रक्कम ठेकेदाराकडून घेणेत आली आहे.

प्रशिक्षण समाधानकारक पूर्ण झाले असलेबाबतचे प्रमाणपत्र संबंधित विभागाने न देताच देयक आदा करणेत आले आहे.

## *152 बचत गट व पतसंस्था गटास अनुदान वाटप केले नंतर उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतलेबाबत.*

**सुवर्णजयंती रोजगार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : नाग.सुविधा वि. प्रकल, केंद्र व राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 3387876.00 रु.

***बचत गटांना अनुदानाचे वाटप केले नंतर संबंधितांकडून उपयोगिता प्रमाणपत्र (Uitization Certificate) प्राप्त करुन घेतलेले नाही.***

सुवर्ण जयंती विभागाकडून बचत गटांना वेळोवेळी अनुदानाचे वाटप करण्यात येते. परंतु त्यांचेकडून दिलेल्या अनुदानाचा विनियोग कसा करण्यात आलेला आहे याची खात्री करणेसाठी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले जात नाही.

वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये एकूण रु.9,20,000/- चे वाटप महिला बचतगटास केलेले आहे. व एकूण 109 वैयक्तीक लाभार्थ्यांना रु.24,67,876/- अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. परंतु त्यांनी केलेल्या रक्कमेच्या विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतली नसलेने लाभार्थीचा आर्थिक स्तरामध्ये बदल झालेची व अनुदानाचा उपयोग विहीत कारणासाठीच केला आहे किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

DATRMJM6101 (Ref No : 140)

## *153 फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणाचे काम निविदा न मागविता दिलेने झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 187500.00 रु.

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस 1093/(2635)/उद्योग 6 दि.16 जुलै 1993 मधील तरतुदीनुसार रक्कम रु. 50,000/- च्या वरील निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतु निविदा न मागविता शृंगार इन्स्टिट्युट यांना प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेले आहे.***

प्रमाणक क्रमांक :- 4743 दिनांक :- 25/11/2011 रक्कम रु. :- 93,750/-

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विधवा, घटस्फोटीत गरजू महिलांना फॅशन डिझयनिंग प्रशिक्षण देणेकामी स्थायी समिती ठराव क्र.263 विषय क्र.06 दिनांक 12/08/2011 अन्वये प्रशिक्षण खर्चाकरीता रु.1,87,500/- रक्कमेस मंजुरी दिलेली आहे. व शृंगार इन्स्टिट्युट सांगली यांना प्रती लाभार्थी रु.750/- या प्रमाणे, 250 लाभार्थींना प्रशिक्षण देणेसाठी एकूण रक्कम रु.1,87,500/- आदा केली आहे.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस 1093/(2635)/उद्योग 6 दि.16 जुलै 1993 मधील तरतुदीनुसार रक्कम रु. 50,000/- च्या वरील निविदा मागविणे बंधनकारक आहे. परंतु निविदा न मागविता प्रशिक्षणाचे काम देण्यात आलेने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास मिळालेला नाही.

प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्यापूर्वी संबंधीत संस्थेस देयकाची निम्मी रक्कम रु.93,750/- प्रमाणक क्र.4743 दि.25/11/2011 ने मा.आयुक्त यांची मंजुरी न घेता नियमबाह्यरित्या आदा केलेली आहे.

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भाखस/1088/2512/दद्योग दि.02/01/1992 मधील तरतुदीप्रमाणे निविदाधारकांने निविदेसोबत एमूण किंमतीच्या 3 टक्के इतकी बयाणा रक्कम म्हणून किंवा कमाल 5000/- बयाणा म्हणून चालनाद्वारे / धनाकर्षाद्वारे भरुन निविदासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतु पालिकेत 1% प्रमाणे बयाणा रक्कम ठेकेदाराकडून घेणेत आली आहे.

प्रशिक्षण समाधानकारक पूर्ण झाले असलेबाबतचे प्रमाणपत्र संबंधित विभागाने न देताच देयक आदा करणेत आले आहे.

DATRMJM6101 (Ref No : 148)

## *154 अतिक्रमण विभागाच्या नगण्य कामगिरीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :अतिक्रमण,*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 6424920.00 रु.

***स्वच्छता निरीक्षकांच्या कामगिरीपेक्षा वेतनावर जादा खर्च केलेला आहे.***

अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून अहवाल काळात खालीलप्रमाणे प्रभाग निहाय वसुली झालेचे दिसते.

| अ.क्र. | प्र.स.क्र. | स्वच्छता निरिक्षक यांचे नांव | वसुल रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 1 | श्री. ए.बी. सुर्यगंध | 10575 |
| 2 | 1 | श्री. डी. वाय. मंजलकर | 45525 |
| 3 | 1 | श्री. वाय.एस.बारगीर | 11275 |
| | | एकूण | 67375 |
| 1 | 2 | श्री. ए.बी. कुलकर्णी | 38600 |
| 2 | 2 | श्री. आर.के.दामटे | 7925 |
| 3 | 2 | श्री. आर.यु.साबळे | 19625 |
| 4 | 2 | श्री. याकुब मद्रासी | 7500 |
| | | एकूण | 73550 |
| 1 | 3 | श्री.पी.एम.रोकडे | माहिती अप्राप्त |
| 2 | 3 | श्री. आर.के.यादव | |
| 3 | 3 | श्री. व्ही.ए.दशवंत | |
| 4 | 3 | श्री. ए.डी.पाटील | |
| | | एकूण | |
| 1 | 4 | श्री. के.जी. गोंधळेकर | 100 |
| 2 | 4 | श्री. के.डी. पाटणकर | 27780 |
| 3 | 4 | श्री. एस.आर.पै | 7250 |
| 4 | 4 | श्री. बी.के.सिसाळे | 16545 |
| | | एकूण | 51675 |
| | | एकूण | 192600 |

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनावर अहवाल काळात रक्कम रु. 64,24,920/- इतका खर्च झालेचे वेतन देयकांची पडताळणी करता दिसून आले. परंतु अतिक्रमण निर्मुलनाचे कामामध्ये एकूण वसुली रुपये 192600/- ची करणेत आली आहे. त्यामुळे कामापेक्षा वेतनावर खर्च जादा झालेचे स्पष्ट होते.

त्यांचे कार्यालय प्रमुख, पथक प्रमुख यांनी वेळोवेळी आढावा घेऊन अतिक्रमण निर्मूलनाच्या कामाकाजाकडे लक्ष दिलेचे दिसून येत नाही.

प्रभाग अधिकारी यांनी स्वच्छता निरिक्षकांना अतिक्रमण निर्मूलनाबाबत दिलेले आदेश, त्यांच्या दैनंदिन्या इ. अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

### *155 वृक्ष व रोपे यांचे लेखे ठेवणेत आले नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष :उद्यान विभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सांगली मिरज आणि कुपवाड या महानगरपालिका परिसरात 26 उद्याने, 4 आयलँड, व शहरातील इतर मोठे वृक्ष याबाबतचे लेखे नगरपालिका लेखा संहिता नियम 116 नुसार नोंदवहीत ठेवलेले नाहीत.***

लेखा संहिता नियम 116 नुसार आवश्यक त्या नोंदवह्या लेखा परीक्षण कामी दाखविल्या नाहीत.

| नोंद वही नं. | प्रकार |
|---|---|
| 83 | उद्याने खाते वही |
| 85 | संकीर्ण मागण्या नोंदवही |
| 78 | किरकोळ जमा संकलन नोंदवही |
| 91 | संकीर्ण मागणी नोंदवही |

रोपांची व इतर वस्तुंची उधार विक्री किती झाली व अद्याप पर्यंत किती येणे शिल्लक आहे याची सविस्तर माहिती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

सन 11-12 या वर्षात झाडावरच्या फळांची लिलावाद्वारे केलेल्या विक्रीचे कागदपत्रे व विक्रीची रक्कम किती याची माहिती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही.

सांगली,मिरज, कुपवाड महानगरपालिका परिसरात 26 उद्याने व 4 आयलँडस् आहेत अशी माहिती उद्यान विभागाने उपलब्ध केली आहे व मालमत्ता विभागने 16 उद्यानांची माहिती दिली आहे. माहितीत तफावत असल्याने अचूकतेबाबत खात्री झाली नाही.

शहरातील उद्याने व सर्व झाडे यांची एकत्रीत माहिती उपलब्ध केली नाही. कोणत्या प्रकारची किती झाडे, त्यांचे सध्याचे वय काय, नैसर्गिक आपत्तीत पडून ज्यांचा लिलाव केला ती झाडे किती आहेत. या बाबतची सविस्तर माहिती उद्यान विभागाकडे नाही.

वृक्षांची जोपासना करणे व लेखा ठेवणे याबाबत मनपा नियमात पुरेशी तरतुद नाही. अशा परिस्थितीत कृषी विद्यापीठ व शासनाकडील कृषी कार्यालये यांच्या साठी नियमात असलेल्या नोंदवह्यामध्ये लेखा ठेवणे आवश्यक आहे. वृक्ष लावणे व संवर्धन करणे यावर दरवर्षी मोठ्याप्रमाणात खर्च होत असलेने वृक्ष संवर्धनाचे सर्व लेखे तयार करुन ठेवणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 123)

## *156 नवीन बॅटरी / ऑईल खरेदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : वाहनविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 642961.00 रु.

***वर्कशॉप विभागाने ऑईल व बॅटऱ्या खरेदी केल्या असून, लेखा संहिता 1971 नियम क्र.145 प्रमाणे नमुना क्रमांक 116 प्रमाणे संग्रह पुस्तक ठेवले नसलेने खरेदी केलेले ऑईल व बॅटऱ्या कोणत्या गाडयांकरिता वापरले याबाबत तपासणी करता आली नाही.***

| अ.क्र | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1 | 7913 | 27/03/2012 | 460000 | भारत मोटर्स (ऑईल) |
| 2 | 6892 | 07/03/2012 | 182961 | व्यंकटेश एंटरप्रायझेस (बॅटरी) |

सां.मि.कु. मनपा कडील वर्कशॉप विभागाकडून उपरोक्त प्रमाणक क्रं. 1 व 2 ने 17 बॅटऱ्या व ऑईल खरेदी करणेत आले आहे.

याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

ऑईल खरेदीची साठा नोंदवही ठेवणेत आलेली आहे. परंतु लेखा संहिता 1971 नियम क्र.145 प्रमाणे नमुना क्रमांक 116 प्रमाणे संग्रह पुस्तक ठेवले नसलेने कोणत्या गाडीमध्ये किती लीटर ऑईल कोणत्या कालावधीत घातले ते समजुन येत नाही.

बॅटऱ्या खरेदी मधील जुन्या बॅटऱ्यांची स्टॉक नोंदवही व नविन बॅटऱ्यांची स्टॉक नोंदवही ठेवणेत आली नाही.

गाडयाचे हिस्ट्रीशीट ठेवलेले नसलेने, खरेदी केलेले ऑईल व बॅटऱ्या कोणत्या गाडयांकरिता वापरले याबाबत तपासणी करता आली नाही.

भारत मोटर्स कडून ऑईल खरेदी, व व्यंकटेश एंटरप्रायझेस कडील बॅटऱ्या खरेदीच्या बीलांसोबत डिलीव्हरी चलने नसलेने, साहित्य कधी प्राप्त झाले याची खात्री होऊ शकले नाही.

उपरोक्त आक्षेपांच्या पूर्ततेे अभावी खर्च रु. 642961 आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATASJF7201 (Ref No : 158)

## *157 मनपा पॅनेलवरील वकीलां व्यतिरीक्त अन्य वकीलांना दिलेल्या वकील फी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विधी, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 262970.00 रु.

***मनपाने वतीने विविध न्यायालयामध्ये दाखल दाव्यांसाठी वकीलांची नियुक्ती महासभा ठरावाने केली आहे. परंतू नगररचना विभागाने पॅनेलच्या व्यतिरिक्त अन्य वकीलांची नेमणूक करुन त्यांना वकील फी अदा केली आहे.***

प्रमाणक क्रमांकाचे सविस्तर परिशिष्ठ क्रमांक ( 15 ) अहवालास जोडणेत आले आहे.

सन11-12 या लेखापरीक्षण वर्षात नगररचना विभागाने उच्च न्यायालयात विविध न्यायालयीन प्रकरणासाठी महानगरपालिकेच्या वतीने नेमलेले ॲड. जी. एच.केळूसकर, ॲड. सुधीर प्रभू, व ॲड. नरेंद्र वालावलकर यांना रु. 2,62,970/- आदा केले आहेत.

महानगरपालिका ठराव क्र. 34 दि. 10/10/2008 नुसार मुंबई येथील न्यायालयीन कामकाजासाठी ॲड. उमेश माणकापुरे ॲड. गजानन सावगावे ॲड. अशुतोष कुंभकोणी व महानगरपालिका ठराव क्र. 06 दि. 19/11/2008 अन्वये ॲड. भूषण तु. वाळींबे यांची नेमणूक केली आहे. तसेच यापूर्वी वेळोवेळी महासभेने नियुक्त केलेल्या वकीलांचे नियुक्तीचे ठराव रद्द केले आहेत.

पॅनेल वरील वकीलाऐवजी अन्य वकीलांची नेमणूक करणे बाबत कोणताही महासभा ठराव लेखापरीक्षणावेळी दाखविला नसलेने संबधीत वकीलांची नेमणूक करणे व त्यांना मानधन आदा करणे नियमबाह्य आहे. सबब उपरोक्त वकीलांना आदा केलेले मानधन रु. 2,62,970/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 168)

## *158 न्यायालयीन दाव्यांची नोंदवही अपूर्ण असले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: विधी विभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***नगरपालिका लेखासंहिता नियम क्र. 121 प्रमाणे दाव्यांची नोंदवही ठेवणेत आली आहे. परंतू त्यामध्ये अपूर्ण माहिती लिहणेत आली आहे.*** |

अर्धसमास पत्रास विधी विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये दिलेली माहिती व त्यानुसार केलेले लेखापरीक्षण यामध्ये विसंगती आढळून येते.

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

नगरपालिका लेखासंहिता 1978 चे नियम 112 प्रमाणे नमुना क्र. 90 प्रमाणे दावा खटल्याचे पुस्तक ठेवणेत आले आहे. परंतू त्यामध्ये नियुक्त केलेल्या पॅनेलवरील वकीलांची नांवे, त्यांना दिलेल्या अगाऊ रकमा, मानधन, कोर्टाच्या हुकुमानुसार प्रदानाच्या रक्कमांची माहितीचे कॉलम भरणेत आलेले नाहीत..

अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये विधी विभागाकडे सांगली, मिरज येथील दिवाणी व फौजदारी , कामगार व औद्योगिक न्यायालयात एकुण 473, उच्च व सर्वोच्च न्यायालयात एकुण 62 दावे प्रलंबित असुन त्या व्यतिरिक्त काहीं दावे कायदे विभागात नोंद न होता परस्पर संबधीत विभागाकडे वर्ग झालेने त्याची माहिती उपलब्ध नाही. असे नमूद केले आहे. या वरुन सर्व दाव्यांची माहिती विधी विभागाने संकलित केलेचे दिसुन येत नाही.

बरेच विभाग विविध न्यायालयात प्रलंबित खटल्यासाठी आवश्यक असलेली माहिती विधी विभागास पुरवित नसलेने कोर्टाचे निर्णय महानगरपालिकेच्या विरुध्द जाणेची शक्यता नाकारता येत नाही. उदा. रे.दि.मु.नं. 21/11, रे.दि.मु.नं 31/11, रे.दि.मु.नं 39/11, रे.दि.मु.नं 44/11, रे.दि.मु.नं 33/11, रे.दि.मु.नं 57/11, या दाव्यांची संबधित विभागांनी विधी विभागास माहिती दिलेली नाही.

विधी विभागाने अर्धसमास पत्रास दिलेल्या उत्तरामध्ये प्रलंबित खटल्यांच्या यादी प्रमाणे नगररचना , मालमत्ता, व करनिर्धारण विभाग वकीलांना व विधी विभागास न्यायालयीन कामकाजासाठी कागदपत्रे पुरवित नसलेचे स्पष्ट होत आहे. त्या पृष्ठ्यर्थ वकीलांची पाठविलेली पत्र आवक क्र. कावि 358 दा.ता. 14/02/13 , कावि356/14.02/2013 दाखविली आहेत. व महासभा ठराव क्र. 34 दि. 10/10/2008 व महासभा ठ.क्र. 06 दि. 19/11/2008 अन्वये सांगली, मिरज विभागासाठी एकुण 18 व मुंबई न्यायालयीन कामकाजासाठी 3 व सर्वोच्च न्यायालयात 3 वकीलांची नेमणूक महानगरपालिकेचे पॅनेलवरील दोन वर्ष कालावधीसाठी केली आहे. सदर मुदत संपले नंतर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम

1949 चे नियम 481(ज) नुसार नविन पॅनेल नियुक्तिचा अहवाल महासभेकडे पाठवुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही न केलेने मुदत संपलेले पॅनेलकडून न्यायालयीन कामकाज पार पाडले जात आहे.

DATSBKM7201 (Ref No : 169)

## *159 विद्युत दिव्यांचा हिशोब विहीत नमुन्यात ठेवला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : विद्युत विभाग,*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 147 अन्वये नमुना क्र. 119 मध्ये विद्युत दिव्यांचा हिशोब ठेवणे गरजेचे असताना ठेवण्यात आलेला नाही.***

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम क्र. 147 अन्वये रस्ता प्रकाश योजनेसाठी बसविलेल्या विद्युत दिव्यांची संख्या नमुना क्र. 119 मध्ये ठेवली नसलेने साठा नोंदवहीशी ताळमेळ घेता आला नाही.

DATRMJM6101 (Ref No : 143)

## *160 भांडारामध्ये असलेल्या निरुपयोगी, उपयोगात नसलेल्या किंवा गरजेपेक्षा अधिक शिल्लक मालाच्या याद्या ठेवणेत आल्या नसले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : भांडारविभाग, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निरुपयोगी, उपयोगात नसलेल्या किंवा गरजेपेक्षा अधिक घोषित केलेल्या तसेच गरजेपेक्षा अधिक कोणत्या कारणांनी झाल्या त्या कारणांचा निर्देश करुन अद्यावत याद्या लेखापरीक्षणासाठी सादर केल्या नाहीत.***

महाराष्ट्र लेखा संहिता 1971 परिशिष्ट 2 भाग फ भांडार मालाची विक्री नियम क्रमांक 40 नुसार निरुपयोगी

विनावापर पडून राहीलेले साहित्य व इतर तत्सम वस्तु निकालात काढण्याबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना असुनसुध्दा त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. नोंदवही/वस्तूंची यादी सादर करणेत आलेली नाही.

प्रत्येक वर्षी सप्टेंबर व मार्च महिना अखेर मध्यवर्ती भांडार आणि उपभांडार यांच्याकडे असलेल्या शिल्लक मालाच्या याद्या तयार करण्यात याव्यात. जर अशा कोणत्याही मालाची गरज नसेल तर उक्त अतिरिक्त मालाची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात यावी.

जेंव्हा कोणत्याही प्रकारचा भांडार माल अनुपयुक्त होईल तेंव्हा भांडार ताब्यात असणाऱ्या अधिकाऱ्याने विनाविलंब अहवाल सादर केला पाहिजे, कारण शिल्लक वा अनुपयुक्त मालाची विल्हेवाट लावण्यास होणारा विलंब मुल्यऱ्हासास कारणीभूत होतो आणि साठवणुकीचा अनावयश्यक खर्च करणे भाग पडते. पर्यायाने हे पालिकेचे आर्थिक नुकसान आहे.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

DATRMJM6101 (Ref No : 151)

## *161 सामान्य रोकड वहीतील अनियमितते बाबत.*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, केंद्र व राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या खात्यावर मार्च 2012 अखेरची पास बुक शिल्लक रक्कम रुपये 2,06,40,222/- एवढी आहे. कामाचे नियोजन करून वेळीच रक्कम खर्च करणेचे प्रयत्न केलेले नाहीत. व सर्वसाधारण रोकड वही नमुना क्रं.11 मध्ये ठेवणेत आलेली नाही.***

सदर कामाबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे खाते क्रं. 160010200011541 हे बँक ऑफ इंडियात आहे. या खात्यावरील मार्च 2012 अखेरची पास बुक शिल्लक रक्कम रुपये 2,06,40,222/- एवढी आहे. कामाचे नियोजन करून वेळीच रक्कम खर्च करणेचे प्रयत्न केले नाहीत.

मार्च 2012 अखेर न वटलेल्या धनादेशाची रक्कम रूपये 43,17,742/- एवढी आहे. लेखा परीक्षणाचे तारखेपर्यंत किती धनादेश वटले व अद्याप किती धनादेश वटायचे आहेत. याचा सविस्तर तपशील लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही.

नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नमुन्यानुसार इतर खात्याची सर्वसाधारण रोकड वह्या ठेवल्या आहेत. या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची सर्वसाधारण रोकड वही नमुना नं.11 मध्ये ठेवणेत आली नाही.

माहे एप्रिल 2011 ते 21 मार्च 2013 पर्यत सामान्य रोकड पुस्तकातील नोंदी पडताळून मुख्य लेखाधिकारी यांनी सह्या केल्या नाहीत. वर्षभर रोकड वहीचा आढावा न घेताच खर्च केला जात होता. आता लेखा परीक्षणावेळी 21 मार्च 2012 रोजी सह्या केल्या आहेत. नियमानुसार वेळीच कार्यवाही केली जात नाही.

सामान्य रोकड वही नमुना नं. 11 अशा अत्यंत महत्वाच्या नोंद वहीतील आर्थिक व्यवहार वेळीच पडताळले जात नाहीत. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 124)

## *162 वॉर्ड क्रं. 51 मधील कोळके घर ते शेख घरापर्यंतचा रस्ता सुधारणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष: सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 150102.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 4857.00 रु.,

***देयकातुन विमा , रॉयल्टी व कामगार कल्याण उपकर वसुल करणेत आलेला नाही.***

प्रमाणक क्रमांक :- 7768 दिनांक :- 31.03.2012 रक्कम :- 1,50,102/-

अंदाजपत्रकीय रक्कम :- 1,50,105/-

प्रशासकीय मान्यता :- स्था.स. ठराव क्र.685 दि.20.03.2012

तांत्रिक मान्यता :- दिनांक 28.02.2012

ठेकेदाराचे नांव :-बालाजी मजूर सह, सोसा.

कार्यादेश क्रमांक / दिनांक :- 27.03.2012 कामाची मुदत :-21 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक :- 3 पृष्ठ क्रमांक :- 89

खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी 2305 सह विमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% कामगार विमा रक्कम रु. 1501/- पैकी रु.754/- देयकातून कपात केलेली नाही.

उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/ प्रक्र.108/कामगार 7 अ दिनांक 17 जून 2010 अन्वये 1% कामगार कल्याण उपकर रक्कम रु.1501/- देयकातून कपात केलेली नाही.

काम वाटप समितीचे पत्र दिनांक 14/03/2012 नुसार बालाजी मजूर सह. सोसायटीस हे काम देणेत आले आहे. या सोसायटीकडून बी-1 निविदा फॉर्म भरून घेणेत आला नाही व फॉर्ममधील अटीशर्तीप्रमाणे करारनामा करणेत आला नाही.

सा.बां.वि. शासन परिपत्रक दिनांक 15/05/2007 नुसार बी-1 फॉर्मची किमंत रक्कम रुपये 500/- सोसायटीकडून वसूल केली नाही.

सा.बा.वि. महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. संकिर्ण 1097/सी आर 622 इमारती -2 दिनांक 29/06/1999 अन्वये उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात कामाची मोजमापे स्वत: नोंद केली नाही व 100 % चेकींग केले नाही.

या कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर करणेत आला आहे.

बाब क्रं. 1 - प्रीमीक्स कारपेट 25 मी.मी. 659.99 चौ.मी.

8.51 ब्रास x रु.200 = रु. 1702/-

बाब क्रं. 2 - सीलकोट 659.99 चौ.मी.

2.09 ब्रास x रु. 200 = रु.400/-

--------------

रु. 2102/-

========

रॉयल्टीची रक्कम रु. 2102/- वसूल पात्र आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

DATBPCM5601 (Ref No : 125)

## *163 सांगली येथील वॉर्ड क्र.47 गव्हर्मेंट कॉलनी 80 फूटी रस्ता सुधारणा करणे कामातील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2011-2012**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम, स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

, आक्षेपाधीन रक्कम : 283023.00 रु.

वसूलपात्र रक्कम : 32500.00 रु.,

| |
|---|
